**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**नाशिक महानगरपालिकेत अनेक कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार**

**(१) * ३७७९८ श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.संजय दत्त, श्री.मोहन जोशी, श्री.एम.एम.शेख, श्री.सुभाष चव्हाण :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेमध्ये जवाहरलाल नेहरू घरकुल योजनेअंतर्गत ठेकेदाराला जास्त पैसे देण्याचा आदेश देणे, श्वान निर्बिजीकरण टेंडरचा ठेका टेंडर शिवाय देणे, गणवेश खरेदीतही ई टेंडर न करता परस्पर संस्थेला देणे, या सगळ्या गोष्टी मध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याकरिता मा.मुख्यमंत्री व नगरविकास सचिव यांच्याकडे दिनांक ४ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने यात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : नाशिक महानगरपालिकेत अनेक कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी मी प्रश्न विचारलेला आहे. या भ्रष्टाचारासंबंधी संपूर्ण नाशिक शहरामध्ये चर्चा सुरु आहे. वर्तमानपत्रातून अग्रलेख लिहिले गेले आहेत. नाशिक महानगरपालिकेमध्ये ज्यांची सत्ता आहे त्या मनसे आणि भाजपच्या नगरसेवकांनी देखील महापौरांना आणि आयुक्तांना पत्रे लिहिली आहेत. या प्रश्नाच्या बाबतीत शासनाकडून असे उत्तर देण्यात आलेले आहे की, प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे. ज्यांच्या विरुध्द तक्रारी आहेत त्यांच्याकडूनच अहवाल आला असून अहवालासंबंधीचे काम करीत असताना घोडचुका झालेल्या आहेत. उदा. तीन मिनिटामध्ये महापालिकेची सभा झाली. सभेमध्ये लगेच राष्ट्रगीत वाजवून आणि मंजूर मंजूर म्हणून महापौरांनी दोन-अडीचशे कोटींचे ठराव पारित केले. यामध्ये रोबोटिक मशिनचा विषय आहे. हे मशिन ५ कोटी रुपयास घेऊन त्याच्या मेण्टेनन्ससाठी साडेचार कोटीचा ठराव मंजूर करण्यात आला. अतिशय गंभीर अशा गोष्टी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

१३-०३-२०१३ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-२

MSS/ KTG/ D/ ११:००

ता.प्र.क्र.३७७९८.... श्री. जयप्रकाश छाजेड...

घडलेल्या आहेत. या गोष्टीकडे लक्ष दिले नाही तर नाशिक शहरातील लोकांचा महानगरपालिकेच्या कामकाजावरचा विश्वास उडेल.

दुसरा एलअेडीचा २०० कोटी रु.चा विषय देखील गंभीर आहे. एका अधिका-याने प्रस्तावावर ज्युनिअर इंजिनिअर म्हणून सही केली, त्याच अधिका-याने डेप्युटी इंजिनिअर म्हणून सही केली आणि पुढे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर म्हणून आणि एस.ई.म्हणूनही सही केली. जो एलअेडी संबंधीचा प्रमुख होता त्याने असे लिहिलेले आहे की, केवळ या कंपनीला डोळयापुढे ठेवून टेंडर काढलेले आहे. ही ब्लॅकलिस्ट झालेली कंपनी असून या कंपनीला कोणताही अनुभव नाही. असे असताना या कंपनीला टेंडर दिलेले आहे. अशा प्रकारची अनेक वेगवेगळी प्रकरणे आहेत. श्वान निर्बिजीकरणाचा ठेका टेंडर शिवाय दिला गेला आहे. हे काम टेंडरविना देण्याइतके तातडीचे नव्हते. कुत्र्यांना लगेच पिल्ले होणार नव्हती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37798...

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, माझी एकच मागणी आहे की, यासंदर्भात जो अहवाल प्राप्त झालेला आहे. सभागृहातील 98 टक्के सदस्य एका बाजूला असताना त्यांच्या विरोधात जाऊन ठराव पास करुन घेण्याचा अधिकार महापौरांना आहे काय ? या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठरावावर चर्चा न करता तीन मिनिटांमध्ये सभा संपविण्यात येऊन त्या तीन मिनिटांच्या सभेत शेकडो रुपयांची प्रकरणे मंजूर करुन घेण्यात आली. त्या मंजूर प्रकरणांना पूर्ण चौकशी होईपर्यंत स्थगिती देण्यात येईल काय ? कुंभमेळ्याच्या प्रश्नावर महानगरपालिकेकडून अतिशय गोंधळाचा कारभार चालला आहे. कुंभमेळयासाठीचा निधी महानगरपालिकेकडे गेला तर त्यात मोठया प्रमाणात गैरप्रकार होतील. म्हणून नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळयासाठी सरकार स्वतंत्र प्राधिकरण निर्माण करील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी नाशिक महानगरपालिकेच्या कारभारातील तीन गोष्टींचा उल्लेख केला. त्यात गणवेश खरेदी, बीएसयूपी प्रोजेक्ट व एलईडी प्रोजेक्ट, श्वान निर्बिजीकरण या संदर्भात त्यांनी विस्ताराने माहिती सभागृहात दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांना पूर्वी एक पत्र दिले होते. नगरविकास सचिवांना देखील एक पत्र दिले होते. त्या अनुषंगाने शासनाकडून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. सदरहू चौकशीचा अहवाल महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून मागविण्यात आला होता. आता सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाच्या रुपाने अधिक माहिती दिली आहे. या संदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांनी चौकशीचा अहवाल शासनाकडे पाठविलेला आहे. त्याची खातरजमा करुन घेऊन, त्या संदर्भातील परिपूर्ण माहिती घेऊन उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या एकूणच कारभाराचे विकेंद्रीकरण करताना आपण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देतो. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या शहरासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून पारदर्शकपणे कारभार करणे, तसेच त्यांच्या शहरांचा विकास करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असते. परंतु या सर्व गोष्टी

2...

ता.प्र.क्र.37798...

श्री.हेमंत टकले....

बाजूला ठेवून जे पैसे येतात, ते अतिशय गैरमार्गाने वेगवेगळया कामांच्या नावावर काढून घेतले जातात. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा होतात, त्या सभेमध्ये गोंधळाचे वातावरण तयार करुन सगळे विषय मंजूर करुन घेतले जातात. आणि त्याप्रमाणे पुढची कार्यवाही केली जाते. मला असे वाटते की, या सगळया गोष्टींची चौकशी किंवा अहवाल आपण महानगरपालिका आयुक्तांकडून मागविता ही एका स्तरावर ठीक गोष्ट आहे. पण या टायर सिस्टीममध्ये नगरविकास विभागाच्या सचिवापर्यंतचा स्तर आहे. पण यात मधला एखादा स्तर नाही काय ? विभागीय आयुक्तांच्या पातळीवर या बाबतची माहिती अप्रत्यक्षरित्या किंवा वेगळया पध्दतीने घेऊ शकत नाही काय? जर अशी अनियमितता होत असेल, अशा प्रकारे गैरकारभार होत असेल तर त्या गोष्टींना पायबंद बसावा म्हणून या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत गोंधळ घालून जी प्रकरणे मंजूर करुन घेतली आहेत, त्या प्रकरणांना ताबडतोब स्थगिती देऊन या संदर्भात संपूर्ण चौकशी केल्या शिवाय पुढचे पाऊल टाकता येणार नाही अशा प्रकारची खबरदारी शासन घेणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी देखील अधिकची माहिती दिलेली आहे. केंद्र शासन व राज्य शासनाकडून मिळणारा जो निधी आहे, त्याचा चुकीच्या पध्दतीने विनियोग केला जातो आहे आणि म्हणून नवनिर्माण काय केले जाते आहे याचा शोध घेण्याकरिता महानगरपालिका आयुक्तांना सांगितले आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्या पध्दतीने नगरपालिका, महानगरपालिका यांच्यावर थोडा जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांचा, संचालकांचा नगररचना संचालकांचा नंतर सचिवांचा थोडा कंट्रोल असतो, तदनंतर नगरविकास मंत्र्यांचा कंट्रोल असतो अशा प्रकारची व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने नगरविकास विभागाचा प्रयत्न आहे. सदर चौकशीच्या बाबतीत आयुक्तांनी चुकीची माहिती दिली आहे अशी बाब निदर्शनास आली तर त्या बाबतीत नगरविकास विभागाच्या सचिवांच्या पातळीवर चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते 11:10

ता.प्र.क्र.37798.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेमध्ये सत्ता स्थापन होऊन 7 महिने उलटले आहेत. अशा परिस्थितीत हा भ्रष्टाचार कोणत्या कालावधीत झाला? आयुक्तांनी सुरु केलेल्या चौकशीचे स्वरुप काय आहे आणि कुंभमेळ्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकारकडून किती अनुदान दिले गेले आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. कुंभमेळ्याबाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात मदत करणार आहे. राज्य सरकारने वेळीच दखल घेऊन चर्चा सुध्दा केली आहे. तसेच पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागामार्फत काही चांगले निर्णय घेतले आहेत. वाहनतळ उभारणे, कलम 37 अंतर्गत प्रस्ताव तयार करणे या संदर्भात कायमस्वरुपी निर्णय कसा घेता येईल याची चर्चा राज्य सरकारच्या पातळीवर सुरु आहे. या संदर्भातील दक्षता शासन अगोदरच घेणार आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी याच विषयावर यापूर्वी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री महोदयांनी सखोल चौकशी केली जाईल व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असेच उत्तर दिले होते. शासनाच्या वतीने संबंधित आयुक्तांना देखरेख करण्याकरिता अधिकार दिलेले असताना अधिकारी मंडळी एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करुन अशा प्रकारचे काम करीत असतील तर त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार आहात? शासनाने चौकशीचे आदेश दिले होते त्या चौकशीमध्ये काय आढळून आले? दोन-तीन मिनिटाच्या वेळेत करोडो रुपयांच्या निधीला मंजुरी दिली जाते, हे शासनाला अभिप्रेत होते का? शासन या संदर्भात तातडीने स्थगिती देणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्था या स्वायत्त आहेत. तेथे जे सत्ताधारी असतात त्यांनी समाजामध्ये आपल्या कार्याने, कर्तृत्वाने आपली स्वच्छ प्रतिमा कशी निर्माण होईल यादृष्टीने काम करणे आवश्यक असते. या संदर्भातील नियमावली देखील तयार केलेली आहे. सातत्याने सरकार हस्तक्षेप करीत नाही, कारण स्वायत्त संस्था आहेत. तशीच परिस्थिती उद्भवली, चुकीच्या पध्दतीने काम करण्याचा प्रयत्न होत असेल तर सरकार निश्चितपणे दखल घेईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37798........

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यात माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही आघाडी सरकारने पारदर्शकतेसाठी पुढाकार घेतला, त्याचे दृश्य परिणाम दिसून येत आहेत. लोकांकडून याचे स्वागत होत असताना काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भ्रष्टाचार होताना दिसून येतो. अकोला महानगरपालिकेमध्ये आमच्याच पक्षाची सत्ता असताना तेथे गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी कडक कारवाईची भूमिका स्वीकारली. त्यामुळे हा प्रश्न नाशिक महापालिकेपुरता मर्यादित न समजता यातून संपूर्ण राज्यामध्ये मेसेज जातो म्हणून शासनाने हस्तक्षेप करुन चौकशीअंती कडक कारवाई करावी अशी मी या प्रश्नाच्या निमित्ताने मागणी करतो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी सांगितले ते योग्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना आपण अधिकाधिक स्वायत्तता देण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था या निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या तिसऱ्या स्तरावरील संस्था आहेत. या संस्था बळकट करण्यासाठी आपण त्यांना खूप अधिकार दिले आहेत. त्यांना स्वायत्तता देण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्याकडून अधिकाराचा गैरवापर होताना दिसतो.

सभापती महोदय, हा प्रश्न नाशिक महापालिकेतील प्रकाराबद्दल विचारण्यात आला आहे. त्या संदर्भात आयुक्तांचा अहवाल आलेला आहे. आयुक्तांनी अहवालानंतर आणखी काही चौकशी करावयाची असेल तर ती केल्यानंतर कडक कारवाई केली जाईल. ही महापालिका कोणत्या पक्षाच्या ताब्यात आहे हे महत्वाचे नसून कुंभमेळ्याचा विषय हाताळणे महत्वाचे आहे. पारदर्शक कारभार चालला पाहिजे, लोकाभिमुख काम झाले पाहिजे, यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. अनेक कायदे कडक केलेले आहेत.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 37798......

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

गेल्या वर्षभरात महानगरपालिका, नगरपालिकांमधील प्रशासन सुधारण्यासाठी शासनाने अनेक कायदे केलेले आहेत. अगोदरच्या काळात निर्णय घेण्यामध्ये जाणूनबुजून विलंब लावला जात होता, निर्णय घेतले जात नव्हते परंतु यासंदर्भात आता कायदे करण्यात आलेले आहेत. एंकदरीत महानगरपालिका, नगरपालिकांमधील प्रशासनामध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी, अपव्यय टाळण्यासाठी आपल्याला अधिक प्रयत्न करावे लागणार आहेत. परंतु या प्रकरणाच्या संदर्भात मी आश्वस्त करु इच्छितो की, या अहवालाची सखोल चौकशी करुन अजून उच्चस्तरावर चौकशी करुन त्यामध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. सर्व महानगरपालिका,नगरपालिकांमधील प्रशासनामध्ये बदल करण्यासाठी निश्चितपणे पाऊल उचलले जाईल एवढे मी या निमित्ताने आश्वासित करु इच्छितो.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, मी नाशिक महानगरपालिकेत नगरसेवक म्हणूनही काम करतो. नाशिक महानगरपालिकेच्या सर्व कामांची चौकशी केली तर आपल्याला दिसून येईल की, या ठिकाणच्या कामातील डीएसआर सुध्दा बदलण्यात आलेले आहेत. जेएनएनयुआरएमची जी काही कामे घेतली जातात ती मुद्दाम लेट केली जातात. या कामाच्या संदर्भात चौकशी करुन त्यामध्ये तीन अधिकारीही निलंबित करण्यात आले होते येथपर्यंतचा भ्रष्टाचार सिध्द झालेले असतांना पुन्हा महासभेचा ठराव करण्यात आला व निलंबित करण्यात आलेले 3 अधिकारी पुन्हा कामावर घेतले व पुन्हा त्यांना त्याच पदावर बसविले गेले. असे प्रकार आता वारंवार होत आहेत त्यामुळे हा भ्रष्टाचार थांबवला नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे तसेच या ठिकाणच्या सर्व कामांना तातडीने स्थगिती दिली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय,या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व काही स्पष्ट केलेले आहे की, यामध्ये पूर्णपणे सखोल चौकशी केली जाईल,प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने जे नियम आणि कायदे करण्याची आवश्यकता आहे ते केले जात आहेत. नाशिक महानगरपालिकेचा चौकशीचा जो काही अहवाल आलेला आहे त्यामध्ये जे म्हटलेले आहे त्यापेक्षाही अधिक चौकशी करण्याची आवश्यकता वाटली तर ती सुध्दा केली जाईल व या संपूर्ण प्रकरणाचा पडदाफाश केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. ..2..

**ता.प्र.क्र.** : 37798......

श्री. मुझफ्फर हुसेन : उत्तरारामध्येच शासनाने म्हटले आहे की, नाशिक महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचा भ्रष्टाचार उघड झालेला असल्यामुळेच चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. परंतु अशा प्रकरणांमध्ये चौकशी होत असतांना झालेल्या ठरावांना शासनाकडून प्रथम स्थगिती दिली जाणार आहे काय ? त्यामुळे ठरावांना स्थगिती देऊन याची चौकशी सुरु केली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव :सभापती महोदय, भ्रष्टाचार झालेला आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले नाही. त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे का असा प्रश्न विचारण्यात आला होता त्याला "हे खरे आहे" असे म्हटलेले आहे. त्यामुळे जोपर्यंत अहवालाची छाननी होत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार झालेला आहे किंवा नाही हे कळणे थोडे अवघड आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय,आदरणीय मुख्यमंत्र्यांनी लोकशाहीतील प्रथा, पंरपंरा पाळण्याचे आवाहन केले असून ते अगदी बरोबर आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात चौकशी होईल तेव्हा होईल परंतु तोपर्यंत जर याची अंमलबजावणी झाली तर ते योग्य होणार नाही. नाशिक महानगरपालिकेने 200 कोटी रुपयांचा एलईडीचा ठेका दिलेला आहे तसेच 250 कोटी रुपयांचे डिफर पेमेंट झालेले आहे. त्यामुळे हे सर्व होऊन गेल्यानंतर या चौकशीला काय अर्थ उरणार आहे ? त्यामुळे आमची विनंती अशी आहे की, 3 मिनिटामध्ये जे ठराव मंजूर झाले आहेत ते लोकशाही प्रथा परंपरेला धरुन झालेले नाहीत. त्यामुळे मंजूर झालेल्या ठरावांना आपण स्थगिती देणार आहात काय ? नाशिक शहर या भ्रष्टाचाराकडे भांबावलेल्या नजरेने बघत आहे. त्यामुळे अंमलबजावणी करण्यापूर्वी या प्रकरणाची सविस्तर चौकशी करावी व नंतर अंमलबजावणीचे आदेश द्यावेत व तोपर्यंत या सर्व गोष्टींना स्थगिती द्यावी अशी माझी मागणी आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे त्यामध्ये एलईडी प्रकल्प हा सर्वात मोठा प्रकल्प असून यासंदर्भात ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत यासंदर्भातील कार्यादेश दिले जाणार नाहीत अशा प्रकारचे आदेश दिले जातील.

------------

..3..

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**मुंबईत म्हाडातर्फे बांधण्यात येणाऱ्या घरांबाबत**

**(२) * ३८१२५ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३६३ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोरेगाव येथे म्हाडामार्फत दहा हजार घरे बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत मुंबईतील शिक्षक, शासकीय कर्मचारी आणि पोलीस यांच्यासाठी आरक्षण ठेवण्याच्या मागणीबाबत शासनाने विचार केला आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सचिन अहिर श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे करिता** : (१) व (२) मुंबई गोरेगाव येथे म्हाडामार्फत दहा हजार घरे बांधण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही. बांधावयाच्या घरांची संख्या म्हाडाकडूनच निश्चित होत असते.

शिक्षक, शासकीय अधिकारी/कर्मचारी आणि पोलीस तसेच शासनास योग्य वाटेल अशा कोणत्याही विशेष गटासाठी म्हाडा (मिळकत, व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांचे हस्तांतरण) विनियम १९८१ च्या विनियम १३ (२) अंतर्गत म्हाडा विशेष गृहनिर्माण योजना राबवू शकते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय,या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय पॉझिटीव्ह उत्तर दिलेले आहे. मुंबईला सेवा देणारा जो वर्ग आहे तो प्रशासनातील असेल, शासकीय सेवेत काम करणारा असेल, शिक्षक असेल हा सर्व वर्ग आता मुंबईच्या बाहेर राहू लागला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38125...

श्री.कपिल पाटील...

ते अंबरनाथ, बदलापूर येथून प्रवास करून येतात. त्यांना येथे घर परवडत नाही. या वर्गाला परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी म्हाडाची आहे. म्हाडाच्या घरांमधील वाटा इतरांना मिळतो हे खरे दुखणे आहे. तो वाटा या वर्गाला प्राधान्याने दिला पाहिजे. या वर्गासाठी म्हाडा विशेष गृहनिर्माण योजना राबवू शकते असे आपण लेखी उत्तरामध्ये म्हटले आहे. त्यामुळे शिक्षक आणि शासकीय कर्मचारी यांच्यासाठी जास्तीत जास्त घरांचा वाटा शासन राखून ठेवणार आहे काय ? गोरेगाव येथे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात दहा हजार घरे निर्माण होण्याची शक्यता आहे. तेथे नेमकी किती घरे निर्माण होणार आहेत, त्यातील जास्तीत जास्त वाटा शासन या वर्गाला कशा प्रकारे ठेवणार आहे ? शासनाने मध्यंतरी हौसिंग स्टॉक घेण्याची भूमिका घेतली होती. ती अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. आताही शासकीय आणि म्हाडाच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टया आहेत. त्या योजना बिल्डरला देण्या ऐवजी म्हाडाने राबविल्या तर जास्तीत जास्त घरे म्हाडा सामान्य माणसांसाठी उपलब्ध करून देऊ शकेल. तेव्हा त्यासंबंधी देखील शासन ठाम निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, शासनाने 5 टक्के घरांचे आरक्षण हे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ठेवलेले आहे. यामध्ये शिक्षक हा संवर्ग मोडत नाही. अशा प्रकारची जागा कुठे उपलब्ध असेल तर तेथे विशेष योजना राबविण्यासंबंधी आपण सहानुभूतीने विचार करू शकू. म्हाडाच्या जमिनीवर मोठ्या झोपडपट्टया झालेल्या आहेत. तेथे योजना घेणे शक्य नाही. परंतु, जेथे मोकळी जागा आहे, झोपड्यांची संख्या कमी आहे, अशा काही प्रकरणांमध्ये म्हाडाच्या माध्यमातून एसआरए योजना राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हाडाच्या माध्यमातून घर बांधणी करण्यात येणार आहे. त्यासाठी टीडीआरचा वापर करण्यात येणार आहे काय ? असल्यास, उपलब्ध जागे पेक्षा अतिरिक्त लाभ होतो त्याचा फायदा घर बांधणीच्या किंमतीमध्ये शासन देणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, म्हाडाला विशेष एफएसआय मिळत असल्यामुळे आपल्याला टीडीआर वापरण्याची गरज नाही. म्हाडाला आपण जास्त चटई क्षेत्रफळ देतो. म्हाडाकडून सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे उपलब्ध झाली पाहिजेत अशी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38125...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, टीडीआर वापरणार काय, असा प्रश्न विचारला आहे. टीडीआर वापरला की अतिरिक्त फायदा होतो. त्याचा लाभ आपण घरांच्या किंमती कमी करण्यामध्ये करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे. तसेच, इतर ठिकाणी टीडीआर वापरला आहे त्याचे आपण काय केले आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, म्हाडाला टीडीआर वापरण्याची गरज भासत नाही. आपण म्हाडाला 2.5 हा अतिरिक्त एफएसआय दिलेला आहे. टीडीआर वापरणे हा सर्वस्वी सोसायटीचा अधिकार असतो. हा वेगळा प्रश्न असला तरी देखील त्यामध्ये निश्चितपणे लक्ष घालण्याचा प्रयत्न केला जाईल.

ॲड्.अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मोकळ्या जागेत आम्ही घरे बांधण्याचा विचार करू शकतो. म्हाडाच्या धोरणां संबंधी आम्ही सतत संघर्ष करीत आहोत. आता आमच्याकडे मोकळी जागा उपलब्ध नाही, असे म्हाडाने आम्हाला वारंवार सांगितले आहे. त्यामुळे म्हाडाने पुनर्विकासाचे धोरण अवलंबिले आहे म्हणून माझे दोनच प्रश्न आहेत. पुनर्विकासासाठी जे प्रस्ताव म्हाडाकडे आले होते ते आपल्या धोरणाला अनुसरून नाहीत, ते कक्षेत बसत नाहीत, असे सांगून ते परत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आपले पुनर्बांधणीचे धोरण गेले कित्येक वर्ष अडकून पडलेले आहे. त्यामुळे अनेक रहिवाशांनी स्थलांतर केले असून ते मुंबई बाहेर रहायला गेले आहेत. तेव्हा या पुनवर्सन धोरणाचा फेरविचार करून शासन नवीन धोरण आणणार आहे काय ? कारण कालच असे कळले आहे की, नवीन धोरण शासन या अधिवेशनातच जाहीर करणार आहे. सदर धोरण लवकरात लवकर जाहीर करून जे लोक बाहेर गेले आहेत त्यांना शासन दिलासा देणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : होय.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ D/ पूर्वी श्री.भारवि.. 11:25

ता.प्र.क्र.38125...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, म्हाडातर्फे बांधण्यात येणाऱ्या घरांमध्ये शिक्षकांसाठी आरक्षण असावे असा मूळ प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, म्हाडातर्फे बांधण्यात येणाऱ्या घरांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पाच टक्के आरक्षण ठेवलेले आहे. तसेच त्यांनी पुढे सांगितले की, यामधून शिक्षकांना वगळलेले आहे. माझा प्रश्न आहे की, म्हाडाच्या घरांमध्ये सर्वसामान्य शिक्षकांसाठी सुध्दा आरक्षण ठेवणार काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, हे आरक्षण म्हाडाने ठरविलेले आहे आणि आता 51 टक्के आरक्षण झालेले आहे आणि कायद्याने त्यापुढे जाता येत नाही. परंतु मी अगोदर उत्तर देताना सांगितले की, शिक्षकांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यास शासन तयार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, एसआरए योजनेमध्ये शिक्षकांनी स्वत: सोसायटी केल्यास त्यांच्या सोसायटीला एसआरए स्कीम डेव्हलप करण्यास देण्यात येईल काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, एसआरएचे काही नियम आहेत. त्या ठिकाणी शिक्षक राहत असतील आणि ते पात्र झोपडपट्टीधारक असतील व 70 टक्केपेक्षा जास्त शिक्षक पुढे येत असतील तर आम्ही निश्चितपणे परवानगी देऊ. शिक्षकवर्ग एकत्रितपणे पुढे येऊन विकासक होऊ इच्छित असतील तर आम्ही त्यांचे स्वागत करु.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, म्हाडाची जागा म्हाडाने डेव्हलप केल्यास अधिक न्याय मिळू शकतो या भूमिकेशी मी शंभर टक्के सहमत आहे. परंतु ट्रान्झिट कॅम्पमध्ये जे लोक 18-20 वर्षे राहत आहेत तेथे आपण स्थगिती दिलेली आहे. म्हणजे जे काम आपण सुरु केले होते ते थांबवावयाच, नवीन धोरण जाहीर करायचे नाही आणि सर्व कामे ठप्प करुन ठेवायची अशी शासनाची भूमिका कशासाठी आहे, या संदर्भात म्हाडाचे नेमके धोरण काय आहे, म्हाडा नेमक्या कोणत्या जागा डेव्हलप करणार आहे, कोणत्या विकासकांना जागा डेव्हलप करण्यासाठी दिलेल्या आहेत, कोणाला एल.वाय दिलेले आहेत ? याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. मी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, मागील 10-12 वर्षे आपण स्थगिती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38125...

श्री.रामदास कदम.....

देत आहात आणि उठवित आहात एवढेच काम सुरु आहे. म्हणजे त्या विकासकाने आमच्याकडे यावे, बसावे आणि कायद्याने बोलावे हे कशासाठी चालले आहे, तेव्हा या संदर्भातील म्हाडाची भूमिका किती दिवसांत स्पष्ट होणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, कोणत्या कायद्याने बोलावे हे मला माहीत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी अधिक स्पष्ट केले तर बरे होईल. यामध्ये दोन भाग आहेत. 33(5) धोरण स्वीकारण्याचे कारण म्हणजे मुंबई सारख्या शहरामध्ये परवडणारी घरे आपल्याला उपलब्ध करण्याच्या उद्देशाने आपण प्रिमियममध्ये दर आकारत होतो. परंतु आता आपण 2सी(1), 2सी (2) प्रमाणे यापुढील काळात प्रिमियमने न घेता हाऊसिंग स्टॉक घ्यायचे म्हणून आपण ते धोरण थांबवले आहे. या संदर्भात एक धोरण आणणार आहोत अशी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी एसआरए योजनांच्या संदर्भात सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. म्हाडला काही योजना करायच्या असतील तर त्यांनी यादी केली पाहिजे. तसेच त्यांनी बाकीच्या योजनांना चालना द्यायला पाहिजे. मी सांगू इच्छितो की, म्हाडाने 20 योजना आयन्डेटीफाय केलेल्या आहेत. या 20 योजना वगळता इतर सर्व योजनांचे परिशिष्ट (2) आणि एल.ओ.आय.झालेले आहेत त्या ठिकाणी परवानगी दिली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हाडाच्या माध्यमातून देण्यात येणारी घरे मालकी तत्त्वावर असतात. मालकी तत्त्वावर दिलेल्या घरांवर म्हाडा लीज रेन्ट आकारते का, जर लीज रेन्ट आकारत असेल तर ते कशासाठी आकारत आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, म्हाडा ओनरशीप जागा देत असली तरी जमीन म्हाडाची असते म्हणून म्हाडा ती जमीन लीजवर देते.

..3..

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.38125...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पाच टक्के आरक्षण ठेवलेले आहे. माझा प्रश्न आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये शिक्षकांना समाविष्ट करण्यात येईल काय ? जवळपास 15 हजार शिक्षकांनी घरासाठी मागणी केलेली आहे. तसेच एमएमआरडीएकडेसुध्दा मागणी केलेली आहे. तेव्हा शिक्षकांसाठी विशेष योजना राबवून ती कार्यान्वित करण्यात येईल काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपल्याला आरक्षणाच्या बाबतीत काही करता येणार नाही कारण 51 टक्के आरक्षण झालेले आहे. अपंगासाठी देखील आरक्षण देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शिक्षकांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करता येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्यदिव्य स्मारक अरबी समुद्रात उभारण्याबाबत.**

**(3) * 37371 श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामदास कदम, श्री.विनायक राऊत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.दिवाकर रावते, डॉ.दिपक सावंत** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्यदिव्य स्मारक अरबी समुद्रात उभारण्यासाठी शासनाकडून जागेचा शोध सुरु असल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबईतील राजभवन ते नेव्हीनगर या भागातील अरबी समुद्रात सुमारे 18 एकर विस्तीर्ण खडकावर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची माहिती मुंबईच्या पालकमंत्र्यांनी दिनांक 7 जानेवारी, 2013 रोजी वा त्या सुमारास घोषित केली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर स्मारकांच्या उभारणीबाबत किती खर्च येणार आहे आणि स्मारकांच्या उभारणीसाठी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(4) असल्यास, स्मारकाचे थोडक्यात स्वरुप काय असणार आहे ?

**प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण** यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रात मुंबई लगत उभारण्याच्या दृष्टीने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मान्यता घेण्याच्या दृष्टीकोनातून वेगवेगळी सर्वेक्षणे आणि स्मारकाचा आराखडा व संकल्पचित्रे तयार करुन महाराष्ट्र सागर तटीय विनियमन प्राधिकरण (Maharashtra Costal Zone Management Authority ) ची शिफारस घेण्यासाठी, प्रस्ताव केंद्र शासनास सादर करुन, केंद्र शासनाची मान्यता मिळण्यासाठी कालबध्दतीत कार्य करण्यासाठी पालकमंत्री मुंबई शहर यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित.... 11:30

ता.प्र.क्र.37371....

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, लाखो-करोडो लोकांच्या अस्मितेच्या प्रश्नावर चर्चा होत असताना माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे आज या प्रश्नाचा निकाल लागेल अशी मला अपेक्षा आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, स्मारकाचा आराखडा व संकल्प चित्रे तयार करुन ती केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली आहेत. ज्या शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्या शिवरायांचे स्मारक उभारण्यास शासन अजून किती काळ लावणार आहे, स्मारकाचा आराखडा तयार केला असेल तर त्या स्मारकासाठी शासनाने जागा निश्चित केली आहे काय, जागा निश्चित केली असेल तर त्या आराखड्यासाठी कोणती एजन्सी नेमली आहे, नसल्यास शासनाच्या स्तरावर तो आरखडा तयार होत आहे काय ? महोदय, या विषयी दि.14/12/2011 रोजी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी प्रश्न विचारला होता. त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर या बाबतची अंमलबजावणी करण्यात येईल असे उत्तर दिले होते. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, या सर्व गोष्टींचा विचार करता राज्य शासन किती कालावधीत केंद्र सरकारकडून आवश्यक त्या परवानग्या घेऊन या स्मारकाबाबतची भूमिका जनतेसमोर आणणार आहे ?

प्रा.फौजिया खान : महोदय, माननीय सभापती महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.20/12/2012 रोजी नागपूर येथे बैठक झाली होती. त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि इतरही मान्यवर उपस्थित होते. त्या दिवशी असे ठरले की, मुंबईचे पालकमंत्री तथा माननीय ग्राम विकास मंत्री श्री.जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी. त्यानुसार समिती गठीत करण्यात आली. त्यांनी दि.26/12/2012 रोजी बैठक घेतली. त्या समितीने दि.28/12/2012 रोजी स्मारकासाठी मरीन ड्राईव्ह येथील स्थळ निश्चित केले होत त्या ठिकाणी जाऊन जागेची पाहणी केली आणि त्यानंतर पुन्हा काही बैठका घेतल्या. त्यामध्ये असा निर्णय घेण्यात आला की, राज भवनपासून दक्षिण-पूर्व दिशेला 1.1 कि.मी. अंतरावर, गिरगांव येथील 420 जेटी पासून दक्षिण-पूर्व दिशेला 3.6 कि.मी. अंतरावर, नरीमन पॉईंटच्या पश्चिम दिशेला 2.6 कि.मी.अंतरावर, रॉक आऊट क्रॉफ्ट 16 हेक्टरवर, त्यांच्या सभोवती 12 हेक्टर शॅलो बाग, अशा प्रकारे 28 हेक्टर जागा या स्मारकासाठी योग्य राहील. या पध्दतीचा एक विचार त्या बैठकीमध्ये झ ााला. पूर्वी जी जागा निश्चित करण्यात आली होती त्या जागेपेक्षा नवीन जागा जास्त

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37371....

प्रा.फौजिया खान....

कॉस्ट इफेक्टीव्ह आणि ते स्ट्रक्चर जास्त स्टेबल राहील असे ठरले. तसेच त्या जागेचे क्लिअरन्स घेणे सुध्दा सुलभ होईल. कारण हा भाग सुध्दा मोठा आहे. या भागात खडक असल्यामुळे पूर्वीची जी जागा होती त्यामध्ये पूर्ण पाणी होते. त्यामुळे ही जागा जास्त चांगली राहील या पध्दतीचा निर्णय घेण्यात आला. त्याच बैठकीमध्ये असाही निर्णय घेण्यात आला की, दि.6/2/2013 पर्यंत....

श्री.विनायक मेटे : अध्यक्ष महोदय,....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे मी या प्रश्नावर जास्तीत जास्त वेळ प्रश्न विचारण्यासाठी संधी देण्याचे ठरविले आहे.

प्रा.फौजिया खान : महोदय, मला माझे उत्तर पूर्ण करण्याची कृपया परवानगी द्यावी.

श्री.विनायक मेटे : महोदय, माननीय मंत्र्यांना जे उत्तर द्यावयाचे आहे ते त्यांनी द्यावे. परंतु माझी विनंती आहे की, चुकीच्या गोष्टी सभागृहाच्या रेकॉर्डवर येता कामा नये. माझ्या माहितीनुसार ज्या बैठकांबाबत माननीय मंत्री महोदय सांगत आहेत त्या बैठकांमध्ये केवळ चर्चा झालेली आहे. परंतु निर्णय झालेला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर या बाबतचा निर्णय होणार आहे. पण मंत्री महोदय सांगत आहेत की, अशा प्रकारचा निर्णय झाला आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी ही बाब निदर्शनास आणून देत आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37371 .....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री नंतर याबाबत सांगतीलच. मी सांगितले की, त्या बैठकीमध्ये कमिटीचा जो निर्णय झालेला आहे त्याची सर्व माहिती माननीय मुख्यमंत्र्यांसमोर ठेऊन तेच या बाबतीत निर्णय घेणार आहेत. यानंतर काही क्लिअरन्स आवश्यक आहेत. जरी ही जागा निश्चित करण्यात आली तरी कोणत्याही जागेसाठी जशा आपल्याला आवश्यकता असतात तशा त्या जागेसाठी सुध्दा खूप माहितीचा अभ्यास होणे गरजेचे आहे. व्हेरियस स्टडीज कंडक्ट करणे गरजेचे राहणार आहे. त्या ठिकाणचे टायडल बिहेविअर काय आहे, वॉटर क्वॉलिटी इन्क्लुडीन्ग केमिस्ट्री काय राहणार आहे, कोस्टल मॉडेलिंग काय राहणार आहे याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकावे लागेल. त्या बाबतीत एखादी शंका असेल तर उपप्रश्न विचारण्याची संधी देण्यात येईल.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आपल्याला काय काय प्रोसीजर्स, काय काय क्लिअरन्सेस आवश्यक आहेत ते ती सांगू इच्छिते. ते केल्याशिवाय आपल्याला काम करताच येणार नाही. जे क्लिअरन्सेस आवश्यक आहेत त्यामध्ये अंडर वॉटर सर्व्हे करावा लागणार आहे. सेडिमेन्टेशन स्टडी करावा लागणार आहे. कोस्टल इरोजन स्टडी करावा लागणार आहे. एन्व्हायरमेंटल इम्पॅक्ट असेसमेंट करावे लागणार आहे. जिऑमार्फालॉजी आहे. जिओटेक्निकल स्ट्रक्चरल स्टेबिलिटी स्टडी आहे. विंड टॅनेल इफेक्ट स्टडी आहे. मरीन बायोडायव्हर्सिटी आहे. सोनार स्टडीज आहे. सिज मेग्जिन स्टडीज आहे. हे सर्व स्टडीज झाल्यानंतर एन्व्हायरमेंटलचा क्लिअरन्स घेऊन पुढचा निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, छत्रपतींचा इतिहास सुध्दा सांगून झाला असता इतकी त्या स्मारकासंबंधीची माहिती मंत्री महोदया देत होत्या. ही समिती माननीय पालकमंत्री श्री. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली होती. उत्तरामध्ये महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीचा उल्लेख केलेला आहे. श्री. जयंत पाटील हे सागरी तटीय विनियमन प्राधिकरणाचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37371 ..... श्री. दिवाकर रावते .....

तज्ज्ञ कधी झाले की ज्यामुळे आपण तो खडक कसा आहे, काय आहे याची एवढी माहिती देत आहात. आपण ज्या पाच सहा जागा पाहिल्या त्यापैकी कोणती जागा योग्य राहील या बाबतीत संबंधित तज्ज्ञांनी सांगितले पाहिजे. आपण या ठिकाणी निर्णय सांगत आहात. हा एक भाग झाला. या स्मारकाकरिता दगड-खडक वगैरे काही सांगत होता ती किती एकर जमीन लागणार आहे ? त्या ठिकाणी उभा राहणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्टॅच्यू ऑफ लिबर्टीपेक्षा एक वीत जास्त उंच करावयाचा झाला तर त्यासाठी 6 ते 7 हजार कोटी खर्च येणार आहे असा प्रचार महाराष्ट्रामध्ये झाला आहे. त्या नुसत्या पुतळ्यावर नक्की किती खर्च येणार आहे या संदर्भात आराखडा आपल्याकडे आहे काय ? या संदर्भात तज्ज्ञ सदस्य प्रमुख श्री. जयंत पाटील यांनी या संदर्भात आपल्याला काही माहिती पुरविलेली आहे का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आघाडी सरकारच्या जाहीरनाम्यामध्ये अरबी समुद्रामध्ये अशा प्रकारचे शिवछत्रपतींचे भव्य स्मारक निर्माण करण्याची घोषणा केली होती आणि शासन हा निर्णय घेण्याकरिता आणि भव्य स्मारक उभारण्याकरिता कटिबद्ध आहे, हे मी आधीच सांगू इच्छितो. पण हा प्रकल्प करीत असताना ज्या अडचणी आहेत त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण हे स्मारक व्हावे याकरिता शासनाचा प्रयत्न आहे. आताची वस्तुस्थिती अशी आहे की, जानेवारी, 2011 मध्ये केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी कोस्टल रेग्युलेटरी झोनबद्दल काही नवीन नियम केले.

आपल्याला माहीत आहे की, या पूर्वी आपण संकल्पचित्र सादर करण्याकरिता एक स्पर्धा घेतली होती. त्यामध्ये काही बक्षिसे ठेवण्यात आली होती. ती स्पर्धा झाली. एका संस्थेचे संकल्पचित्र त्या वेळच्या सुकाणू समितीने मान्य केले. त्यांना काही बक्षीस सुध्दा दिले. त्या संकल्पचित्राच्या दिशेने आपल्याला पुढे जाता येईल असे त्या सुकाणू समितीमध्ये ठरविले होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37371.... श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

पुढे मंत्रिमंडळाने एक जागा निश्चित केली होती. त्याचे कोऑर्डिनेट्स आपल्याला देता येतील. त्या जागेवर मोठ्या प्रमाणात समुद्रामध्ये भर टाकावी लागेल. तेथे जमीन तयार करावी लागेल. त्यावर हा भव्य स्मारकाचा पुतळा उभा करावा लागेल. तो केल्यानंतर हे कायम स्वरुपी कोणतेही संकट आले तरी, कोणती नैसर्गिक आपत्ती आली तरी ते स्मारक राहील. कारण शासनाला चिरंतर स्मारक करावयाचे आहे. त्या वेळेपासून किती अभ्यास करावा लागेल. कोणकोणती परवानगी घ्यावी लागेल याचा अभ्यास त्यावेळच्या समितीने केलेला आहे.

आता माननीय राज्यमंत्र्यांनी माहिती देताना सांगितले की, वेगवेगळया परवानग्या घ्याव्या लागतील. ती माहिती पूर्वीपासूनच शासनाकडे आहे. ही खूप तांत्रिक माहिती आहे. त्या माहितीचा अभ्यास करण्यासाठी व काही परवानगी घेण्यासाठी ती प्रक्रिया पार पाडावी लागेल. त्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट ॲडव्हायझर लागेल. ते काम कोणी करावयाचे ते ठरवावे लागेल. या प्रक्रियेला उशीर लागत असल्याचे लक्षात आल्यानंतर नागपूर येथील अधिवेशनामध्ये माननीय सभापतींनी या संदर्भात पुढाकार घेतला होता. त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. त्यावेळी बैठक घेतल्यानंतर मुंबई शहराच्या पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्मारकाची जागा निश्चित करण्यासाठी व अभ्यासाची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी समिती नेमण्यात आली. त्या समितीने काही जागा पाहिल्या आहेत. तसेच नेव्ही व कोस्ट गार्ड यांच्या बरोबर चर्चा केली. जी जागा ठरविली आहे त्या जागेवर खडक अस्तित्वात आहे. ओहोटीच्या वेळी आपल्याला तो खडक दिसतो व ती जागा मजबुतीच्या दृष्टीने उपयुक्त व चांगली आहे असे मत व्यक्त केलेले आहे. त्या जागेचा निर्णय अभ्यास गटाने किंवा त्या समितीने घेतलेला आहे. हा निर्णय शासनाने घेतलेला नाही हे प्रथम मी सांगू इच्छितो. ती जागा राज भवनापासून किती अंतरावर आहे, चौपाटीपासून किती अंतरावर आहे ? याची माहिती देण्यात आलेली आहे. ती जागा मंत्रिमंडळातील सदस्य, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते यांच्यासोबत जाऊन पाहू या. ती जागा मजबुतीच्या दृष्टीने चांगली व उपयुक्त आहे असे दिसते. ती जागा निवडली तरी बाकीची प्रक्रिया पूर्ण करावीच लागेल. त्यापूर्वी कोस्टल झोन मॅनेजमेण्ट ॲथोरिटीची परवानगी घ्यावी लागेल. आम्ही समुद्रात स्मारक उभे करु

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

ता.प्र.क्र.37371....                                        श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

इच्छितो अशा प्रकारचा त्यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला प्रस्ताव सादर केलेला आहे. जानेवारी, 2011 मध्ये केंद्र सरकारने तयार केलेल्या नवीन नियमावलीनुसार आम्हाला परवानगी द्यावी असे म्हटलेले आहे. पण त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्याशिवाय हे काम होऊ शकणार नाही. त्यासाठी प्राथमिक स्वरुपात आणखी काय काय करावे लागेल ते जाणून घेण्यासाठी त्यांच्याबरोबर पत्रव्यवहार सुरु झालेला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव गेलेला आहे.

या पुढे दोन गोष्टी कराव्या लागतील. प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट नेमण्याची निवड प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्याबाबत निविदा काढून, एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट घेऊन आणि जो प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट येईल तो अल्टिमेट आर्टिटेक्ट नेमेल किंवा कंत्राटदार निवडील.

तसेच यासाठी 20-25 प्रकारच्या विषयाबाबत अभ्यास करावा लागेल. त्यातील काही विषय सोपे आहेत. काही विषयासाठी थोडासा वेळ लागेल. नॅशनल ओशनोग्राफ्री इन्स्टिटयूट असेल किंवा नेव्हीचे तज्ज्ञ असतील या सगळयांना घेऊन काम करावे लागेल. तेथे वेस्ट वॉटर डिस्पोजल कसे होईल, तेथे शुध्द पिण्याचे पाणी कसे देता येईल या सर्व गोष्टी त्यात अंतर्भूत आहेत. याबाबतही स्टडी करावाच लागेल. प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट नेमल्यानंतर तो या सर्व विषयांची जबाबदारी घेईल व त्यानंतर पुढील प्रक्रिया सुरु होईल. सगळयात महत्वाचा टप्पा म्हणजे पर्यावरण खात्याकडे संपूर्ण सविस्तर अहवाल तयार करुन पाठवावा लागेल. .त्या दिशेने प्रयत्न सुरु आहेत.

हे खूप मोठे व तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक काम आहे. भावनिक दृष्ट्या हे स्मारक कितीही मोठे असले तरी ते आपल्याला करावयाचे आहे. आपण जी संकल्पना केली आहे त्यानुसार ही वास्तू जगात कोठेही झालेली नाही एवढे मोठे स्मारक करण्याची संकल्पना आहे. ते करण्यासाठी शासन कटिबध्द आहे. शास्त्रीय आव्हाने असतील व तांत्रिक आव्हाने असतील ती मीट करुन आपण पुढे जाणार आहोत. त्यामध्ये पर्यावरण खात्याची मंजुरी हा महत्वाचा घटक आहे. मी स्वत: हेलिकॉप्टरमधून ती जागा पाहिलेली आहे. खाली जाऊन पाहिलेली नाही. परंतु मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आपण सर्वजण ती जागा पाहण्यासाठी जाऊ.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.37371.. श्री. पृथ्वीराज चव्हाण....

ती जागा पाहिल्यानंतर ती किती लांब आहे याची आपल्याला कल्पना येईल. जागा निश्चित झाल्यानंतर पुढील प्रक्रिया करता येईल. पूर्वीच्या जागेचा कॅबिनेटने केलेला ठराव नामंजूर करावा लागेल. मी सुध्दा या स्मारकाचे काम वेगाने कसे होईल यासाठी प्रयत्नशील आहे. मी स्वत: केन्द्रीय पर्यावरण मंत्र्यांना मुंबईला येण्याचे निमंत्रण दिलेले आहे. साधारणपणे 2 तारखेला त्यांनी येण्याचे कबूल केले आहे. त्यांना जागा दाखविण्यात येईल. हा प्रकल्प आव्हानात्मक आहे. हा प्रकल्प निश्चितपणे व्हावा असे आश्वासन मी सभागृहाला देतो.

श्री. प्रकाश बिनसाळे : या प्रकल्पासंबंधीची संपूर्ण तांत्रिक माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी दिली. मूलभूत प्रश्न असा आहे की हे स्मारक झाल्यानंतर ते पाहण्यासाठी सामान्य जनता किंवा पर्यटकाला तेथे जाता आले पाहिजे महत्वाचे आहे. या स्मारकासाठी पश्चिम किनारपट्टीवरील जागा निवडलेली आहे. त्या ठिकाणी खुला समुद्र आहे. पूर्व किनारपट्टी ही ब्रेकवॉटर स्वरुपाची किनारपट्टी आहे. त्यठिकाणी छोट्या बोटींनी जाणे त्रासदायक होते. स्मारकासाठी निवडलेली जागा खुल्या समुद्रामध्ये असल्यामुळे किती लोक ते स्मारक पाहू शकतील अशी शंका निर्माण होते. तेव्हा मूलभूत गोष्टी विचारात घेऊन स्मारकाच्या जागेची निवड करण्यात येईल काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीच्या दृष्टीने खडकावर हे स्मारक करावे अशी संकल्पना पुढे आली. परंतु ती निश्चित झालेली नाही. त्या ठिकाणी स्मारकाजवळ जेट्टी करावी लागेल. ती केल्यानंतर लोकांना तेथे जाता येईल. स्मारक केवळ लांबून पाहण्यासाठी करावयाचे नाही. जागा पश्चिम किना-यावर घ्यायची की पूर्व किना-यावर घ्यायची या बाबत सर्वांना विश्वासात घेऊन, तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाईल. मोठमोठ्या जहाजांची वाहतूक होते. त्याबाबतीत काय करावे लागेल याचाही विचार करावा लागेल.

दुसरी कल्पना अशी आहे की, तेथे फार मोठे रिक्रीएशन पार्क आणि रेस्टॉरण्ट होईल. परंतु सांडपाण्याचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे पर्यावरण खाते त्यास मंजुरी देणार नाही. स्मारकाच्या ठिकाणी जाऊन तेथे नतमस्तक होणे अशी संकल्पना आहे. फार मोठा टुरिझम स्पॉट करणे किती शक्य होईल हे आताच सांगता येणार नाही. या बाबतीत प्राथमिक चर्चा झाली होती. त्या ठिकाणी स्वच्छ पाणी कोठून आणणार, सांडपाण्याची व्यवस्था काय करणार असे प्रश्न उपस्थित झाले होते. आपण स्मारकाच्या जागेच्या निश्चितीकरणाच्या जवळ गेलो आहोत. सर्वांना विश्वासात

..2..

घेऊन जागा पाहून आणि जे काही प्रश्न उपस्थित होतील त्याचे निराकरण करुन आपण पुढे जाऊ.

श्री. विनायक मेटे : मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधी त्यांनी विस्तृत अशी माहिती दिली आहे. या स्मारकाच्या जागे बाबत कॅबिनेटने पूर्वी घेतलेला निर्णय रद्द करावा लागेल.नवीन जागे बाबत फक्त चर्चा झालेली आहे. ही जागा दाखविल्यानंतर ती निश्चित होणार आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे... ता.प्र.क्र.37371...

या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी चर्चेची माहिती दिली ही अतिशय चांगली गोष्ट आहे.

माननीय सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनात दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी या विषयाच्या बाबतीत आपण आपल्या दालनात बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये या विषयाच्या बाबातीत दोन महिन्याचा कालावधी दिला गेला होता. तो कालावधी वाढला त्यास माझी काही हरकत नाही. किमान यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करुन प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्याचा कालावधी शासनाकडून निश्चित केला जाईल काय? छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक अरबी समुद्रात उभारण्यासाठी ज्या ज्या विभागाच्या परवानग्या लागणार आहेत, त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्य संबंधित विभाग काम करीत आहे. या कामांसाठी विभाग निहाय विशेष अधिकारी नेमण्याचे त्या बैठकीत ठरले होते. या कामासाठी विभाग निहाय विशेष अधिकाऱ्यांच्या नेमणुका झालेल्या नाहीत, त्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात येतील काय ? या स्मारकाच्या संदर्भात जुने वास्तुशास्त्रज्ञ नेमलेले आहेत, ते रद्द करुन नवीन वास्तुशास्त्रज्ञ नेमण्यात येतील काय ? छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळयापुरते ते स्मारक मर्यादित नसावे, त्या स्मारकात महाराजांच्या बालपणापासून ते मृत्यूपर्यंतच्या जीवनातील काही उल्लेखनीय घटना आल्या पाहिजेत. तसेच किल्ले, दुर्ग इत्यादी बाबतची माहिती असली पाहिजे. अशा पध्दतीचे स्मारक तेथे होणार आहे अशा पध्दतीचा निर्णय शासनातर्फे घेण्यात येईल काय?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी नुकतेच सांगितले की, आपण या विषयाची बैठक घेतल्यानंतर बरीच प्रगती झालेली आहे. मंत्रिमंडळासमोर स्मारकाच्या जागेचा निर्णय व्हावयाचा आहे. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी 21 प्रकारची अभ्यासपूर्ण माहिती सदनाला दिली आहे. या स्मारकाच्या बाबतीत सर्व प्रकारचा अभ्यास करुन, विविध विभागांच्या परवानग्या मिळवून, संबंधित विभागांकडून "ना हरकत प्रमाणपत्रे" मिळवून नंतर पुन्हा अभ्यास करुन केंद्रीय पर्यावरण विभागाकडे जाऊन त्यास अंतिम मान्यता मिळविणे यासाठी काही कालावधी लागेल. त्यामुळे या संदर्भात निश्चित कालावधी व निश्चित तारीख सांगणे अवघड आहे. या स्मारकाचे काम सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पहात आहेत. आता प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांच्याकडे या बाबतीतील सर्व जबाबदारी सोपविण्याचा आमचा विचार आहे. तसेच त्यांनीच समन्वय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

ठेवण्याचे काम देखील करावे असाही आमचा प्रयत्न आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून त्या कामावर सुपरव्हिजन केले जाईल. या कामी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे मंत्रिमंडळास वाटले तर वेळ येईल त्यावेळी अशा प्रकारच्या नियुक्त्या निश्चितपणे केल्या जातील.

महोदय, हे स्मारक पुतळयापुरते मर्यादित रहाणार नाही. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा सगळा जीवनपट, त्या ठिकाणी कशा प्रकारचे पुतळे ठेवावयाचे, चित्रफिती लावावयाच्या काय, या सर्व गोष्टी करता येतील. आज नवीन टेक्नॉलॉजी आलेली आहे, त्या माध्यमातून या बाबतीत माहिती मिळू शकते. त्या स्मारकाच्या ठिकाणी बरेच लोक आले पाहिजेत, त्यांनी स्मारकाच्या वास्तूमध्ये काही वेळ घालविला पाहिजे अशी मूळ कल्पना आहे. आपल्या सर्वाच्या सूचना घेऊन त्यामध्ये आणखी काही सुधारणा देखील करता येतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी प्रथम आपले आभार मानतो की, आपण नागपूर अधिवेशन कालावधीत आपल्या दालनात स्मारकाच्या अनुषंगाने सर्व पक्षीय प्रतोद व पालक मंत्री यांच्या समवेत बैठक घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या विषयास आपण चालना दिली. मी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना मुद्दाम सांगेन की, या स्मारकासाठी अर्थसंकल्पात तीन वेळा तरतूद झाली होती. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात या स्मारकाचा सात वेळा उल्लेख झालेला आहे. दुर्देवाने या वर्षाच्या अभिभाषणात या स्मारकाचा उल्लेख नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात होणार आहे असे आम्ही गेल्या दहा वर्षापासून ऐकतो आहोत. ही काही निवडणुकीसाठी आपली घोषणा नव्हती. या स्मारकाच्या बाबतीत सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या स्मारकाच्या अनुषंगाने उत्तर देखील दिले आहे. या बाबतीत सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी विधानसभा सभागृहामध्ये उत्तर दिले आहे. या वेळेला या स्मारकाच्या बाबतीतील भूमिका स्पष्ट झाली पाहिजे असे मला वाटते.

महोदय,या स्मारकाच्या बाबतीत गेल्या दहा वर्षापूर्वी घोषणा केली, त्यावेळी जी परिस्थिती होती, तीच परिस्थिती आजही आहे. माझा माननीय मुख्यमंत्री महोदयांवर अविश्वास अजिबात नाही. माझा त्यांच्यावर पूर्णपणे विश्वास आहे.

यानंतर श्री. भोगले......

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ KTG/ MMP/श्री.गितेनंतर 11:55

ता.प्र.क्र.37371.......... श्री.रामदास कदम....

पूर्ण विश्वास आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, किमान या अधिवेशन काळात बजेटमध्ये भरीव तरतूद करण्यात यावी. आपण स्वत: तातडीने दिल्ली येथे जाऊन सीआरझेडचा प्रश्न असेल, पर्यावरण खात्याच्या मंजुरीचा प्रश्न असेल, याबाबत आपले वजन वापरुन परवानगी मिळवून आणावी. नवी मुंबईच्या विमानतळासाठी आपण जशी परवानगी मिळवून आणली त्याच पध्दतीने आपला स्वाभिमान म्हणून, आपली अस्मिता म्हणून या स्मारकाच्या उभारणीसाठी लागणारी परवानगी मिळवून आणणार का? किती कालावधीत हे काम सुरु होईल? या स्मारकासाठी जागा निश्चित करणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी जाण्याची गरज आहे असे नाही. कारण तसे झाल्यास आणखी 5-6 महिन्यांचा अवधी निघून जाईल. किती कालावधीत स्मारकारचे काम सुरु होईल?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पहिल्यांदा मी स्पष्ट करु इच्छितो की, या स्मारकाच्या उभारणीसाठी किती खर्च येईल, त्याकरिता टोकन तरतूद झाली आहे का याबाबत माननीय सदस्यांनी चिंता बाळगण्याची गरज नाही. एकदा प्रस्ताव सुरु झाला की, त्यासाठी कितीही खर्च लागला तरी शासन तो खर्च नक्की प्रस्तावित करेल. सभागृहातील प्रत्येक माननीय सदस्य किंवा राज्यातील प्रत्येक नागरिक त्याला ना म्हणणार नाही. निधी बाबतचा विषय कोणीही मनात आणू नये.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये बदल काय झाले हे मला सांगणे आवश्यक आहे. केंद्रीय पर्यावरण खात्याने जानेवारी, 2011 मध्ये सीआरझेडचे नवीन नियम प्रस्तावित केले. पूर्वीच्या नियमानुसार खोल समुद्रात काही बांधकाम करणे अशक्य होते. पर्यावरण मंत्रालयाने जे काही बदल केले त्यामुळे परिस्थिती बदलली आहे. नवीन परिस्थितीनुसार अर्ज करण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे. हे आव्हान आहे की, तेथे मजबूत स्मारक उभारले गेले पाहिजे. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये तेथे अपघात घडता कामा नये हा दृष्टीकोन असला पाहिजे. त्यासाठी आम्ही सर्व इच्छुक आहोत. त्याकरिता जागा निश्चित करावी असे बैठकीमध्ये ठरले. ती जागा सापडली आहे. याकरिता केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री यांना विनंती केली आहे. सध्या आमचे अधिवेशन सुरु आहे, आपण मुंबईला आलात तर आमच्या ज्येष्ठ नेत्यांशी आणि मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशी चर्चा करता येईल. वेळप्रसंगी प्रत्यक्ष जागेच्या ठिकाणी जाता येईल,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37371.......... श्री.पृथ्वीराज चव्हाण.........

प्रेझेंटेशन करता येईल. बहुधा 2 एप्रिल रोजी यायचे त्यांनी कबूल केले आहे. सध्या संसदेचेही अधिवेशन सुरु आहे. कोणती तारीख निश्चित होईल हे आपल्याला सांगण्यात येईल. मी जाणीवपूर्वक पाठपुरावा करेन. एवढेच काय, मंत्रिमंडळातील सहकारीच नव्हे तर सर्वपक्षीय सहकाऱ्यांना सोबत घेऊन जाऊ. त्याबद्दल चिंता बाळगण्याची गरज नाही.

सभापती महोदय, या स्मारकाच्या उभारणीसाठी अभ्यास करावा लागेल. परवानगी मिळविण्याच्या दृष्टीने आणि मजबूत स्मारक व्हावे या दोन्ही दृष्टीने हा अभ्यास होणे गरजेचे आहे. आपण जे काही करण्याचा प्रयत्न करीत आहोत, क्वचित तसा प्रयत्न जगात कुठे केला गेला नसेल इतका महत्वाकांक्षी प्रकल्प उभारण्याचा आपला मानस आहे. ते काम योग्यरितीने व्हावे यासाठी आमचा प्रयत्न राहणार आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी आणखी काही ठोस निर्णय घ्यावे लागतील. यासाठी किती खर्च येईल हे आताच सांगणे अवघड आहे. मात्र निधीबद्दल बिलकूल काळजी करु नये. लवकरात लवकर निर्णय घेण्याचा प्रयत्न करु. पर्यावरण खात्याकडून परवानगी आणण्याचा प्रयत्न करु. इंदू मिलच्या जागेसंबंधी आपण सर्वांनी जसे प्रयत्न केले आणि त्याला यश आले. तसा प्रयत्न या स्मारकाबाबत आपण सर्वांनी एकदिलाने करु.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाबाबत सविस्तर माहिती सभागृहाला दिलेली आहे. राज्य शासनाचा आणि आपल्या सगळ्यांचा हा संकल्प सिध्दीला नेण्यासाठी जे जे काही करावे लागेल ते करण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे, याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. या संदर्भात ज्या गोष्टी चर्चेच्या निमित्ताने पुढे आल्या आहेत त्या सर्व गोष्टी या आवश्यक आहेतच. परंतु त्याच्याच बरोबरीने एका गोष्टीचा विचार प्रामुख्याने निश्चितपणे व्हावयास पाहिजे. समुद्रामध्ये जी जागा मिळणार आहे ती जागा किती आहे आणि त्या जागेमध्ये आपण काय काय बसवू शकतो यासाठी ज्या तांत्रिक बाबीचा भाग आहे याचा विचार सुरु असताना हे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचे ठरविले आहे त्यामध्ये निश्चितपणे कोणकोणत्या गोष्टींचा समावेश असेल, काय काय तेथे होऊ शकते, काय काय करण्याची आवश्यकता आहे या विषयाबाबत इतिहास तज्ज्ञांचे मत घ्यावे लागेल. शिवछत्रपतींचा अभ्यास असलेले बाबासाहेब पुरंदरे................

नंतर श्री.जुन्नरे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ MMP/ D/ प्रथम श्री. भोगले...... 12:00

**ता.प्र.क्र. : 37371** ......

श्री. हेमंत टकले.....

यांची माहिती तसेच त्यासंदर्भात जनतेचाही सहभाग मागविला तर त्यामध्ये आपल्याला निश्चित काय पाहिजे आहे हे समजायला मदत होईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला जागा मिळवण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणी तसेच केंद्र शासनाच्या परवानग्या कधी मिळणार आहेत, स्मारकासाठी किती जागा मिळणार आहे याची माहिती मिळाल्यानंतर स्मारकामध्ये कशा कशाचा अंतर्भाव असेल याबाबत शासनाने निश्चित धोरण केलेले आहे काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण :सभापती महोदय,प्राथमिक माहितीनुसार स्मारकासाठी प्रस्तावित 16.5 हेक्टर जागा मिळणार आहे. समुद्रात फारशी काही जागा मिळणार नाही. ही जी माहिती आहे ती प्राथमिक असून निश्चित माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जी अपेक्षा केलेली आहे त्यासंदर्भात इतिहास तज्ज्ञांना, समाज शास्त्रज्ञांना तसेच राजकीय व सामाजिक नेत्यांना विश्वासात घेऊन स्मारकासाठी काय काय करणे आवश्यक आहे याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय,छत्रपती शिवाजी महाराजांचा स्मारकाचा प्रश्न मुंबईच्या सन्माननीय पालक मंत्र्यांनी दिनांक 7 जानेवारी, 2013 रोजी मुंबईत मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेमुळे गोंधळ निर्माण झालेला आहे. हा प्रश्न 11 ओळींचा असून यासंदर्भात केवळ एका वाक्यात उत्तर देण्यात आलेले आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे परंतु दि.7 जानेवारी, 2013 रोजी मुंबईच्या पालक मंत्री तसेच या स्मारकाच्या समितीच्या अध्यक्षांनी सांगितले होते की, "कोणत्याही परिस्थितीत स्मारकाच्या खर्चाबाबत अंतिम अंदाज 17 जानेवारी पर्यंत दिला जाईल." त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात आता माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर व त्यावेळी स्मारक समितीच्या अध्यक्षांनी दिलेले उत्तर यामध्ये बरीच तफावत आहे. स्मारक समितीच्या अध्यक्षांनी छत्रपतींच्या अनुयायांचा अवमान केलेला असून त्यांनी जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे छत्रपतींच्या संदर्भात तरी भविष्यात अशा प्रकारची दिशाभूल करणारी माहिती देऊ नये यासंदर्भात आपण स्मारक समितीच्या अध्यक्षांना समज देणार आहात काय ?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर असून हा प्रोजेक्ट पूर्ण होण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. स्मारकासाठी जी समिती नेमली होती ती स्मारकासाठी जागा शोधण्यासाठी आणि अजून काय काय करावे लागेल यासाठी नियुक्त करण्यात आली होती. शेवटी हा निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावयाचा आहे. स्मारकाच्या संदर्भातील निर्णय वैयक्तिक स्तरावर होणार नाही. पूर्वी मंत्रिमंडळाने स्मारकाची जागा निश्चित केली होती. ती जागा बदलावयाची की, नाही यासंदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार मंत्रीमंडळालाच आहे. स्मारकाच्या संदर्भात अभ्यास करुन प्राथमिक अंदाज आल्यानंतर हा विषय मंत्रिमंडळासमोर येईल व त्या प्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल. स्मारकासाठी पैसे किती लागतील यासंदर्भात आताच फारसे खोलात जाणे योग्य नाही. स्मारकाच्या खर्चासाठी महाराष्ट्रातील जनता मागेपुढे पाहणार नाही व तशी शासनाची सुध्दा स्पष्ट भूमिका आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आपण सर्वांनी सकारात्मक भूमिका घेऊन हा प्रोजेक्ट पूर्ण केला पाहिजे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा संपला आहे.

-------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, 12 वी च्या परीक्षा सुरु आहेत.....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली नाही. परवानगी न घेता बोलणे योग्य नाही. आज माझ्याकडे एकूण 289 अन्वये प्रस्तावाच्या 3 सूचना आलेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

त्यासंबंधी निर्णय घ्यायचा आहे. तो घेतला नंतर आपण त्या बाबतीतील आपले विचार मांडावेत. आपला विषय महत्त्वाचा आहे हे मला देखील मान्य आहे.

**वि.स.वि.क्रमांक 49 - महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक 2010 बाबत**

**सभापती** : काल सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 49 - महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक 2010 या संदर्भात माझ्या दालनात बैठक झाली. त्या बैठकीमध्ये जी चर्चा झालेली आहे, त्याचा निष्कर्ष व निर्णय मी आता सभागृहाला वाचून दाखवितो.

सोमवार, दिनांक 11 मार्च 2013 रोजी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेले सन 2010 चे वि.स.वि.क्र.49-महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक, 2010 संदर्भात सद्य:स्थिती काय आहे याबाबत मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत मंगळवार, दिनांक 12 मार्च 2013 रोजी माझ्या दालनात मी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार, माननीय उप सभापती श्री.वसंत डावखरे, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील, माननीय सहकार राज्य मंत्री श्री.प्रकाश सोळंके, विधान परिषदेतील गट नेते सर्वश्री दिवाकर रावते, सुभाष चव्हाण, पांडुरंग फुंडकर, जयंत पाटील, हेमंत टकले आणि विधान मंडळाचे अधिकारी, सहकार विभाग आणि विधी व न्याय विभाग यांचे प्रधान सचिव व संबंधित अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत या विधेयकाच्या सद्य:स्थितीबाबत साधकबाधक चर्चा झाली. त्यात या विधेयकास नजिकच्या काळात माननीय राष्ट्रपती महोदयांची अधिसंमती मिळण्याच्या दृष्टीने माननीय केंद्रीय गृहमंत्री यांच्याकडे राज्याचे संसदीय कार्य व सहकार मंत्री तथा सदर विधेयकाचे प्रभारी मंत्री तसेच सहकार विभागाचे प्रधान सचिव यांनी पाठपुरावा करावा असे ठरलेले आहे.

याबाबत संसदीय का मंत्री व विभागाचे प्रधान सचिव यांनी माननीय राष्ट्रपतींची या विधेयकास लवकरात लवकर अधिसंमती कशी मिळेल या दृष्टीने तातडीने पाठपुरावा करावा.

श्री.दिवाकर रावते : धन्यवाद.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की,....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, आपला विषय टच अँड गो झालेला आहे.

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचने संबंधी**

**सभापती** : नियम 289 अन्वये पहिली प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दिलेली आहे. दुसऱ्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, श्री.रामनाथ मोते, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.दिवाकर रावते, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, ॲड्.आशिष शेलार यांनी दिलेली आहे. तिसरी प्रस्तावाची सूचना सन्माननीय डॉ.दीपक सावंत, श्री.दिवाकर रावते, श्री.रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विनायक राऊत, श्री.अनिल परब यांनी दिलेली आहे.

या सर्व सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाच्या सूचतील विषय असे आहेत की, "वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संपामुळे राज्यातील महाविद्यालय बंद असणे, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी 10 वी व 12 वी च्या उत्तर पत्रिका तपासण्यासाठी घातलेल्या बहिष्कारामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात असणे" विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने या प्रस्तावाच्या सूचना अत्यंत महत्वाच्या आहेत. तसेच, शिक्षकांचा देखील प्रश्न आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

यापूर्वी सुध्दा हा प्रश्न सुटावा म्हणून प्रयत्न सुरु होते. शेवटचा उपाय म्हणून शिक्षक्‍ांनी पेपर तपासण्यावर बहिष्कार घातलेला आहे.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली कालची अपूर्ण राहिलेली दुष्काळावरील चर्चा आणि त्यावरील उत्तर आज पूर्ण करावयाचे आहे. त्या शिवाय नियम 93 अन्वयेच्या सूचना तसेच लक्षवेधी सूचनेचे कामकाज आहे. हे सर्व कामकाज पूर्ण करुन दुपारी 1.00 वाजता दुष्काळावरील चर्चा सुरु करायची आहे. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचने वरील निर्णय मी आज देणार नाही. माझी विनंती आहे की, माननीय विरोधी पक्ष नेता श्री.विनोद तावडे, सन्मननीय सदस्य श्री.कपिल पाटील व डॉ.दीपक सावंत यांनी एक-दोन मिनिटांत आपले विचार मांडावेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय,आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक संपावर आहेत. तर दुसऱ्या बाजूला कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी पेपर तपासण्यावर बहिष्कार घातलेला आहे त्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. या दोन्ही वर्गांनी हे हत्यार एकाएकी उगारलेले नाही. त्यांनी शासनाला भरपूर वेळ दिलेला आहे. या सभागृहात हा प्रश्न मी स्वत: आणि अनेक शिक्षक आमदारांनी आणि अन्य आमदारांनी उपस्थित केलेला आहे. जवळपास 20 ते 25 वेळा कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. त्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात शासनाकडून प्रचंड दिरंगाई झालेली असल्यामुळे आज ही वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, महत्वाची गोष्ट म्हणजे दहावी आणि बारावीचे निकाल वेळेवर लागले नाहीत तर विद्यार्थ्यांचे पुढील करिअर संकटात येईल. तेव्हा शिक्षकांच्या प्रश्ना संदर्भात तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता होती. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात केव्हा चर्चा लावायची हा आपला अधिकार आहे. आपण या प्रश्नाचे गांभीर्य ओळखलेले आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु या राज्यातील लाखो विद्यार्थी आज संकटात आहेत, त्यांचे पालक अडचणीत आहेत आणि शिक्षकांची जी न्याय्य मागणी आहे त्या संदर्भात आम्ही एक-

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

दोन दिवसांत निर्णय घेऊ असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्यास विद्यार्थ्यांचा जीव भांडयात पडेल.

सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या मागण्या पैशासंबंधी नाहीत. त्यांच्या मागण्या किरकोळ स्वरुपाच्या आहेत. परंतु त्या मागण्या देखील मान्य होत नसतील तर शिक्षकांनी काय करायचे असा त्यांच्या समोर प्रश्न उभा राहतो. बहिष्कार हा योग्य मार्ग नाही हे जरी पटत असले तरी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे. शासन शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करु शकत नाही. आम्ही या संदर्भात आजच तोडगा काढू असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले तर विद्यार्थ्यांना आणि राज्यातील कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक्ांना मोठा दिलासा मिळू शकेल. कारण हे दोन्ही वर्ग आज संकटात आहेत आणि महाराष्ट्र देखील अडचणीत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अधिवेशनाचा आजचा तिसरा दिवस आहे. या तिन्ही दिवशी मी हा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करीत होतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एकूण तीन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा प्रश्न आहे, दुसरा वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा प्रश्न आहे आणि तिसरा विनाअनुदानित शिक्षकांचे आंदोलन सुरु आहे. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्यावर बहिष्कार हे शेवटचे हत्यार शिक्षकांनी उगारलेले आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य देखील थोडे अंधारमय होणार आहे. त्यांच्या निकालावर त्याचा परिणाम होणार आहे.

सभापती महोदय, या सभागृहात शिक्षकांच्या मागण्यांवर अनेकवेळा चर्चा झालेली आहे. शासनाने आश्वासन देऊनही त्याची पूर्तता केली नाही म्हणून शिक्षकांनी शेवटचा पर्याय निवडलेला आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या दृष्टीने देखील हा प्रश्न महत्वाचा आहे. शिक्षकांचे प्रश्न सुटले पाहिजेत.

सभापती महोदय, विनाअनुदानित शाळेतील मूल्यांकनाच्या अटी शिथिल करण्यात येतील असे मान्य करुनही त्या अटी शिथिल करण्यात आल्या नाहीत म्हणून विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आझाद मैदानावर आत्मदहन करण्याच्या तयारीत आहेत.

यानंतर श्री.बोर्डे....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

हा गंभीर विषय आहे. माझी विनंती आहे की, तातडीने या विषयी आंदोलनकर्त्या संघटनांशी चर्चा करण्याची आवश्यकता आहे. हा विषय शासनाने प्रतिष्ठेचा न करता, तातडीने संबंधितांशी चर्चा करुन हा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना देण्यात आलेली आहे ती ज्वलंत विषयावरील आहे. एका बाजूला विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत आणि दुसऱ्या बाजूला पालक संभ्रमात आहेत की, त्यांच्या मुलांच्या उत्तरपत्रिका तपासून मिळणार आहेत की नाहीत ? शासनाने सांगितले की, उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामी निवृत्त प्राध्यापकांची मदत घेण्यात येईल. माझ्या माहिती नुसार केवळ काही प्राध्यापकांनीच या बाबत शासनाशी संपर्क साधला आणि बहुतांश प्राध्यापकांनी संपर्क साधला नाही. वास्तविक पाहता शिक्षक आज विद्यार्थ्यांमुळे आहेत. शिक्षक हे समाजाचे गुरु आहेत. शिक्षकांनी संपाचे हत्यार उपसणे हा संशोधनाचा विषय आहे. आज शिक्षक लोकांसमोर काय आदर्श ठेवत आहेत हे देखील आपल्याला पाहिले पाहिजे. आज विद्यापीठांतील परिस्थिती काय आहे ? तब्बल 91 परीक्षा केंद्रांपैकी केवळ 47 परीक्षा केंद्रांमध्ये पॅक्टीकल परीक्षा होत आहेत. हे चुकीचे आहे. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण या बाबत पुढाकार घेऊन या विषयी तत्काळ तोडगा काढावा. शिक्षकांना सोयी-सवलती, सहावा वेतन आयोग ज्या काही गोष्टी हव्या आहेत त्या यथावकाश मिळतील. परंतु त्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना, पालकांना वेठीला धरणे आणि विद्यार्थ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणे योग्य नाही.

श्री.कपिल पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेल्या भूमिकेला माझी हरकत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रितपणे बोलतात.)

श्री.कपिल पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना आपले म्हणणे मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु त्यांना शिक्षकांवर विद्यार्थ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा आरोप करता येणार नाही. अशा प्रकारचे वक्तव्य त्यांनी करु नये. शिक्षक विनाकारण आंदोलन करीत नाहीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण

ता.प्र.क्र.37371....

**सभापती**.....

म.वि.प. नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली होती. त्या अनषंगाने 3-4 मिनिटांमध्ये आपण आपले मत मांडले. त्यानंतर इतरही सन्माननीय सदस्यांनी मत मांडले. त्यांनी सुध्दा हा प्रस्ताव कसा योग्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आपले मत व्यक्त करीत असताना....

श्री.कपिल पाटील : महोदय, माझी मागणी आहे की, त्यांनी जो शब्दप्रयोग केला तो त्यांनी मागे घ्यावा.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा एखादा शब्द मला चुकीचा वाटला तर तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री, माननीय शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. या विषयी सहज तोडगा निघू शकतो. मी आपल्याला विनंती करतो की, आपण स्वत: पुढाकार घेऊन आपल्या दालनात तातडीने बैठक घेऊन या विषयी तोडगा काढावा . तसेच या विषयी सभागृहात सुध्दा चर्चा करावी.

श्री.विक्रम काळे : महोदय, या राज्याला माननीय मुख्यमंत्री आणि शालेय शिक्षण मंत्री संवेदनशील लाभलेले आहेत. सभापती महोदय, आम्ही पाच आमदार कालच आपल्याला भेटून या विषयी विनंती केली होती. आपण सुध्दा त्या विषयी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आज 13 लाख विद्यार्थी सुरळीतपणे परीक्षा देत आहेत. त्यांना कोणतेही टेन्शन नाही. परंतु परीक्षांचा निकाल लागण्यासाठी शिक्षकांचा संप तातडीने मिटण्याची आवश्यकता आहे. वरिष्ठ महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय किंवा कायम विना अनुदानित शाळांतील शिक्षकांचा संप लवकरात लवकर मिटला पाहिजे. कोणत्याही पक्षाने या प्रश्नाचे राजकारण करता कामा नये ही माझी भूमिका आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : आपल्या सदनाची अशी पध्दत आहे की, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना ज्या सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे ते सदस्य हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा कसा होतो या अनुषंगाने बोलत असतात. काही वेळा सत्ताधारी पक्षातील एखाद्या सदस्याने आपली इच्छा व्यक्त केली तर त्यांना सुध्दा आपण एक दोन मिनिटे बोलण्याची संधी देतो. काही वेळा माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांचेही त्या बाबतीतील मत विचारत असतो.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी बारावीच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणीवर जो बहिष्कार घातलेला आहे त्यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, श्री. रामनाथ मोते, डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा जास्त महत्वाचे कोणाचेही हित असू शकत नाही. दहावीचे निकाल असतील किंवा बारावीचे निकाल असतील हे दोन्ही निकाल वेळेवरच जाहीर होतील एवढे आश्वासन मी आपल्या माध्यमातून सभागृहाला देऊ इच्छितो. ज्या शिक्षक संघटना आहेत त्यांच्या ज्या अनेक मागण्या आहेत त्यासंबंधी शिक्षण विभागाच्या पातळीवर, माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर, माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर वेगवेगळ्या बैठका या महिनाभरात झालेल्या आहेत. 5 तारखेला बैठक झाली. 16 तारखेला बैठक झाली. 27 तारखेला बैठक झाली. त्यानंतर मागच्या रविवारी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या बरोबर चर्चा झालेली आहे. मी सुध्दा सर्व संघटनांबरोबर आजही चर्चेमध्ये आहे. मी आपल्या माध्यमातून या सभागृहाला आणि राज्याला आश्वस्त करु इच्छितो की, या बाबतीत एक दोन दिवसाच्या आतच तोडगा निघेल. कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांची कोणतीही अडचण होणार नाही याबद्दल निश्चितपणे मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो.

**सभापती** : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या या तीनही सूचना महत्वाच्या असल्यामुळे या संदर्भात सदनामध्ये चर्चा करावयाची काय, चर्चा कशी करावयाची या बाबतीत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि सन्माननीय सदस्यांना बोलवून या बाबतीतील निर्णय मी उद्या सभागृहात जाहीर करीन.

---

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य नागपूरचे शिक्षक आमदार श्री. नागो पुंडलिक गाणार हे कालपासून नागपूरला उपोषणाला बसलेले आहेत. त्या ठिकाणी कोणीही गेलेले नाही. प्रोटोकॉल म्हणून किमान त्या विभातील अधिकारी जाणे, त्यांना निरोप देणे आणि त्यांना भेटून उपोषणा पासून परावृत्त करणे यासाठी सुध्दा प्रयत्न झालेले नाहीत. माझी विनंती आहे की, माननीय शिक्षण मंत्र्यांनी त्यांच्याशी तातडीने बोलावे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी सभागृह सुरु असताना येथे प्रश्न मांडण्याचे सोडून तिकडे उपोषण करण्याला काय अर्थ आहे ?

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचा शिक्षकांच्या मागण्यांना पाठिंबा नाही असे समजावयाचे का ?

श्री. रामनाथ मोते : त्यांचा पाठिंबा नाही असे गृहीत धरण्यास हरकत नाही. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो की, कृपया आपण त्यांच्याशी बोलावे. त्यांचे जे काही विषय असतील त्याबाबतीत त्यांना आपण चर्चेला बोलवावे आणि त्यांचे उपोषण तातडीने सोडवावे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, खरे म्हणजे विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना या ठिकाणी जर प्रश्न मांडले तर त्याला निश्चितपणे उत्तर मिळू शकेल. सन्माननीय सदस्य श्री. गाणार कशासाठी उपोषणाला बसले आहेत याची मला खरोखरच कल्पना नाही. जर ते उपोषणाला बसले असतील तर मी त्यांच्याशी स्वत: दूरध्वनीवरुन बोलतो आणि त्यांना सांगतो की, आपण तातडीने मुंबईला यावे

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....

म्हणजे या सभागृहामध्ये त्या प्रश्नासंबंधी सन्माननीय सदस्यांना चर्चा करता येईल. मी स्वत: त्यांना फोन करतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या उपोषणाबाबत चिंता करु नये.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी माननीय शिक्षण मंत्र्यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संपाबाबत उत्तर दिले आहे. परंतु वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचाही संप सुरु आहे. त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा माननीय शिक्षण मंत्र्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली तर बरे होईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, दिनांक 4 फेब्रुवारी, 2013 पासून वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांनी संप सुरु केलेला आहे. त्यांनीही पेपर तपासण्याच्या प्रक्रियेवर बहिष्कार घातलेला आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संघटनांबरोबर एक बैठक घेऊन ताबडतोब तोडगा काढावा अशी मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, आझाद मैदान येथे कायम विना अनुदानित शाळेचे 400-500 शिक्षक उपोषणाला बसलेले आहेत. त्यांनी आज दुपारी 2 नंतर ते आत्मदहन करण्याचा निर्णय जाहीर केलेले आहे. त्यांचा प्रश्न गंभीर आहे. म्हणून शासनाने त्या शिक्षकांच्या मागण्यांसंबंधी शासनाने निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, त्या शिक्षकांनी ज्या अटी शिथिल करण्याची मागणी केलेली आहे त्याबाबतची संपूर्ण नस्ती मी मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीच्या वेळी सादर करणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय मुख्यमंत्र्यांना एक छोटासा प्रश्न विचारावयाचा आहे. विधानपरिषदेच्या सदस्यांसंबंधी लोकसभेमध्ये एक अहवाल गेलेला आहे. या सभागृहाची सदस्य संख्या सम प्रमाणात असावी, त्यामध्ये शिक्षक मतदार संघ रद्द करावा असे अहवालात नमूद केलेले आहे. यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांना कल्पना आहे का ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

**सभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर गुरुवार, दिनांक 14 मार्च, 2013 व शुक्रवार 15 मार्च, 2013 या दोन दिवशी चर्चा होईल आणि शुक्रवार, दिनांक 15 मार्च, 2013 रोजीचे अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येईल. अशासकीय कामकाज नंतरच्या काळामध्ये घेण्यात येईल.

---

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

नियम 93 अन्वयेच्या सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "खामगांव नगरपरिषदेच्या तत्कालीन अभियंत्यांनी किंमतीपेक्षा अधिकचा निधी खर्च करण्यास मान्यता नसताना जास्त दराची निविदा मंजूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी "मुंबईतील अंधेरी-मरोळ येथील पोलीस वसाहतीची झालेली दुरवस्था" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "युपीएससी परीक्षेत मराठीसह प्रादेशिक भाषा वगळ्याचा नुकताच घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबई शहरातील परेल येथील महात्मा गांधी स्मारक रुग्णालयातील लिफ्ट बंद असल्यामुळे रुग्णांना व कर्मचाऱ्यांना होत असलेला त्रास" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:30

माननीय सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, भगवान साळुंखे, रामनाथ मोते व चंद्रकांत पाटील यांनी "कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या, शिक्षकांनी पेपर तपासणीवरील बहिष्कार जाहीर केल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेली नाराजी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया, डॉ. रणजीत पाटील व श्री. वसंतराव खोटरे यांनी "अकोला येथील विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ प्रशासनाकडून जागा देण्यासाठी दाखविण्यात येत असलेली उदासीनता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, नियम 93च्या सूचनांवरील निवेदने शेवटच्या दिवशी येतात असा मागील तीन अधिवेशनामधील अनुभव आहे. नियम 93च्या सूचनांवरील निवेदने प्रत्येक आठवड्यात सभागृहासमोर आली पाहिजेत असे निदेश आपण संबंधित विभागाना द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : या संबंधी मी मागील अधिवेशनामध्ये देखील सूचना दिली होती की, एखाद्या विषयावर निवेदन करावे असे निदेश दिल्यानंतर ते निवेदन 5 दिवसात सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. मी पुनश्च सूचना देत आहे की, सभागृहामध्ये एखादा विषय मांडल्यानंतर त्या संदर्भातील निवेदन संबंधित विभागाने 5 दिवसामध्ये सभागृहासमोर सादर करावे.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आधारकार्ड काढण्यासाठी येत असलेल्या समस्या

**मु. शी.** : आधारकार्ड काढण्यासाठी येत असलेल्या समस्या यासंबंधी

श्री संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री चरणसिंग सप्रा, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री सुभाष चव्हाण, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री जयवंतराव जाधव, विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री किरण पावसकर, अनिल भोसले, डॉ. नीलम गो-हे, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, राणा जगजितसिंह पाटील व दिपकराव साळुंखे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गॅस सिलिंडरपासून शाळेतील प्रवेशापर्यंत सर्वत्र आधार कार्डाची असलेली सक्ती, निवृत्ती वेतनासाठी, भविष्य निर्वाह निधीसाठी, तसेच, विद्यापीठांमधील शिष्यवृत्तीधारकांसाठी आवश्यक होणार असणे, आधार कार्ड नोंदणीसाठी राज्यशासनाने मोहीम राबविली असली तरी अपुरी नोंदणी केंद्रे, आवश्यक यंत्रांची कमतरता, काही ठिकाणी अननुभवी कर्मचारी नसणे, नोंदणी नंतर चार ते सहा महिन्यांची प्रतिक्षा, चौकशीसाठी दिलेला फोन क्रमांक कायम व्यस्त असणे, केंद्रात गेल्यावरही आवश्यक माहिती न मिळणे, कर्मचाऱ्यांचा उर्मटपणा, जेष्ठ नागरिक व अपंग व्यक्तींना आधार कार्ड काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात समस्या येणे, जनजागृतीअभावी विभागात आधारकार्ड नोंदणी केंद्र कुठे आहे याचीच माहिती अनेकांना नसणे, अनेक तास रांगेत उभे राहूनही योग्य ती कागदपत्रे नसल्याने अनेकांना परत जावे लागणे, राज्यात आतापर्यंत झालेल्या ३.८६ कोटी नोंदणीपैकी सव्वापाच लाख कार्ड केवळ पत्ता सापडत नसल्याने पोस्टाने परत गेली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:30

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, संपूर्ण राज्याच्या दृष्टीने ही फार महत्वाची लक्षवेधी आहे. ही लक्षवेधी स्वीकृत केल्याबद्दल मी आपले आभार मानतो. आधार कार्डाची योजना शासनाने प्रामाणिकपणे राबविलेली असली तरी स्थानिक पातळीवर अशी माहिती मिळते की, ब-याच ठिकाणी आधार कार्डाच्या बाबतीत गोंधळ निर्माण झालेला असून आधार कार्ड देणा-या यंत्रणेचा अभाव आहे. हे आधार कार्ड देण्यासाठी 20 खाजगी कंपन्या नेमलेल्या आहेत असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. या 20 खाजगी कंपन्या अपु-या असल्यामुळे या कंपन्यांची संख्या वाढविण्यात येईल काय ? तसेच अतिरिक्त 2 हजार मशिन्स देखील खरेदी करण्यात येणार आहेत. या मशिन्स केव्हा खरेदी करण्यात येतील आणि त्या केव्हा कार्यान्वित होतील ? या 2 हजार मशिन्स अपु-या पडल्या तर आणखी मशिन्स खरेदी करण्यात येतील काय ? अंध, अपंग अशा रहिवाश्यांची आधार नोंदणी करण्यासाठी फिरते नोंदणी केंद्र मुंबई शहरात सुरु करण्यात आल्याचे निवेदनामध्ये म्हटलेले आहे.हे फिरते नोंदणी केन्द्र केव्हा सुरु करण्यात आले आणि अशा प्रकारचे फिरते नोंदणी केन्द्र अन्य ठिकाणी देखील सुरु करण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : महाराष्ट्र राज्यामध्ये जवळ जवळ साडेपाच कोटी आधार कार्डाची नोंदणी झालेली आहे. 5 कोटीची आधार कार्ड जनरेट झालेली आहेत. या आधार कार्डाच्या नोंदणीबाबत स्थानिक पातळीवर संभ्रम आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी सांगू इच्छिते की, आपल्या राज्यामध्ये 4200 मशिन्स आहेत. दरदिवशी 1.6 लक्ष इतकी नोंदणी करण्याची क्षमता आहे. या क्षमतेनुसार डिसेंबर अखेर पर्यंत राज्यातील सर्व लोकसंख्येची नोंदणी होऊ शकेल. अतिरिक्त 2000 मशिन्स खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. एप्रिल महिन्यापर्यन्त मशिन्स कार्यान्वित होतील. मोबाईल युनिट बाबत सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. मोठ्या महानगरपालिकांमध्ये मोबाईल युनिटची सुविधा आपण करीत आहोत. त्यास चांगला रिस्पॉन्स मिळत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : आज सामान्य, गोरगरीब जनतेमध्ये आधार कार्डामुळे योजनांचा फायदा मिळणार असल्यामुळे आधार कार्ड मिळविण्यासाठी प्रत्येक केंद्रांमध्ये मोठमोठया रांगा लागलेल्या आहेत. या संदर्भात मी दोन स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. 5.25 लाख कार्ड त्यापैकी पुणे विभागातील 48 हजार आधार कार्ड पत्ता नीट नसल्यामुळे तसेच अन्य गोष्टींची कमतरता असल्यामुळे परत गेलेली आहेत. ही आकडेवारी सरकारचीच आहे. आधार कार्ड नोंदविणाऱ्या एजन्सीज् काम करतात. त्या एजन्सीज मध्ये पत्ता फिड करणारे ऑपरेटर्स असतात, त्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण व्यवस्थित नसणे, त्या ऑपरेटर्सना त्या एजन्सींज कडून योग्य त्या प्रमाणात दिले न जाणे, त्यामुळे आधार कार्डामध्ये तांत्रिक त्रुटी रहात आहेत.

महोदय, या एजन्सीज्ने जे ऑपरेटर्स नेमले आहेत, त्यांचे प्रशिक्षण नीटपणे झाले आहे काय या बाबतीत अधून मधून त्यांची तपासणी करणे हे काम सरकार करीत आहे काय, तशी तपासणी करण्यात येत नसेल तर तशी तपासणी शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल काय ? निराधार महिला, विधवा महिला, कुटुंब प्रमुख असलेल्या महिला यांची संख्या समाजात मोठी आहे. त्यांना शासनाच्या वेगवेगळया योजनांचा लाभ घेताना आधार कार्ड असणे आवश्यक आहे. आधार कार्डच्या नोंदणीमध्ये महिलांची संख्या खूप कमी आहे ही वास्तविकता आहे. महिलांना योजनांची माहिती व्हावी, त्यांना योजनेचा लाभ घेता यावा म्हणून विविध जिल्हयातील प्रशासनाकडून एक दिवस राखून ठेवण्याचा कार्यक्रम आपण सुरु करणार आहात. त्याप्रमाणे आधार कार्ड नोंदणीमध्ये सुध्दा महिला लाभधारकांना अग्रक्रम देण्यासाठी तो नियम लागू करणार काय ?

प्रा.फौजिया खान : या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पहिला प्रश्न विचारला आहे की, अर्धवट पोस्टल ॲड्रेस असल्यामुळे काही संख्येमध्ये आधार कार्ड परत गेलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. या लोकांना ट्रेस करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना आदेश देण्यात येतील. डेटा ऑपरेटरांच्या बाबतीत तक्रार केलेली आहे, त्या बाबतीत यशदाने थर्ड पार्टी ऑडीट केलेले आहे. त्यात 200 डेटा ऑपरेटर्स यांना सस्पेंड करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात आले आहेत की, आधार कार्ड नोंदणीसाठी मोठे प्रिमायसेस म्हणजे शाळा, महाविद्यालये अशा प्रकारच्या जागा उपलब्ध करुन द्याव्यात. या शिवाय ई-आधार ही महत्वाची सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. दोन महिन्यांपासून ही सुविधा सुरु करण्यात आलेली आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

आधार कार्डचा नंबर मिळाल्या नंतर घरी बसून आधार कार्डची प्रिंट आपण काढू शकतो. या सिस्टीमची गती थोडी कमी होती. आता ती सिस्टीम स्पिड-अप झालेली आहे. आता आपण दररोज 50 हजार आधार कार्डची प्रिंट काढू शकतो. ई-आधारच्या माध्यमातून दररोज 1.50 लाख आधार कार्डच्या प्रिंट निघाव्यात असा विभागाचा प्रयत्न आहे. तसेच आधार कार्ड देताना महिलांना प्राधान्यक्रम देण्याच्या बाबतीत विचार करण्यात येईल.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, ई-आधार कार्डच्या संदर्भात मी बोलू इच्छितो. आधार कार्ड देण्यासाठी कमीत कमी चार ते सहा महिन्याचा अवधी लावला जातो. ई-आधार सिस्टीम ही फेल झालेली असे मी प्रामुख्याने या ठिकाणी नमूद करु इच्छितो. डाऊनलोड केलेला फार्म ती सिस्टीम ॲक्सेप्ट करीत नाही ही वस्तुस्थिती आहे. डाऊनलोड केलेला फार्म सिस्टीम ॲक्सेप्ट का करीत नाही याचा शासन शोध घेईल काय ? काही ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात आधार कार्ड केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. मुलुंड येथील गोशाळा रोड येथे एका महिन्यासाठी आधार कार्ड केंद्र सुरु केलेले आहे. या केंद्राचा अवघी वाढवावा. या केंद्राची मुदत संपत आल्याने लहान मुले आधार कार्ड घेण्यासाठी गेले होते त्यांना परत पाठविण्यात आले, त्यांचे आई-वडील आधार कार्ड घेण्यासाठी गेले होते, त्यांना देखील परत पाठविले म्हणून त्या ठिकाणी दोन दिवस निदर्शने देखील झाली. म्हणून या केंद्रास मुदतवाढ देण्यात येईल काय? मुंबईत तात्पुरत्या स्वरुपातील आधार कार्ड केंद्रे किती आहेत व त्या केंद्रास कधी पर्यन्त मुदत घालून देण्यात आलेली आहे, त्या केंद्राचा अवधी वाढवून देण्यात येणार आहे काय?

प्रा.फौजिया खान : तात्पुरत्या स्वरुपातील आधार केंद्राकडून मुदत वाढीची मागणी आली तर त्यांची मागणी कन्सीडर करता येऊ शकते. ई-आधार सिस्टीम डाऊनलोड केलेला फार्म ॲक्सेप्ट करीत नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ गितेनंतर 12:40

लक्षवेधी सूचना क्रमांक-1......... प्रा.फौजिया खान....

सुरुवातीला थोडा त्रास झाला. परंतु यामध्ये स्पीडअप करण्याचा प्रयत्न करीत आहोत. स्पीडअप झ ाालेला सुध्दा आहे. देशभरात आज दररोज 50 हजार आधार कार्ड जनरेट करु शकतो, हे प्रमाण 1.5 लाखापर्यंत करण्याचा प्रयत्न सुरु आहे. डिसेंबर, 2013 पर्यंत या राज्यामध्ये सगळे आधार कार्ड रजिस्ट्रेशन होईल अशा पध्दतीने नियोजन करण्यात आले आहे.

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

सभापती महोदय, आतापर्यंत 50 टक्के एनरोलमेंट झालेले आहे. यासाठी काही काळजी करण्याची गरज नाही. अवधी वाढविण्याची गरज असेल तर तो अवधी सुध्दा वाढविण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, डिसेंबरपर्यंत राज्यात सर्वांची नोंदणी पूर्ण होईल असे मंत्री महोदया म्हणत असतील तर आज राज्यात पेमेंटसाठी किंवा इतर अनुदानासाठी आधार कार्डची सक्ती का करण्यात येत आहे? कांदिवली येथे आधार कार्ड मिळविण्यासाठी रजिस्ट्रेशन केंद्रावर रात्रीपासून लोक रांगा लावत आहेत. दररोज सकाळी केंद्राबाहेर दोन-तीन किलोमीटरपर्यंत लोकांची रांग लागलेली असते. शासनाची क्षमता नसेल तर आणि डिसेंबरपर्यंत सगळ्यांना आधार कार्ड दिले जाणार असेल तर पेमेंटसाठी आणि विद्यार्थ्यांच्या सवलतीसाठी, रेशन कार्डधारकांसाठी आधार कार्ड सक्ती का केली जात आहे? जानेवारी, 2014 नंतर सक्ती करण्यात यावी. आधार कार्डसाठी फिरते वाहन कुठे उपलब्ध करण्यात आले आहे?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, जगात कुठे इतका महत्वाकांक्षी उपक्रम सुरु झाला असेल असे मला वाटत नाही. केंद्र सरकारने 120 कोटी लोकांची नोंदणी करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. उद्देश एकच आहे की, सरकारकडून लाभार्थ्यांना जे लाभ दिले जातात, अनुदान दिले जाते, सबसिडी दिली जाते त्यात मोठया प्रमाणात लिकेज आहेत. ते होऊ नये यासाठी बँक खाते, ड्रायव्हींग लायसन्स, पासपोर्ट आदीसाठी एकच बायोमेट्रिक आधार क्रमांक देऊन तो वापरण्यात यावा अशी मूलभूत कल्पना आहे. ही महत्वाकांक्षी योजना राबविताना अडचणी आल्या ही गोष्ट खरी आहे.

सभापती महोदय, मी दोन-तीन बाबी स्पष्ट करु इच्छितो. केंद्र सरकारने 1 जानेवारी, 2013 पासून थेट लाभ योजना राबविली. उद्देश असा होता की, आधार कार्ड क्रमांक मिळाला असेल तर तो बँक खात्याशी लिंकअप केल्यानंतर अनुदानाचा हिस्सा लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...........

डायरेक्ट जमा होईल. काही ठिकाणी गैरसमज झाले. सक्ती करण्यात आली. आधार कार्ड नसेल तर अनुदानाचा हिस्सा मिळणार नाही असे सांगण्यात आल्यामुळे बऱ्याच ठिकाणी लोकांची धावपळ झाली, आधार कार्ड काढण्यासाठी रजिस्ट्रेशन केंद्रावर लोकांच्या रांगा लागल्या. विशेषत: एलपीजी गॅसबद्दल लोकांमध्ये गैरसमज निर्माण झाला. एलपीजी गॅस सिलिंडरवरील सबसिडीची रक्कम आधार कार्ड असेल तरच मिळेल असे नाही. मी स्पष्ट करु इच्छितो की, केंद्र सरकार आणि राज्य सरकारची भूमिका अगदी स्पष्ट आहे. थोडा गैरसमज झाला असेल, चुकीच्या घोषणा झाल्या असतील, परंतु कोणत्याही व्यक्तीला आधार कार्ड नाही म्हणून लाभापासून वंचित केले जाणार नाही. आधार कार्ड नसेल तर थोडासा वेळ लागेल, परंतु आधार कार्ड नसल्यामुळे सुविधा मिळणार नाही, स्कॉलरशीपची रक्कम मिळणार नाही, अनुदानित गॅस सिलिंडर मिळणार नाही हे बिलकूल चुकीचे आहे. असे काही होणार नाही. 1 जानेवारी, 2013 पासून थेट लाभ योजना केंद्र सरकारने सुरु केली. त्यामुळे 34 प्रकारच्या सुविधांबाबत आधार कार्डचा वापर केल्याचे घोषित केले.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये सहा जिल्हे आहेत, त्यापैकी वर्धा जिल्हयाचे मी अभिनंदन करतो. वर्धा जिल्हयामध्ये 87 टक्के लोकांची नोंदणी पूर्ण झाली आहे. काही जिल्हयांमध्ये 15 टक्केच नोंदणी झालेली आहे, ते प्रमाण वाढवावे लागेल. आता असे झाले की, जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित केले, आम्ही थेट लाभ योजना लगेच सुरु करणार आहोत, त्यामुळे त्वरित आधार कार्ड काढावे. शासनाने सूचना दिलेली आहे, जोपर्यंत एखाद्या जिल्हयामध्ये 80 टक्के लोकांची नोंदणी पूर्ण होत नाही, आता फक्त असा एकच जिल्हा आहे, ज्या जिल्हयामध्ये 80 टक्क्यापेक्षा जास्त नोंदणी पूर्ण झाली आहे, तो वर्धा जिल्हा आहे. त्या जिल्हयामध्ये 87 टक्के नोंदणी पूर्ण झालेली आहे. इतर ठिकाणी प्रमाण कमी आहे. कमीत कमी नोंदणी 15 टक्के झ ालेली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश दिलेले आहेत की, जोपर्यंत 80 टक्के नोंदणी पूर्ण होत नाही तोपर्यंत तुम्ही घोषणा सुध्दा करु नका.

नंतर श्री.जुन्नरे...

अध्यक्षीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आलेले आहेत की, आधार कार्डची नोंदणी जोपर्यंत 80 टक्के होत नाही तोपर्यंत ज्यांच्याकडे आधार कार्ड नंबर आहे त्यांनाच पैसे मिळतील अशा प्रकारची कोणतीही घोषणा करु नये. आधार कार्ड नसेल तर आपल्याला पैसे मिळणार नाहीत, स्कॉलरशिपचे पैसे मिळणार नाहीत, गॅस सिलेंडरचे पैसे मिळणार नाही हा जो गैरसमज पसरलेला आहे तो चुकीचा आहे. आधार कार्डच्या संदर्भात जाहिराती देण्यात आलेल्या असून यासंदर्भात पुन्हा काही जाहिराती देण्यात येतील. सर्वांनी आधार कार्ड घेणे आवश्यक असून शासनाची जी काही सबसिडी लीकेज होते ती थांबवली गेली पाहिजे ही आधार कार्डची मूळ कल्पना आहे. आधार कार्डच्या संदर्भात बऱ्याच ठिकाणी गैरसमज झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, आधार कार्डच्या संदर्भात नवीन सूचना देण्यात आल्या असून आधार कार्डच्या आणखी मशिन आणणे, आधार कार्डची नोंदणी जलद करणे, आधार कार्डचे केंद्र जास्त उघडणे अशा पध्दतीचे प्रयत्न एका बाजूला सुरु आहेत. डिसेंबर महिन्यापर्यंत आधार कार्डची नोंदणी पूर्ण होईल अशी आमची अपेक्षा आहे. परंतु आधार कार्डच्या नोंदणीच्या संदर्भात काही ठिकाणी अडचणी आहेत. डिसेंबर पर्यंत सर्व जिल्हयात 80 ते 100 टक्के आधार कार्डची नोंदणी पूर्ण होईल यासाठी यंत्रणा उभी केली जाणार आहे. ही यंत्रणा केवळ सार्वजनिक ठिकाणीच असावी किंवा बँकेमध्ये असावी अशी संकल्पना आहे. वैयक्तिक लाभाकरिता अशा प्रकारच्या केंद्राची कोणी मागणी केली तर ती पूर्ण होऊ शकणार नाही अशाही सूचना देण्यात आलेल्या आहेत.

आधार कार्डच्या संदर्भात ज्या काही अडचणी असतील त्या आपण सांगितल्या तर त्या जिल्हाधिकाऱ्यांना सांगून यासंदर्भातील प्रश्न सोडविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. परंतु यासंदर्भात जो पॅनिक निर्माण करण्याचा प्रयत्न झालेला आहे तो थांबला पाहिजे. ज्याच्याकडे आधार कमांक नाही अशांना सुध्दा जे काही लाभ आहे ते मिळतीलच फक्त यामध्ये ज्यांच्याकडे आधार कार्ड आहे त्यांच्या खात्यावर डायरेक्ट कॅश ट्रान्सफर होईल व ज्यांच्याकडे आधार कार्ड नाही त्यांना मात्र पैसे ट्रान्सफर होण्यासाठी थोडा विलंब लागेल. त्यामुळे यासंदर्भात माझे राज्यातील जनतेला आवाहन आहे की, आपण आपल्या सोईप्रमाणे आधार कार्डची नोंदणी करुन घ्यावी. नोंदणी झाल्यानंतरची माहिती अपलोड करण्यामध्ये विलंब लागत होता, ..2..

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

आधार कार्ड पोस्टाने येण्यामध्ये विलंब लागत होता. या विषयाच्या संदर्भात राज्यमंत्र्यांनी सांगितल्यानुसार आधा्र कार्डची माहिती संगणकावर डाऊन लोड करुन आपल्याला आपल्या आधार कार्डची माहिती मिळू शकेल अशा प्रकारची आता नवीन सुविधा झालेली आहे.

आधार कार्डची यंत्रणा खूप मोठी आहे. आधार कार्डसाठी लागणारी यंत्रसामुग्री वाढविणे शक्य आहे. परंतु नवीन आधार कार्ड जनरेट करण्याची जी प्रक्रिया आहे, व्हँकेट प्रोसेसींग आहे त्याला सुध्दा लिमिटेशन आहे. यंत्रसामुग्री मोठया प्रमाणात घेतली तर आधार कार्ड जनरेट करण्याच्या प्रक्रियेला विलंब होईल व त्यामध्ये आपल्याला उद्दिष्ट साध्य करता येणार नाही. विभागाच्या माध्यमातून अधिक मशिन्स् विकत घेऊन अधिक केंद्र सुरु करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मला एवढेच सांगावयाचे आहे की, कोणीही पॅनिक निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये किंवा सबसिडी मिळणार नाही असे सांगण्याचा प्रयत्न करु नये. आधार कार्डच्या संदर्भात जो काही गैरसमज निर्माण झालेला आहे तो होता कामा नये. यापुढे आधा्र कार्डची 80 टक्के नोंदणी झाल्याशिवाय कोणीही कोणत्याही प्रकारची घोषणा करु नये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्याबाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाजात दर्शवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक दोन पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 3 घेण्यात येईल.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात मोठया प्रमाणात मुली बेपत्ता होण्याबाबत

**मु. शी.** : राज्यात मोठया प्रमाणात मुली बेपत्ता होण्याबाबत यासंबंधी सर्वश्री श्रीमती शोभाताई फडणवीस, दिप्ती चवधरी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री. संजय दत्त, सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. अपूर्व हिरे, श्री.विजय गिरकर, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विनोद तावडे, नितीन गडकरी, मोहन जोशी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात वर्षाकाठी सरासरी किमान आठ हजारापेक्षा अधिक मुली व महिला बेपत्ता होण्याच्या घटना घडत असून त्यातील अर्ध्याच प्रकरणांचा छडा लागत असणे, सन २००९ मध्ये ६,७५८ मुली हरवल्याची नोंद असून त्यापैकी केवळ ५,२२३ मुली सापडणे, सन २०१० मध्ये ७,५६६ मुली व महिला बेपत्ता तर ५,२८३ मुली सापडणे, सन २०११ मध्ये बेपत्ता झालेल्या ८,३४५ मुलींपैकी केवळ ५,७०७ मुली सापडल्या असून राज्यात शाळकरी व महाविद्यालयीन मुला-मुलींचे अपहरण करुन त्यांची विक्री करुन त्यांना वाम मार्गाला लावणारी टोळी सक्रीय असणे, तसेच लग्नाचे आमिष देऊनही या मुलींची विक्री होत असल्याचे काही घटनांमधून निदर्शनास येणे, या घटनांमध्ये होत असलेली वाढ, परिणामी पालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व घबराटीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील(गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सदर विषय मोठा असल्यामुळे लक्षवेधी सूचनेला थोडा अधिक वेळ द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्यात दर वर्षी 7 ते 8 हजार मुलींची निरनिराळ्या प्रकारे विक्री होत आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, आम्ही टोळया पकडल्या आहेत. परंतु राजस्थान, मध्यप्रदेश, हरियाणामध्ये भ्रूणहत्येमुळे मुलींची संख्या मोठया प्रमाणात कमी झालेली आहे. त्यामुळे राजस्थान, मध्यप्रदेश, हरियाणा या ठिकाणचे लोक महाराष्ट्रात येऊन 2,5,10 हजार रुपयांमध्ये मुलींची खरेदी -विक्री करतात. या मुलींबरोबर लग्न करतात परंतु पुढे त्या मुलींचे काय होते याचा काहीच पत्ता लागत नाही. चंद्रपूर जिल्हयातील 350 मुली गायब झालेल्या असून त्यांचा अजूनपर्यंत छडा लागलेला नाही. मुलींचे वेश्याव्यवसायासाठी अपहरण, भीक मागण्यासाठी अपहरण केले जाते ही वस्तुस्थिती आहे परंतु यासंदर्भात आपण कोणत्याही प्रकारचे बंधन आणू शकलो नाही. यासंदर्भात आपण ज्या काही टोळया पकडल्या आहेत त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केलेली आहे ?

सभापती महोदय, ज्या मुली लग्न होऊन गेल्या परंतु त्यांचा पत्ता लागत नाही अशा मुलींचा शोध घेण्यासाठी पोलीस स्टेशनला वारंवार तक्रार करुनही यासंदर्भात माहिती मिळत नाही. या मुलींना परत आणण्यासाठी कोणताही विचार झालेला नाही. या विषयाच्या संदर्भातील आपले कायदे कडक नाहीत. जी मुले हरवतात त्यांच्या संदर्भात आपण 24 तासापर्यंत गुन्हयांची नोंद केली जात नाही व 24 तासानंतर गुन्हा नोंदवला जातो व नंतर चौकशी केली जाते परंतु 24 तासापर्यंत या मुली परराज्यापर्यंत जाऊ शकतील एवढा वेळ आपण त्या गुन्हेगारांना देतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

म्हणून मला स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे. हे सर्व प्रकार थांबवायचे असतील तर आपल्याला कायद्यात बदल करावा लागेल. आपले जे कायदे आहेत ते जुने आहेत. तेव्हा या मुलींना वाचविण्याकरिता, मुलींना संरक्षण देण्याकरिता शासन नवीन कायदे तयार करणार आहे काय ? तसेच ज्या टोळ्या पकडल्या आहेत, त्यांच्या विरूद्ध आपण कोणती कारवाई केली आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विस्ताराने प्रश्न विचारताना आकडेवारी दिलेली आहे. मुंबई किंवा उर्वरित महाराष्ट्रामध्ये पोलिसांनी चांगल्या पद्धतीने शोध मोहीम पार पाडली आहे. मुंबईचा विचार केला तर 93 ते 85 टक्के मुला-मुलींचा शोध लावण्यामध्ये पोलीस यशस्वी झालेले आहेत. चंद्रपूरचा विषय मागच्या अधिवेशनात देखील आला होता. त्यावेळी आपण कारवाई करून काही मुलींना परत आणण्याचे काम केले होते. आपण प्रोजिसर प्रमाणे तपास करीत असतो. अनेक प्रकरणांमध्ये मिसिंग चाईल्डचा तपास लागल्यानंतर देखील त्याची नोंद पालकांमार्फत पोलीस विभागाकडे करण्यात येत नाही. त्यामुळे हा आकडा थोडासा जास्त दिसतो. आपण ह्युमन ट्रॅफिंकिंगच्या संदर्भात प्रत्येक जिल्ह्यामध्ये सेल स्थापन केला आहे. डीआयजी लेव्हलचा अधिकारी त्यावर मॉनेटरिंग करीत असतो. ज्या तीन टोळ्या सापडल्या आहेत त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात आली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जो प्रश्न विचारला आहे तो अत्यंत गंभीर आहे. ज्या कायद्यान्वये आपण गुन्हेगारांना शिक्षा करू पहात आहात तो कायदा अतिशय तकलादू आहे. हा ऑर्गनाईझ्ड क्राईम आहे. यामध्ये संघटित टोळ्या काम करीत आहेत. अशा टोळ्यांवर आपण मोक्का अंतर्गत कारवाई करणार आहात काय ? अशी कारवाई जो पर्यंत होत नाही, तो पर्यंत या टोळ्यांना भीती वाटणार नाही. तसे केले नाही तर सर्रास असे गुन्हे घटत राहणार. आज गुन्हेगाराला पकडले की, त्याला चार दिवसात जामीन मिळतो. त्यामुळे पुन्हा तेच काम करण्यासाठी तो मोकळा होतो. तेव्हा एमसीओसी अंतर्गत या टोळ्यांवर आपण कारवाई करणार आहात काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, नवीन क्रीमिनल ॲक्ट येत आहे त्यामध्ये कडक शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यासंबंधीचा अध्यादेश देखील निर्गमित झाला आहे. अशा प्रकरणांमध्ये संघटित टोळयांचा हात आहे असे निदर्शनास आले तर निश्चितपणे तीही कारवाई करायला सरकार मागेपुढे पाहणार नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, लेखी उत्तरा मध्ये नमूद करण्यात आले आहे की, पोलीस आयुक्तालयातील पोलीस आयुक्तांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा, 1956 अंतर्गत कलम 18 व 20 नुसार कुंटणखाने बंद करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. हे नुसते वाचनामध्ये आहे की खऱ्या अर्थाने त्याची अंमलबजावणी होते ? याचे उत्तर सभागृहामध्ये देण्यात यावे. तसेच किती कुंटणखाने आहेत हे देखील सांगावे अशी मी आपल्या मार्फत माननीय मंत्र्यांना विनंती करते.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जी आकडेवारी अपेक्षित आहे ती सभागृहाच्या पटलावर निश्चितपणे ठेवण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. या लक्षवेधीच्या अनुषंगाने जी उत्तरे मिळाली आहेत ती कुठलीही माहिती न घेता मिळालेली आहेत. पोलीस ठाण्यावर गेल्यानंतर आमची मुलगी हरवली आहे असे सांगितल्यावर त्याकडे पोलीस गांभीर्याने बघतच नाहीत. ते सांगतात की, तुमची मुलगी कोणा बरोबर तरी पळून गेली असेल. यामध्ये पोलिसांना कुठल्याही प्रकारचे गांभीर्य नसते. मुलगी हरवल्यानंतर तुमची मुलगी मित्रा बरोबर पळून गेली असेल अशा प्रकारे पोलीस उत्तर देतात. ते सांगतात की, आधी आपण मुलीला शोधा. आपण विशेष पोलीस अधिकार नियुक्त केले आहेत असे सांगितले आहे. त्या विशेष पोलीस अधिकाऱ्यांनी आता पर्यंत काय काम केले आहे, याचा आढावा शासन घेणार आहे काय ? अनेक सुधारगृहांना आम्ही भेटी दिलेल्या आहेत. तेथे मुलींना त्रास होतो. तसेच, कुठल्याही कुंटणखान्यावर कधीही धाड टाकली जात नाही किंवा ते बंद केले जात नाहीत. कुंटणखान्यातील दलालांचे सर्रासपणे काम सुरू असते. पोलिसांना त्याची खबर असून सुद्धा पोलीस कुंटणखाने किंवा दलाल यांच्यावर कुठल्याही प्रकारे कडक कारवाई करीत नाही. तेव्हा यापुढे कडक कारवाई करण्यासाठी पोलीस कोणता कार्यक्रम राबविणार आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, कुंटणखाना चालविणाऱ्यांविरुध्द शासनाने वेळोवेळी कारवाई केलेली आहे. ज्या तीन टोळ्या सापडल्या त्यांच्या विरुध्द देखील "पिठा" अंतर्गत कारवाई केलेली आहे. ज्या ज्या वेळी समाजसेवा शाखेकडून माहिती येते तसेच मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस कारवाई करीत असतात. सन्माननीय सदस्यांनी येथे पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास गेल्यानंतर दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा उल्लेख केला. मुलगी पळून गेली असेल अशाप्रकारची वक्तव्ये करण्यात येत असतील तर त्याला रोक लावण्यासाठी निश्चितपणे सूचना देण्यात येतील. तसेच मिसिंग केसबाबत 24 तास थांबण्याऐवजी ती प्राधान्याने तपासण्याबाबत निश्चितपणे सूचना देण्यात येतील. राज्यपातळीवर अनेक ठिकाणी मिसिंग केसचा विषय आहे. सातारा जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी या संदर्भात एक विशेष मोहीम राबवून जवळपास 80 टक्के मिसिंग केसेस कमी करण्यामध्ये ते यशस्वी झाले. मिसिंग म्हणून गुन्हा नोंदविल्यानंतर मुलगा किंवा मुलगी सापडल्यानंतर त्याची नोंद होत नव्हती. त्यासाठी एक स्पेशल मोहीम राबविण्यात आली. तशाच पध्दतीची मोहीम अन्य ठिकाणी सुध्दा राबविण्याचा निर्णय घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने माझे तीन स्पेसिफीक प्रश्न आहेत. या विषयासाठी पोलीस महानिरीक्षक हे पद मुंबईहून पुणे येथे स्थलांतरीत करण्यात आले आणि त्यांनी ॲन्टी ट्रॅफिकींचे काम पहावे निर्णय घेण्यात आला. परंतु हे पद दोन वर्षे रिक्त आहे. हे पद केव्हा भरणार आहात हा माझा पहिला प्रश्न आहे. पुणे आणि सोलापूर भागातील पोलिसांनी मला सांगितले की, हरवलेल्या मुला-मुलींचे छायाचित्र ताबडतोब वेबसाईटवर टाकण्यासाठी एक वेबसाईट तयार केलेली आहे. मुलगा-मुलगी हरवल्याची तक्रार आल्याबरोबर तेथील रेल्वे पोलिसांना ते छायाचित्र दाखविले तर मी मुले पुणे, मुंबई, कोल्हापूर, कलकत्ता वा अन्य ठिकाणी आयडेन्टीफाय होतील. परंतु असे काम पोलीस विभागाने केलेले नाही. प्रत्यक्षात वेबसाईट असली तरी सुध्दा हरवलेल्या मुला-मुलींची छायाचित्रे कमी वेळेत अन्य ठिकाणी पोहोचली तर ती मुले-मुली लवकर सापडतील. आपण अशी वेबसाईट तयार केली आहे काय, असेल तर ती वापरात आहे काय हा माझ ा दुसरा प्रश्न आहे. मुंबई, पुणे शहरामध्ये ॲन्टी ट्रॅफिकींगसाठी स्पेशल कोर्ट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आहेत. तशी महाराष्ट्राच्या प्रत्येक रीजनमध्ये एक तरी स्पेशल कोर्ट करण्याचा निर्णय घेतला आहे काय, नसल्यास तसा निर्णय घेणार काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, श्री.संजय वर्मा,आय.जी. यांची पीएडब्ल्यूसाठी नेमणूक झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या वेबसाईटचा उल्लेख केला त्याबाबत सांगू इच्छितो की, एकदा फोटो वेबसाईटवर लोड केल्यानंतर त्याची माहिती लगेच सर्वत्र जाते. www.track the missing the child.gov.in अशी केंद्र शासनाची वेब साईट आहे. त्या वेबसाईटवर मिसिंग केसची सर्व माहिती अपलोड करण्यात येते. काही ठिकाणी मिसिंग केसची माहिती अपलोड होत नसेल तर त्याबाबत निश्चितपणे सूचना देण्यात येतील. महिन्याच्या क्राईम रिपोर्टमध्ये देखील मिसिंग केसचा आढावा घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी कोर्ट संबंधी केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये तसे कोर्ट आहे. इतर ठिकाणी असे कोर्ट करण्याची आवश्यकता असेल तर तेथे तसे कोर्ट करण्याचे शासनाचे निश्चितपणे धोरण राहील.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.**:धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील रोहड गावात शासकीय आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांचा विहिरीत बुडून झालेला मृत्यू

**मु. शी.** :धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील रोहड गावात शासकीय आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांचा विहिरीत बुडून झालेला मृत्यू यासंबंधी डॉ. अपूर्व हिरे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.अपूर्व हिरे ( नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील आदिवासी पट्ट्यातील रोहड गांवात शासकीय आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांचा दिनांक 9 फेब्रुवारी, 2013 रोजी वा त्यासुमारास विहिरीत बुडून दुर्देवीरित्या झालेला मृत्यू, शासकीय आश्रमशाळांत पहारेकरी, शिक्षक अधीक्षक व स्त्री-अधीक्षिका यांची मोठ्या संख्येने रिक्त असलेली पदे, आदिवासी विकास विभागांतर्गत नियमित कर्मचाऱ्यांची भरती न करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांमुळे आश्रमशाळांची गुणवत्ता ढासळणे, खाजगी अनुदानित आश्रमशाळांचे तुलनेत, शासकीय आश्रमशाळेत वाढीव पदे व भरीव खर्चाची तरतूद असूनही शासकीय आश्रमशाळांची गुणवत्ता ढासळणे, शासकीय आश्रमशाळांना हजारो रुपयांचे इमारत भाडे अदा करुनही इमारतीत सोयी, सुविधा, पिण्याचे शुध्द पाणी नसणे, स्वच्छतेअभावी विषबाधेचे प्रकार घडणे, शासकीय आश्रमशाळांच्या एकूणच समस्यांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे जनतेत व्यक्त होत असलेला संताप, या प्रश्नी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील आश्रमशाळेत घडलेली ही घटना आहे. त्या आश्रमशाळेत कोणत्याही प्रकारच्या भौतिक सुविधा नाहीत. त्या आश्रमशाळेमध्ये पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे विद्यार्थ्यांना पाणी आणण्यासाठी विहिरीवर जावे लागत होते आणि त्यामध्ये दोन विद्यार्थ्यांचा विहिरीत पडून मृत्यू झालेला आहे. अशाप्रकारच्या घटना तेथे वारंवार घडत आहेत. आदिवासी विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या खूप कमी आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित..... 13:00

डॉ.अपूर्व हिरे....

पहारेकरी, शिक्षक, अधीक्षक, स्त्री अधीक्षक ही पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. अनेक कर्मचारी आश्रमशाळांमध्ये कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत. परंतु या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी केले जात नाही. परिणामी त्यांच्यात काम करण्याचा उत्साह दिसत नाही. त्यामुळेच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आश्रमशाळेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी करण्यात येईल काय, उर्वरित जागा लवकरात लवकर भरण्याच्या दृष्टिकोनातून प्रक्रिया राबविण्यात येईल काय, पाणी पुरवठा, इमारत, इन्फ्रास्ट्रक्चर इ. कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करण्यात येतील तसेच इतरही ठिकाणी हे प्रश्न बऱ्याच प्रमाणात असल्यामुळे ते दूर करण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही करण्यात येईल ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी अनेक प्रश्न विचारलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांची उत्तरे सुध्दा थोड्या विस्ताराने द्यावी लागतील.

महोदय, ही घटना साक्री तालुक्यातील शासकीय आश्रमशाळेत घडली आहे. 1972 पासूनची ही शाळा असून, या शाळेमध्ये इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंतचे वर्ग आहेत. या शाळेची इमारत जुनी आहे. तरी सुध्दा या शाळेमध्ये बहुउद्देशीय हॉल, मुलींचे स्वतंत्र वसतिगृह, मोठ्या हॉलमध्ये मुलांचे वसतिगृह, भोजनालय, स्वतंत्र कोठीगृह, मुला-मुलींसाठी स्वतंत्र प्रत्येकी 6 स्वच्छतागृह, मुलां-मुलींसाठी स्वतंत्र प्रत्येकी 6 स्नानगृह, पिण्याच्या पाण्यासाठी एक हँड पंप, एक बोअरवेल आणि एक विहीर आहे, तसेच 10 हजार लीटर क्षमतेच्या प्रत्येकी 2 टाक्या बसविल्या आहेत. गावातील नळ पाणी पुरवठा योजनेतून त्या शाळेला पाणी पुरवठा केला जातो. ज्यावेळी ही घटना घडली त्या वेळी मुले त्या ठिकाणी न सांगता गेली होती.

महोदय, शाळेच्या नवीन इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. मुलींच्या नवीन वसतिगृहाच्या इमारतीचे देखील काम पूर्ण झाले आहे. राज्यात एकूण 552 शासकीय आश्रमशाळा आहेत. सर्व आश्रमशाळांच्या ठिकाणी इमारत बांधण्याचा कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे. येत्या 2 वर्षात 552 आश्रमशाळेच्या इमारती बांधून पूर्ण होतील. तसेच वसतिगृहांसाठी आवश्यक असलेली जमीन घेण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. 95 टक्के जमीन विभागाच्या ताब्यात आहे. सर्व ठिकाणी आवश्यक ती कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रत्येक तालुक्यातील नव्या आणि जुन्या आश्रमशाळा उत्तमप्रकारे बांधण्यात येतील. कोठेही अडचण येणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

महोदय, रिक्त पदांच्या बाबतीत या ठिकाणी बोलले गेले. कामाठी आणि स्त्री अधीक्षक ही पदे भरण्याबाबत निर्णय झाला आहे. या निमित्ताने काही प्रश्न निर्माण झाले होते. ते सोडविण्यासाठी मंत्रिमंडळाची स्मॉल कमिटी गठीत केली होती. त्या समितीचा अहवाल आता मुख्य सचिवांकडे आलेला आहे. तो अहवाल मंत्रिमंडळापुढे आल्यानंतर ती पदे भरण्यात येतील. शिक्षण सेवक आणि इतर लोकांना घेण्यात आलेले आहे. त्यामध्ये काही अडचणी आलेल्या आहेत. त्या अडचणी एकत्र बसून व चर्चा करुन सोडविण्यात येतील. जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर पूर्वीच्या शिक्षण सेवकांनी मुलाखतीच्या वेळी यावे. त्या शिक्षण सेवकांना जास्त गुण उपलब्ध करुन दिले तर त्यांना पूर्वी केलेल्या सेवेचा फायदा होईल. अशा प्रकारची संघटनेबरोबर चर्चा करुन, त्या बाबत निर्णय घेतलेला आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास पूर्वी विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना 15 हजार रुपये आर्थिक मदत दिली जात होती. आता ती रक्कम वाढवून 75 हजार रुपये केली आहे. त्यानुसार मृत विद्यार्थ्यांच्या पालकांना ही रक्कम त्याच वेळी देण्यात आली आहे. तसेच या घटनेप्रकरणी शाळेतील 2 वर्ग शिक्षक आणि मुख्याध्यापक अशा प्रकारे तिघांना निलंबित केले आहे. या घटनेची चौकशी सुरु आहे.

श्री.वसंतराव खोटरे : महोदय, राज्यात एकंदर 552 शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये एकूण 16,098 पदे असून केवळ 12,133 पदे भरण्यात आलेली आहेत व 3,965 पदे रिक्त आहेत. 875 शिक्षकांची पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, 3,965 पदे रिक्त असताना केवळ 875 पदांची जाहिरात का देण्यात आली, यावरुन इतर शाळांमध्ये शिक्षक किंवा इतर कर्मचारी कमी आहेत असा त्याचा अर्थ होतो काय, तसेच 875 पदांपैकी किती लोकांची प्रत्यक्षात नियुक्ती केली आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : महोदय, ही पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी घेतली आहे. या अनुषंगाने प्रत्यक्षात कार्यवाही सुरु झाली आहे. 875 पदे भरण्याची प्रोसेस सुरु झाली आहे. शिवाय 3,965 रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु केली आहे. कामाठी आणि इतर पदे व्यपगत झाले होते. या बाबत बैठक घेऊन निर्णय घेण्यासाठी कॅबिनेटची सब कमिटी नेमली होती. त्या कमिटीचा अहवाल मुख्य सचिवांकडे आलेला आहे. तो अहवाल कॅबिनेटमध्ये आल्यानंतर ती पदे भरण्यात येतील.

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ...
आदिवासी विभागातील सर्व पदे भरण्याच्या संदर्भात खाते अत्यंत सतर्क आहे आणि ती कार्यवाही पूर्ण केली जाईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी लेखी निवेदनामध्ये तसेच मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना सांगितले की, ही मुले कोणाचीही परवानगी न घेता परस्पर कपडे धुण्यासाठी गेली आणि त्या ठिकाण्ी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. परंतु आता उत्तर देत असताना मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात 2 शिक्षकांना आणि 1 मुख्याध्यापकाला निलंबित केले आहे. त्यांना निलंबित करण्याचे कारण काय आहे ? 2 शिक्षकांना आणि 1 मुख्याध्यापकाला निलंबित करण्यामध्ये त्यांचा काय दोष होता ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मुले निघून जातात, शाळेपासून बाजूला जातात आणि शिक्षकांना माहीत होत नाही. जरी ते चुकून गेले असले तरी त्यांची जबाबदारी होती. कारण शाळा चालू असताना ते गेले होते. यामध्ये प्रत्यक्षात कर्तव्यात कसूर म्हणून त्यांना निलंबित केलेले आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, धुळ्याजवळ साक्री येथे जी आश्रमशाळा आहे त्या ठिकाणी 9 फेब्रुवारीला 2 मुलांचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. अशा ठिकाणी लहान किंवा मोठी मुले जरी असली तरी त्यांना फारसे कळत नाही. त्यामुळे आपल्या परिसरामध्ये जर अशी विहीर असेल तर ती विहीर झाकलेली असली पाहिजे, विहिरीला जाळी असली पाहिजे, पाणी काढताना त्या ठिकाणी पंपाचा वापर झाला पाहिजे याची काळजी शाळेने घेतली पाहिजे. मुले पाण्यासाठी विहिरीत उतरली असतील आणि बुडून मयत झाले असतील. अशा प्रकारे शाळेने आणि प्रशासनाने यापुढे आपल्या प्रांगणात जर विहिरी असतील तर त्याची काळजी प्रथम घेतली पाहिजे. ती काळजी घेणार का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, त्या शाळेमध्ये पहारेकरी वगैरे नव्हते का ? निवेदनामध्ये अधीक्षिका, पहारेकरी यांची पदे रिक्त आहेत असे म्हटले आहे. त्या शाळेमध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्रीमती शोभा फडणवीस ....

प्रत्यक्षात अधीक्षिका, पहारेकरी होते का ? त्या पहारेकऱ्याला निलंबित का केले नाही ? दुसरी बाब अशी की, त्यांनी विहिरीत उतरुन कपडे धुतले. याचा अर्थ असा की, ती विहीर खुली आहे आणि त्या ठिकाणी पंप बसविलेला नाही. मुलांना बाहेर कपडे धुण्याकरिता व्यवस्था नाही. त्यामुळे ताबडतोब ही व्यवस्था करणार का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. त्या ठिकाणी टँकर आणि बैलगाडीने पाणी देतो. विहिरीचे काम सुध्दा मोठ्या प्रमाणावर केलेले आहे. पंधरा दिवसात विहिरीचे काम पूर्ण होईल. ही मुले दुसऱ्याच्या विहिरीवर दुसरीकडे गेली होती त्यामुळे ही घटना घडलेली आहे. त्या ठिकाणी चौकीदार, शिपाई ही सर्व पदे आहेत. त्या शाळेमध्ये 7 पदे नाहीत. त्यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयामधील 3 आणि 2-2 स्वयंपाकी अशी 7 पदे रिक्त आहेत. यामध्ये पहारेकऱ्याचा संबंध येत नाही. शाळा चालू असताना ही घटना झालेली आहे म्हणून ती कारवाई केलेली आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी सर्वश्री अनिल भोसले, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री दीपकराव साळुखे, विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विविध ग्रंथालयामध्ये हजारो कर्मचारी कार्यरत असणे, राज्य शासनाने सध्याचे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून जाहीर करणे, राज्यातील ग्रंथालयाला जे अनुदान देण्यात येते ते फार तुटपुंजे असणे, याबाबत या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी मोर्चे काढूनही त्यांच्या पदरी निराशा कायम असणे, मा.अर्थमंत्र्यांनी बजेटमध्ये ग्रंथालयाला विशेष वाढ देऊ अशी घोषणा करुनही कोणतीही वाढ अद्याप न देणे, अ वर्ग व ब वर्ग वाचनालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी आणि क व ड वर्गातील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळावे यासारख्या प्रामुख्याने मागण्या असणे, मात्र या मागण्यांकडे राज्य शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, यामुळे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांमध्ये शासनाविरोधी पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. डी.पी.सावंत ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, 1967 मध्ये राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याची तरतूद नाही. पण या सर्व ग्रंथालयाच्या सेवकांना कायम स्वरुपी फिक्स मानधन देता येईल का ? जी ग्रंथालये सर्व सुविधायुक्त आहेत अशा ग्रंथालयांची वर्गवारी दर तीन वर्षाने वाढविण्याऐवजी ती थेट वाढविण्यात येईल का ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, 1967 आणि नियम 1970 यामध्ये मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये यांच्या परिरक्षणासाठी परिरक्षण अनुदान मंजूर करण्याची तरतूद आहे. परंतु अशी वेतनश्रेणी देण्याची तरतूद नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या बाबतीत शासनाने अनेक वेळा भूमिका स्पष्ट केलेली आहे की, या लोकांना वेतनश्रेणी देता येणार नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात आहे कारण ग्रंथालयांची संख्याही भरपूर आहे. आपण अनुदानामध्ये दुप्पटीने वाढ केलेली आहे, ही गोष्ट मान्य आहे. परंतु काही क्षेत्रातील कायम नोकरी किंवा सरकारी नोकरांप्रमाणे ही खाजगी संस्थांची वाचनालये असल्यामुळे आपण हे करु शकत नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

हे मान्य केले तरी एक प्रकारचा अन् ऑर्गनायझ सेक्टर ऑफ लेबर असा हा वर्ग आहे. मग बांधकामाच्या कामावर जाणारे लोक असतील, इतर ठिकाणी कामासाठी जाणारे लोक असतील अशा लोकांसाठी शासनाकडून एखादी योजना सुरु केली जाते. मग ग्रंथालयांना जर शासनाला नियमित अनुदान देणे शक्य नसेल तर त्यांच्यासाठी एखादे महामंडळ स्थापन करुन त्यामार्फत त्यांची चांगली सोय करण्यासाठी शासन विचार करील काय ?

श्री.राजेश टोपे : ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी यासंबंधी एवढेच सांगेन की, या ग्रंथालयांना परिरक्षण अनुदान दिले जाते. त्यामुळे 50 टक्के अनुदान पगारासाठी व 50 टक्के अनुदान पुस्तकांसाठी व अन्य कामासाठी वापरले पाहिजे अशा सूचना त्यांना दिलेल्या आहेत. शासनाने 50 टक्के अनुदानात वाढ केलेली आहे. त्यामुळे ग्रंथालयात काम करणाऱ्या 22 हजार कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये 50 टक्के वाढ झ ाालेलीच आहे. त्याचबरोबर सेवा शर्ती लागू करण्यासंबंधी त्यांची मागणी आहे. त्या लागू करण्यासंबंधी या महिन्याच्या अखेरपर्यंत किंवा या अधिवेशनाच्या अखेरपर्यंत निर्णय घेतला जाईल.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तरात वेगळेपणा आहे. या निवेदनात असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र ग्रंथालये अधिनियम 1967 मध्ये यासंबंधीची तरतूद नाही. परंतु तुम्हा आम्हाला माहीत आहे की, ग्रंथालयामध्ये काम करणारे ग्रंथपाल हा त्या ग्रंथालयाचा आत्मा असतो. अ, ब, क या श्रेणीच्या ग्रंथालयात हे ग्रंथपाल पूर्ण वेळ काम करीत असतात, काही ग्रंथपाल हे अर्ध वेळ काम करीत असतात, काही जण तासिकेवर काम करतात. त्यामुळे त्यांना वेतनश्रेणी लागू करुन त्यांचे वेतन बँकेमार्फत दिले जाईल का ?

श्री.राजेश टोपे : या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करता येणार नाही. हे विधानसभेमध्ये शासनाने वेळोवेळी सांगितलेले आहे. ग्रंथालयांची संख्या दर वर्षी हजारोच्या संख्येने वाढत आहे. ग्रंथालय चळवळ अशी आहे की, शासनाला गाव तेथे ग्रंथालय सुरु करावयाचे आहे. शासनाकडून काही ग्रामपंचायतींना सार्वजनिक ग्रंथालये दिली जातात. हे कर्मचारी खाजगी ग्रंथालयातील

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. त्यामुळे त्यांना शासनाची एखादी वेतनश्रेणी लागू करणे शक्य नाही हे मी स्पष्ट केलेले आहे. या ग्रंथालयांचे अनुदान वाढविले जाते. त्यामुळे त्यांचे पगारही वाढतात. त्यांना सेवा शर्ती लागू केल्या जातील. कारण त्यांना कोणतीही सुट्टी मिळत नाही, मॅटर्निटी सुट्टी मिळत नाही. त्यासंबंधीची प्रकिया अंतिम टप्प्यात आहे. या कर्मचाऱ्यांना या महिन्याअखेर किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी सेवा शर्ती लागू केल्या जातील.

श्री.भगवान साळुंखे : यासंबंधीच्या अधिनियमात दुरुस्ती करुन त्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू केली जाईल का ?

श्री.राजेश टोपे : या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करता येणार नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दादर व वांद्रे येथे "अ" दर्जाची ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांच्या इमारती खिळखिळ्या झालेल्या आहेत. त्या संस्था चांगल्या प्रकारे ग्रंथालये चालवित असल्या तरी इमारतीच्या दुरुस्तीसाठी त्यांच्याकडे निधी नाही. त्यामुळे "अ" दर्जाच्या चांगल्या पध्दतीने काम करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी विशेष अनुदान दिले जाईल का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, राजा राममोहन रॉय या संस्थेमार्फत इमारत दुरुस्ती व बांधकामासाठी निधी दिला जातो. तसेच डीपीडीसी मार्फतही ग्रंथालयाच्या बांधकामासाठी निधी दिला जातो. ग्रंथालयाची इमारत बांधणे किंवा दुरुस्ती करणे यासाठी या दोन्ही सोर्सेसमधून निधी दिला जातो.

-----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

**पृ. शी.** : पुणे शहरात स्वाईन फ्ल्यूचा प्रसार होणे

**मु. शी.**: पुणे शहरात स्वाईन फ्ल्यूचा प्रसार होणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे शहरात वातावरणाच्या बदलामुळे स्वाईन फ्ल्यूचा प्रसार वाढण्यास पुन्हा सुरुवात होणे, माहे फेब्रुवारी, 2013 च्या सुमारास शहरातील विविध रुग्णालयात 9 रुग्ण उपचार घेत असून त्यातील तिघांची प्रकृती अत्यावस्थ होणे, अवसरी येथे एकाचा मृत्यू होणे, परिणामी शहरातील नागरिकांमध्ये पसरलेले भीतीचे व घबराटीचे वातावरण, शासनाने स्वाईन फ्ल्यूचा प्रसार रोखण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

प्रा.फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील श्री.संतोष रघुनाथ शिंदे यांना स्वाईन फ्ल्यूची लागण झाली. त्याबाबत मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

जेव्हा जेव्हा स्वाईन फ्ल्यूचा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला जातो त्यावेळी शासनाकडून तीच तीच उत्तरे देण्यात येतात. स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीची सोय पुण्याखेरीज पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकणामध्ये नाही. औंध रुग्णालयाला जिल्हा रुग्णालयाचा दर्जा दिलेला आहे. या रुग्णालयामध्ये पुणे पिंपरी-चिंचवड तसेच ग्रामीण भागातील रुग्ण येत असतात. हे औंध रुग्णालय अद्ययावत करण्यासाठी शासन निधी उपलब्ध करुन देईल काय ? पुण्याप्रमाणे कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी स्वाईन फ्ल्यूची तपासणी करण्यासाठी लॅबची व्यवस्था करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय ? साधारणपणे जून-जुलै महिन्यापासून स्वाईन फ्ल्यूचा प्रादूर्भाव होत असतो. स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीसाठी विविध भागातून रुग्ण पुण्यामध्ये येत असतात. तेव्हा अन्य जिल्ह्यामध्ये स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीसाठी काय व्यवस्था केलेली आहे ?

प्रा. फौजिया खान : राज्यामध्ये राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे, हाफकिन इन्स्टिटयूट, कस्तुरबा रुग्णालय तसेच रॅलिगेअर आणि लाला पॅथॉलॉजी लॅब अशा 5 ठिकाणी स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीसाठी प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रत्येक वेळी तीच तीच उत्तरे दिली जातात असे सांगितले. ज्या काही उपाययोजना करावयाच्या असतात त्या नेहमीच्याच असतात. व्हेण्टिलेटर, औषधे, लसीकरण अशा उपाययोजना करण्यात येतात.

श्रीमती दिप्ती चवधरी : हवामानाच्या बदलामुळे पुण्यामध्ये ज्या साथीच्या रोगांचा प्रादूर्भाव होतो त्यामध्ये स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू हे रोग मुख्य आहेत. हे रोग नियंत्रणात आणण्यासाठी पुणे महानगरपालिकेने स्वतंत्र कक्ष स्थापन केलेला आहे काय, नसल्यास तसा तो करण्यात येईल काय?

श्रीमती फौजिया खान : महानगरपालिकेच्या नायडू संसर्ग रोग रुग्णालयामध्ये विशेष कक्ष उपलब्ध आहे. 20 खाजगी रुग्णालयामध्ये या सुविधा उपलब्ध आहेत. 50 पालिका रुग्णालयात फ्ल्यू सदृश्य लक्षणे असलेल्या रुग्णांच्या तपासणीची सुविधा उपलब्ध आहे.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी./मु. शी.** : बारावीच्य परीक्षेत पर्यावरण शिक्षण या विषयासाठी श्रेणी ऐवजी गुण देण्याबाबत श्री. चंद्रकांत पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

सर्वोच्य न्यायालयाच्या निर्देशानुसार पर्यावरण शिक्षण हा विषय 1995 पासून शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात येणे, केवळ न्यायालयाचा अवमान नको म्हणून गेली काही वर्षे माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये हा विषय सुरु असणे, परंतु शासन संस्था, शिक्षण व विद्यार्थ्यांमध्ये या विषयाबाबत गंभीरता नसल्याने याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, 100 गुणांच्या या विषयामध्ये 60 गुणांची लेखी तर 40 गुण प्रकल्पासाठी दिले जाणे, विषय शिकवलाच नसल्यामुळे परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेसोबतच उत्तरपत्रिकाही मिळणे, त्यामुळे या विषयाचा स्वतंत्र अभ्यास करण्याचे गांभीर्य निघून जाणे, अकरावीसाठी गुणावर आधारित परीक्षा असते तर बारावी बोर्डासाठी श्रेणी दिली जाणे, त्यामुळे टक्केवारीसाठी याचा काहीही संबंध येत नसल्याने या विषयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाणे, या विषयाचा दर्जा उंचावण्यासाठी श्रेणीऐवजी गुण देण्यात येऊन उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये एमएससी झालेल्या शिक्षकांची नेमणूक करण्याची मागणी होत असणे, या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व यावर शासनाची भूमिका."

----

...नंतर श्री. गिते...

**पृ.शी./मु.शी** : स्वतंत्र सफाई कामगार मंडळ स्थापन करण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये विविध क्षेत्रातील 10 लाख असंघटित तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 15 लाख असे मिळून 25 लाख सफाई कामगार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कामगारांना नियमानुसार वेतन व अन्य सरकारी सवलतींचा लाभ मिळतो, परंतु असंघटित कामगारांना रोजंदारीवर काम करावे लागते, हे कामगार अशिक्षित असल्याचा फायदा घेऊन कंत्राटदार त्यांची आर्थिक फसवणूक करतात. तसेच सफाई कामगारांना कोणत्याच सवलती मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती होत नाही. यामुळे या क्षेत्रातील कामगारांसाठी माथाडी कामगारांच्या धर्तीवर स्वतंत्र "सफाई कामगार कल्याणकारी मंडळ" स्थापन करण्यासाठी शासनाने तातडीची कार्यवाही करण्याची आवश्यकता, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे.

---------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुण्यात महाराष्ट्र एज्युकेशन आणि ट्रेनिंग फाऊंडेशन, महाराष्ट्र एज्युकेशन आणि ट्रेनिंग प्रा.लि., महाराष्ट्र एज्युकेशन आणि ट्रेनिंग कार्पेरेट बिझनेस स्कूल या संस्थांकडून विद्यार्थ्यांची होत असलेली फसवणूक या बाबत श्री.अनिल भोसले,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुण्यात महाराष्ट्र एज्युकेशन आणि ट्रेनिंग फाऊंडेशन, महाराष्ट्र एज्युकेशन आणि ट्रेनिंग प्रा.लि., महाराष्ट्र एज्युकेशन आणि ट्रेनिंग कार्पेरेट बिझनेस स्कूल या संस्था श्री.अविनाश जगदीश महाजन, रा. मुंबई, व श्री.सतीश नायर, रा.मगरपट्टा, पुणे यांनी विविध अभ्यासक्रमाच्या जाहिराती देण्यात येणे, त्यानुसार एम.बी.एस.अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना बनावट दस्तऐवज देऊन आर्थिक फसवणूक करणे, याबाबत सदर बोगस संस्था चालकांची चौकशी करुन त्यांनी विद्यार्थ्यांकडून उकळलेल्या पैशांची वसुली करण्यात यावी. तसेच या बोगस संस्था चालकांनी विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक केल्याने त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही


ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 13:20

पृ.शी./मु.शी.: जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर अध्यक्ष व सदस्य सचिव नेमण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेच्या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आपण सरकारला पीठासीन अधिकारी म्हणून वेळोवेळी कडक निर्देश दिलेले आहेत. मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. राज्य शासनाने जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या नेमलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना गेल्या काही महिन्यांपासून जात पडताडणी प्रमाणपत्रे मिळत नाहीत. या समितीवरील एक पद रिक्त असले तरी जात प्रमाणपत्राची पडताळणी होऊ शकत नाही. राज्य शासनाने 15 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या नेमल्या आहेत. त्या 15 समित्यांपैकी 12 समित्यांवर अध्यक्ष नाहीत तर 9 समित्यांवर सदस्य सचिव नाहीत. जात पडताळणीच्या अभावी 2 लाख विद्यार्थ्यांचे अर्ज जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. या समित्यांवरील रिक्त पदे भरण्याबाबतचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी दिले असले तरी सुध्दा त्या अनुषंगाने कार्यवाही होत नाही. अधिवेशन संपण्याच्या अगोदर किंबहुना मी तर म्हणेन की, पुढील आठवडयात समित्यांवरील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करुन लवकरात लवकर अध्यक्ष व सदस्य सचिव नेमावेत म्हणून मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे या गंभीर विषयाकडे लक्ष वेधत आहे.

----------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: मुंबईमधील "बॉम्बे हायकोर्टा"चे नामकरण हे "मुंबई उच्च न्यायालय" होण्यासाठी होत असलेली मागणी याबाबत सदस्य श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पूर्वी फक्त मंत्रालय, मुंबई असे लिहिले जात असे, त्यामुळे हुतात्मा स्मारक चौकाला आणि रस्त्याला जे नाव देण्यात आले ते अवमानित होत होते. या प्रकारचा विशेष उल्लेख देऊन मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई अशा प्रकारे लिहिण्याबाबत मी मांडलेल्या विशेष उल्लेखामुळे सरकारने ही सूचना स्वीकृत केली आणि सरकार दप्तरी आता पूर्ण पत्त्यानुसार पत्रव्यवहार होतो. काही मंत्री अजूनही याला अपवाद आहेत. त्यांनी शासनाच्या या आदेशाचे पालन करावे अशी मी त्यांना या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करतो. श्री.दत्तात्रय पांडुरंग सावंत यांच्या लेटरहेडवर पूर्ण पत्ता लिहिलेला नाही. लेटरहेडवर पूर्ण पत्ता लिहावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

महोदय, माननीय श्री.राजेश टोपे यांच्या बाबतीतील मला माहिती नाही. तसेच विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत असतानाच "बॉम्बे हायकोर्ट"चे "मुंबई उच्च न्यायालय"असे नामकरण करण्याबाबत मी प्रत्येक अधिवेशनामध्ये आग्रह धरला आहे. सरकारने या संदर्भात दिल्लीतील संबंधित खात्याकडे बॉम्बे ऐवजी मुंबई उच्च न्यायालय लिहिण्याबाबत सातत्याने पत्रव्यवहार केल्याचे मला दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे. खरेतर अशा तांत्रिक अडचणीत उभ्या असलेल्या न्यायालयाचे बॉम्बेचे नाव मुंबई होण्यास एवढा कालावधी का लागत आहे हे अनाकलनीय आहे. तरीही ते होईपर्यंत उच्च न्यायालयाच्या प्रवेश व्दारावर मराठी भाषेत मुंबई उच्च न्यायालय, कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग, मुंबई-400 032 असा नामफलक लावण्या संदर्भात मी या विशेष उल्लेखाव्दारे सुचित करीत आहे. त्याचवेळी शासनाची कुचंबणा होऊ नये म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, दिल्ली उच्च न्यायालय, अलाहाबाद उच्च न्यायालय अशा प्रकारे हिंदी देवनागरी

5...



श्री.दिवाकर रावते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्ये त्या न्यायालयात प्रवेश व्दारावर लिहिल्याचे दूरचित्रवाहिनी वरील बातम्या पाहताना स्पष्ट दिसत असते. आपल्याकडे मात्र बॉम्बे हायकोर्ट हा इंग्रजी फलक कायम दिसत असतो. ही बाब लक्षात घेता दिल्ली आणि उत्तरप्रदेश सरकारने आपल्या भाषेचा स्वाभिमान दाखविण्याचे जे काम केलेले आहे, तसा स्वाभिमान आपणही त्वरीत दाखवावा. बॉम्बे हायकोर्टाचे नामकरण होईपर्यंत बॉम्बे हायकोर्ट असे मराठीमध्ये लिहून कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग, मुंबई-400 032 असा पूर्ण पत्ता लिहावा अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने करीत आहे.

-----

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: ठाणे जिल्हयातील टोल नाक्यांची संख्या वाढत असल्याबाबत श्री.संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, भिवंडी-वाडा-मनोर रस्त्यावर माहे मार्च 2013 पासून दोन टोल नाके सुरु झाल्याने ठाणे जिल्हयात टोल नाक्यांची संख्या 18 पर्यंत पोहोचली आहे. भिवंडी-मनोर रस्त्याचे काम अपूर्ण असतानाही टोल वसुली केली जात असल्याने ठाणे जिल्हयामध्ये सर्वाधिक टोल नाक्याविरोधात जनमानसात तीव्र असंतोष निर्माण होणे, भिवंडी-वाडा-मनोर महामार्गाचे काम पूर्ण होण्याआधीच तेथे टोल वसुली सुरु करणाऱ्या वाडा तालुक्यातील वाघोटे गावाजवळील टोल नाक्याविरुध्द दिनांक 12 मार्च, 2013 रोजी स्थानिकांचा उद्रेक झाला. टोल भरण्यास नकार देणाऱ्या स्थानिकांवर नाक्यावरील ठेकेदाराने गोळीबार करताच संतप्त नागरिकांनी त्यास बेदम मारहाण करुन टोलनाक्याची मोडतोड केली. या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन वातावरण तंग होणे, या रस्त्याचे तीन वर्षापासून सुरु असलेले काम निकृष्ट दर्जाचे आहे. देहेर्जे नदी व पिंजाळ नदीवरील पूल अपूर्ण अवस्थेत असतानाही सुरु झालेली टोल वसुली अन्यायकारक असल्याने राज्य शासनाने ठाणे जिल्हयातील वाढत्या टोल नाक्याविरुध्द लोकांचा उद्रेक पाहता ठाणे जिल्हयातील टोल नाके कमी करुन ज्या रस्त्यांचे काम अपूर्ण आहे तेथील टोल नाके बंद करावेत अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आपण पूर्वी सुध्दा या विषयामध्ये लक्ष घातले होते. आपल्याला जनभावनेची कल्पना आहे. या प्रश्नाबाबत आपण पुढाकार घेऊन निदान एक बैठक बोलवावी आणि शासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात, जनतेची भावना शासनापर्यंत पोहोचवावी एवढी नम्र विनंती करतो.

**उप सभापती** : टोल नाक्याबाबत ठाणे जिल्हयातील सर्व आमदारांची एकत्रित बैठक बोलावण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वाशी येथील महापालिकेच्या रुग्णालयातून दोन गुन्हेगारांनी केलेले पलायन याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मागील तीन महिन्यात वाशी येथील महापालिकेच्या इस्पितळातून खुनाचा आरोप असलेले दोन गुन्हेगार पोलिसांना हुलकावणी देऊन पळून गेल्याचे प्रकार घडले आहेत. अतिशय गंभीर गुन्हयासाठी अटकेत असलेल्या एका आरोपीने तिस-या मजल्यावरील स्वच्छतागृहातून काचेची तावदाने काढून पाईपवरुन खाली उतरुन पलायन केले. इस्पितळातील डॉक्टर याची जबाबदारी घेत नसून बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांकडे बोट दाखवित आहेत. या आरोपींना तळोजा येथील तुरुंगातून आणले होते. अशा गंभीर प्रकाराबाबत संबंधित तुरुंग अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नाशिक जिल्हयामध्ये उत्तरप्रदेश व छत्तीसगड राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे शिधापत्रिका वितरित करण्यात येणे याबाबत डॉ.नीलम गो-हे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना काही घटना आपल्यासमोर येतात, आता माझ्या हातामध्ये जो दस्तऐवज आहे त्यात शेवटच्या पानावर कुसुमाग्रज यांची कविता लिहिलेली आहे. त्या कवितेची एक ओळ मी वाचून दाखविते.

गोरगरिबा छळू नका,
पुंड फुकाचे फुकू नका.

सभापती महोदय, मला नाशिकमधील एका घटनेकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री श्री.अखिलेश यादव आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री श्री.रमणसिंग यांच्या नावाचे बोगस रेशनकार्ड देण्यात येऊन त्या कार्डवर त्यांच्या कुटुंबांची नावे देखील नमूद केलेली आहेत. श्री.रमणसिंग यांच्या नावे देण्यात आलेल्या रेशनकार्डची झेरॉक्स प्रत मी आपल्याकडे सादर करते. अशा प्रकारे दुष्काळाच्या काळात बोगस रेशनकार्ड दिली जात असतील, असे गैरप्रकार होत असतील तर संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे, एवढी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करते.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

13-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD.4

SGB/ D/ KTG/ 13:25

**पृ.शी./मु.शी.**: क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय याबाबत डॉ.रणजित पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील महाविद्यालयांना शालेय शिक्षण या मंत्रालय अंतर्गत असणाऱ्या क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत वेतन अनुदान देण्यात येत असणे, अंदाजे 150 ते 200 शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी असणे, मागील सहा महिन्यांपासून या महाविद्यालयाचे कर्मचारी क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या अडवणूक धोरणामुळे त्रस्त असणे, कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार न मिळणे, तीन-तीन महिने पगार कोणत्याही कारणाशिवाय रोखून धरणे इत्यादी प्रकार सातत्याने असणे, अवैधरित्या पैशाची मागणी करणे, तसेच अनुदानित शाळेतील शिक्षण महाविद्यालये असोसिएशन, महाराष्ट्र राज्य, अमरावती विभाग यांनी ही सर्व महाविद्यालये प्रशासकीय दृष्टया क्रीडा व युवक कल्याण विभागाकडून काढून इतर वरिष्ठ महाविद्यालयाप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करण्याबाबत सदर संघटनेने केलेली मागणी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना यासंबंधी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---

नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील ....

तसेच अनुदानित शाळेतील शिक्षण महाविद्यालये असोसिएशन महाराष्ट्र राज्य अमरावती विभाग यांनी ही सर्व महाविद्यालये प्रशासकीय दृष्टया क्रीडा व युवक कल्याण विभागाकडून काढून इतर वरिष्ठ महाविद्यालयांप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाला वर्ग करण्याबाबत सदर संघटनने केलेली मागणी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, त्यावर शासनाची प्रतिक्रिया.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, अधिवेशनाच्या काळात राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेक लोक आझाद मैदानावर आंदोलने करीत असतात. महात्मा गांधी यांनी दाखवून दिलेल्या अंहिसात्मक व आत्मक्लेशात्मक पध्दतीने सुरु असलेल्या आंदोलनाच्या नेत्यांनी संबंधित मंत्र्यांची भेट मागितलेली असते परंतु अधिवेशनाच्या कारभाराची सबब सांगून काही अपवाद वगळता सर्वच मंत्री व त्यांचे सचिव आंदोलन कर्त्यांच्या नेत्यांना भेटच देत नाही असे दिसून येते व त्यामुळे आंदोलन कर्त्यांमध्ये नाराजी पसरते व संतापाची लाट देखील येते. कित्येक वेळला आंदोलन हिंसक देखील होते. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांना, आंदोलनाच्या नेत्यांना भेटून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश द्यावेत. त्यामुळे मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी आझाद मैदानावरील आंदोलन कर्त्यांच्या नेत्यांना बोलावून, चर्चा करुन त्यांचे प्रश्न सोडवण्याचे त्यांनी आदेश द्यावेत.

-------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील छत्रपती राजाराम महाराज यांनी सन 1939 मध्ये दूरदृष्टीने काल्हापूर येथे विमानतळाची स्थापना करुन विमान सेवेस प्रारंभ केला होता. सदर विमानतळास छत्रपती राजाराम महाराज यांचे नाव देण्यासाठी कोल्हापूर येथील राजारामपूरी व्यापारी असोसिएशने गेल्या 10 वर्षापासून प्रयत्नशील आहेत. केंद्र शासनाच्या भारतीय विमानपत्तन प्रधिकरणातर्फे असोसिएशनला असे कळविण्यात आले आहे की, यासंबधी राज्य विधानमंडळात ठराव मांडून व तो संमत करुन राज्य शासनातर्फे केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तरी कोल्हापूर विमानतळाचे नामकरण "छत्रपती राजाराम महाराज विमानतळ" असे करण्यासाठी सध्या चालू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाने ठराव मांडून तो संमत करुन घेण्यासाठी तातडीची कार्यवाही करावी, याकरिता मी विशेष उल्लेखाद्वारे सूचन करीत आहे.

----------

**उप सभापती** :आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी पुन: भरेल.

(1.33 ते 2.10 मध्यंतर)

---

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ.शी.**: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती
**मु.शी.**: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, या विषयावर सर्वश्री सर्वश्री.विनोद तावडे, दिपकराव साळुंखे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, रामदास कदम, जयंत पाटील, राणा जगजितसिंह पाटील, सुभाष चव्हाण, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, सतीश चव्हाण, एम.एम.शेख, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.संदिप बाजोरिया, जयप्रकाश छाजेड, रामनाथ मोते, विनायक मेटे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंवतराव जाधव, किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील वि.प.स. यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरू....

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी दुष्काळावर अतिशय अल्प व मोजक्या शब्दात काही मुद्दे उपस्थित करणार आहे.

दुष्काळ या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी सविस्तरपणे चर्चा केलेली आहे. दुष्काळ हा महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये दिसून येत आहे. महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ हा 40 वर्षात कधी पडला नव्हता एवढ्या तीव्रतेचा आहे. राज्यात पाऊस कधी पडणार आहे, दुष्काळ कधी पडणार आहे याची किती तरी दिवस आधी माहिती हवामान खात्याकडे असते. सदर खाते दुष्काळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही पाऊस जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही,अशा प्रकारची माहिती देत असते. असे असताना सुद्धा एक प्रश्न उद्भवतो की, ही सर्व माहिती हातामध्ये असताना प्रशासन आधी पासूनच दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी तयार का होत नाही ? यात प्रशासकीय हलगर्जीपणा दिसून येतो.

आता टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतु, दुष्काळ असल्यामुळे विहिरींमध्ये पाणी तरी किती असणार ? लोकांना पाणी पुरवठा करण्यासाठी किती टँकर लावण्यात आले आहेत ते किती कि.मी.चा प्रवास करतात हा देखील प्रश्न निर्माण होतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ D/ 14:10

श्री.मुझफ्फर हुसेन....

दुष्काळग्रस्त भागातील जनतेला मदत करण्यासाठी जिल्हाधिकारी व संबंधित विभागाच्या सचिवांकडे जबाबदारी दिली जाते. ती जबाबदारी ते अधिकारी योग्यरितीने पार पाडतात काय, हा खरा प्रश्न आहे. जनावरांना किती चारा दिला जातो, किती छावण्या उघडण्यात आल्या आहेत यासंबंधातील माहिती जिल्हाधिकारी स्वत: जिल्ह्यात फिरून घेतात काय ? अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात.

राज्यात दुष्काळ असल्यामुळे मार्च महिन्यातच टँकरने पाणी पुरवठा करणे अशक्य होऊन बसले आहे. त्यामुळे एप्रिल, मे, जून महिन्यात तर फार मोठीच समस्या आपल्यापुढे उभी राहणार आहे. सिंचनाची अपूर्ण कामे, प्रश्न या सर्व गोष्टी लक्षात घेता दुष्काळामध्ये सर्वात जास्त त्रास हा जनावरांना सोसावा लागतो. मनुष्य हा एका गावातून दुसऱ्या गावात स्थलांतर करू शकतो. पण आपल्या सोबत जनावरांना घेऊन जाणे त्यांना शक्य होत नाही. आपण तालुक्यांमध्ये छावण्या तयार केल्या आहेत. त्यांची आज परिस्थिती पहावी. त्यात आपल्याला संपूर्ण तालुक्यातील जनावरे देखील ठेवता येत नाही. त्यातून मग छावणीचे काम कोण करतो, तेथे व्यवस्थितपणे काम सुरू आहे किंवा नाही, टेंडर कोणी घेतले आहे अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात.

मी येथे काही सूचना व प्रश्न उपस्थित करणार आहे. दुष्काळासंबंधातील व पावसाळ्याच्या संबंधातील माहिती आपल्याला आधी मिळत असते. ग्लोबल वॉर्मिंगचा फटका आता संपूर्ण जगाला बसतो आहे. आज संपूर्ण जगातील वातावरणात बदल होत चालला आहे. त्यामुळे आपल्या बजेटमध्ये कायमस्वरूपी जिल्हानिहाय तरतूद दुष्काळग्रस्तांसाठी का करत नाही ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

त्या तरतुदीच्या माध्यमातून तालुकानिहाय कायमस्वरुपी जनावरांसाठी छावण्या बनविल्या पाहिजेत. पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. जर त्या जिल्ह्यामध्ये दुष्काळ नसेल तर त्या निधीचा उपयोग छावणी बांधण्याकरिता केला पाहिजे तसेच दुष्काळासाठी ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्यासाठी केला पाहिजे. तेव्हा आपण दुष्काळग्रस्त भागासाठी बजेटमध्ये जिल्हानिहाय तरतूद करणार आहात काय ? त्या ठिकाणी काम करणारे सचिव आणि उप सचिव यांच्या कामाची पध्दत काय असली पाहिजे आणि त्यांनी त्या ठिक्‌णी काय काम करावयाचे आहे याचा कायम स्वरुपी एक नकाशा तयार करणार आहात काय ?

सभापती महोदय, जनावरांच्या छावण्या तालुकावाईज आणि जिल्हावाईज करणे आवश्यक आहे. कारण लोक रोजगारासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकतात. परंतु त्यांना जनावरांना सोबत घेऊन जाणे अशक्य असते. तेव्हा छावणीसाठी बजेटमध्ये तरतूद करावी अशी मी सूचना करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अत्यंत जिव्हारी लागणाऱ्या अशा अत्यंत महत्वाच्या विषयावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी या चर्चेमध्ये भाग घेत असताना या चर्चेमध्ये मला भाग घेण्याचा नैतिक अधिकार आहे काय याचा मी विचार करीत होतो. कारण पीठासीन अधिकारी म्हणून आपण काल वाच्यता केली होती की, माझ्याकडे एवढी नावे बोलण्यासाठी आलेली आहेत. दुष्काळग्रस्त भागातील आमदारांनी प्रथम बोलले पाहिजे अशाप्रकारची भावना आपण व्यक्त केली त्याबद्दल मी आपणास मनापासून धन्यवाद देतो आणि आपले अभिनंदन देखील करतो. आपल्या या निर्णयावर येथे थोडीशी चूळबूळ झालीच. आपण जी भावना व्यक्त केली त्या भावनेचा आदर व्यक्त करुन मी मलाच तपासून पाहिले. आपल्या आदेशाचा मी सन्मान व आदर करतो किंवा कसे हे मी प्रथम व्यक्त करतो आणि नंतर माझ्या भाषणाला सुरुवात करतो.

सभापती महोदय, मला प्रथम आपल्या निदर्शनास आणले पाहिजे की, आपण कितीही चर्चा केल्या, कितीही सांगितले तरी दुष्काळग्रस्तांना पहिला मदतीचा हात, पहिला पाण्याचा घोट आणि जनावरांना चाऱ्याचा घास कोणी दिला असेल तर तो प्रथम आदरणीय शिवसेना प्रमुखांनी दिलेला आहे. त्यांच्या जीवनाच्या अखरेच्या क्षणी देखील त्यांनी दुष्काळग्रस्तांची चिंता वाहिली हे मला येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. मी एक साक्षीदार नाहीतर मी एक कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. हे मी यापूर्वी सभागृहात सांगितलेले आहे. तरी देखील ते पुन्हा निदर्शनास आणत आहे.

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थिती ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात सुरु झाली. पावसाळा संपल्यानंतर झाली अशातला काही भाग नाही. पश्चिम महाराष्ट्रातील जत तालुक्यातील 42 गावांनी जाहीर केले की, आमच्या भागात सतत दुष्काळ असतो, या दुष्काळाची तीव्रता आम्ही सहन करीत आहेत. परंतु आमच्या बाजूला लागून असलेल्या कर्नाटक राज्यातील भागामध्ये तसा दुष्काळ नाही. कारण ती गावे महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर आहेत. मी त्या ठिकाणी जात असल्यामुळे मला हे सर्व माहीत आहे. त्या 42 गावांनी सांगितले की, आम्ही इतके वर्षे वनवास भोगत आहोत तेव्हा आम्हाला या गावामध्ये रहायचे नाही आणि तशी बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली. योगायोगाने मी त्यावेळी सांगलीमध्ये होतो.

..2.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, आदरणीय शिवसेना प्रमुखांना मला सकाळी 8.30 वाजता फोन आला. त्यांनी मला विचारले की, ही काय भानगड आहे, तू कुठे आहेस ? मी सांगितले की, सांगलीमध्ये आहे. त्यांनी मला सांगितले की, सांगलीतील 42 गावे महाराष्ट्रातून बाहेर जातात म्हणजे काय, त्यांच्या बाबतीत असे काय घडले आहे ? मला या संदर्भातील ताबडतोब सर्व माहिती मिळाली पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सुदैवाने त्या लोकांचे नेतृत्व करणारे सांगलीच्या मार्केट यार्डमध्ये होते.

मी एका ज्येष्ठ पत्रकाराशी संपर्क साधला आणि विचारले की, लोकांचे नेतृत्व करणाऱ्यांपैकी मला कोणी भेटेल काय. त्यांनी सांगितले की, मी शोधतो. त्यांनी 15 मिनिटांत दूरध्वनी करुन मला सांगितले की, मी त्यांना घेऊन येतो. त्यानुसार ते त्यांना घेऊन आले. त्यांच्याकडून मी माहिती घेतली आणि मातोश्रीवर फोन लावला. माननीय श्री.उध्दवजी त्यांच्या सोबत बोलले. त्यांना एवढेच म्हणाले की, आपण कृपया या बाबत घाई करु नका आणि महाराष्ट्रातून बाहेर पडण्याचे बोलूही नका. महाराष्ट्राचा अपमान होईल असे काही बोलू नका. उध्दवजींनी त्यांना सांगितले की, मी स्वत: त्या ठिकाणी येतो आणि नंतर त्यांनी माननीय शिवसेनाप्रमुखांकडे फोन दिला. शिवसेनाप्रमुख सुध्दा त्यांच्याशी बोलले. त्यांनी सांगितले की, तुमच्या मागण्या पूर्ण करण्यात महाराष्ट्र सरकार कमी पडले तरी, शिवसेना तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. या पुढे आपण महाराष्ट्रातून बाहेर पडण्याची भाषा बोलायची नाही. त्यानंतर माननीय उध्दवजी ठाकरे विमानाने कराडला आले आणि 160 कि.मी. अंतरावरील जत येथे गेले. त्यांनी त्या 42 गावांतील प्रमुख मंडळींना एकत्र बोलावले आणि त्यांच्याशी संवाद साधला. उध्दवजींनी तेथे जाहीर केले की 8 तारखेपासून आमच्या पक्षाकडून छावणी सुरु होईल. महोदय, आम्ही त्या ठिकाणी छावणी सुरु केली आणि 8 टँकरच्या माध्यमातून 42 गावांत चार महिने सतत पाणी दिले. आम्ही त्या ठिकाणी दीड-दोन हजार जनावरांची छावणी चालविली. आदरणीय शिवसेनाप्रमुखांचे आदेश आणि माननीय श्री.उध्दवजींच्या मार्गदर्शनाने मी या गोष्टी करुन आज या ठिकाणी उभा आहे.

महोदय, मला या निमित्ताने सांगावेसे वाटते की, मी दुष्काळग्रस्त भागात व्यक्तिश: फिरलो आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात फिरलो. पावसाळ्याची अपेक्षा असताना त्या भागात फिरलो. मी तेथील उभी पिके आणि शेती बघितली. भविष्यात नक्की काय घडणार आहे हे अनुभवले. दुष्काळी परिस्थितीत मी बीड, जालना, संभाजी नगर, धाराशीव या भागात फिरलो. परंतु सोलापूरला जायचे राहून गेले. तेथील लोकांचा आग्रह असताना सुध्दा मला तेथे जाता आले नाही. आम्ही त्या त्या जिल्ह्यात जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना भेटलो व त्यांना दुष्काळी परिस्थितीची जाणीव करुन दिली. बीडचे जिल्हाधिकारी श्री.केंद्रेकर यांनी माझ्यासोबत सव्वा तास चर्चा केली. आष्टी, पाटोदा, नगर भागातील छावण्यांना भेट दिली. त्यावेळी आष्टी, पाटोदा या ठिकाणी छावण्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सुरु झाल्या नव्हत्या. विभागीय आयुक्तांकडे जाऊन त्यांच्याशी संपर्क साधला. भविष्यात चाऱ्याच्या आणि इतर प्रश्नाबाबत काय परिस्थिती निर्माण होईल या बाबत एक कार्यकर्ता म्हणून मी जे काही अनुभवले ते त्यांना सांगितले. मी जे काही दोन-पाच टक्के अनुभवले असेल ते व्यक्त करता येईल की नाही हे सांगू शकत नाही.

महोदय, आपण जे संकेत दिले आहेत, त्या संकेतानुसार या विषयावर बोलण्यासाठी मी उभा आहे. मी आदरणीय शिवसेना प्रमुखांबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. भविष्यात दुष्काळ पडणार आहे याची दूरदृष्टी लक्षात आलेल्या नेतृत्वाने शिवसेनेकडून पहिली चारा छावणी सुरु केली. त्या चारा छावणीतील जनावरे दिवसा शेतात काम करुन रात्री छावणीत परत येत होती. त्या छावणीवरील जनावरांचा उपयोग शेतकऱ्यांनी दिवसा आपल्या शेतीमध्ये केला. सरकारने सुरु केलेल्या छावण्यांमधील जनावरे बाहेर कामासाठी नेता येत नाहीत असा मुद्दा या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी काल मांडला. महोदय, जनावरांची श्रमशक्ती शेतीवर वापरुन त्यांना चारा-पाणी दिले तर दुष्काळी परिस्थितीचा सामना करता येईल असा आमचा उद्देश होता.

महोदय, माझ्या भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी मला दोन गोष्टी नमूद करावयाच्या आहेत. त्याचा खुलासा माननीय मंत्री करतील अशी मला अपेक्षा आहे. या विषयाबाबतचा मूळ प्रस्ताव सत्तारुढ पक्षाकडून आला होता. त्यामध्ये केंद्र सरकारची RRR योजना प्रभावीपणे राबविण्याबाबतचा उल्लेख होता. RRR ही योजना नेमकी काय आहे या बाबत मी काल सभागृहात विचारणा केली होती. तसेच दुसरी बाब अशी की, अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनेचे 'मनरेगा' असे अशुध्दीकरण केले आहे. या योजनेच्या नावाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात अशुध्दता निर्माण केली जात आहे. आज अधिकारी मंडळी त्यांच्या मनाला येतील तशी नावे देत आहेत. त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात योजनेची अशुध्द नावे लोकांच्या जिभेवर वळविली जातात आणि नंतर सांगतात की अनुभवातील नाव असल्यामुळे आता तोच शब्द वापरावा. पूर्वी रोजगार हमी योजना असे नाव वापरण्यात येत होते. परंतु या अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनेचे EGS असे नाव अंगवळणी पाडले आणि आम्ही रोजगार हमी योजना हा शब्दच विसरुन गेलो.

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.बरवड....

श्री. दिवाकर रावते ....

अधिकाऱ्यांचे त्यांच्या पध्दतीने हे जे शाब्दीक लादणे असते ते आपण स्वीकारावयाचे का हा प्रश्न असतो. या बाबतीत नंतर आपण मला मार्गदर्शन केले तर मी आपल्याला धन्यवाद देईन.

सभापती महोदय, खरे म्हणजे ही दुष्काळावरची गंभीर चर्चा आहे. महाराष्ट्र अत्यंत आतुरतेने आपणा सर्वांकडे बघत आहे. आपण अत्यंत चांगली चर्चा करीत आहोत. एकमेकांना दूषण देण्यापेक्षा सरकारच्या ज्या उणिवा आहेत त्या आम्ही सांगतो. याचा अर्थ प्रशासकीय यंत्रणेतील या उणिवा आहेत. प्रशासकीय प्रमुख त्याला जबाबदार असतो. त्यानुसार मंत्री त्याला जबाबदार असतात म्हणून या सभागृहातून त्यांना मार्गदर्शन होत असते. माझे काय चुकले ते मी स्वीकारावयाचे आणि दुरुस्त करावयाचे. माझे काय चुकले हे सांगणारा तू कोण, राजकारण करता का, असे विचारावयाचे नाही हे या चर्चेचे मूळ आहे. तुमच्या ज्या चुका आहेत त्यावर प्रत्येकाच्या वृत्तीप्रमाणे घणाघाती घाव घातलेच जाणार. शेणाचे काय झाले असे विचारले तर कोणी म्हणेल की, शेण खाल्ले का, अमुक केले का ? हे बोलणे व्यक्तिगत नसते. त्यामागचा भाव जर तुमच्यापर्यंत पोहोचत नसेल तर शासन चालविणारी प्रशासकीय यंत्रणा कशी आहे हा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, या ठिकाणी जे अधिकारी उपस्थित असतात त्यांना आम्ही बघावयाचे नसते. कारण ते अदृश्य असतात. पण या ठिकाणी या चर्चा होत असताना मंत्र्यांना चिठ्ठी पाठविण्याकरिता, सूचना पाठविण्याकरिता बसलेले अधिकारी कोणत्या तोलामोलाचे आहेत त्यावरुन या चर्चेचे गांभीर्य प्रशासन किती घेत आहे हे लक्षात येते. आता या ठिकाणी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी किंवा उच्च अधिकारी कोणीही उपस्थित नाहीत. आम्ही या ठिकाणी चर्चा करण्यासाठी उभे आहोत. या ठिकाणी बसलेले अधिकारी वर्ग 1 चे कनिष्ठ अधिकारी आहेत. विधान परिषद हे विधिमंडळाचे सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात चर्चा चालू आहे पण त्या चर्चेची नोंद घेण्यासाठी उपस्थित असलेले अधिकारी हे वर्ग 1 चे कनिष्ठ अधिकारी आहेत. ते दृश्य नाहीत हे आम्हाला मान्य आहे पण या सभागृहाच्या भावना, संवेदना प्रशासन कसे टिपून घेत आहे याला फार महत्व असते. त्यामुळे आमची आणि आपणा सर्वांचीच नजर तिकडे असते. अशी आजच्या या चर्चेची परिस्थिती आहे. म्हणजे त्या ठिकाणी सुध्दा दुष्काळ आहे. दुर्दैवाने त्या ठिकाणी दुष्काळ का निर्माण झाला आहे, शासन दुष्काळ पुढे नेऊ शकेल का, अशा प्रकारच्या एका शंकेने मी उभा आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय,

दुष्काळ

20 व्या शतकातील 72 चा
का 21 व्या शतकातील 12/13 चा
पवार साहेब म्हणतात 72 पेक्षा हा लई भारी
दादा-म्हणजे छोटे पवार म्हणतात फिरुन बघतो
बाबा-मुख्यमंत्री म्हणतात केंद्राकडून पैसा आणतो
मंत्र्यांचे कार्यकर्ते म्हणतात लवकर आणा
जनावरांना लाजवील असा आणलेला (पैसा) खाऊन दाखवतो
त्याची ही कर्मकहाणी
चढाओढ बोलण्याची
नाही कृती करण्याची
टँकर लॉबी लुटण्याची
छावणीत चारा चोरण्याची
तहानलेला गळा कोरडाच आहे
भुकेची व्याकुळता 'रवंथ' थांबवत आहे
तरीही कोट्यवधीची 'खर्ची'चालूच आहे
दुष्काळाने मरण होते गावाचं
माझ्या गावच्या शिवाराचं
जनावराच्या कसाईकडे ओढ घेण्याचं
भकास उद्ध्वस्त संसाराचं
भविष्यच माझ, माय लेकरांचे, काळ्या आईच
'यम' पण नेत नाही, मायबाप (सरकार)पण पहात नाही

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

उकिरड्यावरील कुत्र्यालाही माझ्या उकिरड्याचे हसू येते
अस्मानी सुलतानीच्या अवकृपेने माझे 'मातेरे' होते.
तो हा दुष्काळ आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

काल सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी दुष्काळाबाबत आपल्या व्यथा मांडलेल्या आहेत. मीही दुष्काळी परिस्थितीची पाहणी केलेली आहे. मोठ्या प्रमाणात लोक स्थलांतर करीत आहेत. कारण जनावरांना चारा नाही, पिण्यासाठी पाणी नाही, हाताला काम नाही. यवतमाळमध्ये 1.50 लाख लोक स्थलांतरित झाले आहेत. त्या लोकांच्या हाताला काम नाही म्हणून स्थलांतर करीत आहेत. दुष्काळग्रस्त भागातील लोकांचे स्थलांतर सुरु आहे. त्या लोकांच्या स्थलांतराचे संकट घेऊन मी व्याकुळता व्यक्त करीत आहे.

"खेळलो ज्या मातीमध्ये
रडलो ज्या कुशीमध्ये
दु:ख सुखाची संगती
भावली, अनुभवली ज्या शिवारात
पडलो, वाढलो तरीही सावरलो
संसाराचा वृक्ष ज्या घर गोठ्यात फुलवला
मुला बाळा, मायबापा
आवडीसंगे गहिवरलो, आनंदलो
रास ओतली माझ्या श्रमाची,
माझ्या कुटुंबाच्या रक्ता घामाची
धनधान्याची, काळ्या आईच्या आशीवार्दाची
श्रमाची संपत्ती पाहिली,
सुख समृध्दीची लीला अनुभवली
सुखाचा घटाटा अनुभवला
दु:खाचे उमाळेही जिरवले
तरीही लेकरा वासरांसहित विसावलो
असे माझे घरकुल

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

असे माझे गावकुल
सोडून जात आहे
अन्न पाण्यासाठी टाहो फोडत आहे
गाव वाट दूर करीत आहे".
ते हे स्थलांतर.

सभापती महोदय, दुष्काळाची सभागृहात चर्चा सुरु केली आहे. पण वस्तुस्थिती काय आहे ते मी मांडतो.

"गेल्या सप्टेंबर महिन्यापासून दुष्काळाची चाहूल लागली होती
आता फेब्रुवारीत चर्चा सावरण्याची नाही
परिस्थितीच्या भानाची नाही
केल्याच्या समाधानाची नाही
तर दुरुस्तीच्या खर्चाची
सर्वांच्या भ्रष्टाचाराची
जनावरांप्रमाणे खंगलेल्या प्रशासकीय यंत्रणेची
दुष्काळाचा फायदा आपल्याच भागात पळवण्याची"

सभापती महोदय, मराठवाड्यात जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याची चीड आल्यामुळे मी हे वाक्य वापरलेले आहे. हे वाक्य वापरत असताना मला लाज वाटते. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आमच्या मराठवाड्यातील दुष्काळाचा उल्लेख केलेला नाही. खानदेशाच्या कोपऱ्यामध्ये असलेल्या दुष्काळाची नोंद नाही. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील काही तालुक्यातील दुष्काळाची नोंद नाही. फक्त पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळाची नोंद करुन घेतली जाते. आमच्या भागातील दुष्काळग्रस्त जनतेचा शासन एवढा मोठा अपमान करते ? आमची ती व्यथा आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

"दुष्काळाचा फायदा आपल्या भागात पळवण्याचा,
कोडगेपणा सरकारी कृतीचा, कर्तृत्वाचा
शब्द कोशात, कोपऱ्यात पडलेला,
आबा दादा, कॉंग्रेस-राष्ट्रवादी वाद श्रेयाचा
कोडगेपणा या शब्दालाही मोठेपण दिलात
शब्दकोश आपले ऋण कसे विसरेल
माहितीच्या अधिकारात सर्वच मिळते
सिंचन घोटाळे थक्क करतात
गगनभरारी घेण्याची भ्रष्टाचारी किमया दाखवणारे
आकडे मिळतात, जनावरांच्या चाऱ्याची चोरी मिळते
छावणीत नसलेल्या जनावरांची संख्या मिळते
पाण्याचे टँकर व अधिक उणे फेऱ्या करणारे
सत्ताधाऱ्यांचे बगलबच्चेही सापडतात
तरीही जनावरांना चारा नाही, पिण्याला पाणी नाही
कर्ज वसुलीस स्थगिती नाही, वीज जोडणी नाही
विजेचा पत्ता नाही, पुरावे पुढे येऊनही भ्रष्टाचार
मात्र शिष्टाचार होऊन मिरवतो आहे" त्याची ही चर्चा आहे.

सभापती महोदय, सरकारच्या वतीने काय जाहीर केले जात आहे त्याकडे तुम्ही आम्ही व राज्यातील सर्व जनता डोळे लावून बसलेली असते. दु:खावर डागण्या दिल्या तरी त्या डागण्यांनाही मर्यादा असतात. डागण्यांमुळे वरची चामडी वाळते, पण शासनाकडून आतील हृदय जळेल असे बोलले जाते त्याला कोणती उपमा द्यावी ? दुष्काळाचा वापर प्रसिध्दीसाठी करु नका असे माननीय मुख्यमंत्री सुनावतात. त्यांच्यात जर प्रामाणिकपणा असेल आणि ते जर आपल्या सहकाऱ्यांना सांगत असतील की, बाबांनो, आपण दुष्काळासाठी काम करु या. ते असे जाहीरपणे सांगत आहेत की, दुष्काळाचा वापर प्रसिध्दीसाठी करु नका. परंतु त्याचबरोबर ते राष्ट्रवादीच्या

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सहकाऱ्यांना टोला देतात. तेव्हा दुष्काळाच्या परिस्थितीवर, सरकारच्या जागृतीचा, प्रवृत्तीचा, वृत्तीचा, कर्मकहाणीचा, कृतीचा हा आलेख मुख्यमंत्री मांडत असतात. मुख्यमंत्री महोदय, असे का म्हणाले ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...

टेंभू योजनेची मूळ किंमत 3450 कोटी रुपये आहे. मार्च अखेरपर्यन्त या योजनेवर 1315 कोटी रुपये खर्च झालेला आहे. परवा माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार तेथे आले. मी त्यावेळी त्या भगामध्ये होतो. कृष्णा खोरे महामंडळाच्या सचिवांना 76 कोटी रुपयाचा धनादेश देताना त्यांचा फोटो आहे. त्यांनी सांगितले की जत या दुष्काळी तालुक्याला पाणी सोडण्याकरिता 76 कोटी रुपये दिले. हे पैसे कधी दिले ? फेब्रुवारी महिन्यामध्ये ते दिले. जत तालुक्याला पाणी गेले पाहिजे हे आपणास कधी समजले ? या जत तालुक्याचा आकांत केव्हापासूनचा आहे ? पैसे दिले. परंतु पाणी पुढे गेलेच नाही. नदीची पूजा करण्यात आली ? ही पूजा कशी करण्यात आली तर ते नदीकाठी उभे राहिले आणि पाण्यामध्ये फुले फेकली. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांचा क्रमांक मागे लागला. त्यांचे बंधू श्री. प्रकाश शेंडगे हे जत तालुक्याचे आमदार म्हणून पुढे होते. हा प्रकार टी.व्ही.वर पाहून मला दुःख झाले. यांनी गंगा मातेची पूजा फुले फेकून केली आणि आलेले पाणी परत मागे गेले. कारण पुढे सर्व बंद होते. परंतु जत तालुक्याला पाणी आले असे यांनी जाहीर केले. ते पाणी काही आले नाही. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी अर्थमंत्री या नात्याने 76 कोटी रुपये दिले. या पैशामध्ये जत तालुक्याला पाणी येईल असे सांगितले. म्हैसाळा योजनेचे पाणी कवठेमहांकाळ करिता आणले. पाण्याची पळवा पळवी केली. दुष्काळी भागातील लोकांची तहान भागविण्याऐवजी आपल्या भागातील लोकांची तहान भागविण्यात आली.

सन्माननीय सदस्य श्री. खाडे यांनी उपोषण केले होते. ते उपोषण सोडताना पालकमंत्री म्हणून डॉ. पतंगराव कदम यांनी 31 मार्च पर्यन्त पाण्याचा प्रश्न सुटेल असे सांगितले. मी या सभागृहामध्ये मुंबइचे माजी महापौर आणि विधानसभेचे माजी अध्यक्ष कै. दत्ताजी नलावडे यांचा उल्लख केला होता. ते मुंबईचे महापौर झाल्यानंतर आजूबाजूच्या ज्या गावांना पाणी मिळत नव्हते त्य गावांना त्यानी पाणी दिले. त्यांच्या महापौर पदाच्या कारकीर्दीचा गुणगौरव केला जातो. इतरांना पाण्याअभावी तहानलेले ठेवून स्वतःची तहान भागविणे ही नैतिकता नाही आणि अशा दुष्काळी परिस्थितीत तर ती नाहीच नाही. म्हणून पाण्यासाठी जे 76 कोटी रु. दिले आहेत ते कधी खर्च करण्यात येतील, हे पाणी कधी येईल ? आटपाडी तालुक्यामध्ये पाणी जाण्याकरित 76 कोटी रु. दिले असे मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम म्हणतात. माननीय उपमुख्यमंत्री जतला असे सांगतात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

की आम्ही 76 कोटी रु. दिले. हे पैसे नक्की कोणी दिले ? खरे म्हणजे हे पैसे सरकारने दिले असे त्यांनी सांगायला पाहिजे होते. 76 कोटी रु. देण्यासंबंधी कॅबिनेटमध्ये निर्णय झाला आणि अर्थमंत्री या नात्याने हा धनादेश देताना मला अभिमान वाटतो असे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सांगायला पाहिजे होते. परंतु तसे न सांगाता हे पैसे मी दिले, मी दिले असे सांगितले गेले. म्हणून माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, दुष्काळाचा प्रसिध्दीसाठी वापर करु नका.

सभापती महोदय, आपल्या कन्येचे गुण वाढविले म्हणून ज्यांना मुख्यमंत्री पद सोडावे लागले ते श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर हे नंतर महसूल मंत्री झाले. मी त्यावेळी सभागृहामध्ये त्यांना विचारले होते की, आपण राज्याचे मुख्यमंत्री होता, आता महसूल मंत्री आहात, आपण मराठवाड्याचे आहात म्हणून आपणाकडे मी मोठ्या अपेक्षेने पहात आहे, आपण ही आणेवारी केव्हा बदलणार ते सांगा.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यांनी आम्हाला उत्तर देताना सांगितले की, आणेवारी लवकर बदलू. त्यावेळी त्यांनी महसूल मंत्री म्हणून उत्तर दिले. तेच सन्माननीय श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर असे म्हणतात की, सरकार म्हणजे वेडयाचा बाजार आहे. ते अधिकृतपणे बोलले. श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर हे माजी मुख्यमंत्री, माजी महसूल मंत्री असून ते आता विद्यमान आमदार आहेत. सरकार म्हणजे वेडयाचा बाजार आहे. अजून त्यांना आणेवारी कळत नाही आणि आणेवारी बदलण्याची त्याची तयारी आजही दिसून येत नाही. हे सर्व वृत्तपत्रात छापून आलेले आहे. ती संपूर्ण बातमी या ठिकाणी मी वाचून दाखवित नाही. आणेवारी संदर्भात विरोधी पक्षातील कोणी बोलले नाही. तुमच्याच पक्षाचे सदस्य अशा पध्दतीने सरकारच्या बाबतीत बोलले. ते जे बोलले आहेत, त्या बाबतीत या सरकारकडे काय उत्तर आहे?

महोदय, राज्यात दुष्काळ पडलेला आहे. सरकारकडून आम्हाला सांगितले जाते की, दुष्काळाच्या बाबतीत राजकारण कोणीही आणू नये. एकमेकाचे उणे-दुणे काढू नये. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष एकत्रितपणे या दुष्काळाला सामोरे जाऊन राज्यातील जनतेला मदत करु. ती भावना चांगली आहे. परंतु चांगली भावना सरकारची देखील असली पाहिजे. "लोका सांगे ब्रम्हज्ञान" अशा पध्दतीने सरकार का वागते आहे ? मंत्रिमंडळाची उप समिती आहे. त्या उप समितीमध्ये आदरणीय श्री.शरद पवार यांना लक्ष घालावे लागले. ते केंद्रीय मंत्री आहेत. मंत्रिमंडळाच्या उप समितीमध्ये खडाजंगी झाली. मराठवाडयात करावयाच्या उपाययोजना बाबत पाणी पुरवठा मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे, सहकार राज्यमंत्री श्री.प्रकाश सोळंके यांनी आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रशासनावर हल्ला चढविला. मराठवाडयासाठी आपण भांडलात त्या बद्दल तुमचा मला अभिमान वाटतो. आपल्या भागातील लोकांकरिता आपण आवाज उठविला असेल तर त्या गोष्टीचा मला खरोखरच अभिमान आहे. जिल्हाधिकारी हे लोकप्रतिनिधींचे ऐकत नाहीत अशा तक्रारी सदर मंत्र्यांनी केल्या. माननीय पाणी पुरवठा मंत्री नुकतेच आले आहेत. मी तुमचेच अभिनंदन करीत होतो आणि आपण आलात मला बरे वाटले. ते विरोधी पक्षाचे भारतरत्न आहेत. त्यांच्यासारखे मंत्री मिळाले तर आम्हालाही बरे वाटते. ते खरे बोलणारे मंत्री आहेत. प्रामाणिक मंत्री आहेत. मातीतून उगवलेले पीक फळे देते,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तसे तुमचे आहे. खालपासून वरपर्यंत आल्यानंतर सगळया जाणीवा, उणिवा कळतात तेव्हा खरे बोलले जाते. आजूबाजूला कोण आहे, मी कोणासाठी बोलतो आहे, यापेक्षा जनतेकरिता बोललो. त्याच भावनेतून " सरकार नापास आहे" असे आपण बोललात. म्हणून तुम्ही आमचे भारतरत्न आहात. तुम्ही सभागृहात आलात, त्यावेळी मी तुमचेच अभिनंदन करीत होतो. आमच्या दुष्काळग्रस्त भागासाठी तुम्ही भांडलात म्हणून तुमचे अभिनंदन करीत होतो.

महोदय, डॉ.पतंगराव कदम त्यांच्या खास शैलीत म्हणाले की, अधिकाऱ्यांची कान उघडणी केली आहे. ते सभागृहात कसे बोलतात याची सर्वांना जाणीव आहे. त्यांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी कशी केली असेल याची आम्हाला माहिती आहे. सन्माननीय श्री.प्रकाश शेंडगे यांनी सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील व्यथा मांडत असताना आदरणीय श्री.प्रकाश सोळंके यांनी आक्षेप घेतला आणि म्हणाले की, मंत्रिमंडळाच्या उप समितीमध्ये आमदारांनी तोंड खुपसावयाचे नाही. आम्ही मराठवाडयाच्या व्यथा मांडतो आहे आणि जत साठी मध्येच कशाला नाक खुपसता आहात. मराठवाडयाच्या बाबतीत लढलात म्हणून मला बरे वाटले. अरे लढनेवाला कोई तो हैं त्यामुळे आम्हाला खूप बरे वाटले.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, आपण मंत्री म्हणून काम केलेले आहे. तुम्ही भविष्यात मंत्री होणार की नाही याची मला माहिती नाही.

श्री.अनिल भोसले : तुमच्या त्यांना शुभेच्छा आहेत काय ?

श्री.दिवाकर रावते : माझ्या शुभेच्छानी कोणी मंत्री झाले असते तर शुभेच्छा देऊन मी तुम्हालाही मंत्री करुन टाकले असते.

**उप सभापती** : त्यांच्या शुभेच्छा काय आहेत याची आपणास माहिती आहे काय ? त्यांच्या शुभेच्छा "लवकर घरी जा आणि आम्हाला येवू द्या" अशा आहेत.

श्री.दिवाकर रावते : महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्यासाठी शुभेच्छा राखून ठेवतो. त्यांनी मुख्यमंत्री होण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे. तुम्ही सगळे त्यांना मंत्री करा असे सांगता आहात. मी त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा राखून ठेवलेल्या आहेत. काल सभागृहात माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम उपस्थित होते, त्यावेळी मी त्यांना

3...



ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 14:40

श्री.दिवाकर रावते....

सांगितले की, आम्ही या चर्चेचे तुमच्याकडून उत्तर घेऊ इच्छित नाही. या चर्चेस माननीय मुख्यमंत्र्यांनी अथवा उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे असा आमचा आग्रह आहे.

महोदय, राज्यात दुष्काळाची तीव्रता असताना, दुष्काळात पाण्याच्या टँकर्समध्ये वाढ झालेली असताना माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम असे म्हणतात की, दुष्काळ निवारणाचा निधी वाटप करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. बुलढाणा जिल्हयाचा अपवाद वगळता मराठवाडयातील जिल्हयांचे पालक मंत्री निरुत्साही आहेत. आपण परभणीचे पालक मंत्री आहात. त्या ठिकाणी जास्त दुष्काळ नाही. त्या जिल्हयात 25 गावांमध्ये दुष्काळ आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

हे सगळे निरुत्साही आहेत असे डॉ.पंतगराव कदम म्हणतात. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन पालकमंत्र्यांनी निधीची मागणी करावयाची असते. परंतु तुम्ही मागणी करीत नाही. गुरांच्या छावणीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत, त्यामुळे फक्त सांगली आणि सातारा जिल्हयामध्ये छावण्या सुरु झाल्या, या आरोपात तथ्य नाही. तुमचे अधिकारी निष्क्रिय आहेत असे जाहीरपणे डॉ.पंतगराव कदम पत्रकार परिषद घेऊन सांगतात. ही परिस्थिती तुमच्या शासनामध्ये आहे.

सभापती महोदय, केंद्रीय पथकाबाबत खूप बोलबाला झाला. केंद्रीय पथकाने पाहणी केल्याशिवाय केंद्राकडून मदत मिळत नाही. केंद्राचे पथक आल्याबद्दल 'पुढारी' वृत्तपत्रात एक लेख प्रसिध्द झाला होता. कोल्हापूरच्या लेखकांनी तो लेख लिहिला होता. त्यांची कशी विटंबना करण्यात आली यावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. केंद्रीय पथकाला शेतकऱ्यांनी हाकलून लावले. पाण्यामध्ये भिजलेली, पिवळी पडलेली ज्वारी घरामध्ये भरुन ठेवा, कशाला मदत मागता असे सांगणारे हे पथक होते. जत तालुक्यातील डफळापूर गावाला भेट देण्यासाठी सायंकाळच्या वेळी गेले. सूर्यास्तानंतर त्या गावात केंद्रीय पथक आले. सूर्य अस्ताला गेल्यानंतर पथकाने पाहणी सुरु केल्यामुळे त्या गावातील शेतकरी संतप्त झाले. त्यांनी केंद्रीय पथकाला पळवून लावले. आम्ही उरकून घ्यायचे म्हणून आलो, नोंद करायची म्हणून आलो ही भावना त्यांच्यात दिसून आली. अशाप्रकारे तुम्ही दुष्काळग्रस्तांची विटंबना केली आहे. एकही मंत्री किंवा एकही अधिकारी बोलायला तयार नाही. त्यांनी ठामपणे सांगितले पाहिजे होते, No Sir, there is a sunset and I will not come. We will visit tomorrow. तसे न सांगता Yes Sir, Yes Sir, No Sir करीत त्यांच्यामागे फिरत होते. मात्र त्यांच्या विरोधात बोलायला कोणी तयार नाही. शेतक-यांच्या जिवाला लागते, त्यांच्या घशाला कोरड पडते, जनावरे तडफडत आहेत, लेकरांच्या पाण्याचा प्रश्न आहे, त्यामुळे शेतकरी गप्प बसायला तयार नव्हते. त्यांनी केंद्रीय पथकाला जत तालुक्यातून पळवून लावले. जनतेच्या प्रती ही शासनाची जागरुकता आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय श्री.भास्कर जाधव यांच्या मुलाच्या लग्न सोहळ्याबाबत खूप बोलबाला सुरु होता. मराठवाड्यामध्ये सामान्य माणसाच्या घरच्या लग्नाला किमान 25 ते 30 हजार लोक येतात. त्यासाठी तो नेता असावा लागत नाही. मराठवाड्यातील बहुतेक लग्न सोहळ्यांना मी हजर असतो म्हणून मला माहिती आहे. यजमान हा समाजातील पाटील, देशमुख

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

असेल तर 50 हजार माणसे येतातच. श्री.भास्कर जाधव यांच्या घरचा लग्न सोहळा पाहून मला खूप दु:ख झाले, रात्रभर झोप आली नाही असे आदरणीय शरद पवार साहेबांनी सांगितले. कोल्हापूरचे खासदार आदरणीय श्री.राजू शेट्टी यांनी त्यांना प्रश्न विचारला की, भास्कर जाधव यांच्या घरचा विवाह सोहळा पाहून तुम्हाला झोप लागली नाही, मग डॉ.पतंगराव कदम यांच्या मुलीच्या विवाह सोहळयाला हजेरी लावल्यानंतर झोप कशी लागली? त्यांची लेक किती उत्साही हे सांगण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्राच्या सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे स्वत: हात धरुन तरुण जोडप्यांना रांगेत उभे करीत होत्या. कितीतरी वेळ दूरदर्शनवर दाखविले जात होते. त्यांच्या मागे अमके, तमके उभे होते. एक कि.मी.ची रांग लागली होती. वाहने उभी करण्यासाठी जागा नव्हती. तो काळ दुष्काळाचाच होता.

सभापती महोदय, आदरणीय श्री.शरद पवार हे द्रष्टे आहेत. माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांचे लग्न झाले तेव्हा दुष्काळ नव्हता. भविष्यात दुष्काळ पडेल म्हणून लग्नाला आलेल्यांना केवळ पेढे वाटले. भविष्यातील दुष्काळाची जाणीव माझ्या लेकीच्या लग्नात ठेवतो, असे त्यांनी जाहीरपणे सांगितले.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

यासंदर्भात माननीय श्री. शरद पवार साहेबांनी जे काही सांगितले आहे ते मी येथे सांगितले आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. भास्कर जाधवांच्या मुलांच्या लग्नाच्या संदर्भात त्यांनी माफी मागितल्यामुळे त्यांना न्याय दिला गेला. परंतु जत मधील बांधकाम सभापती श्री. श्रीकांत शिंदे हे राष्ट्रवादी पक्षाचे आहेत. त्यांनी त्यांचा वाढदिवस जंगी साजरा केला. गांधी चौकात त्यांनी लावणीचा जाहीर कार्यक्रम केला होता. लावणीच्या कार्यक्रमात हजारो लोकांना बोलावण्यात आले होते, वाढदिवसाचे मोठ मोठे होर्डींग लावले गेले. जत येथे 100 टक्के दुष्काळ आहे. आमच्या कोकणात मात्र दुष्काळ नाही. माननीय श्री. राहूल गांधी दुष्काळ पहाण्यासाठी जत आणि आटपाडीला गेले होते. जत येथील श्री. श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त जे काही होर्डींग लावण्यात आले होते त्यावर एका नगरसेविकेच्या पतीचा फोटो लावला नसल्यामुळे दोघांची गँग आपापसात भिडली आणि हे सर्व प्रकरण बाहेर आले. त्यावेळेस आपल्या जाणीवा कोठे गेल्या होत्या ?

सभापती महोदय, सांगलीच्या महापौरांवर सुध्दा अशीच वेळ आली. महापौरांच्या मुलाच्या लग्नाला मोठया प्रमाणात लोक आल्यामुळे त्या महापौरांना राष्ट्रवादी पक्षाने आपल्या पक्षातून हाकलून लावले. याचे खरे कारण म्हणजे महापौर माननीय मंत्र्यांचे ऐकत नसल्यामुळे हा विषय निर्माण झाला. छोटया कार्यकर्त्याला सुध्दा राष्ट्रवादीत मुक्तता दिली जात नाही. त्यामुळे सांगली महापौर पक्षातून काढला गेला परंतु बिचारे आमचे भास्करराव जाधव हुशार असल्यामुळे त्यांनी माफी मागितल्यामुळे ते वाचले. माननीय दादांनी सांगितल्यामुळे हा विषय संपला. एखादे कारण पुढे करुन कार्यकर्त्याला झोडपले जाते हे काही बरोबर नाही. जर आपल्यात सामाजिक जाणीवा आहेत तर जतच्या लावणी प्रकरणात आपल्या जाणीवा का मेल्या ? यामध्ये तुमची प्रामाणिकता दिसत नाही. तुमची रात्रभर विस्कटणारी झोप ही दुष्काळग्रस्त भागातील विवंचनेने मोडत असेल तर त्यासंदर्भातील न्याय सर्वांना लागला गेला पाहिजे. मग हा न्याय सांगलीच्या शिंदे यांना का लागला नाही ?

सभापती महोदय,आमच्या आदरणीय मुख्यमंत्र्यांनी दुष्काळासाठी केंद्राकडे पहिल्यांदा 5 हजार कोटी मागितले नंतर 3 हजार कोटी मागितले. परंतु जेव्हा दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक आले तेव्हा ते 2700 कोटीवर आले परंतु त्यातील आपल्याला केवळ 667 कोटी रुपयेच मिळाले. ..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, राज्यात कशा प्रकारचा दुष्काळा पडलेला आहे त्याची माहिती जवळ पास सर्व सन्माननीय सदस्यांनी मांडली आहे. चारा छावण्यातील भ्रष्टाचार वाहनानिशी आणि त्यांच्या क्रमांकानिशी येथे सांगितला गेला आहे. त्यामुळे मी त्याच्या खोलात जाऊ इच्छित नाही. आपण येथे दुष्काळाच्या संदर्भात बोलत आहोत परंतु भविष्यात दुष्काळ पडणार नाही यासाठी आपण नेमके काय करणार आहोत, याचा जर वेध घेतला असेल व त्याच्यामध्ये तुम्ही दोषी असाल तर तुम्हाला येथे बसण्याचा नैतिक अधिकार आहे काय हा प्रश्न घेऊन मी पुढील भाष्य करतो. आपण कोणत्या नैतिक आधाराने येथे बसला आहात ?

सभापती महोदय,काल सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी असे भाष्य केले की, हा दुष्काळ अस्मानी नाही तर सुलतानी आहे. मी सुध्दा हा दुष्काळ सुलतानीच आहे असे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, 1972 साली महाराष्ट्रातील दुष्काळ व पाणी विषयक आयोगाचा अहवाल आला होता. 1960 साली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर हे घडलेले आहे. काल आपण स्व.यशवंतराव चव्हाणांची जन्मशताब्दी साजरी केली, विचार जगला तरच व्यक्तीमत्व जगते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, दुष्काळ व पाणी विषयक आयोग स्व.श्री.यशंवतराव चव्हाण यांनी 1962 साली निर्माण केला होता. महाराष्ट्र पाटबंधारे आयोगाने त्यावेळी म्हणजे 1962 साली 50 सूचना केल्या होत्या. त्या सर्व माझ्याकडे आहेत. घरगुती गरजेच्या पाणी पुरवठ्याला प्राधान्य ही त्यावेळची म्हणजे 1962 सालातील पाण्याच्या नियोजना संबंधातील पहिली सूचना होती. त्यानंतर मग उद्योग आणि सिंचनासाठी प्राधान्य होते. प्रत्येक खोऱ्यात जास्तीत जास्त क्षेत्रात सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे प्रत्येक नदी खोऱ्यामध्ये सर्व दूरवर समुद्राची बेटे निर्माण होतील. ही संकल्पना किती मोठी आहे ती पहावी. म्हणजे नदीचे पात्र किती मोठे आणि रूंद असले पाहिजे हे लक्षात घ्यावे. त्यामध्ये समुद्राची बेटे निर्माण झाली पाहिजेत असे 1962 मध्ये आयोगाने सांगितले होते. पाण्याची खोली किती असू शकते, रूंदी किती असू शकते याच सगळा उल्लेख त्यात आहे. मी काही 50 सूचना येथे वाचणार नाही. प्रत्येक लाभधारकास शेतात विहीर खोदण्यास भाग पाडावे. आता आपला दशलक्ष विहिरींचा कार्यक्रम होत आहे. मी येथे 1962 ची सूचना सांगत आहे. त्यामुळे ठराविक क्षेत्रामध्ये एकाच प्रकारची पिके घेण्यास उत्तेजन देऊ नये. हा माझ्या भाषणातील आजचा मुख्य गाभा राहणार आहे.

1972 मध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी श्री.अजितप्रसाद जैन आयोग आला होता. राष्ट्रीय सिंचन आयोग, 1972 असे त्याचे नाव होते. या आयोगाने एकूण 13 शिफारशी केल्या आहेत. त्यातील एक शिफारस अत्यंत महत्त्वाची आहे. सिंचन क्षमतेचा पूर्ण वापर झाला आहे अशा भागात भविष्यात नवीन प्रकल्प हाती घेण्यात यावेत असे आमचे मत आहे. तथापि, यापुढे टंचाईग्रस्त क्षेत्रात सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अग्रक्रमाला बाधा येता कामा नये. ही शिफारस त्यांनी केली होती. पण आता त्याच्या नेमके उलटे होत चालले आहे. याच आयोगाने कोल्हापूर सारख्या भागात जेथे खर्चिक उपसा सिंचन योजना राबविण्यात येत आहेत अशा भागात तुषार आणि ठिबक सिंचन करावे असे 1972 मध्ये सांगितले होते. आज लोकांच्या घशाला कोरड पडल्यानंतर माननीय मुख्यमंत्री सांगतात की, तुषार सिंचनाचा कार्यक्रम हाती घ्यावा.

पश्चिम वाहिनीवरील नद्यांचे पाणी उचलून पूर्वेकडे वळविण्याची क्षमता अजमाविणे हे देखील या आयोगाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सांगितले होते. कोयनेचे पाणी कोकणात आणा असे आम्ही नेहमी बोलत असतो. कोयनेचे पाणी आज समुद्राला जाऊन मिळते. ही त्यावेळची सूचना आहे. जास्त पावसाच्या भागात अस्तित्वात असलेले तलाव कमी पावसाच्या भागात पाण्याच्या उपलब्धतेसाठी वापरले पाहिजेत. नदीतून पाणी सोडून, कालव्यातून लिफ्ट करून अवर्षणग्रस्त पट्टयासाठी जादा पावसाच्या प्रदेशातील पाण्याचा उपयोग केला पाहिजे, असे 1972 साली जैन आयोगाने सांगितले होते आणि श्री.अजितदादा पवार यांनी सन 2013 साली फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये आमच्या सातारा जिल्ह्यात जाऊन कृष्णा खोरे महामंडळांच्या अध्यक्षांना 76 कोटी रूपयांचा धनादेश दिला. यात किती अंतर आहे ते पहावे. शिफारशीच्या ताकदीकरिता मी हे उदाहरण दिले.

1972 मध्ये दुष्काळ पडल्यानंतर 1973 मध्ये सुकथनकर समिती निर्माण झाली. या समितीने ज्या शिफारशी केल्या होत्या त्याचे काय केले यासंबंधी मला उत्तर हवे आहे. भविष्यातील दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी आम्ही पाऊल उचलणार असू तर सुकथनकर समितीने केलेल्या शिफारशींचे काय केले ते आम्हाला सांगावे.

सन 1981 साली सुरेश जैन समिती आली. पाटबंधारे विभाग उच्चाधिकार समिती आली. या समितीने एकूण 61 सूचना केल्या आहेत. त्यानंतर 1983 मध्ये सुब्रमण्यम समितीचा अहवाल आला.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यामध्ये कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत त्याची माहिती घ्यावी. 1986 मध्ये हा अहवाल आलेला आहे. त्या अहवालामध्ये जवळपास दहा-पंधरा सूचना केलेल्या आहेत. त्या संदर्भात कोणत्या उपाय योजना केल्या ?

सभापती महोदय, दिनांक 26 व 27 मार्च 1988 रोजी वसंतदादा पाटील यांनी "दुष्काळ आणि पाणी" या विषयावर एक परिषद घेतली होती. त्या परिषदेला अण्णासाहेब शिंदे, वि.स.पागे, सुधाकरराव नाईक, आदरणीय श्री.शरद पवार हे मान्यवर उपस्थित होते. वसंतदादा यांनी भरविलेल्या परिषदेचा गोषवारा आपण सर्वजण वाचू शकता. वसंतदादा पाटील यांच्या भाषणातील उल्लेख फार महत्वाचा आहे. त्यांनी आपल्या भाषणात पाण्याचे नियोजन आणि वापराच्या पध्दती लक्षात घेता पुढीलप्रमाणे क्रम असेल असे सांगितले होते. पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, विद्युत प्रकल्पासाठी पाणी, जल वाहतुकीसाठी पाणी व शेवटी औद्योगिक व अन्य कारणासाठी पाणी असा क्रम सांगितला. हे सर्व वाचल्यानंतर माझ्यासमोर असा प्रश्न उभा राहतो की, हे सर्व मार्गदर्शन आपल्याला मिळाले तरी आपण आज दुष्काळावर चर्चा करण्यासाठी कशाला उभे आहोत ? या थोर नेत्यांनी आपल्या अनुभवावरुन अवर्षणप्रवण भागात काय करावे हे सांगितले असताना आपण सर्वजण दुष्काळाच्या नावाने टाहो फोडण्यासाठी का उभे आहोत ?

सभापती महोदय, सन 1988 मध्ये वसंतदादा पाटील यांनी पिण्याचा पाण्याचा क्रम सांगितलेला असताना सन 2005 मध्ये विधेयकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे पाणी विकून झाल्यानंतर जल आयोग प्राधिकरण विधेयक आणले त्यावेळी मी ते विधेयक अडविले होते. त्या संदर्भात दादा आपल्या बरोबर पाच-सहा बैठका झाल्या. शेवटी आपण स्वत: आणि माननीय मुख्यमंत्री यांनी माननीय सभापतींच्या दालनात सांगितले की, रावतेजी आपण यापुढे पिण्याच्या पाण्याला पहिले प्राधान्य, शेतीसाठी दुसरे प्राधान्य आणि उद्योगासाठी तिसरे प्राधान्य असा क्रम लावलेला आहे. द्रष्टे नेतृत्व असलेले वसंतदादा पाटील यांनी 1988 मध्ये हा क्रम सांगितला होता. पश्चिम महाराष्ट्रातून राज्याला करण्यात आलेले मार्गदर्शन डावलण्यात आले आणि सन 2005 मध्ये आणलेल्या विधेयकाच्या निमित्ताने शेतकऱ्यांचे सर्व पाणी विकून झाले. या विधेयकाच्या अनुषंगाने दादा आपण खूप बैठका घेतल्या. त्यावेळी श्री.नितिन गडकरी उपस्थित असायचे. परंतु विधेयक मंजूर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

झाल्यानंतर अजूनही त्या संदर्भात नियम झालेले नाहीत. एकदा विधेयक मंजूर झाल्यानंतर नियम बनविण्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या प्रमुखांची असते.

सभापती महोदय, या सभागृहात डीम्ड कन्व्हेयन्सचे विधेयक आले त्यावेळी मी विरोध केला होता. परंतु ते मंजूर करण्यात आले. नंतर त्या संदर्भातील नियम झाले की नाहीत हे पाहण्यासाठी तीन-तीन विभागांच्या सचिवांकडे मी स्वत: गेलो होतो. डीम्ड कन्व्हेयन्स संदर्भातील नियम केव्हा करणार आहात हे त्यांना सारखे विचारत होतो. परंतु त्यासाठी दोन वर्षे लागली. परंतु पाण्याचा क्रम ठरविण्या संदर्भात नियम अजून झालेले नाहीत. आपण जर नियम केले नसतील तर मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या संदर्भात संबंधित विभागाच्या प्रमुखांवर म्हणजे सचिवांवर आम्ही हक्कभंग दाखल करणार आहोत. कायदा केल्यानंतर सुध्दा शेतकरी वंचित राहणार असेल तर त्याची सर्व जबाबदारी सचिवाची असल्यामुळे तो हक्कभंग आपणास स्वीकारावा लागेल आणि त्या संदर्भात सचिवाला जाब द्यावा लागेल. या महाराष्ट्रामध्ये विधिमंडळ सर्वश्रेष्ठ असताना त्याची अशाप्रकारे थट्टा होणार असेल तर ती आम्ही का सहन करायची हा प्रश्न आहे. म्हणून त्या संदर्भातील नियम झाले नसतील तर त्याची जबाबदारी सचिवांची आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

महोदय, पाण्याला पैसा लागतो हे त्या वेळी आपण सिध्द केले. टेंभू योजनेमध्ये 5 लिफ्ट आहेत. त्या 5 लिफ्टमधून पाणी चढवावयाचे असल्यास शेतकऱ्यांना प्रती एकर वा हेक्टर 7 लाख रुपये खर्च येणार आहे. हा खर्च खरोखरच शेतकऱ्यांना परवडेल काय ?

महोदय, जालना येथील पाण्याचा प्रश्न मी गेल्या 15-20 वर्षांपासून पाहत आहे. पूर्वी त्या शहराला 8 दिवसातून एकदा आणि नंतर 15 दिवसांतून एकदा पाणी मिळत होते. परंतु आता त्या शहराला महिन्यातून एकदाच पाणी मिळते. माननीय मंत्री प्रा.ढोबळे साहेब, सरकारने जालना शहराला जायकवाडी धरणातून पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आणि पाईपलाईन टाकली. परंतु आज विजेच्या बिलामध्ये तो प्रश्न अडकला आहे. तेथील स्थानिक आमदार उपोषणाला बसले आहेत. मी वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असताना सूचना केल्या होत्या आणि तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. महोदय, विधिमंडळातील एक स्थानिक आमदार पाण्याच्या प्रश्नी उपोषणास बसत असेल आणि 18 तारखेला आम्ही सर्व राजीनामे देऊ असे जाहीर करीत असेल तर, त्या भागातील लोकप्रतिनिधी वा जनतेची संवेदना आपण लक्षात घेणार आहात की नाही ?

महोदय, दुष्काळाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या निधीचा वापर टेंभू, ताकारी, म्हैसाळ या योजनांची विजेची बिले अदा करण्यासाठी केला असेल तर त्यास माझा आक्षेप नाही. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील योजनांवर तो पैसा वापरला असेल. मग तोच न्याय जालना, मराठवाड्यातील योजनांच्या वीज बिलांसाठी का लावला जात नाही. त्या योजना जुन्या आहेत म्हणून पैसा वापरला जात नसेल तर योग्य नाही. शासन मराठवाड्याकडे दु:शासन प्रवृत्तीने पाहत आहे असे मला वाटते. टेंभू, ताकारी, म्हैसाळ योजनांसाठी पैसे दिले असतील तर आम्ही त्याचे स्वागत करतो. परंतु त्याच धर्तीवर जालन्याला पैसे दिले जावेत असा आमचा आणि मराठवाड्याचा आग्रह आहे. महोदय, मला राज्यातील सर्व शहरांची माहिती आहे.

श्री.अजित पवार : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, मी अर्ध्या तासापूर्वीच जाहीर केले आहे की, जालना येथील पिण्याच्या पाण्याच्या विजेचे कनेक्शन जोडले जाईल.

श्री.दिवाकर रावते : धन्यवाद. महोदय, 'सकाळ' या वर्तमानपत्रात दि.9मार्च रोजी पाण्याच्या प्रश्नाच्या बाबतीत सुंदर लेख आलेला आहे. त्या अंकामध्ये पाण्याची किंमत कशी असते हे नमूद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

केले आहे. मटण, भात, बटाटा, वांगी इत्यादी भाज्यांसाठी किती पाणी लागते, किती किंमतीचे पाणी लागते आणि पाण्याचे व्यवस्थापन कसे होते या बाबत त्या लेखामध्ये सुंदर वर्णन केले आहे. मी खरोखरच लेख लिहीणाऱ्यांना धन्यवाद देतो. पाणी वापराच्या संदर्भात सर्व सामान्यांचे ज्ञानार्जन झाले तर सर्व लोक असे लेख वाचतील.

महोदय, पाणी ही आर्थिक व्यवस्था आहे. वस्तुला जसे पैसे पडतात तसेच पाण्यासाठी पडतात. टेंभू, म्हैसाळ या योजनेच्या लिफ्टमधून एक एकर वा हेक्टरसाठी पाणी घेण्यासाठी 7 लाख रुपये खर्च येणार आहे. मराठवाड्यातील पाणी 5 लिफ्टच्या माध्यमातून बुलढाण्याला गेले. पण त्या लिफ्टची 15 वर्षांपासून पाहणीच होत नाही. लिफ्टने पाणी नेऊन आणि विजेचा वापर करुन ते पाणी कसे परवडणार ?

महोदय, मी दुष्काळाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला. कृपया आपण वाईट वाटून घेऊ नका. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांनी तर अजिबात वाटून घेऊ नये.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

दु:ख संत्रावाल्यांचे सुध्दा आहे. दु:ख मोसंबीवाल्याचे सुध्दा आहे. सर्वात जास्त पाणी घेणारे पीक ऊस आहे. ऊसाला 80 टक्के पाणी लागते आणि 20 टक्के पाण्यात संपूर्ण महाराष्ट्रातील इतर शेती पिकते ही परिस्थिती आहे. ऊसाला किती पाणी घ्यावे याचे नियोजन आम्ही केले आहे का ? ऊसाच्या राक्षसी कारखान्याचे खूळ या महाराष्ट्रामध्ये आले आहे. आज जो उठतो तो कारखाना काढतो. आता खाजगी कारखाने उभे राहू लागले आहेत. मी गडहिंग्लजमध्ये असताना ऊसाची परिस्थिती पाहिली. उभा राहिलेला ऊस बघून डोळ्याचे पारणे फिटले. पण अजून 2 लाख टन ऊस गाळपाला गेला नाही म्हणून डोळ्यामध्ये खेद व्यक्त झाला. पिकाचा आनंद मानावयाचा की भविष्यामध्ये त्याच्या होणाऱ्या उद्ध्वस्तेचा खेद मानावयाचा ? हे सर्व मी अनुभवून आलो. एवढ्या मोठ्या प्रमाणावर ऊस निर्माण केला आहे.

सभापती महोदय, आपण इस्त्रायलचे वगैरे नाव घेतो. ते तंत्रज्ञानामध्ये पुढे गेलेले आहेत. ऊसाचा थोडा अभ्यास केला तर असे दिसते की, जगाच्या पाठीवर इतर देशांमध्ये ठिबक आणि कमी सिंचनातून मिळणारे ऊसाचे उत्पादन एकरी 125 ते 150 टन आहे. आमच्याकडे एकरी 20-25 टन ऊसाचे उत्पादन येते. कापसाचेही तसेच आहे. चीन, अमेरिका या देशांमध्ये कापसाचे उत्पादन एकरी 25 ते 30 क्विंटल होते. आपल्याकडे एकरी 7 ते 10 क्विंटल कापसाचे उत्पादन होते. ही परिस्थिती आपल्याकडे आहे. 'अती घाई विनाशाकडे नेई' तसे 'अती पाणी उत्पादन कमी' अशी परिस्थिती ऊसाच्या बाबतीत आहे. दुसऱ्याचे पाणी घेऊन, इतरांना वंचित ठेऊन निर्माण झालेले पाणी ऊसाकरिता वापरता. पण आपण जर बाणेदार उत्पादन घेऊ शकत नसाल तर आपले कर्म फुटले असेच म्हणावे लागते. दुष्काळाबाबत बोलत असताना या दुष्काळामध्ये नियोजनाच्या निर्माण झालेल्या ज्या कथा आणि व्यथा आहेत त्याकडे कोण बघणार आहे ?

सभापती महोदय, 75 टक्के राज्यकर्ते समोर बसलेले आहेत. बँकांचे वगैरे अधिकारी समजू शकतो पण यांना कारखानाच पाहिजे. यांना कारखानदारच व्हावयाचे आहे. उद्या सहकाराचे विधेयक येणार आहे त्यावेळी याबाबत बोलता येईल पण यांना कारखानेच पाहिजेत. आमच्याकडे एक निष्ठावंत कडवट आमदार होते. ते माझ्या घरी आल्यानंतर घरच्यासारखे जेवायला वगैरे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

बसावयाचे. माझ्या पत्नीला बहीण मानायचे. ते म्हणाले, मी राष्ट्रवादीमध्ये जात आहे. कारण विचारले तर ते म्हणाले की, साहेब आपली सत्ता गेली, मला माझा कारखाना वाचवावयाचा आहे. अजूनही त्यांचा कारखाना माजलगावमध्ये उभा राहिलेला नाही. राज्यकर्त्यांना साखर कारखान्याचा हव्यास आहे. शेतकऱ्यांना ऊस उत्पन्नाकडे वळवित आहेत. त्यामुळे पाण्याचा प्रचंड वापर होत आहे. त्यामुळे पाण्याची वाट लागलेली आहे.

भीमा-कृष्णा उद्धरीकरण प्रकल्पाबद्दल मी या सभागृहामध्ये बोललो आहे. त्या ठिकाणी टनेलमधून येणारे पाणी किती वेगाने येणार आहे हेही आपल्याला माहीत आहे. प्रति तास 80 किलोमीटर वेगाने म्हणजे गाडीच्या वेगाने टनेलमधून पाणी कोल्हापूरवरुन सुटेल आणि बारामतीकरिता थेट उजनीमध्ये येणार. ते काम यशस्वी झाल्यानंतर त्या ठिकाणी बारमाही कारखाने चालतील. 200 नवीन कारखाने काढण्याचे सामर्थ्य त्या पाण्यामध्ये असेल. आपण कोठे चाललो आहोत ? दादा, नुसता उजनीचा एक विषय घेतला तर आपल्याला पाणी नाही म्हणून खुलासे करता करता नाकी नऊ येत आहेत. पाणी कोठे द्यावयाचे, कसे द्यावयाचे हा प्रश्न आहे. कारण तुम्ही उजनीची पाणीचोरी पकडली. 200 शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले, ते गुन्हे काढून टाका. शेतकऱ्यांनी नाईलाजाने आपले पीक जगविण्याकरिता चोरी केलेली आहे. कोणाच्या घरावर दरोडा घालून सोने लुटण्याचे काम त्यांनी केलेले नाही. माझ्या शेताची माती होत आहे म्हणून मी पाणी चोरले. त्यांनी चुकीचे केले. आपण त्यांचे पाणी बंद केले आहे. त्यांच्यावर जे गुन्हे दाखल केले ते काढून टाकावेत आणि त्यांना सांगावे की, परत असे पाणी चोरु नका. त्यांना जाणीव करुन दिली पाहिजे की, त्यांचा तहानलेला गळा ओला होत नाही तोपर्यंत तुझी शेती ओली करता येणार नाही.

हा निर्णय आपण पुण्याच्या संदर्भात घेतला होता आणि तो सभागृहासमोर मांडला होता. आपण जाहीर घोषणा केलेली मला आठवते. आपण असे म्हटले होते की, वेळ पडल्यास मराठवाड्याला खडकवासल्याचे पाणी सोडीन. 20-25 दिवसांपूर्वीची तुमची घोषणा आहे. ही राज्यकर्त्यांची कृतिशीलता दाखविणारी गोष्ट आहे. दिले की नाही हा नंतरचा भाग आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तिकडच्या लोकांना असे वाटते की, आम्हाला आधार मिळाला आहे. आपल्यासाठी कोठून तरी पाणी येईल, कसे तरी मिळेल. संकटात सापडलेल्या माणसांना जगण्याची उमेद देणे हे मोलाचे असते, महत्वाचे असते.

माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या एका वाक्याने तेथील लोकांना असे वाटले की, नगर जिल्ह्याचे नेते दादागिरी करीत आहेत. पाणी देणार नाही असे कसे बोलतात ? श्री.बाळासाहेब विखे-पाटील हे खासदार आहेत. त्यांनी सत्ताधाऱ्यांना दम देऊन सांगितले की, आमच्या भागातील पाणी देणार नाही. आमच्याकडील पाणी नेल्यावर आमची शेती वाया जाईल, त्यामुळे पिण्यासाठी पाणी देणार नाही. माननीय उप मुख्यमंत्र्यांना एवढेच वाटत असेल तर त्यांनी पुण्यातून त्या भागाला पाणी द्यावे. अशाप्रकारे ते जाहीरपणे बोलले आहेत. म्हणजे काय वाद चालले आहेत ? श्री.बाळासाहेब विखे-पाटील हे या राज्याचे खासदार असल्यामुळे देशाचे मंत्री होते. देशाचे मंत्री झालेले व्यक्तिमत्व आपल्या गल्लीतील मूठभर पाण्याकरिता अशा प्रकारे राज्य सरकारला आव्हान करणार असेल तर त्यांची औकादच गल्लीत राहण्याची आहे. आम्ही तुम्हाला कशासाठी मोठे केले ? आमच्या मराठवाड्यातील शेतकरी पाण्यासाठी ठणाणा बोंबलत असतो त्यावेळी आम्हाला असा प्रश्न पडतो. आम्हाला वाईट वाटते.

त्याचप्रमाणे सन्माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे या महाराष्ट्राचे कृषी मंत्री आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यांची व्यथा त्यांच्या प्रत्येक निर्णयातून व्यक्त झाली पाहिजे. त्यांच्या निर्णय क्षमतेमुळे त्यांना जगावेसे वाटले पाहिजे. याद राखा तुम्ही पाणी सोडले तर मी राजीनामा देईन असे माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जाहीरपणे सांगितले. माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळात कशासाठी ठेवले आहे ? मराठवाड्यातील शेतकऱ्यांची कुचंबणा करणारे मंत्री मंत्रिमंडळात राहतात कसे ? ते जाहीरपणे दमबाजी करतात. त्याबद्दल त्यांना कोणीही जाब विचारला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि उप मुख्यमंत्र्यांनीही त्यांना जाब विचारला नाही. मंत्रिमंडळानेही त्यांना जाब विचारला नाही. या महाराष्ट्राचे ते मंत्री आहेत. तरीही ते अशा प्रकारचे वक्तव्य करतात. त्यांनी खतासंबंधी जो निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते...

मी कोणाचे नाव घेत नाही. एका ज्येष्ठ मंत्र्यांचे एक मित्र आहेत. त्यांचे महिकोचे लायसन्स बेकायदेशीरपणे रद्द करण्यात आले. आम्हाला माहीत नसते असे नाही. पण आम्ही अशा वादात पडत नाही. म्हणजे मंत्र्यांच्या मनात आले तर बी-बियाण्याचे लायसन्स रद्द करणार. का ? तर माझा विजेचा परवाना रद्द केला म्हणून मी त्यांचे बी-बियाण्यांचे लायसन्स रद्द करणार. हे कसले हेवेदावे चालू आहेत ? हे भांडण तुमच्यातील असेल पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना तुम्ही अशा प्रकारे मारणार ? अशा प्रकारे जाहीरपणे बोलून राज्यातील दुष्काळ कसा संपणार, कोणत्या दुष्काळाला तोंड दिले जात आहे ?

संभाजीनगरचे पालक मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्याबद्दल मला आदर आहे. ते उत्कृष्ट काम करणारे आहेत. पण आपल्या भागातील शेतकऱ्यांसाठी त्यांची लाही कशी होते ते पाहत आहोत. मी त्यावेळी मराठवाड्यात होतो. ते सप्टेंबरमध्ये असे म्हणाले की, परतीचा पाऊस आला तर तुम्हाला पाणी देऊ. ते राज्याचे महसूल मंत्री आहेत. महसूल मंत्री म्हणजे मंत्रिमंडळातील क्रमांक दोनचे मंत्री आहेत. त्यांना ग्रामीण भागातील गावकुसातील लोकांची सुध्दा काळजी असावयास पाहिजे. मी त्यांना परतीचा पाऊस आला नाही तर तुम्ही मंत्रिमंडळातून बाहेर जाणार का असा जाहीर सवाल विचारला होता. या तुमच्या अशा प्रवृत्या आहेत ? माझा शासनाला असा प्रश्न आहे की, येथे दुष्काळासंबंधी चर्चा करु, आपण सर्वजण व्यथा मांडू पण जनतेशी द्रोह करणारे मंत्री मंत्रिमंडळात राहतात कसे ? या प्रश्नाचे उत्तर मला सरकारने दिले पाहिजे. शेतकऱ्यांची टिंगलटवाळी चालली आहे ती आम्ही सहन करु शकत नाही.

सभापती महोदय, मी थोडेसे विषयांतर करतो. काल सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी बरोबर जखमेवर बोट ठेवले होते. सोलापूरमध्ये प्रचंड ऊसाचे पीक आहे, तेथील ऊसाचे कारखाने व्यवस्थित सुरु आहेत. मग तेथे दुष्काळ कसा ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता. सांगली जिल्ह्याबाबतही प्रश्न उपस्थित केला. तेथील काही तालुक्यांमध्ये दुष्काळ आहे तो आम्ही व अनेक सन्माननीय सदस्यांनी पाहिलेला आहे. त्यांचे असे म्हणणे होते की, शासनाने आतापर्यंत 420 चारा छावण्या उघडल्या आहेत. त्यापैकी 22 छावण्या मराठवाड्यात आहेत. हा विषय कालपासून सभागृहात उपस्थित केला जात आहे.

यानंतर श्री.शिगम....

अधोषित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

बाकीच्या सर्व छावण्या नगर, सोलापूर जिल्हयात आहेत. 30 एकर, 50 एकर शेती असलेल्या शेतक-यांची जनावरे देखील त्या छावण्यामध्ये आहेत. हे काय चालले आहे ? भ्रष्टाचार हा वेगळा विषय आहे. परंतु चारा छावण्या हा एक मोठा भ्रष्टाचार आहे.

सभापती महोदय, मी ऊसासंबंधीचा मुद्दा येथे मांडतो. ऊस उत्पादनासाठी हेक्टरी 80 टक्के पाणी दिलेले आहे. एक हेक्टर ऊसाला जेवढे पाणी लागते तेवढया पाण्यामध्ये 16 हेक्टर हरभरा, 6 हेक्टर गहू आणि 10 हेक्टर कापसाचे पिक घेता येते. ऊसासाठी जो पाण्याचा अपव्यय होत आहे तो कमी केला तर इतर पिकांना जीवदान मिळेल. बाहेरील देशातून 90 टक्के तेलाची आयात करावी लागते. शेतक-यांना तेलबियांचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले तर त्यांना ऊसापेक्षा जास्त पैसे मिळतील आणि पाणी देखील कमी लागेल. शेतक-याला सुबत्ता प्राप्त होईल आणि पाण्याची देखील बचत होईल. ऊसाच्या बाबतीत सांगायचे तर ऊसापासून आपण साखरेचे उत्पादन करतो आणि ती साखर देशात न विकता जास्त पैसे मिळतात म्हणून परदेशात निर्यात करतो. महाराष्ट्राचे पाणी साखरेच्या रुपाने परदेशात पाठवितो. आज महाराष्ट्रात पिण्यासाठी पाणी नाही. परदेशामध्ये साखर नाही तर महाराष्ट्राचे पाणी विकले जात आहे.

सभापती महोदय, संभाजीनगरमध्ये जागतिक भूजल परिषद झाली होती. त्या परिषदेमध्ये आपल्या डोळयात अंजन घालण्यात आले. गेल्या 50 वर्षात आपण 3 कोटी कूपनलिका खोदल्या. जे पाणी भूगर्भामध्ये 1700 वर्षे टिकले असते ते पाणी आपण आताच वापरुन टाकले आहे. म्हणजे आपण पुढच्या वर्षी देखील दुष्काळ पडणार हे निश्चित करुन टाकले. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी भूगर्भात पाणी साठण्याचे प्रमाण सांगितले. सभापती महोदय, मी स्वत: जलभरणाचे कार्यक्रम राबविले. दुष्काळ पडला म्हणून मी मोर्चे काढून रस्ते अडविले नाहीत. विदर्भातील वाशिम, अमरावती या भागामध्ये जलभरणाचा कार्यक्रम मी माझ्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन राबविला. 30 वर्षात जी विहीर कधी आटली नव्हती ती आटल्या नंतर तेथे जलभरण केले. असे जलभरणाचे कार्यक्रम आपण राबविणार आहात काय ? सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे भूगर्भामध्ये 80 ते 100 फूट पाणी साठण्याकरिता 5 वर्षे लागतात, अणि 140 फुटापर्यंन्त पाणी साठण्यासाठी अनेक वर्षे लागतात. भूगर्भातील पाण्याचा उपसा आपण केव्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. दिवाकर रावते....

थांबविणार हा खरा प्रश्न आहे. बैलमोटेने 15 दिवसात जेवढया पाण्याचा उपसा होतो तेवढ्या पाण्याचा उपसा एका दिवसामध्ये एका पंपाने होतो.

सभापती महोदय, मी दुष्काळामुळे झालेल्या आत्महत्येचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. राज्यात कर्जामुळे शेतक-याच्या आत्महत्या होतात. परंतु काल सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील रेवळनाथ गावातील आनंद शिंदे या शेतक-याने दिनांक 26.2.2013 रोजी रात्री 8.30 वाजता आपल्या घरासमोर दुष्काळामुळे गळफास लावून आत्महत्या केली. या आनंद शिंदे यांची 45 एकरात एक नंबरची मोसंबीची बाग होती.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्या कुटुंबावर स्टेट बँक ऑफ इंडियाचे 4 लाख रुपयांचे कर्ज होते. फळबाग जळाली म्हणून तीन वर्ष हे कुटुंब कर्ज फेडू शकले नाही. बँकेच्या कर्जाचे व्याज वाढले. बँकेने त्यांना कर्ज भरा म्हणून अनेक वेळा नोटीसा पाठविल्या. ते कर्ज फेडू शकत नाही म्हणून बँकेने त्यांच्यावर न्यायालयात खटला दाखल केला. त्या कुटुंबातील दोन्ही भावांनी लिहून दिले की, आम्हाला बँकेने जमीन विकण्यास परवानगी द्यावी. जमीन विकतो आणि कर्ज फेडतो अशी त्यांनी बँकेकडे विनंती केली. परंतु या बाबतीत निर्णय झाला नाही.

महोदय, आत्महत्या करण्याच्या आठ दिवसापूर्वी बँकेत जाऊन जमीन विकण्यास परवानगी द्यावी अशा प्रकारचा अर्ज सादर केला. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे वडील सैनिकात सुभेदार होते. ते मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांच्या पत्नीस 10 हजार रुपये दरमहा पेन्शन मिळत होती. त्या 10 हजार रुपये पेन्शनवर त्यांचे कुटुंब चालले होते. बँकेच्या मॅनेजरने कर्ज वसुली करिता पेन्शनवर होल्ड लावली. मला सरकारकडून एका प्रश्नाचे उत्तर अपेक्षित आहे की, सरकारने दुष्काळग्रस्त भागामध्ये कर्ज वसुलीस स्थगिती दिली आहे. सदर बँकेच्या मॅनेजरने पेन्शनला होल्ड लावल्यानंतर म्हातारी आई व मुले 11 वाजेपासून दुपारी 4 वाजेपर्यंत स्वत:ची पेन्शन मिळावी म्हणून बँकेकडे भीक मागू लागले. परंतु त्यांना पेन्शन दिली गेली नाही. त्या कुटुंबातील एका शेतकरी भावाने आत्महत्या केली. त्यानंतर दोन दिवसांनी त्या बँकेच्या मॅनेजरने पेन्शनवरील होल्ड उठविली आणि तो पळून गेला.

मी त्या ठिकाणी भेट दिली. त्या बँकेत गेलो. पोलीस स्टेशनला गेलो. या घटनेच्या बाबतीत पुरावे देऊनही गुन्हा दाखल करण्यास पोलीस अधिकारी तयार नाही. म्हणून मी माननीय गृहमंत्र्यांची भेट घेतली. पोलीस स्टेशनचा साधा इन्स्पेक्टर गुन्हा दाखल करुन घेण्यास तयार नाहीत असे त्यांना सांगितले. आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे अशा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यास तेथील पोलीस अधिकारी तयार नाहीत. सदर आत्महत्येच्या बाबतीत पुरावे घेऊन जिल्हाधिकारी यांची भेट घेतली, त्यांना सांगितले की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयास 1 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयास लवकरात लवकर आर्थिक मदत करतो असे जिल्हाधिकाऱ्यांनी मला सांगितले.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

महोदय, सदर बँकेच्या मॅनेजरने आता अटकपूर्व जामीन घेतलेला आहे. तो मॅनेजर मुंबईला पळून गेला. मी त्याच्याशी दूरध्वनीवरुन बोललो. त्यावेळी त्यांना विचारणा केली
की, कर्ज वसुलीस सरकारकडून स्थगिती आदेश देण्यात आले आहेत. ते स्थगिती आदेश आपणास प्राप्त झाले आहेत काय, तर त्या बाबतीत त्यांनी मला सांगितले की, कर्ज वसुली करु नये अशा प्रकारचे सरकारचे आदेश बँकेला प्राप्त झालेले आहेत. ही जी आत्महत्या झाली त्यास बँकेचा मॅनेजर पूर्णपणे जबाबदार आहे. त्यास नुकताच अटकपूर्व जामीन मिळालेला आहे. मॅनेजर आणि बँकेतील इतर अधिकारी त्या कुटुंबाकडे जात आहेत, खटला मागे घ्यावा अशी विनंती करीत आहेत. आम्ही नुकसान भरपाई देण्यास तयार आहोत असे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे.

सभापती महोदय, या दुष्काळी परिस्थितीत तीन आत्महत्या झाल्या आहेत. मी दोन ठिकाणी जाऊन आलो. जालना येथे मी गेलो नाही. तेथे सुध्दा एका शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. दुसरी आत्महत्या पुन्हा सांगली जिल्हयातील जत येथे झाली. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव श्री.विजयकुमार खैनअप्पा असून त्याचे वय 26 एवढे होते. त्याची तीन एकर द्राक्ष बाग पाण्याअभावी जळून गेली. तुमच्या विभागातील द्राक्षे नंबर 1 ची आहेत. माननीय श्री.अजितदादा यांनी कर माफ केल्या बरोबर तुम्ही आम्हाला द्राक्षाचे एक-एक पाकीट वाटले होते. हे पाकीट कशाचे आहे हे सन्माननीय सदस्यांना कळले नाही. मी त्यांना सांगितले की, केमिकल नसलेली द्राक्षे फक्त सांगली जिल्हयातच मिळतात. आपण जे द्राक्षाचे पाकीट दिले ते आम्ही घरी घेऊन गेलो. परंतु द्राक्ष पिकविणारा एक शेतकरी मृत्युमुखी पडला. त्या शेतकऱ्यावर बँक ऑफ इंडियाचे 4.50 लाख रुपयांचे कर्ज होते. तसेच सावकारी कर्ज होते. ज्या दिवशी ही आत्महत्या झाली त्या दिवशी सावकारी कायद्या संदर्भात मी बोललो. ही आत्महत्या सावकारी कायद्यामुळे झाली म्हणून मी सावकारी कायद्याच्या अनुषंगाने बोललो. खाजगी सावकाराने पैशाची मागणी केली.

महोदय, मला सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी या आत्महत्येच्या बाबतीत भयानक माहिती दिली आहे. सावकारी कर्ज फेडता येत नाही म्हणून सावकाराने मुलीला गहाण ठेवायला सांगितले. त्या सावकाराकडे आठ महिन्यापासून 13 वर्षाची मुलगी गहाण आहे. तो सावकार त्या मुलीवर अत्याचार करीत आहे. सावकारी बंदी कायदा अस्तित्वात आणला नाही तर त्याचे भयानक परिणाम भविष्यात होतील. ग्रामीण भागात सावकारी कर्ज फेडण्यासाठी बायकोला

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 15:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

गहाण ठेवले जाते, मुलीला गहाण ठेवले जाते असे प्रकार मोठया प्रमाणात होत आहेत. यासंबंधातील  कायदा या राज्यामध्ये लागू करण्यात आला पाहिजे. एक सानंदा कुठे गेला, दुसऱ्याने 20 लाख रुपये दंड भरला. सावकार बंदी विधेयक कशासाठी अडविले हे कळत नाही. सावकारी कर्जाच्या बाबतीत ज्या घटना घडतात, त्या सांगणे देखील कठीण आहे. एका खाजगी सावकाराच्या कर्जामुळे त्या श्ेतकऱ्यांने जाळून घेऊन आत्महत्या केली. त्याला दोन लहान भाऊ आहेत. त्याला एक मुलगी आहे. त्याची पत्नी चिंताग्रस्त अवस्थेत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयास 1 लाख आर्थिक मदत तातडीने करावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

सन्माननीय श्री.प्रकाश सोळंके साहेब आपणाकडे सहकार विभाग आहे. मला आपणाकडून एका प्रश्नाचे उत्तर हवे आहे. माझे आई-वडील किंवा मी स्वत: विमा काढतो.  मी मेल्यानंतर    माझ्या कुटुंबीयांना विम्याची रक्कम मिळाली पाहिजे असा विमा काढण्यामागचा खरा उद्देश आहे. माझे इतर काहीही देणे घेणे असले तरी विम्याची रक्कम माझ्या कुटुंबीयांना मिळाली पाहिजे. शेती पिकाचा विमा काढला जातो. त्याचे आपण सभागृहात कोतूक करतो. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या कर्जाला स्थगिती दिली असेल तर शेतकऱ्यांकडून पीक कर्जाची वसुली होता कामा नये. तुमच्या सांगली जिल्हयासाठी 30 ते 32 कोटी रुपये देण्यात आले. त्यातील 23 कोटी रुपये जत तालुक्यासाठी होते.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ गितेनंतर 15:30

श्री.दिवाकर रावते.........

सगळेच्या सगळे जत तालुक्यातील दुष्काळग्रस्तांच्या खात्यामधून पीक विम्याचे पैसे वळते करुन घेतले. ती रक्कम त्यांना मिळाली असती तर दोन-तीन महिने त्यांना गुजराण करता आली असती. शेतकऱ्यांनी जगायचे कसे असा प्रश्न आहे म्हणून मी मला योग्य वाटतात असे उपाय सांगतो.

सभापती महोदय, शासनाच्या तिजोरीमध्ये पैसे नाही. तरी सुध्दा मंत्र्यांनी एक महिन्याचा पगार दिला. मंत्र्यांची संख्या विचारात घेता 15 ते 20 लाख रुपये जमा होतील, त्यापेक्षा जास्त रक्कम जमा होणार नाही. गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, मला 50 हजार रुपये पगार मिळतो, तो मी दुष्काळ निवारणासाठी शासनाला देणार आहे. सर्व आमदारांचा एक महिन्याचा पगार व भत्ता जमा करण्यात येणार आहे. ती रक्कम साधारणपणे 20 कोटी रुपये होईल. शासन सभागृहापुढे प्रलंबित असलेले अंधश्रध्दा विधेयक मंजूर करण्यास तयार नाही. असे असताना दुष्काळावर मात करण्यासाठी धर्मादाय संस्थांकडून निधीची मागणी केली जात आहे. हा सरकारचा पैसा नाही. लोकांनी श्रध्देने देवदेवतांना दिलेला पैसा आहे. त्या देव देवतांकडून तुम्ही पैसे जमा करणार आहात. कोणत्या अधिकाराने ते पैसे मागत आहात?

सभापती महोदय, सिध्दि विनायक ट्रस्टने सुरुवातीला 5 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले होते. नंतर 25 कोटी रुपये देऊ असे सांगितले. आता त्यांनी स्पष्ट सांगितले की, आम्ही थेट गावामध्ये जाऊन उपाययोजना करणार आहोत. आमचा शासनावर विश्वास नाही. ही सिध्दि विनायक ट्रस्टकडून प्रशासकीय यंत्रणेबाबतची शोकांतिका आहे. शिर्डीच्या साईबाबा संस्थानकडून तुम्ही निधीची मागणी केली आहे. प्रथम त्यांना पाणी द्या. त्यांना पाणी देत नाही मग पैसे कसे मागता? दात कोरुन पोट भरत नसते. हा श्रध्देचा विषय असतो.

सभापती महोदय, दुष्काळ निवारणासाठी 3 हजार कोटी रुपये लागणार आहेत. शासनाच्या तिजोरीमध्ये दमडी नाही. या संदर्भात शासनाने उत्तर दिले पाहिजे. माननीय उप मुख्यमंत्री 20 मार्च रोजी अर्थसंकल्प सादर करणार आहेत. तेव्हा आम्हाला शासनाची भूमिका कळेल. परंतु निधी कुठून उभा करणार याचे ठोस उत्तर दिले पाहिजे. दुष्काळ निर्माण होऊ नये म्हणून कोणत्या उपाययोजना करणार हे सांगितले पाहिजे. ऊस उत्पादकांवर नियंत्रण आणणार का? ऊस उत्पादकांनी पाणी वापरण्याबाबत सिलिंग निर्माण करणार का? ठिबक सिंचनाच्या माध्यमातून ऊस उत्पादन झाले पाहिजे. एक-एक वर्ष विभागून द्या. यामुळे पाण्याचा वापर कमी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ गितेनंतर 15:30

श्री.दिवाकर रावते.........

होईल. पाच वर्षाकरिता महाराष्ट्राचे पाणी वाचविले तर खूप काही होऊ शकते. पीक पेरे बदलायला सुरुवात करावी. शेतकऱ्यांना पाण्याची आवश्यकता तीन वेळा भासते. पेरणीचा हंगाम सुरु होतो, पाऊस कमी पडतो तेव्हा पाणी आवश्यक असते. रब्बीच्या हंगामात आणि उन्हाळ्यामध्ये पाण्याची आवश्यकता असते. याबाबत निश्चित नियोजन कसे करणार आहात हे जाहीर केले पाहिजे.

सभापती महोदय, दुबार पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या नाल्यावर जोड बंधारे बांधावेत. सिमेंट बंधारे बांधण्यात येणार आहेत. परंतु त्यासाठी पाणी कुठून आणणार? प्यायला पाणी उपलब्ध नाही. आदरणीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सांगितले की, जत तालुक्यामध्ये 450 सिमेंट बंधारे बांधून तयार झाले. लोकांना प्यायला पाणी नाही, जनावरांना प्यायला पाणी नाही. असे असताना सिमेंट बंधारे बांधण्यासाठी पाणी कुठून आणणार? म्हणून माझी सूचना आहे की, दगडाचे बंधारे बांधावेत. कृषी विभागाच्या माध्यमातून हे काम केले पाहिजे.

सभापती महोदय, शेततळी आपण निर्माण करतो. गाळ काढण्याबाबत चर्चा झालेली आहे. जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती आणि लोक सहभागातून जल पुनर्भरण कार्यक्रम राबविला तर लोकांना पाण्याची किंमत कळेल. आदरणीय शिवसेना कार्याध्यक्ष श्री.उध्दवजी ठाकरे यांनी दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली पाहिजे अशी मागणी केली आहे. त्याबाबत शासनाने विचार करावा. ज्याप्रमाणे ऊसाबाबत झोनबंदी लागू केली, तशी झोनबंदी कारखान्यांबाबत लागू करणार का? ऊस लावला नाही, पाणी वाचविले तर अनुदान देण्यात यावे. एकरी 5 ते 10 हजार रुपये द्यावेत. यामुळे पाणी वाचेल. डाळिंब, संत्रा बागा वाळल्याचे आपण पाहिले. पुढील दोन ते पाच वर्षाच्या काळात फळधारणा होणार नाही. त्यांना किमान दोन-तीन वर्षे अनुदान देणार का?

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या दुष्काळामध्ये शेतकऱ्यांच्या संत्र्याच्या, डाळींबाच्या बागा जळाल्या आहेत त्यामुळे शेतकरी उभा राहीपर्यंत म्हणजे किमान 4-5 वर्षे तरी आपण त्यांना अनुदान देणार आहात काय ?

सभापती महोदय,चारा छावण्याच्या संदर्भात या ठिकाणी घोषणा झाली असून त्यासंदर्भात आम्हाला माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून काही अपेक्षा आहेत. चारा छावण्यामध्ये ज्यांनी ज्यांनी हात डुबवले आहेत त्यांना आपण तुरुंगात पाठविणार आहात काय असा प्रश्न विचारुन मी आपली रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, या सभागृहात तसेच विधानसभेमध्ये दुष्काळाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे परंतु या चर्चेला रिप्लाय कधी सुरु होणार आहे ?

**उप सभापती** : दुष्काळाच्या संदर्भातील चर्चा आज पूर्ण करावयाची असे ठरले आहे. साधारणत: 5.30 वाजता उत्तराला सुरुवात करण्यात येईल. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना 2-3 मिनिटात मांडाव्यात अशी अपेक्षा आहे. जर सन्माननीय सदस्यांनी नावे कमी केली तर आज ही चर्चा पूर्ण होऊ शकेल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या ठिकाणी बरेचसे सन्माननीय सदस्य हे दुष्काळग्रस्त भागातील असल्यामुळे नावे कमी करण्यास मला अडचण आहे.

**उप सभापती** :ठीक आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेल ) : सभापती महादय, महाराष्ट्रात पडलेल्या गंभीर दुष्काळाच्या प्रश्नाच्या संदर्भात काल पासून या सभागृहात चर्चा सुरु आहे. महाराष्ट्राला दुष्काळ नवीन नाही. गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत वावरतो आहे. या वर्षीचा दुष्काळ 1972 च्या दुष्काळापेक्षाही महाभयंकर आहे असे या ठिकाणी बोलले गेले व ते खरेही आहे. ज्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची दुष्काळ निवारण बैठक झाली होती त्यावेळस या देशाचे कृषी मंत्री माननीय शरद पवार साहेबांनी वक्तव्य केले होते की, "यंदाचा दुष्काळ झोप उडवेल असा राहणार आहे. या दुष्काळाचा सामना करण्यासाठी सर्व पालक मंत्र्यांनी कृती आराखडा तयार करावा, गेल्या 50 वर्षात पाहिला नाही असा यंदाचा दुष्काळ आहे. अनेक दुष्काळ बघितले मात्र पाणी नाही अशी स्थिती यापूर्वी कधीही नव्हती."

सभापती महोदय,माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा वसंतदादा साखर कारखान्याच्या कार्यक्रमात वक्तव्य केले होते की, "यंदा राज्यात भीषण दुष्काळी संकट आहे, या दुष्काळी परिस्थितीचा सामना करतांना यापूर्वी कधीही घेतले नाही एवढे कटू निर्णय घ्यावे लागणार आहेत. राज्यासमोर यंदा दुष्काळ निवारण एवढाच अजेंडा आहे."

सभापती महोदय,1972 पेक्षाही यंदाचा दुष्काळ भयंकर आहे. 1972 साली ज्यावेळेस दुष्काळ पडला होता तेव्हा आम्ही कॉलेजमध्ये शिकत होतो. त्या दुष्काळामध्ये सर्वत्र पाणी उपलब्ध होते. त्यावेळेस नदी, नाले, धरण तसेच विहिरींनाही पाणी होते. त्यावेळेस रोजगार आणि अन्नधान्याचीच टंचाई होती.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, यंदाच्या दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. या दुष्काळाची चाहूल सप्टेंबर महिन्यातच लागली होती. पेरणीच्या वेळी अपुरा पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांची पिके उद्ध्वस्त झालेली आहेत. त्यामुळे दुबार पेरणी झाली. मात्र, परतीचा पाऊस पडला नाही. त्यात विदर्भाचा देखील समावेश होता. राज्यात पडलेल्या दुष्काळावर होत असलेली चर्चा मी काल पासून ऐकत आहे. त्यात फक्त पश्चिम महाराष्ट्रातील 4-5 जिल्ह्यांवरच जास्त चर्चा होत आहे. या चर्चेत मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाचा उल्लेख होत नाही याचे दु:ख आहे.

विदर्भामध्ये बुलढाणा जिल्ह्यात जवळपास 700 गावांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेला आहे. दुष्काळाच्या कार्यक्रमामध्ये राज्य बुलढाणा जिल्ह्याला विसरले आहे अशा प्रकारचे चित्र दिसते. मराठवाड्याची कहाणी आताच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितली आहे. मराठवाड्याला चाऱ्यासाठी फक्त 10 कोटी रूपये दिले आहेत, तर उर्वरित महाराष्ट्रासाठी 500 कोटी रूपये दिले आहेत हे माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर यांचे दुष्काळासंबंधात आयोजित केलेल्या बैठकीतील वक्तव्य आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र यांच्यासाठी वेगवेगळा निधी देत असाल तर ते योग्य नाही.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि माननीय विरोधी पक्ष नेते दुष्काळावर बोलले आहेत. त्यामुळे मी जास्त वेळ घेणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. हा दुष्काळ विचित्र आहे. असा दुष्काळ यापूर्वी कधीच पाहिलेला नाही. विदर्भामध्ये बऱ्यापैकी पिके आली. परंतु, आज विदर्भामध्ये पिण्याचे पाणीच नाही. विदर्भामध्ये पिण्याच्या पाण्याची एवढी टंचाई आहे की, नद्या, नाले, विहिरी कोरड्या पडलेल्या आहेत. बुलढाणा जिल्ह्यात नळगंगा, पैनटाकळी, खडकपूर्णा हे तीन मोठे प्रकल्प आहेत. या तिन्ही प्रकल्पांमध्ये 5.89 द.ल.घ.मी.पाणी साठा शिल्लक आहे. 7 मध्यम प्रकल्प आहेत. यातील पाण्याची पातळी देखील कमी झालेली आहे. त्यामुळे आता कोणत्या गावाला टँकर कसा द्यायचा असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

मी ज्या गावात राहतो त्या गावाची लोकसंख्या दीड लाखाच्या वर आहे. त्या गावाला दहा दहा दिवस पाणी ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

येत नाही. दुष्काळाची चाहूल सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये लागल्यानंतर सुद्धा शासनाने कोणते नियोजन केले आहे ? शासनाने कृती आराखडे तयार केले. श्री.शरद पवार साहेबांनी सांगितल्या प्रमाणे प्रत्येक जिल्ह्याचा 20-25-21 कोटी रूपयांचा कृती आराखडा तयार आहे. कृती आराखडा तयार करून चालणार नाही. दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिववस वाढत चालली आहे. सप्टेंबरमध्ये दुष्काळाची चाहूल लागलेली असताना पाच महिने त्याचे नियोजन झाले नाही. यंत्रणा कामाला लागली नाही. यंत्रणेने जिल्ह्याजिल्ह्यांचा आढावा घेतला नाही. त्यामुळे आता दुष्काळाची तीव्रता प्रचंड जाणवत आहे. आजही आपण जुन्या जी.आर.नुसार काम करीत आहोत. टँकर लावण्याचे अधिकार अजूनही आपण तहसीलदारांना दिलेले नाहीत. तहसीलदार, बीडीओ यांनी टँकरने पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव तयार केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याला मंजुरी द्यायला 4 आठवड्यांचा कालावधी लागतो.

विदर्भामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. मी सुद्धा अनेक गावांमध्ये जाऊन आलेलो आहे. दोन हजार लोकवस्तीच्या गावामध्ये एकच विहीर असते आणि तिला देखील पाणी नसते. टँकर सुरू झाल्यामुळे त्या विहिरीवर पाणी भरण्यासाठी झुंबड उडते, असे दारूण चित्र आम्ही देखील पाहिलेले आहे. परंतु, शासन आणि प्रशासन कोणत्याही परिस्थितीत हलायला तयार नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

कोट्यवधी रुपयांचे आराखडे तयार करुन शेतकऱ्यांना किंवा गरीब माणसाला पाणी मिळणार नाही.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये चाऱ्याच्या छावण्या सुरु झाल्या. लाखो जनावरे त्या छावण्यांमध्ये आहेत. आज विदर्भामध्ये छावणीची आवश्यकता नाही. विदर्भामध्ये पिण्याचे पाणी दिले तरी विदर्भातील माणूस सुखावणार आहे. परंतु विदर्भाला साधे पिण्याचे पाणी मिळू शकत नाही हे आमचे दु:ख आहे.

सभापती महोदय, शासनाने आराखडे तयार केले. महाराष्ट्रामध्ये 12 हजार गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असताना शासनाने दुष्काळ जाहीर केलेला नाही. शासनाने टंचाईग्रस्त परिस्थिती जाहीर केली. परंतु दुष्काळ जाहीर केला नाही. तेव्हा माझी मागणी आहे की, एवढी गंभीर परिस्थिती असेल तर शासनाने प्रथम दुष्काळ घोषित केला पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती पाहून राज्य सरकारने केंद्र सरकारकडे 2200 कोटी रुपयांची मागणी केली त्यापैकी फक्त 778 कोटी रुपये केंद्र सरकारने मंजूर केले. पुढील चार महिन्याचा काळ आपण कसा घालविणार आहोत ? 778 कोटी रुपयांपैकी 563.29 कोटी रुपये शेतीसाठी, 91.29 कोटी रुपये फलोत्पादनासाठी, 72.88 कोटी रुपये पशुसंवर्धनासाठी आणि 50.63 कोटी रुपये पाणी पुरवठ्यासाठी दिले. आपणास तीन हजार कोटी रुपयांची गरज होती त्यापैकी फक्त 778 कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळाले. एवढ्या छोट्या रकमेमध्ये आपण दुष्काळाशी कसा सामना करणार आहोत, या राज्यातील जनतेला कसे पाणी देणार आहोत ? 12 हजार गावांना पाणी द्यायचे आहे आणि आपल्याला कमी निधी मिळालेला असताना त्याचे नियोजन कसे करणार आहात हे या ठिकाणी सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, दुष्काळ दाबण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे. संपूर्ण बुलढाणा जिल्हा दुष्काळाने होरपळत असताना महसूल विभागाने तेथे आणेवारी जास्त दाखवून त्या भागातील दुष्काळ दडपून टाकला. मी या ठिकाणी जाणीवपूर्वक आरोप करतो की, जिल्हाधिकाऱ्यांनी पटवाऱ्यांना 50 पैशाच्या आत आणेवारी काढू नका असे आदेश दिले. मला असे अनेक पटवाऱ्यांनी ही बाब सांगितली. 50 पैशाच्या वर आणेवारी दाखवा असा आदेश देणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यावर शासन काय कारवाई करणार आहे हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. दादा, ही सत्य परिस्थिती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आहे. मराठवाड्याला लागून बुलढाणा जिल्हा आहे. बुलढाणा जिल्हा जास्त प्रमाणात दुष्काळात होरपळत नाही परंतु 50 टक्केपेक्षा कमी पाऊस झालेले अनेक तालुके असताना जिल्हाधिकाऱ्यांनी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी काढू नका अशा प्रकारचे आदेश दिले.

सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्याला लागूनच मराठवाडा असल्यामुळे मी त्या ठिकाणच्या काही भागात जाऊन आलो. मराठवाड्याचे वर्णन करायचे असेल तर मी असे म्हणेन की, नदी-नाले कोरडे पडले, पाण्याअभावी उभे पीक डोळ्यासमोर जळून गेले. गाव ओस पडू लागले. गोठे सुन्न झाले. मराठवाड्यातील 3299 गावांतील आणेवारी 50 पैशांपेक्षा कमी आली. हंडाभर पाणी मिळण्यासाठी लोक जीव धोक्यात घालत आहेत. पहावे तिकडे जळलेले शेत दिसत आहे. शेतात काही पिकले नाही. कपाशी, मका, तूर, ज्वारी अशी कोणतीही पिके आली नाहीत. धरणातील पाणी कोठे गेले ? हे अस्मानी संकट नसून सुलतानी संकट आहे. 1100 बंधाऱ्यावरील 250 कोटी रुपयांचा खर्च पाण्यात गेला. मुला-मुलींची लग्ने कशी करावी हा प्रश्न सतावत आहे. 3200 कोटी रुपयांची मागणी असताना फक्त 778 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली. सध्या गरज आहे चारा आणि पाण्याची. राज्यात दुष्काळाची छाया गडद होत चालली आहे. जवळपास सव्वासहा हजार गावांना दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. पिण्याच्या पाण्याबरोबर चारा टंचाईचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. गावे ओस पडत आहेत. गोठे सुन्न होत चालले आहेत. लोकांवर स्थलांतर करण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, माझ्या हातामध्ये चित्रलेखा या साप्ताहिकाचा अंक आहे. त्यामध्ये उल्लेख आहे की, धामणगाव सर्कलमध्ये सुमारे 25 हजार लोकांनी गाव सोडून मोठ्या शहराचा रस्ता धरलेला आहे. हे लोक बीड आणि औरंगाबाद येथे स्थलांतरित झाले. सुमारे 300 ते 400 लग्ने पुढे ढकलली आहेत. परळी येथील औष्णिक विद्युत केंद्र पाणी नसल्यामुळे 32 वर्षात पहिल्यांदा बंद पडलेले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित... 15:50

श्री.पांडुरंग फुंडकर...

आणि वीज पुरवठ्यामध्ये 19,930 मे.वॅ. घट निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत या राज्याचे कसे होणार आहे ? सरकारने 778 कोटी रुपयांची तुटपुंजी व्यवस्था केली आहे. इतक्या अपुऱ्या रकमेत दुष्काळाचा सामना कसा केला जाणार आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पाणी नसल्यामुळे विद्युत प्रकल्प चालणार नाहीत, त्यामुळे विजेचे उत्पादन कमी होईल आणि भारनियमन करावे लागेल. परिणामी ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना बंद होतील आणि तेथील जनता पाण्यापासून वंचित राहील.

महोदय, शासनाने 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावातील योजनांचा वीज पुरवडा खंडित होऊ नये म्हणून ज्या ग्रामपंचायती चालू वीज देयकाच्या 33 टक्के रक्कम भरतील त्यांची उर्वरित 67 टक्के रक्कम शासन भरेल असा निर्णय घेतला आहे. परंतु 33 टक्के रक्कम भरण्याची ताकद सुध्दा ग्रामपंचायतीमध्ये नाही. वीज बिल न भरल्यामुळे आणि भारनियमनामुळे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजना बंद होण्याच्या मार्गावर आहेत. वीज या चर्चेच्या निमित्ताने बिल न भरल्यामुळे ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना बंद होणार नाहीत असा शब्द राज्यातील जनतेला सरकारच्या माध्यमातून द्यावा लागणार आहे. या योजनांचे वीज कनेक्शन कट झाले तर त्या चालणार नाहीत. त्या ठिकाणी थोडे का होईना पाणी आहे. परंतु त्या योजनांचे वीज कनेक्शन कट केले तर असलेले पाणी उपसले जाणार नाही, परिणामी ते पाणी जनतेपर्यंत पोहोचणार नाही.

महोदय, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत मी बोलत होतो. मराठवाड्यामध्ये नदी-नाले कोरडे पडले आहेत, विहिरींनी तळ गाठला आहे, हातपंप केवळ नावालाच उरले आहेत, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, दुष्काळामुळे संपूर्ण जनता हैराण झाली आहे. राज्यात दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. टँकरने करण्यात येत असलेला पाणी पुरवठा पुरेसा नाही असे चित्र मी मराठवाड्यात स्वत: बघितले आहे.

महोदय, माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व रामदास कदम यांनी दुष्काळी भागातील जनतेच्या कथा-व्यथा सांगितल्या. त्या पुन्हा सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. दुष्काळाचा सामना करण्यासाठी 3-4 हजार कोटी रुपये लागणार आहेत. परंतु राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केवळ 2200 कोटी रुपयांची मागणी केली आणि केंद्राने केवळ

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

778 कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम अपुरी आहे. अजून राज्याचा अर्थसंकल्प सादर व्हायचा आहे. अपुऱ्या तरतुदीमध्ये राज्य सरकार या दुष्काळाचा सामना कशा पध्दतीने करणार आहे हेच माझ्या लक्षात येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, केंद्राकडून 1200 कोटी रुपये मिळाले असले तरी त्यातून दुष्काळाचा सामना करता येणार नाही. अशा परिस्थितीत दुष्काळाचा सामना कसा केला जाणार आहे या बाबत उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

महोदय, 12 हजार गावांपेक्षा अधिक गावांमध्ये 50 पैशांपेक्षा खाली आणेवारी गेली असताना त्या ठिकाणी दुष्काळ का जाहीर केला जात नाही हे मला समजत नाही. माझा सरकारला सवाल आहे की, राज्यात दुष्काळ जाहीर का केला जात नाही ? माझी मागणी आहे की, अगोदर राज्यात दुष्काळ जाहीर करावयास पाहिजे. केवळ टंचाईच्या नावाखाली काम करु नका. दुष्काळाचे जे निकष आहेत त्यानुसार लोकांना मदत करावी. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना कर्ज माफी, शेतसारा माफी, विद्यार्थ्यांची परीक्षा फी, शैक्षणिक शुल्क माफ करावयास पाहिजे. आज दुष्काळामुळे शेतकरी संपूर्णतः उद्ध्वस्त झाला आहे. येत्या जुलै महिन्यात पावसाला सुरुवात होणार आहे. लगतच्या काळात हंगाम सुरु होणार आहे. त्या वेळी शेती कशी करावी असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण होणार आहे. येत्या हंगामासाठी शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे इत्यादिंचा पुरवठा मोफत करण्यात येईल की नाही, हे सरकारने जाहीर करावयास पाहिजे. या बरोबरच शेतकऱ्यांचे वीज बिल माफ केले पाहिजे. अशा पध्दतीने राज्य सरकारने निर्णय घेतले तरच या राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य माणूस जगणार आहे.

महोदय, 1972 पासून 2013 पर्यंत अनेक दुष्काळ पडले. 2003 मध्ये सुध्दा दुष्काळ पडला होता. गेल्या 36 वर्षांपूर्वी म्हणजेच 1972 मध्ये पडलेल्या दुष्काळाचे चटके बसल्यानंतर सुध्दा आपण धडा घेतला नाही. 1972 च्या दुष्काळामुळे आपण नेमका काय धडा घेतला हे मला समजत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी वाचून दाखविलेले सर्व अहवाल माझ्याकडे आहेत. पुन्हा त्या बाबतची आकडेवारी वाचून मी वेळ घेऊ इच्छित नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, 1962 चा बर्वे आयोग, 1972 चा अजितप्रसाद जैन आयोग, 1973 ची सुखथनकर समिती, महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाच्या अभ्यासासाठी नेमलेली सत्यशोधन समिती, राष्ट्रीय कृषी आयोग, सुरेश जैन समिती, पाटबंधारे विभाग उच्चाधिकार समिती, डॉ. सुब्रम्हण्याम समिती. 1962, 1972, 1973, 1976, 1981, 1986 या साली जे आयोग आणि कमिट्या स्थापन केल्या त्या कमिट्यांचे अहवाल आले त्या अहवालावर शासनाने काय विचार केला ? 1972 चा दुष्काळाच्या वेळी मी कॉलेजमध्ये असताना विदर्भामध्ये दुष्काळाच्या कामावर जाणारा मी एक कार्यकर्ता आहे. मी मस्टर क्लार्क म्हणून खडी फोडण्याच्या म्हणजे गिट्टीच्या ज्या खदानी होत्या ज्यांना क्वारीज म्हणतात त्या क्वारीजवर मस्टर क्लार्क म्हणून काम केलेला कार्यकर्ता आहे. त्यावेळेला मी जे चित्र पाहिले त्यामध्ये त्यावेळेला श्री. वसंतराव नाईक यांच्या काळात आमच्या विदर्भामध्ये सर्वदूर गिट्टी फोडण्याच्या क्वारीज ठिकठिकाणी निर्माण केल्या होत्या. हजारो मजूर त्या क्वारीजवर काम करीत होते. त्यावेळी आता सारखी परिस्थिती नव्हती. आठ दिवसातून त्या मजुरांचा पगार केला जात होता. त्यांना क्वारीवरच रेशन धान्य उपलब्ध करुन दिले जात होते. दुसरी कामे उपलब्ध नसल्यामुळे आणि दुसऱ्या कामांचे प्लानिंग नसल्यामुळे गिट्टी फोडण्याचे एकच काम उरले होते. त्यावेळी अशी टीका झाली होती की, जे गिट्टी फोडण्याचे काम तुरुंगामधील कैद्याला दिले जाते ते काम तुम्ही राज्यातील सर्वसामान्य जनतेला करावयास लावता.

1972 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन फक्त 12 वर्षे झाली होती. 1972 मध्ये पहिल्यांदा दुष्काळ पडला आणि त्यावेळी ज्या पध्दतीने दुष्काळाचा सामना केला गेला तसे चित्र मला आज दिसत नाही. गेल्या 36 वर्षात इतके आयोग स्थापन केल्यानंतरही आपण दूरगामी विचार करुन या महाराष्ट्राचे प्लानिंग केले नाही याचे दु:ख आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी सांगितले. मी तोच मुद्दा सांगणार होतो की, या ठिकाणी जमिनीला सर्रास 3 कोटी बोअर म्हणजे 3 कोटी छित्रे पाडली आणि या जमिनीतील पाणी वर खेचले. काल सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले की, या 3 कोटी बोअरमधून वर आलेल्या पाण्याचे नियोजन झाले नाही. ज्याला वाटले तो उठला आणि घरामध्ये बोअर, शेतामध्ये बोअर, वाटेल त्या ठिकाणी बोअर घेतल्या. अशा पध्दतीने 3 कोटी बोअरच्या माध्यमातून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/ KTG

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या राज्यातील भूगर्भातील पाणी उपसले गेले. याकडे कोणाचेही लक्ष नाही.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितले की, ऊसावर या राज्यातील 80 टक्के पाणी खर्च केले जाते, पण त्याचे नियोजन नाही, बोअरचे नियोजन नाही. काल सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले की, जो साठा 1700 वर्षे पुरत होता तो या बोअरमुळे उपसला गेला. त्याचे प्लानिंग नाही. या महाराष्ट्राचा आपण दूरगामी विचार करणार की नाही हा एक सवाल आज या दुष्काळाच्या निमित्ताने उभा राहिलेला आहे. आता राज्यात दुष्काळ पडणार नाही अशा प्रकारची स्थिती नाही. पुढच्या कालखंडामध्ये राज्यात दुष्काळ पडणार नाही असे सांगण्यासाठी तुम्ही काही भविष्यकार नाही. या राज्यात दुष्काळ पडला तरी या राज्यात पडणाऱ्या पावसाचा एकही थेंब बाहेर जाणार नाही अशा पध्दतीचे नियोजन करण्याचा आपला मानस आहे काय ?

आता आपण तत्कालिक उपाय करतो. कोठे टँकर सुरु करा, कोठे बुडक्या सुरु करा, कोठे बैलगाडीने पाणी द्या, तात्पुरत्या नळ योजना करा, असे उपाय आता आपण करीत आहोत तहान लागली की आपण विहीर खोदण्यास सुरुवात करतो परंतु भविष्यात या महाराष्ट्रावर येणारे जे दुष्काळाचे संकट आहे त्यादृष्टीने उपाययोजना केली पाहिजे. ग्लोबल वार्मिगमुळे आता जे वातावरण बदलत आहे त्यामुळे पाऊस लांबत चाललेला आहे. जूनमध्ये येणारा पाऊस आता जुलैपर्यंत पुढे गेलेला आहे. अशा स्थितीमध्ये पुढचा महाराष्ट्र या पाण्यावर कसा जगवावा याचा विचार करण्याची गरज आहे. तात्पुरत्या उपाययोजना करुन चालणार नाही. या महाराष्ट्रासाठी आम्ही दीर्घकालीन काय उपाययोजना करु शकतो, महाराष्ट्र दीर्घकाळ जगला पाहिजे, महाराष्ट्राला दीर्घकाळ किमान पिण्यासाठी पाणी दिले पाहिजे, महाराष्ट्राच्या शेतीला दीर्घकालीन सिंचनाची व्यवस्था झाली पाहिजे यासाठी आपल्याला काही व्यवस्थापन करता येईल काय याचाही विचार या दुष्काळाच्या निमित्ताने गांभीर्याने झाला पाहिजे.

सभापती महोदय, दुष्काळाची जनरल चर्चा होतच असते परंतु माझी अशी विनंती आहे की, महाराष्ट्रातील पाण्याचे व्यवस्थापन या विषयावर किमान दोन दिवसाचे अधिवेशन घ्यावे. दुसरी कोणतीही चर्चा नको.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ही परिस्थिती गंभीर होणार असेल तर महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधीं बरोबर दोन दिवस अधिवेशन घ्यावे. या महाराष्ट्राला पिण्याच्या पाण्यासाठी स्वयंपूर्ण केले पाहिजे. मग एकदा दुष्काळ पडू दे, दुसऱ्यांदा दुष्काळ पडला तरी माझ्या महाराष्ट्रातील पाणी संपणार नाही अशा प्रकारच्या दीर्घकालीन उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेतले जाईल काय ? याबाबतही शासनाने उत्तर द्यावे. विजेसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी पुढील 50 वर्षासाठी स्वयंपूर्ण होण्यासाठी दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे अशी आग्रहाची विनंती करतो आणि माझे भाषण येथे थांबवितो.

---------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ D/ KTG/

श्री.राणा जगजितसिंह-पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :सभापती महोदय, सभागृहात नियम 260 अन्वये प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. त्यावर बोलण्यासाठी मला आपण संधी दिल्याबद्दल मी आपले मनापासून आभार व्यक्त करतो.

आपल्या राज्यामध्ये अभूतपूर्व पाणी टंचाई आहे. उस्मानाबाद जिल्हा हा पठारावर आहे. या जिल्ह्यात 767 एमएम इतका पाऊस पडतो. परंतु यंदाच्या पावसाच्या हंगामामध्ये केवळ 397 एमएम पाऊस पडला आहे. राज्यामध्ये 2 हजारच्या वर टँकर्स सुरु आहेत. त्यापैकी 250 टँकर्स एकट्या उस्मानाबाद जिल्ह्यात सुरु आहेत. एवढी भयानक परिस्थिती निर्माण का झाली त्याबाबत सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी ऊहापोह केलेला आहे. या कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शासनाने बरीच मदत केली आहे. बऱ्याच उपाययोजना राबविल्या आहेत हेही मला आवर्जून सांगितले पाहिजे. उस्मानाबाद शहराला 65 टँकर्सद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. या शहराची लोकसंख्या 1.25 लाख इतकी आहे. या शहरासाठी वेगवेगळ्या ठिकाणाहून पाणी आणले जात आहे. त्यापैकी एक स्त्रोत 40 कि.मी.अंतरावर आहे. पुढील महिन्याभरात तो स्त्रोतही कोरडा पडणार आहे. त्यानंतर या शहरासाठी जवळपास 125 कि.मी.अंतरावरुन पाणी आणावे लागेल. अशी भयानक परिस्थिती आहे. शेजारच्या तालुक्यात व जिल्ह्यात पाणी उपलब्ध होते आणि ते आजही आहे. परंतु ते पाणी आणण्यासाठी जर टँकर गेला तर त्या टँकरचे वा ड्रायव्हरचे काय होईल अशी भीती आम्हाला वाटत आहे.

कोणी तरी असे म्हटले आहे की, तिसरे महायुध्द हे पाण्यावरुन होणार आहे. म्हणून मी हा उल्लेख केला आहे. काही प्रमाणामध्ये आम्हाला ते जाणवलेही आहे. उस्मानाबाद शहरापासून 20 कि.मी.अंतरावरील एका तलावात पाणी आहे. सध्या 40 कि.मी.अंतरावरुन पाणी आणण्याऐवजी 20 कि.मी.अंतरावरुन आणण्यासाठी तेथे टँकर पाठविण्याचा विचार करण्यात आला. तेथे उपलब्ध असलेले पाणी पाहण्यासाठी दुपारी एका माणसाला पाठविले होते. त्या ठिकाणी झाडाखाली दोन वयोवृध्द माणसे बसलेली होती. त्या माणसाने त्यांना विचारले की, तुम्ही दोघे दुपारच्या वेळी का थांबला आहात ? त्यावर ते असे म्हणाले की, उस्मानाबादहून पाणी नेण्यासाठी टँकर येणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे गावातील लोकांनी आमच्याजवळ मोबाईल दिलेला आहे. टँकर आल्यावर त्यांनी गावात फोन करण्यास सांगितलेले आहे. यातील विनोदाचा भाग बाजूला ठेवू या. पण यातून किती भयानक परिस्थिती आहे ते दिसून येते.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ D/ KTG/

श्री.राणा जगजितसिंह-पाटील.......

शासनाने मदत केली आहे याचा मी मुद्दाम उल्लेख करीत आहे. त्याचे कारण असे की, 2004 साली तत्कालीन शासनाच्या शेवटच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत उस्मानाबाद शहरासाठी उजनी धरणाचे पाणी आरक्षित करण्यात आले होते. कारण या शहरासाठी 4-5 ठिकाणाहून पाणी आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण 5-6 वर्षामध्ये सर्व स्त्रोत आटून जातात. म्हणून 114 कि.मी.अंतरावर पाण्यासाठी अतिशय महत्वकांक्षी योजना हाती घेतली आहे. जवळजवळ 20 हजार पाईप व 25 हजार जॉईन्ट असलेली ही योजना आहे. या योजनेचे 360 मीटरचे हेड आहे. ही योजना पूर्णत्वापर्यंत आलेली आहे. या योजनेचे 105 कि.मी.पर्यंतचे काम व्यवस्थित झालेले आहे. उर्वरित शहराजवळ 6 कि.मी.चे काम आहे तेथे 100 मीटरचे हेड आहे. मुख्यमंत्री महोदय, गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात आले होते त्यावेळी त्यांनी या योजनेसाठी 51 कोटी रुपये मंजूर केले होते. त्याबद्दल मी मुद्दाम आभार व्यक्त करतो. उप मुख्यमंत्री महोदयांनी ऑगस्ट महिन्यात एक बैठक घेतली होती. त्या बैठकीत 30 कोटी रुपयांचे अनुदान व 21 कोटी रुपयांचे सॉफ्ट लोन देण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

गेल्या 5 वर्षातील सरासरी आपण पाहिली तर भूगर्भातील पाण्याची पातळी 5 मीटरने खाली गेल्याचे दिसून येते. उस्मानाबाद येथे मोठ्या प्रमाणावर ऊसाची लागवड केल्यामुळे पाण्याचा अमर्याद उपसा झालेला आहे असे सांगितले जाते. तेथे ऊस लागवडीबरोबर साखर कारखाने देखील आले. गेल्या वर्षी शेतक-यांच्या घरामध्ये 600 कोटी रुपये गेले. ऊसाला पर्याय द्या असे कितीही म्हटले तरी सहजासहजी त्याला कोणता पर्याय नाही. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी ड्रीप इरिगेशनचा उल्लेख केला. ऊसासाठी ड्रीप इरिगेशन करायचे झाले तर एकरी 40 हजार रु. खर्च येतो. त्यासाठी केवळ 15 हजार रुपये अनुदान दिले जाते. इतर राज्यामध्ये 90 टक्के अनुदान दिले जाते. आपल्या राज्याने देखील ड्रीप इरिगेशनच्या अनुदानामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. ड्रीप आणि स्प्रिंकल इरिगेशनमुळे आपल्याला पाणी वाचविता येईल. आपण कितीही सांगितले तरी शेतकरी ऊसाची लागवड करण्याचे थांबतील अशी आज परिस्थिती नाही.

सभापती महोदय, आपण जो टँकरने पाणी पुरवठा करतो त्यामध्ये 25 टक्के पाण्याचा अपव्यय होतो. सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केल्याप्रमाणे गावामध्ये टँकर आला की, लोक भांडी घेऊन धावतात आणि पाईपाद्वारे पाणी घेतात. अशा प्रकारे पाणी घेत असताना 25 टक्के पाणी वाया जाते. आम्ही उस्मानाबादमधील दुष्काळी गावामध्ये 5 हजार लिटरच्या दोन आणि 3 हजार लिटरची एक अशा टाक्या बसविल्या आहेत. त्या टाक्यामध्ये टँकरने पाणी सोडले जाते आणि मग ते लोकांना दिले जाते. यामुळे पाणी वाया जात नाही. या टाक्या बसविण्यासाठी आमदार निधीतून 25 लाख रुपये दिलेले आहेत. बाकीचा निधी प्रशासनाकडून मिळतो. अशा प्रकारचे नियोजन प्रत्येक जिल्ह्यामध्ये होणे गरजेचे आहे. राज्य शासनाने या वर्षी आणि पुढील वर्षासाठी डिस्ट्रिक्ट प्लॅन मधून 15 टक्के निधी विविध उपाययोजनांसाठी वापरण्याचा महत्वाचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, चारा छावण्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते या ठिकाणी मांडलेली आहेत. शेतक-यांना जनावरांच्या चा-यासाठी थेट अनुदान दिले तर ते योग्य होईल असे माझे मत आहे. उस्मानाबादमध्ये प्रचंड दुष्काळ असून देखील फक्त 9 छावण्या आहेत. चारा छावण्याचे निकष अतिशय कडक असल्यामुळे कोणी चारा छावण्या काढण्यासाठी पुढे येत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. केन्द्रीय कृषीमंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी एक चांगला निर्णय घेतलेला आहे. त्यांनी मोठ्या जनावरांसाठीचे अनुदान 35 रु.वरुन 50 रुपये केलेले आहे. अनुदानामध्ये 15 रुपये वाढविल्यामुळे या छावण्या योग्य प्रकारे चालू शकतील असे मला तरी वाटत नाही. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जेथे दुष्काळ आहे अशा नागरी भागामध्ये देखील नियम शिथिल करुन रोजगार हमी योजनेची कामे सुरु होणे गरजेचे आहे. उदा. आमच्या उस्मानाबाद शहराच्या हद्दीमध्ये दोन-तीन गावे येतात. या गावातील शेतकरी मजुरीसाठी कोठे जातील ? शहरी भागामध्ये बांधकामाच्या ठिकाणी मजूर काम करतात. पाण्याअभावी बांधकाम थांबलेले असल्यामुळे या मजुरांची उपासमार होत आहे, याबाबतीत शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुरांचे राष्ट्रीयकृत बँकेने झिरो बॅलन्सवर खाते उघडायला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात ते उघडले जात नाही. पोस्टातील खाते तेवढ्या प्रमाणात वापरले जात नाही. याबाबतीत निर्णय होण्याची गरज आहे. 1972च्या दुष्काळामध्ये 20-30 लाख मजूर कामावर येत होते. या दुष्काळामध्ये 2 लाख मजूर कामावर येत असतील तर त्याही बाबतीत अभ्यास होणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राणा जगजितसिंह पाटील....

रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुराला tks मजुरीचा दर देतो तो योग्य आहे की त्या दरात बदल करण्याची गरज आहे याच्या बाबतीत विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी सभागृहात पूर्वी देखील पैसेवारीच्या बाबतीत उल्लेख केला होता. रब्बीची अंतिम पैसेवारी 15 मार्चला ठरते. सुधारित पैसेवारी उपलब्ध झाल्यानंतर खरे तर या गावांना लाभ देण्यास हरकत नाही. तो लाभ आवर्जून दिला जावा असे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे. एप्रिल व मे महिन्यात मोठया प्रमाणात लग्न होत असतात. त्या लग्नांसाठी शासनाने अधिकचा विचार करण्याची गरज आहे. आपल्याला माहिती आहे की, सामुदायिक विवाह सोहळे हे प्रत्येक ठिकाणी होतात. दुष्काळी परिस्थितीमध्ये देखील विवाह सोहळे होतात, त्यावेळी शासनाकडून वेगळी उपाययोजना राबविली जावी अशी माझी विनंती आहे. अशा स्वरुपाचे जेथे विवाह सोहळे असतील तेथे पाण्याची सोय करणे, या संदर्भात शासनाकडून जे काही अनुदान दिले जाते, ते थोडसे लवकर द्यावे. अशा गोष्टी झाल्या तर अशा प्रकारच्या सोहळयांना खूप मदत होणार आहे.

महोदय, उस्मानाबाद सारख्या शहरामध्ये जवळ जवळ हजार के.टी.वेअर आहेत. पाझर तलाव आणि इतर साठे वेगळे आहेत. या के.टी.वेअरचे खोलीकरण करणे, त्याच बरोबर त्यातील गाळ काढणे अशी कामे होणे अपेक्षित आहे. आज उस्मानाबाद जिल्हयात 50 पोकलॅन्ड, 198 जी.सी.बी. यांच्या माध्यमातून गाळ काढण्याची प्रक्रिया चालू आहे. 850 ट्रॅक्टर आणि 302 ट्रिपर याच्या मदतीने 35 लाख मीटर क्युबीक एवढा गाळ काढण्यात आला आहे. गाळ काढण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळणे अपेक्षित आहे. ज्यांच्याकडे पैसे आहेत अशा शेतकऱ्यांनी गाळ काढून आपल्या स्वत:च्या शेतात टाकला आहे. परंतु जे गरीब शेतकरी आहेत त्यांच्या बाबतीत आवर्जून विचार करण्याची गरज आहे.

महोदय, विहिरीच्या अधिग्रहणाच्या बाबतीत मला विनंती करावयाची आहे की, बऱ्याच वेळेला विहिरीच्या अधिग्रहणाचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. हे पैसे लवकर मिळण्यासाठी शासनाकडून उपाययोजना करावयास पाहिजे, अशी मी शासनास विनंती करतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 16:10

राणा जगजितसिंह पाटील...

महोदय, उस्मानाबाद जिल्हयातील एका बाबीच्या संदर्भात मला आवर्जून उल्लेख करावयाचा आहे. जिल्हाधिकारी हे जी.एस.डी.ए.चे संचालक होते. रिचार्ज करण्याच्या बाबतीत काही टार्गेट ठरवून देणे गरजेचे आहे. पाऊस आल्यानंतर ते पाणी जमिनीत मुरविण्यासाठी रिचार्जींग वेल्सच्या माध्यमातून मोठा कार्यक्रम राबविला गेला पाहिजे अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

महोदय, 1972 साली पडलेला दुष्काळ अतिशय भीषण होता असे सांगितले जाते. त्यावेळेचे राज्यकर्ते, त्यावेळचे प्रशासन ज्या पध्दतीने वागले याची आपण आवर्जून माहिती करुन घ्यावयास हवी. माझी आताच्या राज्यकर्त्यांना अशी विनंती रहाणार आहे की, आपण किती कार्यक्षम आहोत. आपण योग्य राज्यकर्ते कसे आहोत, हे दाखविण्याची खूप मोठी संधी आपल्या समोर आलेली आहे. पुढील चार-पाच महिने दुष्काळाच्या बाबतीत चांगल्या पध्दतीने नियोजन झाले तर निश्चितपणे आपण दुष्काळावर मात करु शकतो. पालक मंत्री आणि पालक सचिव आणि वेगवेगळया भागातील जिल्हाधिकारी यांनी एकत्रित येऊन दुष्काळावर मात करण्यासंबंधीच्या उपाययोजना नीट राबविल्या तर आपल्याला निश्चितपणे भीषण पाणी टंचाईवर आणि दुष्काळावर मात करता येईल असे मी पुन्हा या ठिकाणी नमूद करु इच्छितो.

महोदय, आमच्या जिल्हयात बऱ्याच बोअरवेल्स आहेत. शेतकऱ्यांनी पैसे भरले नाहीत म्हणून बोअरवेल्सचे वीज कनेक्शन मोठया प्रमाणात कापली जात आहेत. एकीकडे शेतकऱ्याला अनुदानाच्या स्वरुपात मदत देण्याचे ठरवित आहोत आणि दुसरीकडे शेतकऱ्यानी वीज बील भरले नाही म्हणून त्याच्या बोअरवेल्सचे वीज कनेक्शन कापले जात आहे. हा विरोधाभास आहे. या बाबतीत काही तरी निर्णय शासनाने घेणे गरजेचे आहे.

महोदय, मी या चर्चेच्या निमित्ताने ज्या सूचना केल्या आहेत, त्यां सूचनांचा शासनाने साकल्याने विचार करावा अशा प्रकारची विनंती करतो.

यानंतर श्री. भोगले....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राणा जगजितसिंह पाटील..........

सभापती महोदय, परांडा तालुक्यात जगवाडी नावाचे एक गाव आहे. तेथे अंबादास गिरी नावाच्या शेतकऱ्यांकडे पाच एकर कोरडवाहू जमीन होती. तीन दिवसांपूर्वी त्याने गळफास लावून आत्महत्या केली. या वर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे फक्त एक पोते ज्वारी झाली. अडचणीत सापडलेल्या या शेतकऱ्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. त्याने सोसायटीकडून कर्ज घेतले होते, हात उसने कर्ज आणि खाजगी कर्ज देखील घेतले होते. हा उल्लेख मी आवर्जून करतो.

सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत परवा निर्णय होऊ शकला नाही. जालना आणि धुळे या दोन्ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मदत करण्याचे शासनाने ठरविले आहे. परंतु उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मदत दिलेली नाही. होमट्रेड संबंधित बँक असल्यामुळे मदत होऊ शकली नाही असे मला सांगण्यात आले. आजच सकाळी औरंगाबाद हायकोर्टाचा निकाल आलेला आहे. उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे 30 कोटी रुपये नागपूर जिल्हा मध्यवर्ती बॅकेला दिले आहेत, ते परत करावेत अशा प्रकारचा निर्णय झाल्याचे समजते. शासनाने उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वाचविण्यासाठी 31 मार्च, 2013 पर्यंत 30 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले पाहिजेत, या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, कालपासून या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश आणि राज्यातील काही गावांमध्ये तीव्र अशा प्रकारची पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. दुष्काळी परिस्थितीच्या प्रस्तावावर चर्चेला सुरुवात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केली. या प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. दुष्काळी भागात कामे करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने तशा प्रकारची पावले उचलली आहेत. 1972 चा दुष्काळ आणि त्यापेक्षाही भयानक अशा प्रकारच्या दुष्काळाची जाणीव अनेक सन्माननीय सदस्यांनी सदनामध्ये करुन दिली आहे.

सभापती महोदय, यंदाच्या दुष्काळाची स्थिती सहज लक्षात येण्यासारखी आहे. मागील वर्षी राज्यात साधारपणे 200 ते 250 टँकर लावण्यात आले होते. यावर्षी टंचाईग्रस्त गावात पाणी पुरवण्यासाठी 2000 ते 2500 टँकर सुरु आहेत. राज्याच्या बजेटमधून यावर्षी जी विकास कामे निश्चित करण्यात आली होती, त्या अर्थसंकल्पीय तरतुदीला 20 टक्के कपात लावण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. केंद्र सरकारकडे दुष्काळ निवारणासाठी आर्थिक मदत वाढवून मागितली आहे. आणखी 2500 कोटी रुपये मदतीची आवश्यकता आहे अशा प्रकारची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

केंद्रशासनाने मागच्या वेळेस आपल्या राज्याला 700 कोटी रुपयांची मदत दिली हाती व आता 1260 कोटी रुपयांची मदत केंद्रशासनाकडून आपल्या राज्याला मिळाली आहे अशी माहिती आलेली आहे. राज्य शासनाला अजून 7 हजार कोटी रुपयांच्या कर्जाची आवश्यकता असून त्याची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आलेली आहे आणि अशा प्रकारे दुष्काळासाठी आपण प्रचंड पैसा उभा करीत आहोत.

सभापती महोदय, आपण जनावरांना चारा आणू शकतो, लोकांना रोजगारही उपलब्ध करुन देऊ शकतो परंतु पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता जटील बनला आहे. मार्च महिन्याला आता कोठे सुरुवात झालेली आहे. मार्च महिन्यामध्येच जर आपल्याला 40-50 कि.मी. अंतरावरुन पाणी आणावे लागत असेल तर एप्रिल, मे आणि जून महिन्यामध्ये पाण्याची काय परिस्थिती होईल याची आपल्याला कल्पना सुध्दा करवत नाही.

सभापती महोदय, आज भूगर्भातील पाणी वेगाने कमी हात चालले आहे. आज 8 दिवसामध्ये काही फूट पाणी खोल जात असेल तर पुढील तीन महिन्याच्या कालावधीत हेच पाणी दर दिवसाला काही मीटरने खाली जाऊ शकते. पुढील महिन्यात भूगर्भातील पाण्याचे साठे संपत जाणार आहेत. आज मराठवाडयातील धरणांमध्ये अल्प प्रमाणात पाणी शिल्लक असून पुढील महिन्यात पाणी आणावयाचें कोठून हा प्रश्न आपल्या समोर आणि शासनासमोर उभा राहणार आहे.

सभापती महोदय,1972 च्या दुष्काळात आपल्याकडे पाणी होते परंतु पाण्याचा उपसा करणारी यंत्रणा नव्हती परंतु आता आपल्याकडे पाण्याचा उपसा करणारी यंत्रणा आहे परंतु भूगर्भात पाणीच शिल्लक नाही अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकरी संत्रा पिकासाठी 400 फूट बोअर करुन पाणी पिकाला देतो असे सांगितले जात होते तेव्हा आमचा त्यावर विश्वास बसत नव्हता. परंतु आज संपूर्ण राज्यात 400 फूटापर्यंत गेले तरी पाणी लागत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. हजार हजार फूटापर्यंत बोअर केले जात असल्याचे आम्ही ऐकत आहोत आणि जमिनीतील पाण्याचा साठा जर या प्रमाणात घटत असेल तर हा सगळयात चिंतेचा प्रश्न राज्य सरकार समोर आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यामुळे पाण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे व हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे असे मला वाटते. ..2...

श्री. माणिकराव ठाकरे ....

सभापती महोदय,या सदनात दुष्काळावर चर्चा होत असतांना दुष्काळाच्या संदर्भात मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ या ठिकाणच्या लोकप्रतिनिधींनी माहिती दिलेली आहे. या सर्व प्रश्नांचा विचार केला आणि भूगर्भातील पाणी एवढया वेगाने खोल जात असेल तर भविष्यासाठी भूगर्भातील पाण्याची पर्यायी व्यवस्था आपण काय करणार, त्यासाठी कोणती पाऊले उचलणार यासंदर्भात चर्चा होणे व त्यासंदर्भात नियोजन करणे हा पर्याय असू शकतो असे मला वाटते.

सभापती महोदय,1972 मध्ये वि.स.पागे यांनी रोजगार हमी योजना सुरु केली. रोजगार हमी योजनेची कामे राज्यातच नाही तर संपूर्ण देशात चांगल्या प्रकारे केली जात आहे. राष्ट्रीय स्थरावर केंद्र सरकारने रोजगाराची गॅरंटी स्कीम लागू केली असून त्यासाठी प्रचंड पैसा उपलब्ध करुन दिलेला आहे. ही योजना चांगली असल्यामुळेच संपूर्ण देशभर लागू झाली.

आज आपल्या महाराष्ट्रासमोर सगळयात माठे संकट कोणते असेल तर ते पाणी टंचाईचे आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. मागील चार वर्षामध्ये संपूर्ण राज्यात पावसाचे प्रमाण 15 टक्क्याने घटलेले आहे. अगोदर आपल्याकडे 7 जून रोजी पाऊस पडत असे. चार दिवस अगोदर हा पाऊस केरळ मध्ये येतो व त्यानंतर मुंबईत पडतो. मुंबईत पावसाला सुरुवात झाली की, संपूर्ण राज्यभर पाऊस पडत असे. परंतु अलीकडच्या काळात जून महिन्यामध्ये कोठेच पाऊस पडत नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

जुलै महिन्यामध्ये पाऊस येतो. ज्या पद्धतीने आता पाऊस येत आहे त्यानुसार आपण पीक पॅटर्न सुद्धा बदलले पाहिजे. तशा प्रकारचे नियोजन शेतीबाबत करणे गरजेचे आहे, असे मला वाटते. आज संपूर्ण राज्यामध्ये भयावह अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. भविष्यामध्ये मोठी धरणे बांधून आपण पाण्याचा साठा करू शकतो. त्या माध्यमातून आपण पिण्याच्या पाण्याची सोय करू शकतो. जलसंधारण अंतर्गत पाणी अडवा पाणी जिरवा याचा अवलंब करणे गरजेचे आहे. यासाठी आपण किती पैसा ठेवला पाहिजे व ठेवल्यानंतर कशा प्रकारे त्याचे नियोजन केले पाहिजे याचा विचार केला पाहिजे. कारण नियोजन करताना त्यातील बारकावे देखील लक्षात घ्यायला पाहिजेत.

महाराष्ट्रात सर्वात जास्त पाणी ऊसाच्या पिकाला जाते असे आपण म्हणतो. ऊसाला 80 टक्के पाणी जाते असे आपण म्हणतो. राज्यातील 80 टक्के जमीन ओलिताखाली यायची असेल तर सगळ्यांचा पाण्यावरचा अधिकार आपण मान्य केला पाहिजे. तशा प्रकारचा कायदा भविष्यामध्ये करण्याची आवश्यकता आहे. ज्यांच्याकडे विहीर आहे त्याने पाणी उपसायचे, ज्यांची बोअर मारण्याची ताकद आहे, त्याने हजार फुटा पर्यंत बोअर मारायची हे चालणार नाही. त्यातून भविष्यातील चिंता दिसून येत नाही. शासन म्हणून आपण तशा प्रकारचे नियोजन करीत असाल तर योग्य दिशेने आपण पावले उचलत आहात असे म्हणावयास हरकत नाही. नियोजन न करता पावले उचलू नयेत असे आमचे म्हणणे आहे. आपण जे काही पाहिले आहे ते सर्वांनाच माहीत आहे. याबाबतची आकडेवारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनाकडे आली नाही अशातला देखील भाग नाही. प्रत्येक भागामध्ये दररोज टँकर लावावा लागत आहे. रोज 100-150 टँकरची संख्या वाढत आहे. आताच टँकरची संख्या 2000 च्या वर गेलेली आहे. ती कदाचित 3000 किंवा त्यापेक्षा देखील अधिक वाढू शकते. आपण टँकर कितीही लावू शकतो. पण त्यासाठी पाणी कुठून आणणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

सन्माननीय सदस्य श्री.पाटील यांनी एक समस्या सांगितली. त्यांनी सांगितले की, लोक बॉर्डरवर उभे आहेत. भविष्यात एका गावाचे पाणी दुसऱ्या गावाच्या सीमेत जाऊ देण्यास कोणीही तयार होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

आज शेतकरी आपल्या फळबाग जगविण्याकरिता प्रयत्न करीत आहेत. जालना जिल्ह्यातील आकुर्डी गावामध्ये आम्ही गेलो होतो. तेथील मोसंबीच्या बागा आम्ही बघितल्या. तेथील शेतकऱ्यांशी चर्चा केली. या शेतकऱ्यांना आपणच गावतळी दिली आहेत. गावतळे दिल्यानंतर त्यांनी पॉलीथीनचा कागद टाकून दोन-तीन-चार वर्षे त्यात पाणी आणून टाकले. ते गावतळे भरले. ते पाणी वापरून झाल्यानंतर संपूर्ण पाणी संपले. या पाण्याच्या आधारावरच त्या शेतकऱ्यांची बाग उभी होती. त्यांच्या डोळ्या देखतच ती बाग पाण्या अभावी नष्ट झाली. मराठवाड्यामध्ये थोडा आर्थिक फरक देखील आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतकरी द्राक्षाच्या बागेला पाणी देण्याकरिता 80 हजार रूपये खर्च करून टँकरची व्यवस्था करू शकतो. परंतु, मराठवाड्यातील शेतकरी मोसंबीच्या बागा का वाचवू शकला नाही ? ही बाग वाचवावी असे त्याला वाटले नाही काय ? याचा विचार केला पाहिजे. येथे आर्थिक परिस्थितीचा मुद्दा देखील उपस्थित होतो. मराठवाड्यातील शेतकरी शासनाच्या मदती शिवाय उभा राहू शकणार नाही. आज सुद्धा तेथील मोसंबीच्या बागांचा सर्व्हे सुरू झालेला नाही. आज त्याची बाग जळून गेली आहे. त्याला जी काही मदत द्यायची असेल ती आपण द्यावी. आज ज्या 30 ते 40 टक्के बागा उभ्या आहेत त्या देखील संपण्याच्या अवस्थेत आलेल्या आहेत. त्यांना 15 ते 30 दिवसात पाणी मिळाले नाही तर त्या परिसरातील संपूर्ण मोसंबीच्या बागा सुकल्याशिवाय राहणार नाही.

आज आपण नियोजन करीत आहोत. पैसा मागत आहोत. परंतु, सर्वात पहिले पाणी कोणाला देणे आवश्यक आहे तर जेथे आज बागा उभ्या आहेत त्यांना दिले पाहिजे. ते पाणी टँकर मागवून कशा प्रकारे त्यांच्या शेतीला पोचवायचे ही जबाबदारी त्या शेतकऱ्यांचीच आहे. त्यांना आपण गावतळे दिलेले आहे. आज पाणी नसल्यामुळे शेतकरी हतबल झालेले आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

तोंडाशी आलेले पीक गेले आहे, ते धनदांडगे शेतकरी नाहीत किंवा अन्य कुठून पैसा आणून बाग उभी करावी अशी देखील त्यांची परिस्थिती नाही. तेव्हा आज ज्या बागा उभ्या आहेत त्यांना पाणी देण्यासाठी टँकरची व्यवस्था करावी. आपण अशी व्यवस्था केल्यामुळे निदान त्या बागा जगतील. प्रथम त्या बागा मरु द्यायच्या व नंतर त्यांना अनुदान द्यायचे असा आपण विचार करु लागलो तर शेतकरी उभा राहू शकणार नाही. त्या भागातील शेतकरी मोठ्या अडचणीतून उभा राहिलेला आहे. तेव्हा त्या शेतकऱ्यांना वेगळ्या पध्दतीने मदत करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आपण रोजगार हमी योजनेसाठी वेगवेगळ्या माध्यमातून सहा टॅक्स जमा करतो आणि आपण तसा कायदा केला होता. ज्या वर्षी दुष्काळ पडेल त्या ठिकाणी तो निधी वापरायचा. साधारणत: दरवर्षी 900 ते 1000 कोटी रुपये जमा होतात. केंद्र सरकारने राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणली आहे परंतु त्याचे काही निकष आहेत. केंद्र सरकारला संपूर्ण देशाचा विचार करावा लागतो. बिहार, उत्तर प्रदेश राज्यांमध्ये राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या निधीचा कशा प्रकारे वापर होतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. म्हणून केंद्र सरकार सर्वांना एकाच माळेमध्ये पाहतात. आपल्याला मदत द्यायची आहे तेव्हा त्यामध्ये दुजाभाव करता येणार नाही. आपण रोजगार हमी योजना राबविली त्यामध्ये आणि केंद्र सरकारच्या योजनेमध्ये जो काही फरक असेल तो फरक भरुन काढण्याच्या दृष्टीकोनातून किमान रोहयो करिता जमा झालेला पैसा आपण वापरला पाहिजे. परंतु आपण तो निधी एकत्रित केला आणि त्या संदर्भातील आलेल्या विधेयकावर चर्चा देखील झाली होती. त्या विधेयकानुसार आता रोजगार हमी योजनेसाठी वेगळा फंड राहणार नाही. तो फंड राज्याच्या एकत्रित फंडामध्ये जमा होईल. आपण आजही रोजगार हमी योजनेसाठी वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्स घेतो तो पैसा किमान अशा परिस्थितीमध्ये वापरला गेला पाहिजे. केंद्र सरकारच्या योजनेमधून ज्या अतिरिक्त गोष्टी करु शकत नाही त्याकरिता वापरला पाहिजे.

सभापती महोदय, 1972 मध्ये जवळपास 50 लाख मजूर कामावर होते. आज जालना जिल्ह्यामध्ये फक्त अडीच हजार मजूर कामावर आहेत. तेथील लोकांना कामाची गरज नाही किंवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्यांना कोणत्या प्रकारच्या अडचणी येत असतील या गोष्टी देखील पाहिल्या पाहिजेत. आपण सर्वजण या सदनामध्ये चर्चा करतो तेव्हा यात एक वाक्यता राहिली पाहिजे. कोणाला राजकारण करायचे असते ते राजकारण करतातच. यामध्ये कोण राजकारण करीत आहे हे जनता पाहत असते. दुष्काळासंबंधी कोण मुद्दे मांडत आहेत हे जनता पाहत आहे.

सभापती महोदय, सदनामध्ये चर्चा करीत असताना राज्याचे सिंचना संदर्भातील नियोजन काय असावे, राज्यावर अशी परिस्थिती आल्यानंतर तारांबळ उडणार नाही अशा प्रकारचे निर्णय घेतले पाहिजेत. त्याप्रमाणे दोन्ही सभागृहात चर्चा होऊन काही निर्णयाप्रत आपण येऊ.

सभापती महोदय, चारा छावण्यांमध्ये भ्रष्टाचार होतो अशाप्रकारच्या अनेक बातम्या येत असतात.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 16:35

श्री.माणिकराव ठाकरे....

शेवटी आपण त्या त्या भागात असलेल्या अधिकाऱ्यांकडे या बाबतची जबाबदारी देण्याबाबत विचार केला पाहिजे. प्रत्येक छावणीची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांकडे का दिली नाही ? वास्तविक पाहता त्या अधिकाऱ्यांनी सकाळी छावणीमध्ये किती जनावरे आहेत, संध्याकाळी किती जनावरे आहेत हे मोजून खरोखरच त्या जनावरांना चारा दिला जातो काय या बाबतची माहिती घ्यावयास पाहिजे. या बरोबरच जनावरांना पौष्टीक खाद्य दिले जाते की नाही हे पाहण्यास सांगावयास पाहिजे आणि त्या बाबत रोजचा अहवाल त्यांच्याकडून घ्यावयास पाहिजे. आज राज्य सरकारचे हजारो कर्मचारी दुष्काळी भागात काम करीत आहेत. त्यांना जबाबदारी निश्चित करुन दिली तर ते योग्य प्रकारे नियोजन करतील आणि तेच सांगतील की, शासनाकडून देण्यात येणारे दर खरोखरच परवडणारे आहेत की नाहीत. महोदय, चारा डेपो 100 टक्के नियमानुसार चालवायचे म्हटले तर त्यांना देण्यात येणारे दर हे कदापि न परवडणारे आहेत. पौष्टीक खाद्यासाठी, चारा देण्यासाठी किती खर्च येतो, जनावरांचे पाणी किती कि.मी. अंतरावरुन आणावे लागते, या गोष्टींचा विचार केल्यानंतरच जनावरांना पाणी पाजायचे की नाही, किती पाजावे लागेल याचा विचार केला जातो व त्या बाबतचे दर ठरलेले आहेत. त्यामुळे या संदर्भात इत्थंभूत गोष्टींचे नियोजन करुन दुष्काळाचा सामना करणे आवश्यक आहे.

महोदय, देशात आणि परदेशात फिरणारे अनेक नेते या ठिकाणी आहेत. त्यांना सुध्दा इतर देशांनी दुष्काळावर कशाप्रकारे मात केली हे माहीत आहे. त्यांची सुध्दा या कामी मदत घेता येईल. या बरोबरच अगोदरच्या काही गोष्टी आपल्याला सोडाव्या लागतील. एखादी गोष्ट लोकप्रिय असेल, निवडून येण्यासाठी योग्य असेल तरच आपण त्या विषयी आग्रही राहतो. वास्तविक पाहता दुष्काळी परिस्थितीत राज्यामध्ये कशाला प्राथमिकता द्यायची आणि त्या बाबत सत्तारुढ व विरोधी पक्षाचे एकमत कसे करता येईल या दृष्टीने वाटचाल केली तर भविष्यातील दुष्काळी परिस्थिती टाळू शकतो. ज्या ठिकाणी दुष्काळ आहे त्या ठिकाणी कामे घेण्यास सुरुवात केली आहे. कारण पुढील वर्षी दुष्काळ येऊ नये म्हणून दुष्काळी भागात काम करण्यास सुरुवात झालेली आहे. काही पैसा दुष्काळी भागातील समस्यांवर वापरला जातो आणि काही पैसा भविष्यात दुष्काळ पडू नये यासाठी वापरण्यास सुरुवात झाली आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, या संदर्भातील नियोजन आपण व्यवस्थितरित्या केले पाहिजे. परंतु राज्य म्हणून सुध्दा नियोजन केले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

पाहिजे. राज्यात ज्या ज्या ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्यासारखी आहे त्या सर्व परिसराचा विचार केला जातो की नाही या बाबत काळजी घेतली पाहिजे. या वर्षी मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रासाठी काम केले आणि पुढील वर्षी विदर्भ, खानदेश, कोकण या भागासाठी काम केले तर ते एकप्रकारे तुटपुंजे नियोजन केल्यासारखे होईल. अशा प्रकारचे तुटपुंजे नियोजन हे दुष्काळावर भविष्यकालीन नियोजन असू शकत नाही. सर्व भागांचा विचार करुन नियोजन करावे लागेल.

महोदय, आपण नेहमी सांगतो की, दुष्काळ हा निसर्गनिर्मित आहे. परंतु दुसऱ्या बाजूला आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की, निसर्गामुळेच पाऊस पडतो. निसर्गामुळेच अनेक गोष्टी आपल्याला मिळतात. प्रत्येक वेळी निसर्गावर ढकलून चालणार नाही. निसर्गावर ढकलणे म्हणजे एक प्रकारे रस्त्यापासून बाजूला जाण्याचा प्रयत्न करीत आहोत असे मला वाटते. यासाठी योग्य प्रकारे नियोजन करण्याची आवश्यकता आहे, किंबहुना पावले उचलण्याची गरज आहे असे मला सांगावेसे वाटते.

महोदय, जनावरांना छावण्यातून उसाचे वाडे खायला दिल्यामुळे त्यांची तोंडे रक्तबंबाळ झाल्याचे सांगितले गेले. जनावरांच्या शरीरातील कॅल्शियम कमी झाल्यामुळे जनावरे व्यवस्थितपणे उभी राहू शकत नाहीत. दुधाळ जनावरांचे दूध देणे कमी होत आहे. दुधाळ जनावर आणि भाकड जनावरांना किती चारा द्यावा याचे वेगवेगळे नियोजन असावयास पाहिजे. या संदर्भात कोठे तरी नियोजन करण्याची गरज आहे. परंतु या बाबत एकत्र बसून चर्चा वा नियोजन केले जात नाही.

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून मला अपेक्षा होती की, त्यांनी ज्या-ज्या भागांचा दौरा केला त्या भागातील वस्तुस्थिती ते सांगतील. आमचे कार्यकर्ते अमुक ठिकाणी काम करीत आहेत असे ते सांगतील असे वाटले होते.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

राजकीयदृष्टया आपल्याला काही सांगावयाचे असेल, त्या भागातील परिस्थिती सांगावयाची असेल तर आपण ती सांगावी परंतु आपण चर्चा करताना जो दूरगामी दृष्टीकोन ठेवतो तशा प्रकारचे नियोजन करण्यासाठी काही सूचना करणे गरजेचे आहे असे मला वाटते. या ठिकाणी काही सूचना माझ्याही लक्षात आलेल्या आहेत. मी जालना जिल्ह्याचा दौरा केला. त्यावेळी मी जाफ्राबादला, भोकरधनला, दाणापूरला गेलो. दाणापूरला जे धरण आहे ते पूर्णपणे आटले आहे. जाफ्राबादच्या धरणामध्ये एक थेंब सुध्दा पाणी शिल्लक नाही. जाफ्राबादच्या धरणावरुन 50 गावांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होते. परंतु त्या धरणामध्ये एक थेंब सुध्दा पाणी शिल्लक राहिलेले नाही त्यामुळे त्या ठिकाणी भयानक परिस्थिती आहे. मी भोकरधनला गेलो. तेथील दुष्काळी भागाची पाहणी केली. मी धारणीला गेलो. या निमित्ताने मला एकच सांगावयाचे आहे की, हे सर्व जरी असले तरी या सदनामध्ये दूरगामी नियोजनाच्या दृष्टीकोनातून चर्चा व्हावयास पाहिजे आणि ती चर्चा करुन तशा प्रकारचे निर्णय राज्य सरकारने घ्यावेत अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, रोजगाराच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर जो रोजगार आज मिळतो त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. जनावरांच्या चाऱ्याच्या संदर्भामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. जे पैसे देतो ते वेळेवर पोहोचले पाहिजेत. बऱ्याच वेळा पैसे नसल्यामुळे टँकर बंद पडतात, कोठे मदत पोहोचत नाही. अशी परिस्थिती येऊ नये या दृष्टीकोनातून पावले उचलावयास पाहिजे. जालन्याच्या संदर्भामध्ये आमदार उपोषणाला बसले होते. त्यांनी जालन्याचा पाणीपुरवठा सुरु करा असे सांगितले. त्या ठिकाणचा पाणीपुरवठा सुरु करण्याच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत जाहीर केले परंतु त्याचे जे काही विजेचे बिल असेल ते कशा पध्दतीने माफ करता येईल या संदर्भात राज्य शासनाने निर्णय घ्यावा. कनेक्शन जोडण्याच्या संदर्भात सांगण्यात आले परंतु बिल माफीच्या संदर्भातील जो विषय अनुत्तरीत आहे त्याही संदर्भामध्ये बसून चर्चा करुन त्यातून मार्ग काढावा. उस्मानाबादला शासनाने मदत केली. त्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. पाटील यांनी उल्लेख केला. त्याबद्दल त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. ज्या भयंकर अडचणी आपल्या समोर आहेत त्यांचा मुकाबला करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

**पृ. शी.** : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या मंजूर केलेल्या मागण्या

**मु. शी.** : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या मंजूर केलेल्या मागण्या यासंबंधी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे निवेदन.

प्रा. फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करते.

( प्रेस - येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.विक्रम काळे )** : मंत्री महोदयांनी निवेदनाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित कराव्यात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता केलेल्या निवेदनामध्ये पुढील 3 महिन्यामध्ये निर्णय घेण्याचे जाहीर केलेले आहे. यापूर्वीही या प्राध्यापकांनी परीक्षांवर बहिष्कार घातला होता त्यावेळीही शासनाने काही गोष्टी मान्य केल्या होत्या. त्यामुळे त्यांनी परीक्षांवरील बहिष्कार मागे घेतला होता. परंतु त्यांची पूर्तता न झाल्यामुळे त्यांनी यावेळी पेपर तपासण्याच्या कामावर बहिष्कार घातला होता. आजही 3 महिन्यामध्ये मागण्यांबाबत विचार करण्याचे आश्वासन दिलेले आहे. पण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाप्रमाणे याही विषयाचे होऊ नये अशी अपेक्षा आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 3 महिन्यामध्ये निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांबाबतही माननीय उच्च शिक्षण मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

**तालिका सभापती** : त्याबाबत मंत्री महोदय स्वतंत्र निवेदन करतील.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ.शी.**: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती

**मु.शी.**: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिपकराव साळुंखे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, रामदास कदम, जयंत पाटील, राणा जगजितसिंह पाटील, सुभाष चव्हाण, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, सतीश चव्हाण, एम.एम.शेख, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री संदिप बाजोरिया, जयप्रकाश छाजेड, रामनाथ मोते, विनायक मेटे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंवतराव जाधव, किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु......

श्री.मनिष जैन (जळगांव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये दुष्काळासंबंधी चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जळगाव जिल्ह्याच्या 15 तालुक्यांपैकी 12 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झालेला आहे. जामनेर तालुक्यामध्ये डिसेंबर महिन्यामध्ये थंडी सुरु होती. त्याचवेळी मुंबईतही थंडीचे वातावरण होते. परंतु या काळात जामनेर तालुक्यात 60 गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु होता. त्यामुळे आमच्याही भागात दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे हे मला सांगावयाचे आहे. ही वस्तुस्थिती असताना आजही तेथील एकाही तालुक्यात किंवा गावात चाऱ्याची छावणी सुरु करण्यात आलेली आहे. शासनाचे असे म्हणणे आहे की, तेथून मागणी आलेली नाही.

गेल्या 8 दिवसात 6075 गावांमध्ये 587 गावांची वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे 2280 टँकर चालू होते त्यामध्ये 128 गावांची वाढ झालेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन....

राज्यातील 28000 गावापैकी 11500 गावामध्ये आज टँकर चालू आहेत. एखाद्या वर्षी पाऊस पडला नाही तर आरडा ओरडा होतो. 2005मध्ये दुष्काळ पडला, 2009मध्ये दुष्काळ पडला आणि आता 2013मध्ये दुष्काळ पडला. दर पाच-सहा वर्षांनी राज्यात दुष्काळ पडत आहे. मागील 15 वर्षापासून हे शासन सत्तेवर आहे. परंतु राज्यात दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी या शासनाने कोणतेही नियोजन केलेले नाही. या जगात जेवढे पाणी आहे त्यापैकी फक्त अडीच टक्के पाण्याचा आपण वापर करु शकतो. 97.50 टक्के पाण्याचा आपण वापर करु शकत नाही. 2.5 टक्के पाण्यापैकी 1 टक्का पाणी बर्फ स्वरुपात आहे. जे पाणी उपलब्ध आहे त्या पैकी फक्त 1 टक्का पाण्याचा आपण वापर करु शकतो. केवळ 0.40 टक्के पाणी पिण्यायोग्य आहे आणि 0.60 टक्के पाणी शेतीसाठी योग्य आहे.

सभापति महोदय, यह पानी एक जिंदगानी है. पानी को हिंदी भाषा में "पानी" कहते हैं, तमिल भाषा में पानी को "तणी" कहते हैं, बंगाली भाषा में पानी को "जॉल" कहते हैं, कन्नड भाषा में पानी को "नीर" कहते हैं, मराठी भाषा में पानी को "पाणी" कहते हैं, संस्कृत भाषा में पानी को "अमृत" कहते हैं, ग्रीक भाषा में पानी को "एक्वाप्योर" कहते हैं, फ्रेंच भाषा में इसे " ऑर" कहते हैं, अंग्रेजी भाषा में इसे "वाटर" कहते हैं, केमिस्ट्री (विज्ञान ) की भाषा में इसे "$H_2O$" कहते हैं. मुझे यहां पर यह भी कहना है कि आजकल पानी की राजनीति हा रही है. कई लोग बताते हैं कि फिल्मों में ऐसा दिखाया जाता है कि पानी के लिए तीसरा महायुद्ध होगा. काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की आता तिसरे महायुध्द हे पाण्यावरुन होईल. 34400 अरब रुपयांचा पाण्याचा व्यवसाय आहे. सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांना मी सांगू इच्छितो की, पाण्याच्या व्यवसायामध्ये खूप फायदा आहे.केबलचा व्यवसाय आता मागे पडत चालला आहे.

आपण आज मुंबईमध्ये बसलो आहोत. मुंबईमध्ये टबमध्ये आंघोळ करण्यासाठी 400 लिटर पाणी लागते, शॉवरखाली आंघोळ करण्यासठी 40 लिटर पाणी लागते आणि बादलीत पाणी घेऊन आंघोळ करण्यासाठी 20 लिटर पाणी लागते. पाणी हा जीवनाचा स्त्रोत आहे. शेतक-यांनी देखील पाण्याचा जपून वापर केला पाहिजे. परंतु पाण्याच्या वापराबाबत केवळ शेतक-याला दोषी धरता

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन....

येणार नाही. आपण अधिकारी आणि मंत्र्यांना का दोषी धरत नाही ? आता पर्यंत कोणत्या अधिका-यावर आपण कारवाई केलेली आहे, कोणत्या जिल्हाधिका-याला तुरुंगात टाकलेले आहे ? एक सन्माननीय सदस्य पाण्याच्या प्रश्नावर कोर्टातही गेले आहेत. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन कोणत्या ठोस उपाययोजना करणार आहे हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये स्पष्ट करावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:50

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी आणि सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये आणलेल्या दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती करु नका असे आपण सांगितले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी दुष्काळासंबंधी जी परिस्थिती सांगितली तिची पुनरावृत्ती मी करणार नाही. मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे भाषण शांतपणे ऐकत होतो. ते नियोजनावर भर देत होते. संपूर्ण महाराष्ट्राचे नियोजन झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

...नंतर श्री.गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

महोदय, याच विषयावर चर्चा होऊन निर्णय घेणाऱ्या माणसांगमध्ये नियोजनाचा अभाव आहे. त्यामुळे नियोजन व्यवस्थित झाले पाहिजे अशी अपेक्षा कोणी व्यक्त करीत असतील तर त्या बाबतीत मला आश्चर्य वाटते. नियोजनाचा अभावाचा दोषी कोण आहे याची माहिती या सदनाला तसेच महाराष्ट्रातील जनतेला कळणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या बाबतीत राजकारण कोणालाही करावयाचे नाही. राजकारण बाजूला ठेवावयाचे आहे, हे जरी सत्य असले तरी ज्या गोष्टीचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी केला की, मागच्या घटनेवरुन शिकून आपण पुढे जातो आहोत की नाहीत, तर या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, दूरगामी योजनेमध्ये आपण कुठे तरी शून्याकडे जात आहोत.

सभापती महोदय, मला या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेच्या अनुषंगाने सांगितले की, आता स्थलांतराच्या दिशेने हे सगळे प्रकरण सुरु झालेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांच्या बरोबर मनमाड, सोलापूर, बीड येथे जाण्याची संधी मला मिळाली. त्या ठिकाणी जाऊन दुष्काळा संबंधी माहिती घेतली. केज मधील कोल्हेवाडी असे गाव आहे. त्या गावाची लोकसंख्या 1800 एवढी आहे. त्या गावातील 1300 लोकांनी स्थलांतर केले असून 500 लोक त्या गावात रहात आहेत. तेथे 3 महिन्याचर लहान मुले ते 6 वर्षापर्यंतची मुले आणि त्यांचा सांभाळ करण्यासाठी आजी-आजोबा तेथे आहेत. ज्यांचा उपयोग नाही, जे स्वत:च्या पायावर उभे राहू शकत नाही, ते स्वत: काहीही कमवू शकत नाही अशा लोकांची वरात घेऊन कोठे जावयाचे म्हणून कोल्हेवाडीतील 1300 लोक, लहान मुले आणि आजी-आजोबा यांना सोडून एका हातपंपाच्या गावात स्थलांतरित झाले ही अतिशय दु:खाची गोष्ट आहे. पण या बाबतीत आज मार्ग काढतो आहोत. परंतु हा मार्ग कुठे तरी मलमपट्टी करण्यासारखा आहे. एका अर्थाने या सगळया समस्येवर ऑपरेशन्स करण्याच्या दिशेने विचार केला तर या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिसून येते. यात रिपीटेशनचा भाग सोडला तरी दुष्काळाचे परिणाम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष होतात. या बाबतीत सरकारने काय उपायोजना केली हे सरकारच्या उत्तरात अपेक्षित आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3M-2

ॲड.आशिष शेलार....

महोदय, दुष्काळाच्या परिणामावर ज्यावेळी जगभरात कोठेही चर्चा होते, त्यावेळेला त्याचा गोषवारा तीन पध्दतीने होतो. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये आम्हाला अशा उत्तराची अपेक्षा आहे की, आर्थिक, पर्यावरणात्मक आणि सामाजिक स्तरावर या दुष्काळामुळे काय परिणाम झाले आणि सरकार म्हणून या तिन्ही गोष्टींचे उत्तर काय शोधणार आहे ? या विषयावर नागपूरला चर्चा झाली. त्याही वेळेला पर्यावरणात्मक परिणामाबद्दल मी प्रश्न उपस्थित केले होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी उल्लेख केला की, पूर्वी जमिनीत 300 ते 400 फुटावर पाणी लागावयाचे. परंतु आता 1 हजार फूट जमिनीत खोलवर गेलो तरी पाणी मिळत नाही. याचा अर्थ कुठे तरी माती आणि जिऑलॉजिकल कंडीशनवर परिणाम झाला आहे. गेल्या कित्येक वर्षामध्ये दुष्काळावर उत्तर शोधण्यासाठी जिऑलॉजिकल सर्व्हे महाराष्ट्रात केला गेला नाही.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असे नमूद करण्यात आले आहे की, आपण छोटे छोटे सिमेंट बंधारे बांधणार आहोत. जलसंवर्धनाची कामे कृषी विभागाकडून होणार आहेत. कृषी विभागाच्या माध्यमातून करोडो रुपयांचे सिमेंट बंधारे बांधले जाणार आहेत. कृषी विभागात सिव्हील इंजिनिअर्स किती आहेत, याबाबतीत सांगू इच्छितो की, कृषी विभागात एकही सिव्हील इंजिनिअर नाही. आपण लाखो आणि करोडो रुपयांचे सिमेंट बंधारे बांधणार आहोत. त्या ठिकाणी सायंटिफीक वर्क होताना दिसून येत नाही. या सदनाचे सदस्य श्री.अमरीशभाई पटेल यांनी केलेल्या कामाचा आढावा माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी घेतला. या शासनाने खानापूर आणि शिरपूर पॅटर्नचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कृषी विभागाने एक सिमेंट बंधारा बांधला होता, त्या बंधाऱ्यास पोकलॅन्ड मशीनचा धक्का लागला आणि तो बंधारा धडाधड पडून गेला. कृषी विभाग सिव्हील इंजिनिअर विना बंधाऱ्यांच्या कामावर खर्च करीत आहे.

महोदय, आज आपण पर्यावरणात्मक स्थितीच्या बाबतीत भरभरुन बोलतो. महाराष्ट्र सरकारकडे 300 जिऑलॉजिस्ट आहेत. या 300 जिऑलॉजिस्टना इन्व्हॉल्व्ह करुन सिमेंट बंधारे कोठे बांधले पाहिजेत. ते डेड असलेल्या नाल्यावर बांधले पाहिजेत, सुकलेल्या नदीवर बांधले पाहिजेत की जेथे जिल्हाधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी सांगतात तेथे बांधले पाहिजेत या

3...



ABG/ D/ D/ MMP/ KTG/ प्रथम श्री.शिगम 16:55

ॲड.आशिष शेलार..

बाबतीत जिऑलॉजिस्टचे मत घेणे आवश्यक आहे. परंतु पूर्वी झालेल्या कामांमध्ये जिऑलॉजिस्टचा सहभाग कोठेही दिसून येत नाही. या ठिकाणी 1972 साली पडलेल्या भीषण दुष्काळाच्या बाबतीतील उल्लेख वारवांर केला जातो आहे. या देशात आणि राज्यात छोटे-मोठे असे एकूण 23 दुष्काळ पडलेले आहेत. या देशात 1972 नंतर 9 दुष्काळी परिस्थती निर्माण झाली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार..........

त्यामुळे थोडक्यात विचार मांडताना या 9 वेळा पडलेल्या दुष्काळाच्या माध्यमातून ज्या सूचना पुढे आल्या त्या सूचनांबाबत आपण एक तरी पाऊल पुढे टाकले आहे का, याबद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे. ज्या सहा आयोगांचा वारंवार उल्लेख केला जातो, त्या बर्वे आयोग, जैन आयोग, सुकथनकर समिती, राष्ट्रीय कृषी आयोग, सुरेश जैन आयोग, डॉ.सुब्रम्हण्यम समिती यांचा समावेश होतो. 1962 ते 1987 च्या काळात या सहा आयोगांनी शासनाला 13 निर्देशांक दिले. त्या महत्वाच्या 13 निर्देशांकामध्ये अवर्षण आयोग नेमावा ही मुख्य शिफारस होती. महाराष्ट्राने अवर्षणग्रस्त भागासाठी कृषी आयोग नेमला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मी शासनाला दोन महत्वाच्या सूचना करणार आहे.

सभापती महोदय, आज आपण पाहतो की, महाराष्ट्रातील जनप्रतिनिधी स्वत:चा आमदार निधी दुष्काळ निवारणासाठी देत आहेत, स्वत:चे वेतन देत आहेत. दूरदर्शन, वृत्तपत्र आणि चॅनेलच्या माध्यमातून याला प्रसिध्दी देण्यात येत आहे. मोठमोठ्या धर्मादाय ट्रस्ट व देवस्थानांनी दुष्काळ निवारणासाठी निधी द्यावा अशी शासनाने मागणी केली आहे. मी गेल्या महिन्यात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली होती. त्यानुसार मला अशी माहिती मिळाली की, महाराष्ट्रात काम करणाऱ्या ज्या मोठमोठ्या कंपन्या आहेत, त्यांच्याकडे 2500 कोटी रुपयांचा कंपनी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंड पडून आहे. हा निधी सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी वापरता येऊ शकतो. यासाठी शासनाने चांगले कार्यालय सुरु करण्याची, आयुक्तांची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे. या सर्व कंपन्यांनी माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाशी संपर्क साधून सी.एस.आर.निधी एन.जी.ओ.च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी खर्च करण्याची आवश्यकता आहे. हे करायचे असेल तर काही मूलभूत गोष्टी कराव्याच लागतील आणि त्याचा अहवाल देखील सादर करावा लागेल.

सभापती महोदय, Normalise difference vegetation index, Normalise difference weightness index, Normalise difference moisture index या गोष्टीबाबत अहवाल दिला नाही, अहवाल पब्लिश केला नाही तर 2500 कोटी रुपयांचा जो निधी आज पडून आहे, हा निधी कंपन्यांनी कुठे ना कुठे वापरावयाचा आहे, तो निधी महाराष्ट्रात जी सगळ्यात मोठी समस्या निर्माण झाली आहे त्यावरील उपाययोजनेसाठी वापरला जाणार नाही अशी स्थिती आहे.

..2..

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांसमवेत राज्यातील जनावरांच्या दोन-चार छावण्यांना भेट देण्याची मला संधी मिळाली. उत्सुकतेपोटी मी माहिती घेतली असता महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारची 4.5 ते 5 लाख जनावरे छावण्यांमध्ये आश्रयाला आलेली आहेत. जगभरामध्ये प्रत्येक प्राणी संग्रहालयाच्या माध्यमातून, प्राणी प्रोटेक्शन अभियानांतर्गत प्राणी संग्रहालयामध्ये साधारणपणे 7.5 लाख जनावरे आहेत आणि राज्यातील 12 जिल्हयांमधील छावण्यांमध्ये असलेल्या जनावरांची संख्या 4.5 लाख आहे. या विषयावर काम करणाऱ्या संस्था शहरी भागात आहेत. विशेषत: मुंबई, ठाणे आणि पुणे भागात असतील. या प्राणी मित्र संघटनांना सरकारने बैठक घेऊन आवाहन करण्याची आवश्यकता आहे. या संघटना या कामासाठी निधी खर्च करण्यास तयार आहेत. जनावरे कत्तलखान्याकडे पाठविली जात असतील तर त्यांना वाचविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अंतिम महत्वाची गोष्ट म्हणजे शासन भरभरुन मदत देत आहे. पाण्यासाठी, चाऱ्यासाठी पैसे दिले जात आहेत. रोजगार हमी योजनेच्या कामासाठी पैसे दिले जाणार आहेत. केंद्राकडून काही निधी येणार आहे. प्रत्यक्षात दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांच्या विवेचनातून हेच लक्षात येते की, दुष्काळी भागासाठी दिला जाणारा निधी पाणी, चारा याकरिता ज्या प्रमाणात पोहोचला पाहिजे त्या प्रमाणात पोहोचत नाही. या आवश्यक गोष्टी आहेत.

सभापती महोदय, माझ्या हातात 'Maharashtra Essential Services Maintenance Act' या कायद्याची प्रत आहे. प्राध्यापकांनी आंदोलन केले तर त्यांच्याविरुध्द मेस्मा लागू करु, परीक्षेचे पेपर तपासले नाहीत तर शिक्षकांविरुध्द मेस्मा लावू असे शासनाने जाहीर केले आहे. चारा पोहोचविणे, पाणी पोहोचविणे या इसेन्शियल ॲक्टिव्हीटीज नाहीत?

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय,पाणी पोहचविणे, चारा पोहचविणे ही इसेन्शिअल ॲक्टीव्हीटी नाही काय ? जे लोक चारा आणि पाणी पोहचविण्याचे काम करणार नाहीत त्यांच्यावर सेक्शन 3 आणि सेक्शन 7 खाली मेस्मा ॲक्ट अंतर्गत आपल्याला कारवाई करता येते. सेक्शन 11 खाली आपल्याला त्यांना अटक सुध्दा करता येते त्यामुळे माझी मागणी आहे की, या विषयाच्या संदर्भात शासन निर्णय घेत असतांना, शासन पैसे देत असतांना जो कोणी आपल्या कामात कुचराई करेल मग तो अधिकारी सचिव स्तरावरील असो किंवा जिल्हा स्तरावरील असो तो जर दोषी आढळून आला तर त्यांच्यावर सेक्शन 3,सेक्शन 11 अंतर्गत मेस्मा ॲक्ट खाली अटक करण्यात यावी.

सभापती महोदय, शासनाची डोळेझाक केली जात असेल, भूतदया दाखवली जात नसेल, एकावर अन्याय करुंन दुसऱ्याला फायदा दिला जात असेल तर मला असे वाटते की, महाराष्ट्रातील लोक कोर्टात गेल्याशिवाय राहण्ार नाही. त्यामुळे सीएसआर फंडसाठी, प्राणी मित्र संघटनांसाठी शासनाने भूमिका घ्यावी व जे कोणी अधिकारी दोषी आढळतील त्यांच्यावर मेस्मा ॲक्टखाली कारवाई करावी अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेच्या निमित्ताने करावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द येथेच पूर्ण करतो.

धन्यवाद.

------------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबई येथे झालेल्या पाच वर्षापूर्वीच्या अधिवेशनामध्ये मी ग्लोबल वॉर्मिंगच्या विषयावर चर्चा केली होती व या सभागृहात ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात पहिल्यांदाच चर्चा झाली होती. त्या चर्चेमध्ये येणाऱ्या काही वर्षामध्ये दुष्काळ पडेल अशी भितीही त्या चर्चेमध्ये व्यक्त केली होती व तो दुष्काळ सावरण्यासाठी आपले कोटी कोटी हात कमी पडतील अशी भीती व्यक्त केली होती.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळ पडणार आहे हे राज्य सरकारला माहिती नव्हते काय ? 925 million people in the world are going to be hungry. 90% of the people live in developing countries and out of them 50% are farmers." आपण जागतिक बँकेकडे कर्ज मागतो त्यावेळेस आपल्या पॉलीसी मेकर्सने जागतिक बँकच्या सूचना लक्षात घ्यावयास नको काय ? जागतिक बैंकेने सांगितले आहे की, 1990-2000 या वर्षामध्ये ॲग्रीकल्चरल ग्रोथ प्रत्येक वर्षी 3.5 टक्क्याने कमी होणार आहे.

सभापती महोदय, दुष्काळाचे नियोजन शासनाने 5 वर्षापूर्वीच करावयास पाहिजे होते. आता नियोजन करुन काही फायदा होणार नाही. आता जे काही करु ती केवळ मलमपट्टी असणार आहे. आपण अवकाळी पाऊस पडला तर मलमपट्टी करतो, तात्पुरती मदत देतो आणि तो विषय संपवून टाकतो. आंबा,संत्र्याचे पीक खराब झाल तर आपण मदत करतो आणि विषय तेथल्या तेथे संपवतो. परंतु जनक्षोभाचा आक्रोश तुम्हाला आम्हाला कधी तरी गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही हे आपण विसरु नका.

सभापती महोदय, आपण चारा छावण्या काढतो. आपण चारा छावण्याच्या संदर्भात म्हटले आहे की, "चारा छावण्यामध्ये किमान 500 मोठी जनावरे आणि अधिकत्तम 3000 जनावरे ठेऊ शकतो." अशी एक तरी चारा छावणी दाखवा की, जेथे 5 हजार जनावरे नाही. चारा छावण्यामध्ये कोंडवाडयासारखी जनावरे भरली जात आहेत. 5 हजार जनावरे एकेका चारा छावणीत आहेत. "चारा छावणीत जनावरांना अपघात झाल्यास किंवा नैसर्गिक, अनैसर्गिक मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांना शासनाकडून कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही" असे म्हटले आहे. "चारा छावणीमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांचा औषधोपचार स्वखर्चाने करावा" असेही म्हटले आहे. चारा छावणी चालकास प्रत्येक मोठया जनावरामागे 10 किलो वाळलेली वैरण किंवा 15 किलो ओला चारा, 1 किलो पशुखाद्य व किमान 60 लिटर पाणी देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

आज किती लिटरचा एक टँकर देण्यात येत आहे, एका चारा छावणीमध्ये किती जनावरे असतात व तेथे किती लोक राहतात ? जनावरां सकट पाणी पिणारे 5000 लोक असतात. एवढ्या लोकांना पाणी देणे कसे शक्य आहे ? म्हणून माझी सूचना आहे की, जनावरे चारा छावणीत आणण्यापेक्षा त्या त्या शेतकऱ्यांच्या दावणीला बांधलेली आहेत तेथेच त्यांना चारा व पाणी उपलब्ध करून द्यावे. कारण शेतकरी त्यांच्या बरोबरच राहतो. त्यामुळे शेतकऱ्याचा रोजगार बुडतो. पुन्हा शेतकरी कामाला कुठे जाणार आहे ? मी आष्टीला जाऊन आल्यामुळे हा सर्व जिवंत अनुभव सांगत आहे. त्यांनी सांगितले की, शासनाने आम्हाला दिवसाला 150 रूपये दिले तरी आमचे मायबाप सरकार आम्हाला खूप देत आहे असे आम्ही मानू.

आपण जनावरांना ऊसाचा चारा घालतो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी बरोबर सांगितले आहे की, ऊसाचा चारा खाल्ल्यामुळे जनावरांच्या बॉडीतील कॅल्शियम दिवसेंदिवस कमी होत जाते व फॉस्फरसचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे ती जनावरे एका वर्षाने दूध देईनाशी होतात. यासाठी त्यांना कॅल्शियम द्यावे लागते. ते आपण चारा छावणीमध्ये देत नाही. आपल्याला फक्त कॅल्शियमचे सॅशेट दाखवतात. ते जनावरांना दिले जात नाही.

जनावरांसाठी ओला चारा पाहिजे असेल तर तो मध्य प्रदेशात खूप मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. येथे पशु मित्र संघटनेचा उल्लेख करण्यात आला. अनेक जैन संस्था प्राणी वाचविण्यासाठी तयार आहेत. त्यांची मागणी एवढीच आहे की, मध्य प्रदेशातून आमच्या महाराष्ट्रात किंवा गुजरातहून महाराष्ट्रात चारा आणायचा असेल तर आम्हाला चारा रेल्वे मार्गे आणण्यासाठी केंद्र शासनाकडून परवानगी घेऊन द्यावी. तो चारा अडीच रूपयामध्ये आणून देण्यास ते तयार आहेत. या सर्व लोकांना मी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडे घेऊन यायला तयार आहे. आपण त्यांना परवानगी मिळवून द्यावी. अडीच रूपयामध्ये चण्याचा ओला चारा मिळत असेल तर आपली जनावरे वाचू शकतील. ती जनावरे दुभती सुद्धा राहू शकतील. आपण जर काहीच केले नाही तर मग काही वर्षांनी ही जनावरे वांझ होतील. अशाने शेतकरी कायमस्वरूपी मरून जाईल. हे दूरगामी परिणाम आहेत म्हणून शॉर्ट टर्म आणि लाँग टर्म मेझर्स आपल्याला घ्यावे लागतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

येथे पशु गणनेचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. आठवी पशु गणना सन 2002 मध्ये झालेली आहे. त्यानंतर एकही पशु गणना झालेली नाही. आता जी पशु गणना झालेली आहे त्याचा रिपोर्ट आलेला नाही. त्याची आकडेवारी अजूनही गुलदस्त्यात आहे. आजही जालन्यातील 90 टक्के जनावरांचे लसीकरण करण्यात आलेले नाही.

आपण टँकरने पाणी पुरवठा करतो. त्या पाण्यामध्ये फ्लोराईड असते. त्याने फ्लोरोसिस होऊ शकतो. हात पाय वाकडे होऊ शकतात. मी टीव्ही वर माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी साहेबांची मुलाखत पाहिली. ते कोणत्या तरी गावामध्ये गेले होते. त्यांनी सांगितले की, या पाण्याचे नमुने घेऊन आम्ही सगळीकडे पाठवू आणि रिपोर्ट घेऊ. पाण्याच्या स्त्रोतामध्ये प्रॉब्लेम असेल तर तेथील पाणी आणणार नाही. जर आपण अशा प्रकारचे पाणी लोकांना टँकरद्वारे पाजत असाल तर आपण त्यांना जिवंत मारत आहात हे लक्षात घ्यावे. आपण त्यांना अनेक आजार देत आहात. त्यांना आजारांपासून वाचवायचे असेल, येणारी पिढी वाचवायची असेल तर राज्य शासनाने तात्पुरती मलमपट्टी न करता कायम स्वरूपी उपाययोजना करावी. या पुढे शासनाने येत्या पाच वर्षात दुष्काळ पडेल हे गृहीत धरून नियोजन करावे असे मला सुचवावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आपण मला दुष्काळाच्या संदर्भातील चर्चेमध्ये बोलण्यासाठी संधी दिल्या बद्दल मी आपला आभारी आहे.

या सभागृहामध्ये दुष्काळावर सविस्तर चर्चा झालेली आहे. यंदाचा दुष्काळ हा 1972 पेक्षा अतिशय भीषण आहे. 1972 नंतर देखील दुष्काळ पडलेला आहे. सन 2002-2003 मध्ये पश्चिम महाराष्ट्रातील सातारा-सांगलीमध्ये दुष्काळ पडला होता. आज जी परिस्थिती आहे तशी 7-8 वर्षापूर्वी होती. या दुष्काळामुळे जनावरांना जगवण्याचे फार मोठे संकट आपल्या समोर उभे राहिलेले आहे. अनेक छावण्यांमध्ये लाखो जनावरे आहेत. त्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा देखील झालेली आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे...

मराठवाड्यातील काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मराठवाड्यात जनावरांच्या छावण्या कमी आहेत आणि पश्चिम महाराष्ट्रात जनावरांच्या छावण्या जास्त आहेत. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिती वेगळी आहे. पश्चिम महाराष्ट्रातील संस्थांनी मग त्यामध्ये बँक असेल वा अन्य संस्था असेल त्यांनी स्वत: चारा छावण्या सुरु केलेल्या आहेत. चारा छावणीसाठी शासनाकडून 80:40 असा दर मिळत होता. आता 60:30 असा दर दिला जातो. दोन दिवसांपूर्वी आमच्या भागामध्ये माननीय पवार साहेबांचा दौरा झाला त्यावेळी आम्ही मागणी केली की, या दरामध्ये जनावरे जगविणे अवघड आहे तेव्हा हा दर वाढवून द्यावा. परंतु यासाठी केंद्र सरकारने पैसे वाढवून दिले असे आम्हाला समजते.

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. आज अनेक दुष्काळी भागात टँकरच्या माध्यमातून पाणी पुरविले जात आहे. महाराष्ट्रामध्ये जवळपास दोन हजार टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे 200 इंच पाऊस पडतो तर खटाव आणि माण तालुक्यामध्ये 15 इंच पाऊस पडतो. सातारा जिल्ह्यातील खटाव, माण, कवठेमहाकांळ या तालुक्यांमध्ये सलग दुसऱ्यांदा दुष्काळ सुरु आहे. त्या ठिकाणी कोठून पाणी पुरवठा करावा हा प्रश्न आहे. काही ठिकाणी तर 50-100 कि.मी.अंतरावरुन पाणी आणावे लागत आहे. परंतु अशाही परिस्थितीत दुष्काळी भागात पाणी पुरवठा करण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, 1972 च्या दुष्काळामध्ये 50 लाख लोक काम करीत होते. या दुष्काळामध्ये चार-पाच लोक काम करीत आहेत. त्याचे कारण म्हणजे रोहयोच्या कामावर 165 रुपये मजुरी मिळते. केरळ राज्यामध्ये हीच मजुरी 300 रुपये आहे. अन्य ठिकाणी काम केल्यास दिवसाला 200 ते 250 रुपये मिळतात. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, रोहयोवरील मजुरी वाढविण्यात यावी.

सभापती महोदय, आपण पाणी साठविण्यासाठी सिमेंटचे बंधारे बांधतो, शेततळी घेतो. परंतु दुष्काळामुळे हे बंधारे आणि शेततळी कोरडी पडली आहेत. तेव्हा त्यातील गाळ काढण्याचे काम रोहयोच्या माध्यमातून किंवा शासनाने स्वत: केले पाहिजे जेणेकरुन गाळामुळे तेथील जमीन सुपीक होईल आणि पाण्याची खोली देखील वाढेल. तेव्हा याचा शासनाने विचार करावा.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे...

सभापती महोदय, ज्या ठिकाणी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी जाहीर झालेली आहे तेथे दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. शासनाने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पीक कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, बँकांच्या व्याजाचा दर चार टक्के आहे. परंतु कर्जाचे पुनर्गठन केल्यास व्याजाचा दर 13 टक्क्यांवर जाणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे.

सभापती महोदय, जे कायम स्वरुपी दुष्काळी भाग आहेत त्यामध्ये मराठवाड्यातील 87 तालुके आहेत तर पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली या जिल्ह्यातील खटाव, माण, कवठेमहाकांळ, जत या सारखे तालुके आहेत. या दुष्काळी भागांसाठी शासनाने वेगळा विचार करावा. 1972 च्या दुष्काळामध्ये रोजगार हमी योजनेसाठी शासनाने काही टॅक्स लावले होते आणि त्या निधीच्या माध्यमातून ती योजना सुरु झाली होती. त्या योजने प्रमाणे कायम दुष्काळी भागातील पाण्याच्या योजना पूर्ण करण्यासाठी टॅक्स लावावा अशी सूचना आहे. अशाप्रकारे कायम स्वरुपी दुष्काळी भागासाठी कायम स्वरुपी पिण्याचे पाणी देण्यासाठी आपण प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, काही ठिकाणी दुष्काळी भागाला लिफ्टद्वारे पाणी दिले जाते. आपण सांगोला तालुक्याचा विचार केल्यास त्या ठिकाणी पाच-सहा ठिकाणी पाणी लिफ्ट करावे लागते. त्यामुळे वीज बिल फार मोठ्या प्रमाणावर भरावे लागणार आहे. आज वीज पाण्यावर झाली काय, औष्णिक झाली काय किंवा अणुऊर्जेवर झाली काय, विजेचा दर सर्व ठिकाणी समान आहे. तेव्हा पाणीपट्टीचा दर देखील सर्व ठिकाणी समान लावावा अशी विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीवर गेल्या दोन दिवसांपासून चर्चा सुरु आहे. या चर्चेच्या माध्यमातून अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना आणि आपली मते व्यक्त केलेली आहेत.

महोदय, या दुष्काळी परिस्थितीमध्ये आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने अधिक गांभीर्याने काम करावे अशाही भावना या ठिकाणी व्यक्त केल्या गेल्या. या ठिकाणी सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार उपस्थित आहेत. महोदय, दुष्काळी भागात काम करण्याची भूमिका असताना अनुशेषाच्या माध्यमातून काही अडचणी येत असतात. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, कोकण या भागांच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मला वाटते त्या पेक्षा दुष्काळात अडकलेल्या तालुक्यांना, जनावरांना, माणसांना मदत करण्यासाठी मोठ्या मनाने एकत्रितरित्या काम करण्याची भूमिका घेतली पाहिजे. आज छावण्यांमध्ये अनेक जनावरे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, छावण्यांतील जनावरांना खाद्यामध्ये किती प्रोटीन्स, किती मिनरल्स दिले पाहिजे. जनावरांचा भाकड काळ वाढू नये म्हणून डॉक्टरांनी काही बाबी मांडल्या, त्या बाबत विचार करणे आवश्यक आहे. महोदय, अनेकांचा संसार पशुधनावर चालतो. परंतु त्यांना 10 दिवसांनी पेमेंट मिळते. त्यांच्या घरात तेल, मीठ पशुधनामुळे येते. त्यामुळे खऱ्या अर्थाने पशुधन जगविण्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

महोदय, जलसंधारणाच्या माध्यमातून असेल, इरीगेशन किंवा ड्रीपच्या माध्यमातून असेल या संदर्भातील अवेअरनेस शेवटच्या माणसांपर्यंत नेऊन खऱ्या अर्थाने काम करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन भविष्यात असा प्रसंग आला तर त्याला समोर जाता येईल. सन्माननीय सदस्य श्री.घार्गे यांनी उल्लेख केला की, दुष्काळी महामंडळाची निर्मिती करुन त्या अंतर्गत असलेल्या तालुक्यांमध्ये इरीगेशनच्या योजना सुरु करणे गरजेचे आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

महोदय, मी सुध्दा या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो की, दुष्काळी महामंडळाची स्थापना लवकरात लवकर करावी. जनावरांसाठी छावण्या सुरु करण्यात आलेल्या आहेत. सर्वांची मागणी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील.....

आहे की, जनावरांमागे देण्यात येणारी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वर्ग करावी. असे केले तर खरोखरच चांगले होईल. सर्व शेतकरी एकत्र मिळून चारा आणतील आणि जनावरांना एकत्रितपणे सांभाळू शकतील. तसेच बंधारे, ड्रीप इरीगेशनची सक्ती करुन किंबहुना सरकारने ड्रीपच्या अनुदानाचा वाटा वाढवून आवश्यक त्या गोष्टी कराव्यात अशी मी विनंती करतो. सर्व सन्माननीय सदस्यांची भूमिका लक्षात घेऊन या बाबत उपाययोजना कराव्यात अशी मी विनंती करतो व माझे भाषण येथेच थांबवितो.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, घाईघाईने मुद्दे मांडत असताना अगोदरच्या मुद्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न करते. मला वाटते या ठिकाणी भाषण करण्यापूर्वी रिकामा हंडा सोबत आणला असता तर पुरे झाले असते. अगोदरच्या वक्त्यांनी विचार मांडल्यामुळे आता या दुष्काळी परिस्थितीचे जास्त विश्लेषण करण्याची आवश्यकता राहिली नाही, असे मला वाटते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना माझे मुद्दे मोर्चातून सांगण्याऐवजी सभागृहातून सांगण्याची मला या निमित्ताने संधी मिळाली आहे..

**उपसभापती** : मला वाटते आपल्याकडे लेखी मुद्दे असतील तर ते दिले तरी चालतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, आपल्या सूचनेबद्दल मी आभारी आहे. परंतु मला लेखी देण्याऐवजी माझे मुद्दे मांडणे आवश्यक आहे. शिवसेनेचे पक्ष प्रमुख माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांची जालन्याला सभा होती. त्यासाठी मी तयारी करीत होते. आम्ही इतर भागात सुध्दा दौरे केले आहेत. बीड जिल्ह्यातील शिरुर-कासार या पंचायत समितीमध्ये शिवसेना-भाजपाची सत्ता आहे. त्या ठिकाणी दौऱ्याच्या निमित्ताने तेथील पंचायत समिती सदस्यांनी मला बोलाविले होते. त्यांनी दोन निरीक्षणे समोर ठेवली. त्यांचे म्हणणे होते की, शिरुर-कासार पंचायत समिती विरोधी पक्षाची असल्यामुळे आमची खूप कोंडी होते. रोजगार हमी योजनेच्या कामाची किंवा टँकरची मागणी करुनही ती पूर्ण होत नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

इतकेच नव्हे तर शिरुर कासार गावाची जी पाण्याची योजना आहे ती संपूर्ण सदोष झालेली आहे. त्यामुळे ते पैसे वाया गेलेले आहेत. इतकेच नव्हे तर चार सर्कलपैकी आमदार श्री. धस आणि श्री. क्षीरसागर यांचे मतदारसंघ सोडून जे सर्कल आहेत त्या ठिकाणी बोअरवेल किंवा पाण्याच्या योजनांबाबत दुजाभाव होतो अशी त्यांची एक महत्वाची तक्रार होती. तेथील शेतकऱ्यांनी आणि तहसीलदारांनी मला असे सांगितले की, 52 हजार लोक स्थलांतरित झालेले आहेत. ऊसतोड कामगारांच्या बरोबर हे शेतकरी पुणे, पिंपरी-चिंचवड या ठिकाणी जात आहेत.

काही लोकांना चारा छावण्यांवर जाऊन राहावे लागते. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झालेला आहे. गावामध्ये म्हातारी माणसे, छोटी मुले आणि महिलाच राहिलेल्या आहेत कारण स्थलांतराचा ओघ वाढण्याची शक्यता आहे. या चारा छावण्यांमध्ये जनावरांबरोबर घरातील एका माणसाला ठेवणे भाग पडते त्यामुळे गुरांबरोबर ती माणसांची सुध्दा छावणी झाल्यासारखी परिस्थिती होते. म्हणून त्यांनी अशी मागणी केलेली आहे की, त्यांच्या गावामध्ये किती जनावरे आहेत हे बघून जर त्यांना गावामध्ये थेट अनुदान मिळाले तर स्थलांतर रोखण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल. बारा महिन्यांची वीज बिले सरकारने माफ करावीत. शेतीला पाणी नसताना शेतकऱ्यांना वीज बिले आकारली जात आहेत.यामुळे याबाबत त्यांची मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.

जालना शहरामध्ये जवळजवळ तीन आठवड्याने पाणी येते. ज्या ठिकाणी सत्तासंघर्ष आहे त्या ठिकाणी आम्हाला मुद्दाम डावलले जाते अशी भावना लोकांच्या मनामध्ये येते. बीड जिल्ह्यामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री आणि इतर मंत्री नंतर दौरा करणार होते पण त्या ठिकाणी राष्ट्रवादीच्या आणि काँग्रेसच्या कोणकोणत्या आमदारांच्या मतदारसंघामध्ये भेट द्यावयाची याची जाहीर चर्चा चालू होती. जर दुष्काळामध्ये राजकारण होऊ द्यायचे नसेल तर विरोधी पक्षाचे जरी आमदार असले तरी त्यांच्या मतदारसंघांना सुध्दा मंत्री महोदयांनी भेटी दिल्या पाहिजेत. कोण कोणत्या पक्षाचा आमदार आहे हे बघून सन्माननीय मंत्र्यांनी भेटी देणे अयोग्य आहे. बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. केंद्रेकर यांना बदलण्यावरुन नंतर जो सत्तासंघर्ष झाला तो अत्यंत दुर्दैवी आहे. चांगले काम करणारे जे अधिकारी आहेत त्यांच्यासाठी सहकार्याची भूमिका असली पाहिजे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

रोजगार हमी योजनेच्या संदर्भात लोकांनी सांगितले की, प्रस्ताव पाठवून सुध्दा आमच्याकडे काम निघाले नाही. काम शेल्फवर आहे असे सांगण्यात आले. सातारा जिल्ह्यामध्ये फलटणजवळ तरडगाव आहे. त्या ठिकाणी मी भेट दिली. त्या ठिकाण्ी चारा छावणी होती. त्या ठिकाणी 85 वर्षाची म्हातारी भेटली. तिने सांगितले की, जनावरांजवळ थांबायला कोणी घरात नाही म्हणून मी आलेली आहे. तरडगावच्या संरपंच श्रीमती काशिबाई झुंजार यांनी लोणंद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली आहे की, फलटण पंचायत समितीचे माजी सभापती श्री. वसंतराव गायकवाड आणि तरडगावचे माजी सरपंच यांनी गावच्या पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य पाईपलाईनला होल पाडून तेथे चार इंच बिडाची पाईपलाईन बसवून ती स्वत:च्या विहिरीत सोडलेली आहे. 1997 पासून स्वत: पूर्वीचे सरपंच पाण्याची चोरी करीत आहेत. त्यामुळे त्याबाबत गुन्हा दाखल करण्याची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, वेळ कमी असला तरी पश्चिम महाराष्ट्र असो, मराठवाडा असो, विदर्भ असो किंवा अन्य गाव असो या सर्व ठिकाणी लक्ष देत असताना पुणे जिल्ह्यामध्ये वरसगाव आणि टेमघर या दोन्ही धरणांचा 2007 मध्ये सेफ्टी अँड हेल्थ स्टेटस अहवाल तयार केला होता. त्यामध्ये या धरणांमधून गळती होताना दिसते. या गळतीकडे दुर्लक्ष का होते याबाबत पुण्यातील संघटनांनी मागणी केलेली आहे. त्यामध्ये स्वत: शासनाने लक्ष घालावे. त्याचबरोबर छोट्या 36 जलविद्युत प्रकल्पांची कामे रेंगाळलेली आहेत. बारामती निरा डाव्या कालव्यातून सुध्दा पाणी गळती होत आहे. बारामती तालुक्यात हजारो लिटर पाणी वाया जाते अशा प्रकारची माहिती 13.2.2013 ला कार्यकर्त्यांकडून आलेली आहे. ज्या भागांमध्ये रोजगार हमी योजनेची कामे चालू करणे अपेक्षित आहेत ती कामे 70 टक्के अपूर्ण आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दुष्काळावरील चर्चा होत असताना शिवसेनेने काय केले असा प्रश्न विचारला जातो. जालन्याच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये श्री. अर्जुन खोतकर यांनी चारा छावणी सुरु केलेली आहे.

**उप सभापती** : मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी शिवसेनेने काय केले हे सर्व सांगितले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हे सांगणे गरजेचे आहे. मी एक छोटे उदाहरण देते. मी तरडगावचे उदाहरण दिले. मी शिरुर कासारचे उदाहरण दिले. मी स्पेसिफिक उदाहरणे दिलेली आहेत त्या संदर्भात शासनाने उपाययोजना करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, 1972 पेक्षाही अतिशय भयानक असा दुष्काळ आपल्या राज्यामध्ये पडलेला आहे. राज्य सरकारने या दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन अनेक प्रकारे चांगल्या उपाययोजनांची अंमलबजावणी या राज्यामध्ये सुरु केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

म्हणून मी राज्य सरकारचे प्रथम अभिनंदन करीन. 1972 साली पडलेल्या दुष्काळामध्ये अन्नधान्याचा तुटवडा पडला होता. आता पिण्याचे पाणी व चाऱ्याचा तुटवडा निर्माण झालेला आहे.

राज्याची 17.5 ते 18 टक्के सिंचन क्षमता आहे. देशाची 45 टक्के सिंचन क्षमता आहे. काही राज्यांची तर 80 टक्के सिंचन क्षमता आहे. म्हणून मी कायम सूचना करीत असतो की, जे कायम दुष्काळी तालुके आहेत, त्यांच्यासाठी कायमचे नियोजन व उपाययोजना कराव्यात. कवठेमहांकाळ, सांगोला, आटपाडी, जत, तासगांव अशा तालुक्यांसाठी अगोदर नियोजन केले असते तर त्या भागातील दुष्काळाची तीव्रता कमी जाणवली असती. उप मुख्यमंत्री महोदयांनी आमच्या भागासाठी भरीव निधी दिला आहे. त्यामुळे म्हैसाळचे पाणी कवठेमहांकाळ व जत या तालुक्यांपर्यंत जाऊन पोहोचले. म्हैसाळ, टेंभू व ताकारी या योजनांसाठी भरीव निधीची आवश्यकता आहे.

ढालगाव सर्कलची आम्ही मागणी केलेली आहे. परंतु अजूनही त्या योजनेसाठी सर्व्हे झालेला नाही. कालच मंत्री महोदयांनी सर्व्हे करण्याचे आश्वासन दिलेले आहे. सर्व्हे करण्यासाठी 4 वर्षे लागतात हा कालावधी जास्त आहे. शासनाने मागे पडलेली कामे गांभीर्याने पूर्ण केली पाहिजेत. टेंभू योजनेच्या माध्यमातून 16 गावांना ग्रॅव्हीटीने पाणी जाणार आहे आणि तेथील गावांचा पिढ्यान्पिढ्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. आजही त्या गावात टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. तेथील नरेगाची कामे चांगल्या प्रकारची झालेली नाहीत. ती कामे केवळ कागदोपत्री आहेत, कोणतीही यंत्रणा काम करण्यासाठी तयार नाही. म्हणून त्याच्या अटी शिथिल करणे आवश्यक आहे. निकष बदलण्याची आवश्यकता आहे. स्थानिक विद्यार्थ्यांनाच सवलती दिल्या जातात, पण परगावातील विद्यार्थी तेथे शिकत आहेत त्यांना सवलती मिळत नाहीत. म्हणून दुष्काळी भागातील सर्व विद्यार्थ्यांना सवलती देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दुष्काळी भागातील पशुधन वाचविणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. गाई, म्हशी व बैलांच्या चारा छावण्यांमध्ये नियोजन केलेले आहे. पण शेळ्या व मेंढ्यांसाठी नियोजन केलेले नाही. 130 लाख शेळ्या व 40 लाख मेंढ्या या राज्यात आहेत, त्यांचे कसलेही नियोजन करण्यात आलेले नाही. या शेळ्या मेंढ्यांवर लाखो कुटुंबे जगत आहेत. शेळ्या मेंढ्या

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.रमेश शेंडगे....

कत्तलखान्याकडे चालल्या आहेत, परराज्यात चालल्या आहेत. मेंढपाळांच्या कुटुंबाचे प्रश्न बाजूला ठेवू पण आज मटणाचे दर एका किलोसाठी 380 ते 400 रुपयांपर्यंत गेलेले आहेत. शेळ्या मेंढ्या नेस्तनाबूत झाल्या तर मांसाहार करणारे लोक काय खाणार ही सुध्दा मला एक चिंता आहे. म्हणून मी शेळ्या व मेंढ्याबाबत शासनाला विनंती करतो की, शासनाने वाघार घालून त्यांना जगवावे.

कवठेमहांकाळ तालुक्यातील 40 गावे पाण्यापासून वंचित आहेत. चारा छावणीमध्ये 15 किलो चारा दिला जात नाही. तेथे 10 ते 12 किलो चारा दिला जातो. कमी चाऱ्यामुळे जनावरांचे पोट भरत नाही. म्हणून 15 किलो ऐवजी 20 किलो चारा दिला जावा. चारा छावण्या चालविण्यासाठी कोणतीही संस्था तयार होत नाही. त्याचे निकष बदलले पाहिजेत. काही राज्यात शासन स्वत: चारा छावण्या चालवित आहे. उस्मानाबादला चारा छावण्या चालविण्यासाठी संस्था पुढे येत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये शासनाने स्वत: चारा छावण्या चालवून मुक्या जनावरांचे व शेतकऱ्यांचे हाल दूर करावेत अशी मी विनंती करतो. दुष्काळाचे निवारण करण्यासाठी आपण आपला निधी दिला आहे. मंत्री महोदयांनी, सन्माननीय सदस्यांनी, सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निधी दिलेला आहे. त्या सर्वांचे मी आभार मानतो. राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने गरीब विद्यार्थ्यांना 2-2 हजार रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्याबद्दल आमच्या पक्षाचे खजिनदार व सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे आभार मानतो. मला बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपलेही आभार मानतो आणि या ठिकाणी थांबतो.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या दुष्काळावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी आपणा सर्वांसमोर उभा आहे.

सभापती महोदय, राज्यात पडलेल्या दुष्काळी परिस्थितीवर काल पासून चर्चा सुरु झालेली आहे. आपले अर्थसंकल्पीय अधिवेशन 11 तारखेला सुरु झाले आणि लगेच 12 तारखेला दुष्काळाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु झाली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी हा विषय दिलेला होता म्हणून विषयाचे गांभीर्य लक्षत घेऊन तातडीने दोन दिवस आपण चर्चा केली. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या 21 सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपापले विचार मांडले. राज्यात काय परिस्थिती आहे, त्या परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य सरकारने कोणते निर्णय घेतले पाहिजेत हे त्यांनी सांगितले. काही बाबतीत थोडीशी टीकाटिपणी झाली. 1972च्या दुष्काळाशी तुलना करुन या विषयावर सर्वांनी आपल्या संवेदना व्यक्त केल्या. राज्यामध्ये अनेक ठिकाणी पाण्याचे भीषण दुर्भिक्ष्य निर्माण झालेले आहे. राज्यातील जनतेला दुष्काळाच्या झळा कशा कमीत कमी पोहोचतील यादृष्टीने शासन विविध माध्यमातून प्रयत्न करीत आहे. शासनाचे हे प्रयत्न या चर्चेच्या माध्यमातून सभागृहासमोर आणि पर्यायाने राज्याच्या जनतेसमोर आणण्याची संधी दोन्ही बाजूच्या माझ्या सहका-यांनी मला दिली त्याबद्दल मी दोघांनाही मनापासून धन्यवाद देतो.

या चर्चेमध्ये अनेक मान्यवरांनी आपापली मते व्यक्त करीत असताना सरकारवर अशी टीका केली की, इतकी वर्षे राज्यकर्ते म्हणून आपण काम करीत असताना देखील दुष्काळ का पडतो. खरे म्हणजे यामध्ये राजकारण आणू नका असे आवाहन या देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांनी केले होते. ज्या दिवशी चहापानाचा कार्यक्रम होता त्या दिवशी प्रेस कॉन्फरन्स घेऊन राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील असे आवाहन केले होते. ज्या ज्या वेळी या राज्यामध्ये नैसर्गिक संकटे आली मग ती दुष्काळाची असतील, गारपीटीची असतील, अतिवृष्टीची असतील, भूकंपाची असतील, जेव्हा जेव्हा संकटे आली त्या त्या वेळी त्या संकटांना आपण सर्वांनी मिळून सामोरे गेलो आहोत. राजकीय मतभेद असू शकतात.

काल स्व. यशवंतराव चव्हाण यांची 100वी जयंती झाली. लवकरच महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीमध्ये जन्मशताब्दी सोहळयाच्या समारोपाचा कार्यक्रम आम्ही घेत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. अजित पवार...

त्यांनी राज्याला दिशा देत असताना राज्याच्या विकासावर दूरगामी परिणाम होतील असे निर्णय घेतले. त्यानंतर स्व. वसंतराव नाईक, स्व. वसंतदादा पाटील यांचाही उल्लेख करण्यात आला. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी देखील या राज्याचे चार-चार वेळा मुख्यमंत्री पद सांभाळत असताना राज्याचा सर्वांगीण विकास कसा होईल ही भूमिका सातत्याने डोळयापुढे ठेवून निर्णय घेण्याचे प्रयत्न केले. या सर्व बाबी घडत असताना एक गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, कोणीही राज्यकर्ते असले तरी आपल्या कारकीर्दीमध्ये अशा प्रकारे दुष्काळाचे सावट यावे असे कुणालाही वाटत नाही. मागील साडेचार वर्षे भाजप-सेना युतीच्या कारकीर्दीमध्ये आम्ही विरोधी पक्षामध्ये बसत होतो. त्यावेळी महाराष्ट्र टँकरमुक्त करण्याबाबत चर्चा झाली. पण महाराष्ट्र टँकर मुक्त झाला नाही. कारण आपण एखादा पाण्याचा सोर्स बघितला तर लोकसंख्या वाढल्यामुळे तो सोर्स अपुरा पडतो. मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती अशी अनेक शहरे प्रचंड वेगाने वाढत आहेत. तेथील पाण्याचे सोर्स आटत आहेत. युतीच्या शासनाने त्यावेळी काय केले असा दावा मी करणार नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

शेवटी एकमेकाच्या उखाळया-पाखाळया काढून, उणी-धुणी काढून दुष्काळाचा प्रश्न सुटणार नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

महोदय, आम्ही वेगवेगळया ठिकाणी दौरे करीत असतो. आतापर्यंत या सरकारने काय केले अशा प्रकारचे आरोप करण्यात आले. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ग्लोबल वॉर्मिंगचे संकट होते, ते सरकारला कळले नाही काय ? जगात एकंदर काय परिस्थिती चाललेली आहे या विषयी सगळयांना माहिती होत असते. आम्ही देखील असे म्हणावयाचे काय की, गुजरात राज्यात अनेक वर्षापासून एकच व्यक्ती मुख्यमंत्रीपदी कार्यरत आहे. गुजरात राज्यातही दुष्काळ पडलेला आहे. त्यात गुजरातच्या मुख्यमंत्र्यांचा दोष आहे काय ? पाऊसच पडला नाही तर कोणीही कर्तृत्ववान मुख्यमंत्री असला तरी तो दुष्काळ थांबवू शकत नाही. राज्यातील पाण्याचे साठे साधारणत: जुलै अखेरपर्यंत कसे पुरतील अशा प्रकारचे नियोजन पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत करीत असतो. शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या बाबतीत करीत असतो. सध्या पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील दुष्काळावरील चर्चेच्या अनुषंगाने काही मुद्दे सभागृहात उपस्थित केलेले आहेत. देशात महाराष्ट्राने प्रथमच हेड टू टेल पर्यंत समन्यायी पाणी वाटप करण्यासंबंधीचा कायदा केला. हा कायद्याच्या बाबतीत अनेक वर्षे चर्चा झाली. या संदर्भात सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना एकत्रित घेऊन देशात पहिल्यांदा अशा प्रकारचा कायदा करणारे पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्राकडे बघितले जाते. यापूर्वी या राज्यात अनेक मुख्यमंत्री होऊन गेले. त्यांचे या ठिकाणी कौतुक केले गेले. पहिले पाणी पिण्यासाठी, दुसरे पाणी उद्योगधंद्यासाठी आणि तिसरे शेतीसाठी असे धोरण होते. परंतु आम्ही ते धोरण बदलले काय ? ते धोरण आम्ही बदलले नाही. आम्ही 1972 चा दुष्काळ बघितला, त्यानंतर अनेक दुष्काळ बघितले. परंतु पूर्वीचे धोरण बदलले नव्हते. परंतु आता या आघाडीच्या सरकारने धोरण बदलले आणि पहिले पाणी पिण्याकरिता, दुसरे पाणी शेतीकरिता आणि तिसरे पाणी उद्योगधंद्यांकरिता अशा प्रकारचे धोरण आणले. आम्ही एकंदरीत अनुभव लक्षात घेतल्यानंतर लक्षात आले की, राज्यातील बळीराजाकडे प्रथम लक्ष दिले पाहिजे. त्यातून हे धोरण अस्तित्वात आणले. बिगर सिंचनाकरिता पाणी द्यावयाचे असल्यास तो विषय मंत्रिमंडळासमोर ठेवला जातो आणि मंत्रिमंडळाने त्या विषयाला मान्यता दिल्यानंतर बिगर सिंचनाकरिता पाणी दिले जाते. 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

सभापती महोदय, मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी अशीही भूमिका मांडली की, या राज्यात पाण्यासाठी भांडणे होणार आहेत, पाण्यासाठी युध्द होण्याची शक्यता नाकारता येत नाही असेही मत या ठिकाणी मांडले गेले. आज बांगला देश आणि भारत यांच्यामध्ये पाण्याच्या बाबतीत वाद चालला आहे. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश यांच्यात पाण्याच्या संदर्भात चर्चा करीत असताना वेगवेगळे प्रसंग उद्‌भवतात. मला आठवते की, या सभागृहामध्ये माजी मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ दिल्ली येथे माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांना गोदावरीचा बाभळी बॅरेज झाला पाहिजे म्हणून भेटावयास गेले होते. बाभळी बॅरेजचे काम झाले पाहिजे अशी आमची मागणी होती. सदर बॅरेज होऊ नये अशी आंध्र प्रदेश राज्याची मागणी होती. महाराष्ट्रातील पाणी महाराष्ट्रातील जनतेला मिळाले पाहिजे अशी आमची सातत्याची मागणी होती. या बाबतीत सुप्रीम कोर्टात सुदैवाने महाराष्ट्राच्या बाजूने निकाल लागला. त्यानंतर बाभळी बॅरेज पूर्ण झाला व तो बॅरेज किती फायद्याचा ठरला हे एकंदरीत राज्यातील सगळया जनतेला कळून चुकले असेल.

महोदय,अनेक वेगवेगळया प्रकारचे निर्णय वेळोवेळी सरकारने घेतलेले आहेत. कधी कधी आपण शेजारधर्म या नात्याने पाणी देण्याचे सहकार्य करतो. दुधगंगेच्या पाण्याची कर्नाटक राज्याला गरज लागली तर तेथील पाणी त्यांना उपलब्ध करुन देतो. आज अलमट्टी धरणाचे पाणी सोलापूर जिल्हयाला,सोलापूर शहराला हवे आहे म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत. माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांना कर्नाटक राज्यात पाठविले होते. ते तेथील मुख्यमंत्र्यांना, पाटबंधारे मंत्र्यांना भेटून आले. आम्ही त्यांना सांगितले की, पाण्यासाठी किंमत लावणार असाल तर ती किंमत आम्ही देण्यास तयार आहोत. त्या पाण्याच्या बदल्यात पाणी हवे असेल तर दुधगंगेतील पाणी पाऊस पडेपर्यंत शिल्लक रहाणार आहे, त्यातील काही पाणी आम्ही तुम्हाला देण्यास तयार आहोत. एकंदरीत राज्यातील पाण्याची कमतरता दूर करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत आहे. सोलापूरला पाणी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत सरकारला अजून यश आलेले नाही. परंतु त्या बाबतीत गांभीर्याने प्रयत्न चालला आहे. आपण अनेक पाणी लवाद बघितले. वेगवेगळया लवादाच्या निमित्ताने आपल्या राज्याला जास्तीचे पाणी कसे मिळेल अशा पध्दतीचा प्रयत्न सरकारकडून चाललेला आहे.

3...



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 17:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

महोदय, काही सन्माननीय सदस्यांकडून या चर्चेच्या निमित्ताने सरकारवर आरोप केले. विशेषत: दुष्काळी भागासाठी कोणत्या ठोस अशा उपाययोजना करण्यात येत आहेत, अशा प्रकारचा प्रश्न माननीय विरोध पक्ष नेत्यांकडून केला गेला. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात धरणे बांधण्यात आली आहेत. मी पुणे जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करतो. महाराष्ट्रात सगळयात जास्त धरणे पुणे जिल्हयात आहेत. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, आता साधा साठवण तलाव करावयाचा म्हटला तरी त्या तलावासाठी लागणारी जमीन संपादित करताना त्या भागातील शेतकरी मोठया प्रमाणात विरोध करतात.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

तेथील लोकप्रतिनिधी देखील विरोध करतात. सगळ्यांना पाणी पाहिजे, परंतु स्वत:ची जमीन पाण्याखाली जाता कामा नये. सगळ्यांना शेतीसाठी, प्यायला पाणी पाहिजे, परंतु आमच्या भागामध्ये आमची स्वत:ची जमीन घेऊ नका ही भूमिका सगळ्यांनी स्वीकारली तर त्यातून अनंत अडचणी पुढे येत असतात. तरी देखील राज्य सरकारने सर्व विभागांचा समतोल साधण्याचा दृष्टीकोन बाळगला आहे. शासनाने मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भ या सगळ्या भागामध्ये धरणे बांधण्याचा प्रयत्न केला आहे. अजून काही धरणे शेवटच्या टप्प्यात आहेत. तेथे वेगवेगळ्या अडचणी आहेत. याबाबत आरोप-प्रत्यारोप होत आहेत. कामाचा दर्जा चांगला असला पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. या सगळ्या गोष्टी करीत असताना वेगवेगळया प्रकारचे प्रश्न निर्माण होतात.

सभापती महोदय, आज राज्यात दुष्काळ, टंचाईसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. साहजिकच अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर दौरे करावे लागतात. फिल्डवरील अधिकारी काम करीत असतात. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांत, मामलेदार, तहसीलदार यांना योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. ज्या ज्यावेळी अशी संकटे येतात त्या त्यावेळी मुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सहकारी आणि सर्व अधिकारी वर्ग कामाला लागतात. अधिकारी वर्गाला आम्ही आवाहन केले आहे. दुसरा-चौथा शनिवार, रविवार हे सुट्टीचे दिवस बघू नका. आम्ही सर्वजण शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे लोकप्रतिनिधी आहोत, आपण अधिकारी आहात, त्या दृष्टीने काम सुरु केल्यानंतर काही अडचणी येत आहेत. काही ठिकाणी स्टाफ कमी पडत आहे. त्या भागात तातडीने कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी असा शासनाने निर्णय घेतला आहे. हे अधिकार शासनाने विभागीय आयुक्तांना दिले आहेत. मंत्रालयाच्या आदेशाची वाट न पाहता त्यांच्या त्यांच्या विभागामध्ये कर्मचाऱ्यांची भरती करावयाची असेल तर ती तातडीने करण्यात यावी. भरती करण्याकरिता वेळ लागणार असेल तर 58 व्या वर्षी जे सेवेतून निवृत्त होतात, त्यांच्यामधून भरती करण्यात यावी.

सभापती महोदय, हे संकट पुढील काही महिन्याच्या काळासाठी आहे. हवामान खात्याचा अंदाज आहे की, पावसाळा सुरु होईल त्यावेळी चांगला पाऊस पडेल. तोपर्यंत हे संकट झेलावे लागणार आहे. तोपर्यंत दुष्काळग्रस्त भागात त्या त्या खात्यातून निवृत्त झालेले चांगले अधिकारी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

तात्पुरत्या स्वरुपात 3-4 महिन्याकरिता सेवेत घ्यावेत अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यात अडचण येण्याचे काही कारण नाही. मात्र काही ठिकाणी काम करीत असताना अधिकारी चुकारपणा करतात असेही माननीय सदस्यांनी सांगितले. अशा प्रकारचे संकट आल्यानंतर प्रशासनाला विश्वासात घेऊन काम केले पाहिजे. काही जिल्हाधिकारी उत्तम काम करीत आहेत. काही माननीय सदस्यांनी सांगितले की, तुम्ही जिल्हाधिकाऱ्यांची बदली केली. शासनाने कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यांची बदली केलेली नाही. फक्त विरोधकांनीच चर्चा करायची. बदलीचे आदेश केव्हा काढले, कोणी काढले?

सभापती महोदय, बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली अजिबात झालेली नाही. यांनी काही वेगळे केले असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. उलट ज्या भागात दुष्काळ आहे तेथील प्रशासकीय यंत्रणा चांगल्याप्रकारे कामाला लागण्याकरिता राज्य सरकारला निर्णय घ्यावाच लागतो. तशा पध्दतीने मुख्यमंत्र्यांनी, त्यांच्या सहकाऱ्यांनी हे सगळे निर्णय घेतले आहेत. त्या पध्दतीने काम सुरु आहे. मागच्या काळात काम करताना काही चुका घडल्या. मागील काळात चारा डेपो मंजूर करण्यात आले. त्यातून प्रश्न सुटेल असे शासनाला वाटत होते. पण प्रश्न सुटण्याऐवजी लोकांनी काही चुका केल्या, ज्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केला. या संदर्भात चौकशी सुरु आहे. लवकरच अहवाल आल्यानंतर जे कोणी दोषी असतील त्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, जनावरांच्या छावण्या सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला. हा निर्णय घेत असताना काहीजण सातत्याने भेदभाव करण्याचा प्रयत्न करतात. काहीजण सांगतात की, ठराविक भागात छावण्या जास्त आहेत, ठराविक भागात छावण्या कमी आहेत. राज्य सरकारने ठरविले आहे की, ज्यांना कोणाला छावणी काढावयाची आहे ते छावणी काढू शकतात. कोणी म्हणाले की, पक्षाचे कार्यकर्ते पाहून छावण्यांना परवानगी दिली जाते. वास्तविक पाहता असे अजिबात घडत नाही. मराठवाड्यामध्ये 7896 पैकी 3299 खरिपाच्या गावांमध्ये आणि 3095 रब्बीपैकी 1695 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आढळून आली आहे.

नंतर श्री.जुन्नरे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

त्यानुसार या गावांमध्ये टंचाईच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. मराठवाडयामध्ये जनावरांच्या 63 छावण्या असून संपूर्ण राज्यात 20185 टँकरने पाणी पुरवठा केला जात असून 999 टँकर एकटया मराठवाडयात सुरु आहेत.

सभापती महोदय, मी एक गोष्ट मान्य करतो की, काही भागात जनावरांच्या छावण्या मोठया प्रमाणात आहेत. परंतु चारा छावण्यासाठी तेथील स्थानिक लोक पुढे आल्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणात चारा छावण्या सुरु झालेल्या आहेत. वास्तविक इतर भागातील लोकांनी सुध्दा चारा छावण्या सुरु कराव्यात अशी अपेक्षा आहे. या ठिकाणी एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 420 जनावरांच्या चारा छावण्याचा आकडा कसा काय आला ? महाराष्ट्रात जनावरांच्या छावण्या दिनांक 12.3.2013 पर्यंत 593 असून नाशिक, धुळे, नंदूरबार येथे एकही चारा छावणी उघडण्यात आलेली नाही. अहमदनगर येथे 221, औरंगाबाद-4, जालना-20, बीड-32, ऊस्मानाबाद-7, पणे-1,सातारा-106, सांगली-43, सोलापूर-149 चारा छावण्या उघडण्यात आलेल्या आहेत. नागपूर, गोंदिया गडचिरोली, अमरावती व बुलढाण्ां येथे एकही चारा छावणी उघडण्यात आलेली नाही. चारा छावण्या उघडण्यासाठी आपण सर्वांना सांगितले आहे. छावणी उघडल्यानंतर त्या ठिकाणी एकही जनावर येत नसेल तर छावणी उघडून उपयोग काय ? ज्या ठिकाणी गरज असेल त्या ठिकाणी जरुर छावणी उघडली जाईल. ठराविक जिल्हयात चारा छावण्या का असा काही सन्माननीय सदस्यांना प्रश्न पडला असेल परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या जिल्हयात दुधाचा धंदा मोठया प्रमाणात आहे अशा जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात चारा छावण्या उघडल्या गेल्या आहेत. सातारा, नगर, सांगली या जिल्हयांमध्ये तसेच बीड येथील आष्टी आणि पाटोदा या तालुक्यांमध्ये दुधाचा धंदा मोठया प्रमाणात असल्यामुळे त्या ठिकाणी चारा छावण्या जास्त आहेत. या छावण्यांमध्ये लोक आपले जनावरे घेऊन येतात.

सभापती महोदय,या चर्चेच्या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्यातील कोणत्याही सहकाऱ्यांनी चारा छावणीची मागणी केली आणि त्या ठिकाणी अगोदर चारा छावणी नसेल त्या ठिकाणी चारा छावणीची गरज असेल तर अशा ठिकाणी निश्चितपणे छावणी उघडण्यास परवानगी दिली जाईल. त्यामध्ये कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही. माझे तर म्हणणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

असे आहे की, बऱ्याच लोकांच्या मार्केट कमिटया आहेत, दूध खरेदी विक्री संघ आहेत, सूत गिरण्या आहेत, साखर कारखाने आहेत अशा संस्थांनी चारा छावण्यासाठी पुढे येऊन चारा छावण्या सुरु कराव्यात. अनेक संस्थांना राज्य सरकार वेळोवेळी मदत करीत असते. जिल्हा बँक अडचणीत आल्यानंतर राज्य सरकार करोडो रुपयांची मदत करीत असते. आपल्या भागातील काही वर्ग अडचणीत आल्यानंतर या संस्थांनी पुढे येण्यास कोणीही अडवलेले नाही. परंतु चारा छावणी सुरु करण्यासाठी इच्छाशक्ती असण्याची आवश्यकता आहे. चारा छावण्या उघडण्यास कोणतीही अडचण नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, तुम्ही चारा छावणी उघडण्याऐवजी शेतकऱ्यांच्या दावणीतील जनावरांना चारा उपलब्ध करुन द्यावा. दावणी पर्यंत चारा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात अभ्यास केल्यानंतर तेथपर्यंत चारा उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही असे दिसून आल्यामुळे दावणी पर्यंत चारा पोहचविणे शक्य होणार नाही. जनावरांची संख्या लाखात आहे. जर काही शेतकरी त्यांची जनावरे सांभाळत असतील तर शासनाने अशा जनावरांची जबाबदारी का घ्यावी ? ज्या शेतकऱ्याला गरज असेल तो शेतकरी आपली जनावरे छावणीत घेऊन येईल. चारा छावणीत जनावरांची चांगली व्यवस्था राखली जाते, सकाळ संध्याकाळ जनावरांची मोजणी केली जाते.

सभापती महोदय,मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दीपक सावंत यांनी सांगितले की, जनावरांना शासन औषध पाणी देत नाही. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एका चारा छावणीत किमान 250 जनावरे व जास्तीत जास्त 3000 जनावरे ठेवता येतात असा नियम आहे. छावणीमध्ये जनावरांना मोफत औषधोपचार केला जातो. सन्माननीय सदस्यांनी जे काही नियम सांगितले ते जुने नियम आहेत. चारा छावण्यांच्या संदर्भात आता नवीन जीआर काढण्यात आलेला आहे. जनावरांच्या औषधोपचारासाठी शासनाकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत. या चर्चेच्या निमित्ताने मी पूर्णवेळ सभागृहात हजर नव्हतो परंतु ही सर्व चर्चा मी स्पिकरवरुन ऐकत होतो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

सभापती महोदय, या दुष्काळाच्या संदर्भात विधानसभेत माननीय मुख्यमंत्री उत्तर देत असून या ठिकाणी मी स्वत: उत्तर देत आहे. चारा छावण्याच्या संदर्भात उद्याच नवीन जीआर काढले जाणार आहेत. जुन्या जीआरच्या संदर्भात कोणतीही अडचण बाळगण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, 1972 मध्ये दुष्काळ पडला होता त्यावेळी मी हायस्कूल मध्ये होतो. त्यावेळी पाण्याचा, चाऱ्याचा, धान्याचा आणि कामाचाही दुष्काळ होता. त्या दुष्काळामध्ये या चारही गोष्टी होत्या. यावेळी केंद्र सरकारकडे मुबलक प्रमाणात धान्य आहे. केंद्रातील युपीए सरकारने आम्हाला कळविले आहे की, धान्याची कोठारे भरलेली आहेत. धान्याच्या बाबतीत कोणतीही अडचण येऊ देणार नाही. मला आठवते की, 1972 च्या दुष्काळात विरोधकांना मिलोच्या भाकऱ्या दाखवाव्या लागल्या. त्या लोकांना खाव्या लागल्या होत्या. आज ती गोष्ट नाही. आता तर धान्याचा प्रश्न बाजूलाच निघाला आहे.

आता दुसरा प्रश्न आहे तो हिरव्या चाऱ्याचा. रोजगार हमी योजनेद्वारा देखील आपली कामे सुरू आहेत. यात केंद्र शासनाने देखील मदतीची भूमिका घेतलेली आहे. त्यात कुठली अडचण आहे असे मला तरी वाटत नाही. काल आमच्या सहकाऱ्याची थोडीशी पंचाईत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी केली. मी नरेगाचा अर्थ संपूर्ण सभागृहाला सांगतो. "National Rural Employment Guarantee Act" असा त्याचा अर्थ आहे. "NREGA" चा उच्चार नरेगा करतात. केंद्र शासनाने हा कायदा मंजूर केला आहे. या कायद्यांतर्गत संपूर्ण देशात रोजगार मागणाऱ्या प्रत्येक कुटुंबास किमान 100 दिवस रोजगार देणे बंधनकारक आहे. याच कायद्यास नंतर केंद्र शासनाने महात्मा गांधी नॅशनल रूरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी ॲक्ट असे नाव दिले. त्यामुळे त्याचा उच्चार मनरेगा असा करण्यात येतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या या कायद्यापूर्वीच महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायदा 1977 पासून अंमलात आणला होता. आता आपण महात्मा गांधी नॅशनल रूरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम सुरू केलेली आहे. देशातील काही राज्यांमध्ये असणारी दुष्काळी परिस्थिती, टंचाईची परिस्थिती लक्षात घेता आम्ही केंद्र शासनाला विनंती केली आहे की, 100 दिवस रोजगार देण्याची योजना 150 दिवसांपर्यंत वाढविण्यात यावी. याबाबत केंद्रीय मंत्री श्री.जयराम रमेश यांच्याशी आमचे बोलणे देखील झाले आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये 100 दिवसांचा रोजगार उपलब्ध करून दिला जातो.

...3Y2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

दोन्ही सभागृहामध्ये दुष्काळावर चर्चा सुरू असल्यामुळे आज सकाळी 9.00 वाजता या समितीचे अध्यक्ष आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी केंद्रामध्ये बैठक बोलावून काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यात आपल्याही राज्याला निश्चितपणे मदत झालेली आहे. आपल्या राज्यातील दुष्काळाला सामोरे जाण्याकरिता केंद्राकडून देखील मदत झालेली आहे.

रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग योजना, जवाहर विहीर योजना, जुनी अपूर्ण कामे राज्य सरकारच्या मार्फत घेण्यात येतात. कुठल्याही परिस्थितीत लोकांना कुठेही अडचण येऊ द्यायची नाही, अशा प्रकारची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे. फळबागाच्या नुकसानी संबंधात देखील अनेकांनी वेगवेगळ्या प्रकारची मागणी केली आहे. येथे जालनाच्या मोसंबी बागांचा उल्लेख अनेकांनी केलेला आहे. या सगळयाला सामोरे जात असताना सर्वांना मदत झाली पाहिजे अशा प्रकारची भूमिका राज्य सरकारची निश्चितपणे आहे. याबाबत केंद्र सरकारने देखील सकारात्मक अशी भूमिका घेतलेली आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाची वेळ माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे भाषण संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

अजित पवार : सभापती महोदय, आज जायकवाडी आणि उजनी धरणामध्ये पाणी साठा कमी आहे. वरच्या धरणातील पाणी सोडले पाहिजे अशा प्रकारची भूमिका सरकारने घेतली. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी वेगळ्या प्रकारचे स्टेटमेंट केले. स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसे करायला नको होते याच्याशी आम्ही सर्वजण सहमत आहोत. मंत्री, उपमुख्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर आम्ही एका तालुक्याचे प्रतिनिधीत्व न करता संपूर्ण महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करीत असतो म्हणून आम्ही मधल्या काळात निवंडे धरणाचे पाणी सोडले. श्री.मधुकरराव पिचड यांच्या मतदारसंघात निवंडे धरण असताना त्यांनी पाणी सोडण्यामध्ये पुढाकार घेतला आणि त्यांनी सांगितले की, या धरणातील पाणी जायकवाडी धरणामध्ये गेले पाहिजे. त्याप्रमाणे आम्ही जायकवाडी धरणात पाणी सोडले. मला या ठिकाणी राजकारण आणायचे नाही. परंतु काही खासदारांनी पाणी सोडू नका म्हणून आंदोलन केले. नगरचे खासदार पाण्यात उभे राहून पाणी सोडू नका म्हणून आंदोलन करीत होते आणि पाणी मिळाले पाहिजे असे औरंगाबादचे लोक म्हणत हाते. असे प्रकार देखील राजकीय पक्षामध्ये चालतात. काही जण राज्याचा विचार न करता येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत पुन्हा निवडून येण्यापुरता तात्पुरता विचार करतात आणि तशा प्रकारे मागणी करतात.

सभापती महोदय, सन 2003 मध्ये देखील अशाच प्रकारचा दुष्काळ पडला होता त्यावेळी वरसगाव, पानशेत, खडकवासला, टेंमघर आणि पवना या पाच धरणातील प्रत्येकी दोन टीएमसी पाणी उजनी धरणात सोडण्यात आले होते. आता देखील जायकवाडी धरणात पाणी सोडले आहे. काही वेळेला आम्हाला कठोर निर्णय घ्यावे लागतात. समोर पाणी दिसते परंतु तेथे आम्ही आठ तासांच्या ऐवजी दोन-तीन तास वीज देतो. शेतकरी म्हणतात आमच्या जमिनी गेल्या आम्ही येथे बाजूला शेती करतो, परंतु आपण आम्हाला आठ तास वीज देत नाही. आपणास ते पाणी 31 जुलै 2013 पर्यंत पुरवायचे असल्यामुळे आमचा नाईलाज झालेला आहे. शेतकऱ्यांना शेती करण्यामध्ये अडचण यावयास नको असे आम्हाला देखील वाटते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, आपण गेल्या वर्षीचे पाण्याचे साठे पाहिले तर गेल्या वर्षी कोकणात 51 टक्के पाण्याचा साठा होता आज 57 टक्के आहे. गेल्या वर्षी मराठवाड्यात 26 टक्के साठा होता यावर्षी 11 टक्के आहे. मराठवाड्यातील येलदरी, माजलगाव, निम्नतेरणा, मांजरा आणि जायकवाडी या धरणांमध्ये पाण्याची परिस्थिती अतिशय बिकट आहे. गेल्या वर्षी नागपूरमध्ये पाण्याचा साठा 36 टक्के होता या वर्षी 39 टक्के आहे. अमरावतीमध्ये 29 टक्के होता आज 33 टक्के आहे. नाशिकमध्ये 32 टक्के होता, आज 26 टक्के आहे. पुणे विभागात 43 टक्के होता आज 36 टक्के आहे अशी पाण्याची परिस्थिती आहे.

सभापती महोदय, एखादे धरण दोन रिजनला पाणी देणार असेल तर त्या दोन रिजनच्या विभागीय आयुक्तांनी एकत्र चर्चा करुन त्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. जर त्या धरणातून एकाच जिल्ह्यातील गावांना किंवा शेतकऱ्यांना पाणी द्यावयाचे असेल तर त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. त्यामध्ये राज्य सरकार, पाटबंधारे विभाग वा कोणीही हस्तक्षेप करणार नाही. कारण कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम जिल्ह्याचा प्रमुख म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना करावयाचे आहे. तेव्हा विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत की, पाड्यावर असणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या योजना आणि एकंदरीत असलेली शेती याचा विचार करुन नियोजन करावे आणि पिण्याचे पाणी 31 जुलै 2013 पर्यंत पुरेल या दृष्टीने राखून ठेवावे. मग उर्वरित पाणी हिरवा चारा घेण्यासाठी देता आले तर त्यासाठी द्यावे.

सभापती महोदय, जायकवाडीवरुन पाणी नेल्याशिवाय जालना जिल्ह्याला पाणी मिळू शकत नव्हते. तेथील परिस्थिती अडचणीची आहे. त्याकरिता तिथे जो काही निधी लागेल तो देण्याची भूमिका स्वीकारुन निधी उपलब्ध करुन दिला. त्यामुळे जालना जिल्ह्याला निश्चितच मदत झालेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

महोदय, जालना शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी 40 कोटी रुपये त्वरित उपलब्ध करुन दिले आहेत. उस्मानाबादला 51 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. उस्मानाबाद येथे तर उजनीवरुन पाणी नेलो. काही जण म्हणाले की, या मुळे मराठवाड्यावर अन्याय होत आहे. जालना, उस्मानाबाद इतकेच नव्हे तर मनमाड सारख्या शहरात 15-15 दिवसांनी पाणी मिळते. अशा विविध प्रश्नांबाबत राज्य सरकारने महत्त्वाची भूमिका घेतली.

महोदय, आम्ही दुष्काळी भागात दौरे करीत असताना लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात आणून दिली. ते म्हणाले की, साई प्रकल्पासाठी चार-पाच कोटी रुपयांची मदत झाली तर आमचे पाणी उशिरापर्यंत पुरु शकेल. कॅबिनेटने तातडीने त्यास मान्यता दिली आणि त्यांना कामाला लागण्यास सांगितले. बजेट मंजूर झाल्यानंतर 1 एप्रिलला त्यांना पैसे जाणार आहेत. सोलापूरचे माननीय पालकमंत्री या ठिकाणी नाहीत. परंतु सोलापूर येथील माननीय लोकप्रतिनिधी येथे आहेत. सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, काही काही ठिकाणी उजनीचे पाणी जस जसे पुढे जाईल तस तसे फुटवॉल मोकळे पडतील आणि नंतर बार्शीसारखे शहर किंवा उजनीवर अवलंबून असलेली शहरे अडचणीत येतील. आम्ही त्यांना कामाचे प्लॅन एस्टीमेट तयार करुन, कामाला सुरुवात करण्यास सांगितले. एप्रिल महिना सुरु झाल्यानंतर त्यांचे पैसे त्यांना मिळतील.

ज्या ज्या भागात दुष्काळी आणि टंचाई परिस्थिती आहे त्या ठिकाणी राज्य सरकारने मदत करण्याबाबत निर्णय घेऊन त्या संदर्भातील अंमलबजावणी तातडीने करण्याचा प्रयत्न केला आहे. अहमदनगर जिल्ह्यात अनेक बाबतीत अशाच प्रकारच्या अडचणी होत्या. त्या ठिकाणी ताबडतोब जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांना सूचना दिल्या. त्या ठिकाणी योजना सुरु झाल्यामुळे अहमदनगरमध्ये किती तरी टँकर कमी लागले आहेत. मी असा दावा करणार नाही की, सर्वच गोष्टी व्यवस्थित सुरु आहेत. परंतु एवढ्या मोठ्या दुष्काळाला सामोरे जात असताना कदाचित सरकार म्हणून काही त्रुटी राहू शकतात. परंतु सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाने त्या लक्षात आणून दिल्या तर त्या बाबत तातडीने कार्यवाही केली जात आहे किंवा केली जाईल ही बाब मी या निमित्ताने निदर्शनास आणून देतो.

महोदय, 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील नियमित नळ पाणी पुरवठा

..2..

श्री.अजित पवार....

योजनेच्या चालू वीज देयकाच्या 33 टक्के रक्कम ग्रामपंचायतीने भरल्यास उर्वरित 67 टक्के रक्कम राज्य शासनाने भरण्याचा निर्णय घेतला. सांगली, सातारा या भागात प्रचंड दुष्काळ आहे. त्यासाठी त्या भागात टेंभू, ताकारी, म्हैसाळ, उरमोडी या योजनांचे पैसे भरले. त्या भागात कुसळीशिवाय काही उगत नाही. त्या ठिकाणी माणूस जगण्यासाठी माणसी जेवढे पाणी लागते तेवढे पाणी दुर्दैवाने तेथे मिळत नाही. त्या ठिकाणी पाणी नेण्याचा प्रयत्न झालेला आहे. मध्यंतरी उरमोडी, टेंभू योजनेला जो निधी हवा होता तो दिला. येत्या 20 मार्चला अर्थसंकल्प सादर होणार आहे. त्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी दुष्काळ वा टंचाई आहे त्या ठिकाणी निधी देण्यास राज्य सरकार तसूभरही कमी पडणार नाही. शिवाय सोलापूरला देखील मदत केली जात आहे.

महोदय, पुणे जिल्ह्यात जनाई-शिरसाई, पुरंदर उपस सिंचन योजना आहे. मी ज्या जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतो त्या ठिकाणी एक छावणी आहे. जर त्या ठिकाणी या उपसा सिंचन योजना सुरु झाल्या नसत्या तर तेथे सुध्दा अनेक छावण्या उघडल्या गेल्या असत्या. म्हणजेच जेथे सिंचनाची कामे झालेली आहेत त्या ठिकाणी निश्चितच कमी प्रमाणात छावण्या सुरु कराव्या लागल्या आहेत. माननीय मंत्री श्री.गुलाबराव देवकर हे जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. विधानसभेच्या माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी लक्षात आणून दिले की, पाण्याची अडचण पाहता मुक्ताईनगर उपसा सिंचन योजना सुरु करण्याची आवश्यकता आहे. आम्ही त्यामध्ये कसल्याही प्रकारचे राजकारण न आणता पुरेसे पैसे देऊन ती योजना सुरु करण्याचा प्रयत्न केला.

महोदय, सांगली जिल्ह्यातील जत येथील बिरनाळ तलावात टेंभू उपसा योजनेचे पाणी आणण्यासाठी 25 कोटी रुपयांचा निधी आवश्यक होता. 65 ते 80 कि.मी. अंतरावरुन त्या गावांना पाणी आणावे लागत होते. त्या लोकांना किती तरी वेळ टँकरची वाट बघावी लागत होती. आम्ही ते काम तातडीने हातामध्ये घेतले आणि त्यांना मदत केली. सभापती महोदय, एवढ्यावरच आम्ही थांबलो नाही,

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

तर पाणीपुरवठा योजनांच्या बाबतीत तातडीच्या उपाययोजना आणि योजनांच्या विशेष दुरुस्तीकरिता जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना कमी रकमेचा अधिकार होता तो अधिकार वाढवून 25 लाख रुपयांपर्यंतचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला. जर आमच्या जिल्हाधिकाऱ्यांना वाटले की, एखाद्या योजनेसाठी 25 लाख रुपये खर्च करावयाचा आहे तर तो खर्च त्यांच्या स्वत:च्या स्तरावर ते करु शकतात. विभागीय आयुक्तांचा अधिकार 1 कोटी रुपयांपर्यंत वाढविला. टँकर भरुन घेण्यासाठी विद्युत पंप, ऑईल इंजिन भाड्याने घेण्यासाठी टंचाई निधीमधून खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. जसजसे एकंदरीत बाष्पीभवन व्हावयास लागले, उन्हाची तीव्रता भासावयास लागली, पाण्याची टंचाई भासावयास लागली तसतसे अशा पध्दतीचे निर्णय राज्य सरकारने तिथल्यातिथे घेतलेले आहेत, ही बाब सुध्दा मला या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाच्या समोर आणावयाची आहे.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु नव्हते तोपर्यंत जो काही निधी लागला तो आम्ही आकस्मिकता निधीमधून निधी घेतला आणि चालू वर्षात चारा छावण्यांकरिता जवळपास 749 कोटी 29 लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचे काम करण्यात आलेले आहे. 2011-2012 मध्ये देखील 9 उपाययोजनांकरिता 164 कोटी रुपये इतका निधी पाणी टंचाईकरिता आणि जून 2012 पर्यंच्या कालावधीकरिता खर्च करण्यात आला आहे. आता फेब्रुवारी, 2013 पर्यंत 413 कोटी रुपयांचा निधी पाणी टंचाईकरिता खर्च करण्यात आला आहे. हे करीत असताना आम्ही जानेवारी 2013 ते जुलै 2013 पर्यंतचा पिण्याच्या पाण्याचा कृती आराखडा देखील तयार केला आहे आणि या बाबतीत आवश्यक ते नियोजन करण्यात आलेले आहे. या बाबतीत राज्य सरकारने कोठेही कुचराई केलेली नाही. सर्व निर्णय घेत असताना साधारणत: 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या गावांमध्ये एकूण 10 उपाययोजना आम्ही लागू केलेल्या आहेत. त्यामध्ये जमीन महसुलामध्ये सूट, सहकारी कर्जाचे रुपांतर, शेती पंपाच्या वीज बिलात सव्वा तेहत्तीस टक्के सूट, परीक्षा शुल्कात माफी, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीला स्थगिती तसेच बाधित शेतकऱ्यांची वीज जोडणी थकित बिलामुळे खंडित न करणे आणि खंडित केली असेल तर तात्काळ जोडणे या बाबी आहेत.

..2...

RDB/ D/ MMP

श्री. अजित पवार .....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मघाशी बोलत असताना सांगितले की, महाराष्ट्रातील काही भागातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. माझी या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना विनंती आहे की, नैसर्गिक संकटे येतात पण संकटे आली म्हणून घाबरुन जाऊ नये. त्यांनी नाउमेद होऊ नये. राज्य सरकार आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. काहीही झाले तरी त्यांनी घेतलेले कर्ज कोणत्याही बँकेचे असले तरी बॅकेला त्यांची वसुली करता येणार नाही. या संदर्भात आता आम्ही त्यांना आवाहन करीत आहोत. शेवटी कोणावर कोणते संकट येईल हे सांगता येत नाही. पुन्हा त्यांना नवीन कर्ज घेण्याकरिता देखील आम्ही पात्र ठरविणार आहोत. पावसाळा सुरु झाल्यानंतर नवीन पीक कर्ज द्यावेच लागणार आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण पीक कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिली पण पीक विम्याच्या आलेल्या पैशातून कर्जाचे पैसे का वसूल केले ?

श्री. अजित पवार : मी सुरुवातीपासूनच ज्या गोष्टी राज्य सरकारने केलेल्या आहेत, त्या केल्या म्हणून मी सांगत आहे. आज दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आणखी काही नवीन मुद्दे सांगितलेले आहेत. त्या मुद्यांच्या संदर्भात केवळ या कानाने ऐकून त्या कानातून सोडून देणार अशा पध्दतीची राज्य शासनाची भूमिका अजिबात नाही. जरुर त्या संदर्भामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही सर्व बसू आणि त्यामध्ये कोठे काही चुकले असेल तर दुरुस्त करु. माझा स्वत:चा असा दावा आहे की, जो काम करतो तोच चुकतो. जो कामच करीत नाही तो कायमचा बिनचूक असतो. यामुळे काही चुका होत असतील. चूक झाली तर चूक झाली असे कबूल करु आणि ती चूक दुरुस्त करुन दाखवू अशी खात्री मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना देऊ इच्छितो.

पिण्याचे पाणी त्याचबरोबर टँकरच्या बाबतीत या ठिकाणी सांगण्यात आले. विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच दोन्ही बाजूच्या सदस्यांनी सांगितले की, काही ठिकाणी विहिरीमध्ये पाणी दिसले पण त्या ठिकाणी टँकर सुध्दा चालू आहेत, अशा काही घटना घडत आहेत. त्या घटना लक्षात आणून दिल्यानंतर तो राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे, काँग्रेसचा आहे, भारतीय जनता पक्षाचा आहे, शिवसेनेचा आहे की मनसेचा आहे हा कसलाही विचार त्या ठिकाणी केला जाणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

जर कोणी दुष्काळी व टंचाईच्या परिस्थितीत मयताच्या टाळूवरील लोणी खाण्याचे काम करीत असेल तर त्या औलादीला त्याची जागा दाखविण्याचे काम राज्य सरकार निश्चितपणे करील. परंतु हे काम करीत असताना मेहेरबानी करुन एवढ्या वेळी त्याला वाचवा, जाऊ द्या असे सांगण्यासाठी दोन्ही बाजूपैकी कोणीही येता कामा नये. हे सुध्दा मी आवर्जून सांगू इच्छितो.

या राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यात दौरे केले आहेत. वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या सहकाऱ्यांनी केले आहेत. हे दौरे कशासाठी केले असे राजकीय पक्षाच्या सहकाऱ्यांकडून विचारणा केली जाते. ज्या ठिकाणी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब दौऱ्यावर गेले होते तेथे काँग्रेसचे मंत्री दौऱ्यावर गेले नाहीत असे काहीजण म्हणतात. तुम्हाला असे म्हणण्याचे काय कारण आहे ? काँग्रेसचे मंत्री जातील किंवा जाणार नाही. निर्णय होणे महत्वाचे आहे. दौऱ्यासंबंधी आम्ही सर्वजण एकच आहोत असे समजतो. आम्ही कोणत्या कारणामुळे वेगळे झालो होतो हे आपल्याही माहिती आहे. त्यामुळे ताटात काय आहे आणि वाटीत काय आहे हे पाहू नये. त्यामुळे काही फरक पडत नाही. त्याकरिता आपण काही काळजी करण्याचे कारण नाही. दौरा करण्यासाठी आमचे नेते येऊ देत किंवा त्यांचे नेते येऊ देत. दुष्काळासाठी प्रमुख नेते दौ-यावर जातील, संबंधितांशी चर्चा करतील.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.प्रभाकर घार्गे आणि इतर सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. माझ्या दौऱ्याच्या वेळी तुम्ही सहभागी व्हायचे नाही असे मी जिल्हाधिकाऱ्यांनाही सांगत असतो. ज्या ठिकाणी माझा दौरा संपेल तेथे जिल्हाधिकाऱ्यांनी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी, कृषी अधिकाऱ्यांनी व संबंधित अधिकाऱ्यांनी यावे असे सांगितलेले आहे. त्या ठिकाणी मी चर्चा करीन. त्यावेळी मी कोठे कोठे काय लक्षात आले ते त्यांना सांगतो. कारण शिष्टाचाराप्रमाणे माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या वेळी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना फिरावे लागते. त्यामुळे टंचाईची कामे अडून राहतात. हे टाळण्यासाठी मी आमच्या लोकप्रतिनिधींनाही आवाहन केले आहे की, आपण दौरे करु पण त्या दौऱ्यामुळे दुष्काळाच्या कामावर परिणाम होतो, अधिकाऱ्यांना त्या दौ-यात सहभागी व्हावे लागते. बैठकीत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.अजित पवार....

सहभागी व्हावे लागते, अशा प्रकारची वेळ येता कामा नये. याबद्दलची खबरदारी आम्ही घेतलेली आहे. त्यामुळे आमचे दौरे व्यवस्थित झाले आहेत. आज माननीय श्री.शरद पवार साहेबांनी दौरा केला आहे. त्यामुळे आजच्या सकाळच्या बैठकीत ते निर्णय घेऊ शकले.

मुख्यमंत्री महोदयांनी व आम्ही दौरे केले आहेत. त्यामुळे दिल्लीमध्ये गेल्यावर प्रश्न सोडविण्यासाठी काय अडचण आहे ते समजते. केंद्र सरकारची जी काही मदत पाहिजे ती घेता येते. तसेच दौरे केल्यामुळे राज्य सरकारच्या माध्यमातून निर्णय घेता येतो. एखादा निर्णय घेत असताना एखाद्या सचिवांनी मंत्रालयात बसून हे करण्याची गरज नाही असे सांगितले तर, त्यावेळी आम्ही त्यांना अधिकारवाणीने सांगत असतो की, बाबा तू अजून बाहेर पडलेला नाही, हे असेच करावयाचे आहे आणि त्याची अंमलबजावणी करीत असतो. मदत व पुनर्वसन खात्याचे सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे स्वत: दर आठवड्याला मंगळवार किंवा बुधवार या दिवशी बैठक घेतात. त्या बैठकीला प्रत्येक जिल्ह्याचे संपर्क मंत्री, पालक मंत्री तेथे अडचणी सांगत असतात. सर्व खात्यांचे सचिव तेथे उपस्थित असतात. त्याप्रमाणे प्रत्येक आठवड्याला बैठका होत असतात. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्याचा पहिला विषय असतो. आठवड्यामध्ये आपापल्या भागात दौरे करुन आल्यानंतर वेगवेगळे प्रस्ताव बैठकीत सादर केले जातात. त्याबाबत ताबडतोब अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून केला जातो.

सभापती महोदय, टंचाईग्रस्त जिल्ह्यात टँकर्स सुरु करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना होता. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी हा अधिकार प्रांताधिकाऱ्यांना द्यावा अशी मागणी केली होती. प्रांताधिकाऱ्यांना हा अधिकार देऊन चालणार नाही. मी सरकारच्या वतीने आज जाहीर करतो की, हा अधिकार आता तेथील तहसीलदारांना देण्यात येईल. 15 जिल्ह्यांमध्ये जेथे वाईट परिस्थिती असेल तेथे हा अधिकार तहसीलदारांना असेल आणि इतर ठिकाणी हा अधिकार प्रांताधिकाऱ्यांना असेल. तहसीलदारांना अशाही सूचना देण्यात येतील की, जर एखाद्या गावाने टँकरची मागणी केली असेल तर त्या गावाने जीएसडीएचे प्रमाणपत्रही आणण्याचे कारण नाही.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

तहसीलदाराने जागेवर जाऊन खरोखरच पाण्याची गरज आहे का हे पाहायचे आणि पाण्याची गरज असेल तर ताबडतोबीने टँकर सुरु करायचा असा निर्णय सरकार म्हणून आम्ही करीत आहोत.

स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनेचे 67 टक्के वीज बील भरण्याचा निर्णय आम्ही करीत आहोत. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 12 गावांच्या, 15 गावांच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना आहेत. त्या संदर्भात आणि इतरही ज्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना असतील त्या योजनांमधील 15 गावापैकी 10 गावे टंचाईग्रस्त असतील आणि त्यांची 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असेल तर आणि इतर 5 गावांची परिस्थिती बरी असली तरी देखील आम्ही निर्णय जाहीर करीत आहोत की, 20 टक्क्या पेक्षा जास्त टंचाईग्रस्त गावे ज्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये असतील अशा योजनांचे देखील 67 टक्के वीज बिल राज्य शासन भरील. यामुळे 2400 गावांना याचा फायदा होणार आहे. टंचाईग्रस्त 15 जिल्हयामध्ये टँकर लावण्याकरिता जीएसडीएच्या प्रमाणपत्राची असेलेली अट काढून टाकलेली आहे. टंचाईग्रस्त गावातील महावितरण कंपनीचा ट्रान्सफॉर्मर जळाला किंवा नादुरस्त झाला तर नवीन ट्रान्सफॉर्मर ताबडतोबीने बसविला जाईल. त्याबाबतीत कोणत्याही प्रकारचा विलंब लावला जाणार नाही.

सभापती महोदय, टंचाईग्रस्त गावांमध्ये जनावरांच्या छावण्या सुरु करण्यासाठी 5 लाख रुपये अनामत रक्कम ठेवण्यास सांगितले होते. नंतर ती रक्कम 2 लाखापर्यंत खाली आणली. शेवटी शेतक-यांची जनावरे अडचणीमध्ये आहेत म्हणून आता अनामत रकमेची अट काढून टाकीत आहोत. जनावरांच्या छावण्या सुरु करण्याकरिता आता कोणतीही अनामत रक्कम घेतली जाणार नाही. टंचाईग्रस्त गावामध्ये सोयी सुविधा देण्याच्या बाबतीत राजकारण केले जाते असे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी सांगितले. मी सांगू इच्छितो की, जर ग्रामपंचायतीने मागणी केली, मग ती ग्रामपंचायत कोणत्याही पक्षाची असो किंवा कोणत्याही पक्षाची नसो, त्या ग्रामपंचायती, विकास सोसायट्या किंवा कृषी उत्पन बाजार समित्या पुढे आल्या तर त्यांना जनावरांच्या छावण्या तेथल्या तेथे देण्यात येतील. या बाबतीत एवढीच अट आहे की, त्या छावणीमध्ये कमीत कमी 250 जनावरे असली पाहिजेत. अशा प्रकारचे अधिकार जिल्हाधिकारी आणि प्रांताला देण्याचा निर्णय आजच्या चर्चेच्या निमित्ताने आपण घेत आहोत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : ज्या सवलती जाहीर केलेल्या आहेत त्या दुष्काळी भागासाठी आहेत की टंचाईग्रस्त भागासाठी आहेत ?

श्री. अजित पवार : ज्या 15 जिल्ह्यामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे अशा गावांसाठी सवलती आहेत. टँकर सुरु करण्यासाठी आणेवारीची अट नाही.

श्री. रामदास कदम : दुष्काळग्रस्त की टंचाईग्रस्त शब्दप्रयोग केलेला आहे ?

श्री. अजित पवार : दुष्काळग्रस्त असा शब्दप्रयोग केलेला नाही. या संदर्भात मागे देखील खूप चर्चा झाली. रेकॉर्डला दुष्काळ शब्द नाही. टंचाई असा शब्द आहे. परंतु जेव्हा दिल्लीला प्रस्ताव पाठवावा लागतो त्यावेळी तो दुष्काळ म्हणून पाठवावा लागतो.

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये "दुष्काळ" असा शब्दप्रयोग केलेला आहे.

श्री. रामदास कदम : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. अजित पवार : मला वाटते सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आता हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची आवश्यकता नाही. मी त्यांचे भाषण शांतपणे ऐकून घेतलेले आहे. आता त्यांनी देखील माझे भाषण शांतपणे ऐकून घ्यावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, सरकारने 150 कोटी रुपयांपर्यंतचे 15 तालुक्यात 16 सिमेंट बंधाऱ्यांची कामे हाती घेतली होती. त्यातील 830 बंधारे पूर्ण झाले आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, बंधाऱ्यांचा कामाचा दर्जा खराब असतो. कृषी विभागाकडे इंजिनिअर नाहीत. आर.सी.सी.मध्ये केलेले सिमेंट बंधारे मी स्वत: बघितले आहेत. या बाबतीत सरकारने असा निर्णय घेतला आहे की, दगड बांधकामात बंधाऱ्यांची कामे करु नका. बंधाऱ्यांची कामे आर.सी.सी.मध्ये करा. त्याप्रमाणे आर.सी.सी.च्या माध्यमातून सिमेंट बंधारे, नाले बंधाऱ्यांची कामे सरकारने हाती घेतलेली आहेत. ती कामे चांगल्या प्रकारे होत आहेत. आम्ही एवढेच सांगतो की, क्युरींगसाठी पाणी ज्या ठिकाणी उपलब्ध असेल त्याच ठिकाणी या कामांना प्राधान्य द्यावे. तशा प्रकारचे नियोजन राज्य सरकारने केलेले आहे. या कार्यक्रमाचा चांगला परिणाम होतो म्हणून येत्या नवीन वर्षामध्ये ही कामे मोठया प्रमाणात हाती घेतली जाणार आहेत. शिरपूर पॅटर्नप्रमाणे ओढा आणि नाला थोडासा रुंद करतो, उकरतो, तसेच त्यांची खोली वाढवितो. तशी कामे सुध्दा हाती घेतली आहेत. दुष्काळ निवारणाची तातडीने योजना म्हणून पहिला जो कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे, त्यासाठी येत्या वर्षामध्ये तिपटीने तरतूद वाढवून तो कार्यक्रम यशस्वीपणे राबविला जाईल.

सभापती महोदय, 2012-13 या वर्षात महात्मा फुले जलभूमी अभियानांतर्गत गाळ काढण्याच्या कामासाठी 80 कोटी रुपयांची तरतूद केली होती. हा कार्यक्रम आणखी जोमाने नेण्याकरिता लोकसहभाग आणि योजने बरोबर विहीर पुर्नगठन व वनराई बंधारे ही कामे हाती घेण्याच्या संदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुराला 145 रुपये मजुरीचा दर होता. 1 एप्रिल पासून मजुरीचा दर 162 रुपये करण्यात आलेला आहे. रोजगार हमी योजनेची कामे प्रभावीपणे करण्यासाठी विभागाने सुमारे 2508 डाटा एन्ट्री ऑपरेटर्स, तांत्रिक कर्मचारी आणि अभियांत्रिकी कंत्राटी पध्दतीवर घेतलेले आहेत. रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुराला प्रतिदिन 162 रुपये मजुरी दिली तरी ती मजुरी कमी आहे. त्यांच्या प्रतिदिन मजुरीचा दर 200 रुपये करावा अशी काही सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, भागामध्ये परिस्थिती बरी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

आहे. रोहयोवरील मजुरांच्या मजुरीचा दर प्रतिदिन 200 रुपये केला तर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आपणास देखील मान्य करावे लागेल की, शेतकऱ्याच्या शेतावर जाणारा शेतमजूर लगेचच म्हणतो मला तिकडे एवढी हजेरी मिळते. आम्हाला देखील कळते की, मस्टरवर काम करणाऱ्या माणसाला जास्त मजुरी मिळाली पाहिजे. परंतु 200 रुपये प्रतिदिन मजुरी दिली तर शेतकऱ्यांच्या शेतावर काम करण्यासाठी मजूर मिळणार नाहीत ही गोष्ट आपणास मान्य करावी लागेल. शेतकऱ्यांच्या शेतात काम करण्यासाठी मजूर मिळाले नाही तर बिचाऱ्या शेतकऱ्याच्या शेतीतून निघणारे संपूर्ण उत्पन्न बुडेल.

महोदय,मी देखील शेती करतो. माझ्याकडे देखील शेती आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचा कारखाना आहे, त्यांना देखील परिस्थितीची माहिती आहे. काही सदस्यांना रोहयोवर काम करणाऱ्या मजुरांना प्रतिदिन 162 रुपये मजुरी दिली जाणार आहे, ही बाब पटणार नाही. रोहयोवर काम करणाऱ्या मजुरांला जास्त मजुरी मिळाली पाहिजे. गरीब मजुरांना जास्त पैसे मिळाले पाहिजे. आम्ही या बाबतीत केंद्र सरकारशी चर्चा केली आहे की, टंचाईग्रस्त परिस्थिती असणाऱ्या जिल्हयांमध्ये जो मजूर मस्टरवर काम करण्यासाठी येईल, त्याला सवलतीच्या दरामध्ये गहू आणि ज्वारी देण्याकरिता राज्य सरकारला कोटा वाढवून द्यावा. ती मागणी केंद्र सरकारने तत्वत: मान्य केलेली आहे. त्या मजुरांना सवलतीच्या दरात धान्य मिळाले व प्रतिदिन 162 रुपये मजुरी मिळाली तर त्यांना काही अडचण येणार नाही.

सभापती महोदय, जलसंपदा विभागांतर्गत व प्रस्तावित योजनापैकी पिण्याच्या पाण्याच्या आवश्यक योजनांना प्राधान्य देऊन, त्या योजना तातडीने पूर्ण करुन त्या त्या भागातील पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी दुष्काळ निवारण करण्यासाठी 9 हजार कोटी रुपयांची मदत जाहीर करावी अशी मागणी केली. केंद्र सरकारकडे 3 लाख मेट्रीक टन गहू आणि तांदूळ या धान्याची मागणी राज्य सरकारने केलेली आहे. ती मागणी देखील मान्य होण्याची शक्यता आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, जलसंधारण, जलसंपदा, पाणी पुरवठा, कृषी विषयक सिंचन शेततळी इत्यादी उपाययोजना राज्याच्या नियोजित अर्थसंकल्पामध्ये होण्याची शक्यता आहे. परंतु त्याबाबत आताच मला काही सांगता येणार नाही. कारण आपल्या राज्याचा अर्थसंकल्प मी येत्या 20 मार्च रोजी सभागृहाला सादर करणार आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.......

परंतु आजच या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला आणि सभागृहाला मी सांगू इच्छितो की, एकंदरीत नियोजित अर्थसंकल्पाच्या 25 टक्के रक्कम या सगळ्या कामाकरिता ठेवण्याचा शासनाचा मानस आहे. एकंदरीत बजेटच्या 25 टक्के रक्कम ही कृषी विषयक सिंचन, ठिबक, शेततळी, पाणीपुरवठा, जलसंपदा, जलसंधारण या कामांकरिता ठेवणार आहोत. हा एक महत्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे.

सभापती महोदय, लाँग टर्मकरिता अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे, काही निर्णय हे टंचाईग्रस्त भागाला मदत करण्याकरिता तात्पुरत्या स्वरुपाचे घेतले आहेत. जेणेकरुन टंचाईच्या प्रश्नावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा शासनाचा मानस आहे. आजच केंद्र सरकारने रब्बी हंगामासाठी वाढीव मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. फळबागांना जीवदान देण्यासाठी मदत जाहीर केली आहे. या निर्णयाचा अभ्यास करुन लवकरच अंमलबजावणी करण्यासाठी पावले उचलली जातील.

सभापती महोदय, खरिपाच्या मदतीकरिता केंद्र सरकारकडून मिळालेला निधी शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी 681 कोटी रुपये इतकी पुरवणी मागणीद्वारे तरतूद केली आहे. यापूर्वीच उपलब्ध झालेला निधी विचारात घेता 900 कोटी रुपये शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. लवकरच केंद्र सरकारच्या निकषाप्रमाणे या मदतीचे वाटप होईल. या ठिकाणी गारपिटीबद्दल मुद्दा उपस्थित करण्यात आला. मागील 2 महिन्यात गारपीट आणि अवेळी पाऊस यामुळे राज्यात 62 हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले आहे. 2010 मध्ये पावसामुळे झालेल्या नुकसानीकरिता राज्य शासनाने नुकसान भरपाईचे जे दर जाहीर केले त्याच दरानुसार शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल.

सभापती महोदय, फळबागांना प्रती हेक्टर 10 हजार रुपये आणि इतर पिकांना प्रती हेक्टर 5 हजार रुपये मदत दिली जाईल. या व्यतिरिक्त केंद्र सरकारच्या धोरणानुसार 7 हजार हेक्टरसाठी 30 हजार रुपये अनुदान देणार आहोत. त्यात बागा वाचविण्याकरिता ठिबक आणि तुषार सिंचनाकरिता शेतकऱ्यांची वाढीव मागणी लक्षात घेता केंद्र सरकारकडून 1 ते 1.5 लाख हेक्टर क्षेत्रावर अनुदान मिळत असल्यामुळे यापुढे राज्य सरकारच्या वतीने किमान 1 लाख हेक्टरवर अतिरिक्त क्षेत्राला ठिबक आणि तुषार संच बसविण्यास केंद्र शासनाच्या अनुदान दराने अर्थसहाय्य देण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/गितेनंतर 18:30

श्री.अजित पवार.......

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अशी मागणी केली की, ऊसाकरिता पण ठिबक सिंचनाचा वापर झाला पाहिजे, पाणी वाचविले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केली त्यावेळी मी सभागृहात उपस्थित नव्हतो. पण ही वस्तुस्थिती आहे. आज महाराष्ट्रात सगळ्यात जास्त साखर कारखाने सोलापूर जिल्हयामध्ये आहेत. 30 साखर कारखाने एकट्या सोलापूर जिल्हयात आहेत. एकेकाळी सोलापूर हा दुष्काळी, रब्बीचा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. हीच स्थिती उस्मानाबाद जिल्हयाची आहे. निश्चितपणे ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. पाणी जास्त घेणारी केळी, ऊस ही नगदी पिके घेण्याकडे राज्यातील शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. एक एकर ऊसाला जेवढे पाणी लागते त्यापेक्षा कितीतरी कमी पाण्यामध्ये 15 ते 20 एकर भूसार पिके घेता येतात. त्यासाठी राज्य सरकार या भूमिकेशी सहमत आहे. आपल्याला एकत्र बसून पीक पध्दती बदलावी लागेल.

सभापती महोदय, आम्ही आवाहन केले आणि मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतल्यानंतर लोकप्रतिनिधींकडून एक महिन्याचे वेतन दुष्काळ निवारणासाठी दिले गेले त्याबद्दल मी सगळ्यांना धन्यवाद देतो. परंतु साखर कारखान्यांकडून टनामागे 10 रुपये कापून घेणार आहोत. जेणेकरुन 600 लाख मे.टन ऊस गाळप झाल्यास 60 कोटी रुपये मिळतील. साखर कारखाने जेवढे पाणी वापरतात त्या मानाने ही रक्कम कमी आहे. यापुढील काळात राज्य सरकार खाजगी किंवा सहकारी साखर कारखान्यांना सांगणार आहे की, तुमच्या कार्यक्षेत्रात ठराविक वर्षात म्हणजे 3 किंवा 5 वर्षात तुमचे सगळे ऊस क्षेत्र ठिबक सिंचनावर आणलेच पाहिजे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

अशा प्रकारचा निर्णय राज्य सरकार घेऊ पाहत आहे. यामध्ये राजकारण न आणता सर्वांनी सहकार्य केले तर मोठया प्रमाणात पाण्याची बचत होईल. नागरीकरण वाढत असतांनाही आपल्याला पाणी देता येईल तसेच शेतकऱ्यांच्या पिकालाही पाणी देता येईल.

सभापती महोदय,शेततळी अस्तरीकरणासाठी, फळपिकांसाठी केंद्र शासनाकडून 50 टक्के अनुदान दिले जाते. परंतु फळ पिकांसाठी अतिरिक्त 25 टक्के अनुदान राज्य सरकार तर्फे दिले जाईल. इतर पिकांसाठी केंद्राकडून मदत मिळत नाही त्या पिकांच्या अस्तरीकरणासाठी राज्य सरकार 50 टक्के अनुदान उपलब्ध करुन देईल. त्यामुळे यावर्षी 10 हजार शेततळयाच्या अस्तरीकरणासाठी जे काही पैसे लागतील ते उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, फळबागांची लागवड हेक्टरी किती आहे त्या प्रमाणे निधी वाटला जाणार आहे त्यामुळे कोणत्याही भागावर अन्याय होणार नाही. दुष्काळाची झळ शेतकऱ्यांना पोहचू नये यासाठी राज्य सरकानने पीक विम्यावर विशेष लक्ष दिलेले आहे. सन 2011-12 मध्ये पीक विम्यासाठी 175 कोटी रुपये दिले असून व फळ पिकांसाठी 50 कोटी रुपयांची नुकसानभरपाई शेतकऱ्यांना मिळालेली आहे. या वर्षी रब्बी हंगामात विमा उतरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत तिप्पट वाढ झालेली आहे. अगोदर पिकाचा विमा उतरविणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 3 लक्ष होती आता ती 9 लक्ष झालेली आहे. जोखीमस्तर 60 टक्क्यावरुन 80 टक्के असून राज्याने सुमारे 100 कोटी अतिरिक्त अनुदान विमा हपत्यासाठी दिलेले आहे. आमच्या अंदाजानुसार किमान 300 ते 400 कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर शेतकऱ्यांना विम्याच्या द्वारे नुकसानभरपाई मिळेल. विम्याचे पैसे कापून घेतले जाते असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, विम्याचे पैसे शेतकऱ्यांनाच कसे मिळतील या दृष्टीने राज्य शासन प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, चारा उत्पादनासाठी राज्य शासनाने एक कार्यक्रम हाती घेतलेला आहे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या जनावरांच्या वैरणीची उपलब्धता वाढण्यासाठी कार्यक्रम घेतलेला आहे. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात 4 लाख हेक्टरवर चारा उत्पादनाचा कार्यक्रम शासनाने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

घेतला असून त्यासाठी 100 कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असल्यामुळे हिरव्या चाऱ्याचे उत्पादन 60 ते 70 लक्ष टन होईल असा राज्य सरकारचा अंदाज आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या पिकाची आधारभूत किंमत वाढली पाहिजे यासाठी केंद्र सरकार सातत्याने आम आदमी डोळयासमोर ठेवून निर्णय घेत आहे. राज्य शासनाच्या सततच्या पाठपुराव्यामुळे राज्यातील प्रमुख पिकांच्या आधारभूत किंमतीमध्ये भरीव वाढ झालेली आहे. यावर्षी 20 लक्ष क्विंटल मालाची खरेदी करुन राज्य सरकारने शेतकऱ्यांना चांगला भाव मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, दूरगामी, शॉर्टटर्म योजनेसाठी राज्य सरकारने निर्णय घेतलेले आहेत.

सभापती महोदय,डीपीसीची संदर्भात माझ्या लक्षात एक गोष्ट आलेली आहे. यंदाच्या वर्षी राज्यातील 35 जिल्हयांसाठी जास्त जिल्हा नियोजन निधी देण्याचा माझा स्वत:चा प्रयत्न राहणार आहे. येत्या 20 तारखेच्या अर्थसंकल्पात या संदर्भात सविस्तर माहिती दिली जाणार आहे. हा निधी देत असतांना काही निधी त्या-त्या जिल्हयाच्या पालक मंत्र्यांच्या तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्याही हातामध्ये पाहिजे म्हणून जो निधी डीपीसीला दिलेला आहे त्यातील 4.5 टक्के निधी नावीन्य पूर्ण कामासाठी खर्च करता येतो. टंचाईग्रस्त परिस्थितीमध्ये त्यातील ॲडिशनल 15 टक्के निधी तेथील पालक मंत्र्यांना, जिल्हाधिकाऱ्यांना खर्च करावयाचे असेल व राज्य सरकार व केंद्र सरकारच्या ज्या काही योजना आहेत, त्यामध्ये जर योजना बसत नसेल तर त्या कामांसाठी आपल्यालाला हा 15 टक्के निधी खर्च करता येईल. या संदर्भातील फाईल पालकमंत्र्यांना किंवा जिल्हाधिकाऱ्यांना नियोजन विभागाकडे पाठविण्याची आता गरज नाही. उदाहरणादाखल सांगावयाचे तर 200 कोटी त्या जिल्हयासाठी असतील तर 30 कोटी रुपये तेथील पालक मंत्री व जिल्हाधिकारी खर्च करु शकतील. तातडीने ज्या काही रकमा लागतात त्यासाठी त्यांना मंत्रालयाची वाट बघण्याची गरज राहणार नाही अशा प्रकारचा निर्णय यार्चेच्या नित्तिाने घेतलेला आहे हे मला या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, यंदाच्या वर्षी आम्ही काटकसरीने पाणी वापरत आहोत. कित्येक लोकांना माहीत नसेल की, आज कोयना धरणात गेल्या वर्षी पेक्षा काही टीएमसी पाणी जास्त आहे. उद्याला जर अडचण आलीच तर कोयनेचे पाणी देखील आपल्याला या भागात नेता येईल अशा प्रकारचा आपला प्रयत्न राहणार आहे.

राज्यातील प्रचलित पद्धतीनुसार खरीप-रब्बी अंतिम हंगामाच्या पैसेवारीच्या आधारे 15 डिसेंबर रोजी खरीप आणि 15 मार्च रोजी रब्बी पिकाकरिता आणेवारी जाहीर करून दहा सुविधा देण्यात येतात. तथापि, केंद्र सरकारने दुष्काळ व्यवस्थापन नियमन पुस्तिका 2009 जारी केली आहे. त्यानुसार कृषी दुष्काळ, आणि हायड्रोलॉजिकल ड्राऊट हे दोन प्रकार जाहीर केले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने प्रथमत: हंगामी पैसेवारीच्या आधारे खरीप पिकांकरिता सप्टेंबर महिन्यामध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केली व दहा सुविधांपैकी 4 सुविधा जाहीर केल्या. अंतिम पैसेवारी जाहीर केल्यानंतर उर्वरित 6 सुविधा जाहीर केल्या. या व्यतिरिक्त पैसेवारीशी संबंध न ठेवता महाराष्ट्र भू जल अधिनियम 1993 चे कलम 4 नुसार उपलब्ध पाणी साठा लक्षात घेऊन जिल्हाधिकारी पेय जल टंचाई जाहीर करून एकूण 9 सुविधा उपलब्ध करून देतात. त्यामुळे यात कुठलीही अडचण येत नाही. त्या पाठीमागचे कारण देखील मी सगळ्यांच्या लक्षात आणून दिलेले आहे. गेल्या वर्षी पेक्षा या वर्षी कोयनेचे जास्तीचे पाणी आपण आपल्या हातामध्ये ठेवलेले आहे. कोयनेचे पाणी टेंभू, टाकारी, म्हैसाळ यांना उद्या द्यावेसे वाटले तर ते देता येईल. योजना सुरू आहेत, पण पाणी नाही असे होता कामा नये. एवढी व्यवस्थित बचत आपण त्यामध्ये केलेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कोयनेच पाणी आपण आणावे. आपण कोकणासंबंधी जे आश्वासन दिलेले आहे ते पाळणार की नाही ? कोयनेचे पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. ते कोकणात आणता येऊ शकेल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, याचा सर्व्हे झालेला आहे. ते पाणी फार महागात पडत आहे. ते आता आपल्याला परवडत नाही. बीओटीवर हे काम कोणी करते काय हे देखील आपण पाहिले आहे. जलसंपदा विभागाच्या चर्चेच्या वेळी कोकणचे सुपुत्र जलसंपदा मंत्री श्री.सुनीलजी तटकरे आपले समाधान होईल अशा प्रकारचे उत्तर देतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उजनीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांनी सांगितले की, काही जण उपोषणाला बसले आहेत. आम्हाला देखील काम करत असताना वाटते की, येथे किंवा आझाद मैदानावर कोणालाही उपोषणावर बसावे लागू नये. योग्य असेल तर तातडीने निर्णय घेतले गेले पाहिजे. आपण उजनीच्या पाण्याचे नियोजन करीत आहोत. आज उजनीच्या पाण्याची पातळी 489.102 मीटर आहे. आज तेथे उपयुक्त साठा -23 टक्के आहे. कालवा पातळी 487.20 मीटर आहे. सध्या आम्ही नदी पात्रात सहा हजार क्युसेक्स पाणी सोडले आहे. हे सर्व कशाकरिता केले आहे ? आज सोलापूर येथे पाणी पोचणे आवश्यक आहे. सोलापूरला जाताना पंढरपूरसह इतर अनेक महत्त्वाची गावे व शहरे आहेत. डावा व उजवा कालवा, शाखा, कालवे व इतर वितरिका यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. जर आपण पाणी सोडले तर ते कोणालाही धड मिळणार नाही. आम्ही खूप बारकाईने विचार केला आहे.

जे सन्माननीय उपोषणाला बसले होते त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठकीला देखील बोलाविले होते. माझ्या माहिती प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यां समवेत देखील बैठक झालेली आहे. आज उजव्या व डाव्या कालव्यातून जास्तीत जास्त जाऊ शकणारा विसर्ग हा 1300 क्युसेक्स इतका आहे. नदीत विसर्ग सुरू असल्याने ही क्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. दोन्ही कालव्यामध्ये पाणी पोहोचणारच नाही. मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. मागणीची पूर्तता करणे अजिबात शक्य नाही. हे जलसंपदा विभागाने खूप अभ्यास करून सांगितलेले आहे. त्यामुळे कालव्यामध्ये पाणी सोडता येणार नाही. उलट हे पाणी दोन मतदार संघात जाणार होते. या देशाचे गृह मंत्री आणि या देशाचे कृषी मंत्री यांच्या मतदार संघात जाणार होते. ते पाणी जाताना आम्ही गप्प बसलो असतो काय ? तेथे पाणी सहज जाण्या सारखे असते तर ते आम्ही कुणालाही उपोषण न करता दिले असते. येथे सन्माननीय सदस्य श्री.दीपक साळुंखे किंवा अन्य सन्माननीय सदस्य आहेत त्यांना आपण विचारावे. आज तशी परिस्थिती नाही. आज जे पाणी आहे ते अत्यंत काटकसरीने आम्हा सर्वांना वापरावे लागत आहे. नाईलाजास्तव कॅनॉलला पाणी सोडता येत नाही ही गोष्ट देखील मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात जायकवाडी धरणातील पाणी कारखान्यांना दिले जाते असा एक मुद्दा मांडला होता. मी त्या संदर्भातील सर्व माहिती घेतलेली आहे. त्या ठिकाणी किती पाणी जाते याची मागील तीन महिन्यांची आकडेवारी मी घेतलेली आहे. 31 जुलै 2013 पर्यंत तेथील पाणी पुरेल अशा प्रकारचे नियोजन निश्चितपणे करण्यात आलेले आहे. त्याठिकाणी पाणी वाढवून दिलेले नाही. एमआयडीसीने त्यांच्या कोट्यातील पाणी दिलेले आहे ही वस्तुस्थिती मी मान्य करतो. त्यांनी वेगवेगळ्या कंपन्यांची नावे देखील दिलेली आहेत हे देखील मला येथे आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये टी.व्ही.वर एक बातमी दाखविली जाते की, उजनी धरणातील पाणी डायनामिक कंपनीला दिले जाते आणि त्याला कुणाचा तरी वरदहस्त आहे. आजच्या चर्चेच्या निमित्ताने मी राज्यातील जनतेला तसेच दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, बारामतीमधील डायनामिक डेअरीला एमआयडीसीमार्फत पाणी पुरवठा केला जातो. त्या डेअरीची रोजची पाण्याची गरज 3.5 एमएलडी एवढीच आहे. पाण्याची कमतरता लक्षात घेऊन एमआयडीसीकडून साधारण 1.4 एमएलडी पाणी पुरवठा केला जातो. पिण्याचे पाणी या डेअरीला वळविण्यात आले हा आरोप पूर्णपणे चुकीचा आणि वस्तुस्थितीला धरुन नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, त्या डेअरीमध्ये 10 दुष्काळी जिल्ह्यातून दूध पुरवठा होतो आणि त्या दुधावर प्रक्रिया केली जाते. जर ती डेअरी बंद पडली तर 10 जिल्ह्यातील दुधाचे काय करायचे हा प्रश्न आहे. ते दूध ओतून द्यायचे म्हटले तर शेतकरी दुष्काळामध्ये अडकले आहेत. दुधाचा धंदा हाच त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न आहे. ज्या -ज्या वेळी दुष्काळी स्थिती निर्माण झाली त्या-त्यावेळी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना वाचविण्याचे काम दुधाच्या धंद्याने केलेले आहे. डेअरीच्या मालकाने सांगितले की, मी आताच्या आता डेअरी बंद करण्यास तयार आहे. परंतु आपण ती डेअरी बंद केल्यास त्या डेअरीमध्ये सातारा,सोलापूर, अहमदनगर, नाशिक, जालना, बीड, पुणे अशा दहा जिल्ह्यांतून जो दूध पुरवठा होतो तो बंद होईल आणि शेतकऱ्यांचे नुकसान होईल.

..2..

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी देखील मला सांगितले की, डेअरी बंद करणे आपल्याला परवडणारे नाही कारण एवढ्या मोठ्या दुधावर त्याचा परिणाम होईल. आता देखील मधल्या काळामध्ये दुधाचे जामिंग लागत होते. महानंद डेअरीमध्ये दूध घेतले जात नव्हते. बऱ्याचदा इलेक्ट्रॉनिक्स मीडिया आणि प्रिंट मीडिया माहिती न घेता बातम्या देतात. मग जनतेला वाटते की, एवढी मोठी दुष्काळी परिस्थिती असताना डायनामिक डेअरी चालविण्याचे कारण काय ? याचे उत्तर म्हणजे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता ती डेअरी सुरु ठेवली आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्या बरोबर देखील चर्चा झाली. दुष्काळी भागातील जनतेला मदत करण्याकरिता ती डेअरी चालू ठेवावी लागेल असा सरकार म्हणून निर्णय घेतलेला आहे. या डेअरीमध्ये ट्रीटमेंट होऊन जे पाणी बाहेर पडते ते पाणी दुष्काळी भागातील जनता वापरते ही बाब देखील मी सभागृहाच्या निदर्शनास नम्रतापूर्वक आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी लोक स्थलांतरित करीत असल्याचा मुद्दा मांडला. मी, त्या बाबत सांगू इच्छितो की, औरंगाबाद महसूल विभागातील बीड जिल्ह्यातील काही पारंपारिक कुटुंबे दरवर्षी काही कालावधीकरिता अन्य शहरांमध्ये जातात. शेतीकाम सुरु झाल्यावर ते पुन्हा परत येतात. परंतु काही भागात तशी परिस्थिती निर्माण होत असेल तर तशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून तेथील लोकांसाठी जी काही व्यवस्था केली पाहिजे ती निश्चितपणे सरकारच्या माध्यमातून केली जाईल.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांच्या भाषणात टंचाईग्रस्त भागातील लोकांच्या स्थलांतराचा प्रश्न मांडला होता.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

या भागातून काही झाले तरी स्थलांतर होणार नाही यासाठी शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. टँकरच्या माध्यमातून जनतेचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल. दुष्काळी भागातील जनतेच्या अन्नधान्याचा आणि रोजगाराचा प्रश्न सोडविण्याचे काम करण्यात येईल. मी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांसोबत चर्चा केली. त्यांनी सांगितले की, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 3 लाख मेट्रीक टन अधिकच्या धान्याची मागणी करण्यात आली आहे.

महोदय, या संकटावर मात करण्यासाठी राज्यातील जनता सरकारच्या सोबत असेल अशी मी खात्री बाळगतो. मंत्रिमंडळातील सदस्यांनी आणि काही पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी एक महिन्याचे वेतन दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी दिले आहे. शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सुध्दा मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये एक दिवसाचे वेतन दिले आहे. या निमित्ताने मी राज्यातील जनतेला विनंती करु इच्छितो की, ज्यांना शक्य असेल त्यांनी आपापल्या परिने या संकटावर मात करण्यासाठी खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करावा. ज्यांना दुष्काळाचे चटके बसतात त्यांना कोणताही पक्ष नसतो, कोणताही प्रांत नसतो. या संकटाला सामोरे जाण्यासाठी, दुष्काळी भागातील जनतेच्या दु:खावर फुकर घालण्यासाठी, त्यांना आवश्यक तो आधार देण्यासाठी पक्षभेद विसरुन एकत्र येण्याची आवश्यकता आहे. दुष्काळाच्या या भीषण संकटाला सामोरे जाण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. दुष्काळी भागातील लोकांना मदत पुरवताना राज्य सरकारकडून पक्षपात किंवा प्रादेशिक भेदभाव केला जाणार नाही असे मी सभागृहाच्या माध्यमातून जनतेला आश्वस्त करु इच्छितो. या चर्चेत सहभागी झालेल्या.....

श्री.दिवाकर रावते : महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे भाषण संपण्यापूर्वी मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, उजनीचे पाणी नेणाऱ्या 200 शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांनी केवळ शेतीसाठी पाणी घेतले होते. माझी मागणी आहे की, त्यांच्यावरील गुन्हे मागे घ्यावेत. तसेच जल पुनर्भरणाबाबत मी बोललो होतो. या बाबत प्रांताधिकाऱ्यांचे अधिकार तहसीलदारांना दिले. ग्रामपंचायतीमध्ये जल पुनर्भरणाचे काम बचत गट किंवा माध्यमिक शाळांच्या माध्यमातून केले तर बरे होईल. असे केल्यास ही कामे मोठ्या प्रमाणावर होतील.

श्री.अजित पवार : महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांच्या बाबतीत राज्य सरकार निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेईल. राज्य सरकारला यामध्ये कोणतेही राजकारण





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

करायचे नाही. अशी संकटे येत असतात. हे जाणीवपूर्वक निर्माण केलेले संकट नाही. आपल्याकडे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली की नगदी पिके घेण्याचा प्रयत्न केला जातो. माझ्या उत्तरामध्ये मी ठिबक सिंचन, लॉंग टर्म, शॉर्ट टर्म योजनांच्या बाबतीत विस्तृतपणे सांगितलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. महोदय, या ठिकाणी काहीही जाहीर करायचे आणि त्याची अंमलबजावणी करायची नाही असे करुन चालणार नाही. राज्य सरकार जे 100 टक्के करु शकते त्याच गोष्टी मी सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अजून काही मुद्दे राहिले असतील तर त्याही बाबत राज्य सरकार, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि आम्ही सर्वजण त्या बाबत सकारात्मकच भूमिका घेऊ. हे अधिवेशन दीड महिना चालणार आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजेच साधारणत: 15 एप्रिलच्या दरम्यान आणखी काही गोष्टी पुढे आल्या किंवा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर काही बाबी आढळून आल्या तर राज्य सरकारची अधिकची भूमिका जनतेला सांगण्याचा मी मनापासून प्रयत्न करेन एवढेच सांगतो व माझे दोन शब्द संपवितो.

-------------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, या दुष्काळाच्या चर्चेला आम्ही माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा यासाठी व्यक्त केली होती की, त्यांच्याकडून आम्हाला नीट सर्व प्रकारची उत्तरे अपेक्षित होती. विशेषत: आपल्या सभागृहात माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देणार असल्यामुळे ते डायनॅमिकली काही ठोस करतील असे वाटले होते. पण आज दादा, मला 60-70 टक्के हतबल आणि 25-30 टक्के काही तरी जमते असे दाखवित आहेत. आपण जिल्ह्याजिल्ह्याच्या भांडणाचा उल्लेख केला. जिल्ह्याजिल्ह्यात पाणी सोडण्यावरुन भांडणे सुरु आहेत. एकाच पक्षाचे दोन खासदार, अमुक तमुक सर्व सांगितले. परंतु एकात्मिकृत राज्य जल आराखडा 2005 मध्ये करावयाचा होता तो आजपर्यंत करु शकलो नाही. तो आराखडा या पुढच्या काळात पूर्ण करु असे उत्तर शासनाकडून अपेक्षित होते. ते आम्हाला मिळाले नाही. मध्यंतरी जो 778 कोटी रुपयांचा निधी आला त्यामध्ये 556 कोटी रुपये शेतीकरिता अनुदान आणि 71 कोटी रुपये बागायतीकरिता आले होते परंतु ते वापरले नाहीत. तो निधी दुसरीकडे वापरला. तो निधी जर त्याचवेळी बागायतींना मिळाला असता, जालन्यातील ज्या बागा जळाल्या त्यांना जर तो पैसा मिळाला असता तर त्याचा उपयोग झाला असता. आजही तो पैसा गेलेला नाही. पुरवणी मागण्यांमध्ये ते येईल परंतु 24 जानेवारीला आपण त्या हेडखाली जे पैसे मंजूर केले त्याबाबत मी विचारत आहे.

सभापती महोदय, आमच्या भाषणात आम्ही रोजगार हमी योजनेच्या मजुरीच्या बाबतीत 200 रुपयांची मागणी केली. दादांनी सांगितले की, 200 रुपयांची मागणी जर मान्य केली तर शेतीवर मजूर जाणार नाहीत. जसे आपण धान्याच्या बाबतीत केले त्या पध्दतीने टंचाईग्रस्त गाव असेल, ज्या गावातील आणेवारी 50 पैशाच्या खाली आहे त्या टंचाईग्रस्त गावातील मजूर असतील तर त्यांना 200 रुपये मिळतील असे करु शकतो. या ठिकाणी धान्याच्या बाबतीत सांगण्याचा प्रयत्न होत आहे पण जी कुटुंबे रोजगार हमीवर कामाला जातात ते तसे धान्य घेतील असे आपण कृपया समजू नका. जामखेडच्या चौंडी साठवण तलावाच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले, बाकीच्यांनी आदेश दिले. पण राजकीय दबावामुळे त्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. नियमानुसार मिळावयास पाहिजे असे सांगितले जाते पण अधिकारी घाबरुन करीत नाहीत. या बाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/ KTG

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन मुद्दे उपस्थित केले. चौंडीच्या संदर्भामध्ये स्वत: तेथील सन्माननीय सदस्य श्री. राम शिंदे यांच्या बरोबर माझी चर्चा झ ाली. मी उद्या परवा दोन दिवसात स्वत: श्री. विनोद तावडे साहेब, श्री. एकनाथ पाटील, यांच्या बरोबर चर्चा करु. मी पुन्हा सांगतो की, ज्या ज्या भागामध्ये पाणी देता येणे शक्य आहे त्या त्या ठिकाणी पाणी देण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. कारण सर्वांना पाणी मिळाले पाहिजे. परंतु एखाद्या ठिकाणी लांबून पाणी देत असताना खूप पाणी वाया जात असेल, जसे उजनीच्या ठिकाणी कॅनॉलने पाणी सोडल्यानंतर बरेच पाणी वाया जाणार आहे, त्यामुळे आमचा नाईलाज होतो. आम्हालाही वाटते की, दोन्ही कॅनॉलला पाणी दिले पाहिजे. अशा पध्दतीचे काही मुद्दे आहेत म्हणून त्या संदर्भात अडचण येते.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 200 रुपयांसंबंधी सांगितले. आपण सातारा जिल्ह्याचे उदाहरण घेतले तर त्या जिल्ह्यातील माण आणि खटाव या ठिकाणी टंचाईची परिस्थिती आहे. फलटण, कोरेगाव, खंडाळा येथील काही भागात टंचाई आहे. पण इतर भागामध्ये सुध्दा लोकांना मजूर लागतात. जर आपण काही ठिकाणी 200 रुपये मजुरी आणि काही ठिकाणी 162 रुपये मजुरी असा भेदभाव केला तर मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण होईल. ते आम्हालाही पटते. त्यामुळे त्यांना सवलतीच्या दरामध्ये धान्य मिळाले पाहिजे याकरिता मागणी केली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 19:00

श्री.अजित पवार....

यासाठी शासनाने केंद्र सरकारकडे मागणी केलेली आहे. ते धान्य व 162 रुपये मजुरी मिळाली तर त्यातून बऱ्यापैकी मार्ग निघू शकेल असे शासनाचे मत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघाशी असे म्हणालो होतो की, शासनाने मराठवाड्यावर अन्याय केलेला आहे. याबाबत उप मुख्यमंत्री महोदय आपण असे म्हणालात की, शासनाने मराठवाड्यावर बिलकूल अन्याय केलेला नाही. आपले म्हणणे चुकीचे आहे. मराठवाड्यासाठी कृष्णा खोऱ्याचे 24 टीएमसी पाणी दिले असते तर आष्टी, पाटोदा या भागात दुष्काळ नाही तर सुबत्ता आली असती. धाराशिव या जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे, तेथे पाणी आले असते तर दुष्काळ पडला नसता. शासनाने कृष्णा खोऱ्याचे पाणी मराठवाड्याला दिलेले नसल्यामुळे त्या भागावर नक्कीच अन्याय झालेला आहे. 24 टीएमसी पाणी न दिल्यामुळे तेथे दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याला कारणे काहीही असतील. त्यामुळे मराठवाड्यावर 100 टक्के अन्याय झाला आहे असे आमचे म्हणणे आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी आजही सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या मताशी अजिबात सहमत नाही. तेथे पाऊस पडला असता तर 24 टीएमसी पाणी दिले असते. आज उजनी धरणात पाणी नाही. त्या धरणात कृष्णा खोऱ्यातूनच पाणी येते. त्या धरणात उणे पाणी आहे. पाऊस नसल्यामुळे टंचाई निर्माण झाली आहे. तेथे पाणी दिले असते तर फुटबॉल मोकळे पडले असते. कारण सध्या तेथे पाणीच शिल्लक नाही. त्यामुळे त्या भागावर अन्याय केला असे नाही. एक गोष्ट खरी आहे की, त्या भागाला 24 टीएमसी पाणी लवकरात लवकर दिले पाहिजे. अनुशेषाचे पैसे देत असताना काही ठिकाणी पाणी देण्यासाठी उपसा सिंचन योजनांसाठी 3-3, 4-4 हजार कोटी रुपये द्यावे लागत आहेत. यापूर्वी योजना मंजूर केलेल्या आहेत. परंतु राज्याचे उत्पन्न व खर्च आणि त्यातून विकास कामांसाठी द्यावा लागणारा निधी याचा शासनाला विचार करावा लागतो. मराठवाड्यासाठी भेदभाव केला जात नाही. सगळ्यांना सारखा न्याय देण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी विचारणा केली होती. त्याबाबत मी सांगेन की, आरआरआर म्हणजे, रिपेअर, रिकन्स्ट्रक्शन व रिनोव्हेशन असा त्याचा अर्थ आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ MMP/

श्री.दिपकराव साळुंखे : सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी टंचाईच्या विषयावर, दुष्काळ निवारण करण्यासाठी अतिशय चांगले निवेदन केलेले आहे. उजनीतून पाणी देण्यासाठी त्या धरणात पाणी पाहिजे. वरच्या लोकांची परिस्थिती त्याहूनही वाईट आहे. उप मुख्यमंत्री महोदयांनी टंचाई व दुष्काळाबाबत चांगल्या उपाययोजना सुचविल्या आहेत. त्याबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो. पाण्याच्या टँकरबाबत तहसीलदारांना अधिकार दिलेले आहेत. जत व कवठेमहांकाळ या सारख्या दुष्काळी भागात म्हैसाळचे पाणी आणले आहे. या भागात पिण्याच्या पाण्यासाठी 100-100 टँकर्स सुरु होते म्हणून 25-30 कोटी रुपये तातडीने खर्च करण्याचा निर्णय घेतलेला आहे. चारा छावण्यांबाबत किरकोळ तक्रारी असतील. पण काही ठिकाणी चांगल्या प्रकारे छावण्या सुरु आहेत. जेथे तक्रारी असतील त्याबाबत त्यांनी सांगितले की, काही अपप्रवृत्तीचे लोक असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. जालना व उस्मानाबाद या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या योजना तातडीने राबविलेल्या आहेत. पीक विमा योजनेचे पैसे कापून घेतले जाणार नाहीत हेही सांगितलेले आहे. अशा अनेक चांगल्या योजना तातडीने करण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे. त्याबद्दल मी उप मुख्यमंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी दुष्काळासंबंधी जे जे काही करता येईल ते करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझा एकच प्रश्न आहे की, 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील शेतक-यांच्या कर्जाला आपण स्थगिती दिली. आता जुलैपर्यंत पाऊस पडत नाही. पाऊस पुढे गेलेला आहे. पुढच्या सिझनमध्ये शेतक-याला शेती करणे अवघड होणार आहे. कारण आता तो दुष्काळामध्ये सापडलेला आहे. पुढच्या सिझनसाठी शेतक-याला खते, बियाणे आणि बँकेचा पुनर्कर्ज पुरवठा करण्याबाबत शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री. अजित पवार : मी सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, आपण कर्जाचे पुनर्गठन करतो याचा अर्थ ते कर्ज त्याच्याकडून वसूल न करता नवीन कर्ज घेण्यास त्याला पात्र ठरवितो. जिल्हा सहकारी बँकाना आपण तशा प्रकारच्या सूचना देतो. दरवर्षी राज्य सरकार जी खते मार्केटमध्ये उपलब्ध नसतात त्या खतांचा मोठ्या प्रमाणावर साठा करुन ठेवते जेणेकरुन शेतक-यांना ती खते उपलब्ध होऊ शकतील. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा राज्य सरकार सकारात्मक विचार करील.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 14 मार्च 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 7 वाजून 6 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 14.3.2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही